## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.


# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरिता मार्गदर्शक पुस्तिका

जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणूका -२०१७

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | प्रस्तावना | २-४ |
| १ | मतदार यादी तयार करणे-सर्वसाधारण सूचना | ५-७ |
| २ | नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी - सर्वसाधारण सूचना | ८-१८ |
| ३ | छाननी व अपील -(नियम १९, २०) | १९-२२ |
| ४ | उमेदवारी मागे घेणे | २३ |
| ५ | चिन्ह वाटप- सर्वसाधारण सूचना | २४-२७ |
| ६ | बिनविरोध /अविरोध निवडणूक | २८ |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व मतपत्रिका | २९-३५ |
| ८ | आचारसंहिता-सर्वसाधारण सूचना | ३६-४६ |
| ९ | मतदान केंद्र | ४७-५२ |
| १० | मतदान कर्मचारी वृंद | ५३-६० |
| ११ | मतदान साहित्य | ६१-६८ |
| १२ | मतदानाची तयारी- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे कार्यान्वित करणे | ६९-८६ |
| १३ | जिथे भारत निवडणूक आयोगाची मशीन वापरायची आहेत तिथे | ८७-९० |
| १४ | मतदान | ९१-११३ |
| १५ | मतमोजणी | ११४-१२९ |
| १६ | अनामत रक्कम जप्त करणे | १३०-१३१ |
| १७ | निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावरील सादर करावयाची माहिती | १३२ |
| १८ | परिशिष्ट | १३३-२१२ |

# प्रस्तावना

## १) निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी व अंमलबजावणी :-

भारतीय संविधानाच्या **अनुच्छेद २४३ के** अन्वये जिल्हा परिषदा व पंचायत समित्या निवडणूकांचे अधिक्षण, संचलन, व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले असून, **महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१** व त्या अंतर्गत असणारे, **महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम १९६२, महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचन गण व निवडणूक घेणे ) नियम,१९६२** तसेच **महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (जागांच्या आरक्षणाची पध्दती व चक्रानुक्रम) नियम, १९९६** मधील तरतुदीनुसार निवडणुकांबाबत कार्यवाही केली जाते.

राज्य निवडणूक आयोगाकडील **आदेश क्र. रानिआ-२०१६/अहाका/प्र.क्र.१०/सं.क, दि. ४/१०/२०१६** च्या आदेशान्वये दिलेल्या सुचनांनुसार निवडणुकीशी निगडित सर्व अधिकाऱ्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये अनपेक्षित परिस्थिती हाताळतेवेळी खालील अग्रक्रमाप्रमाणे असणाऱ्या तरतुदींचा विचार करावा.

- संविधानातील तरतुदी
- संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थाकरिता अधिनियम व नियमातील तरतुदी,
- मा. सर्वोच्च/उच्च न्यायालयाचे निर्णय
- राज्य निवडणूक आयोगाने पारित केलेले आदेश, सूचना, इ.

उपरोक्त तरतुदींनुसार देखील एखादी परिस्थिती हाताळणे शक्य नसल्यास आयोगाकडे अभिप्रायासह अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तरी या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करावा.

## २) निवडणूक अधिकारी यांची भुमिका / कार्यपध्दती :-

संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत व रितसरपणे पार पाडणे हे मुख्यत्वे करुन निर्वाचन अधिकारी व त्यांचे अधिनस्त कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे. छोटीशी चूक किंवा चुकीची कार्यपध्दती अथवा अपूर्ण माहिती / गैरसमजूत / चुकीचा अन्वयार्थ यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्दबादल होऊ शकते याची नोंद घ्यावी.

ही मार्गदर्शक पुस्तिका केवळ माहितीकरीता व मार्गदर्शनाकरीता तयार करण्यात आली असून ती सर्वसमावेशक किंवा अधिनियम व नियमाला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे व त्यामुळे आवश्यकतेनुसार अधिनियम व नियमातील तरतुदी मुळात वाचणे व संदर्भासाठी तपासणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश, सूचना, परिपत्रके इत्यादी देखील संदर्भासाठी पहाणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या कामाकरीता विहित केलेले नमुने, प्रपत्रे इ. आवश्यकतेनुसार पुरेशा प्रमाणात तयार करुन ठेवणे आवश्यक आहे.

**कर्तव्याची रुपरेषा :-**

- निवडणुकीची व्यवस्था आणि कामाची आखणी निवडणूक कार्यक्रमास सुरुवात होण्यापूर्वीच करणे जसे आवश्यक कर्मचारीवृंद अधिग्रहित करणे, मतदान केंद्राची पहाणी करणे, पोलिसांच्या सहाय्याने संवेदनशील-अतिसंवेदनशील मतदान केंद्र निश्चिती करणे, कमजोर सामाजिक घटकांचा (Vulnerable Mapping) शोध घेणे, मतमोजणी आराखडा तयार करणे, आयोगास सादर करावयाच्या अहवालांच्या नमुन्यांचे, तसेच आवश्यक नोटिसा, नमुने संगणीकृत करून ठेवणे इ.
- आपल्याकडील जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समितीच्या निर्वाचक गणांची आवश्यक ती सर्व माहिती असणारी तसेच निवडणुकीची तयारी (वाहतूक आराखडा, मतदान साहित्य, कर्मचारीवृंद वै.) दर्शविणारी माहिती पुस्तिका निवडणूक निरीक्षकांसाठी तयार ठेवणे
- पुरेशा प्रमाणात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व इतर साहित्य उपलब्ध करुन घेणे.
- निवडणुकीची अधिसूचना व जाहीर नोटीस देणे, नामनिर्देशनपत्रे व अनामत रक्कम स्विकारणे, उमेदवाराकडून शपथपत्र / घोषणापत्र / हमीपत्र स्विकारणे.
- उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रातील व शपथपत्रातील माहिती प्रसिध्द करणे.
- नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे नामनिर्देशनपत्र नाकारण्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करणे.
- उमेदवारी मागे घेण्याच्या नोटीसांची पोच पावती देणे.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप करणे.
- नामनिर्देशनांची नोटीस, वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे.
- मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करणे.
- मतपत्रिकांची (पोस्टल बॅलट पेपर व मतपत्रिका इ. सह) संख्या निश्चित करणे व छपाई व पुरवठयाची / वितरणाची व्यवस्था करणे.
- स्वच्छ, निर्भय व नि:पक्षपाती रितसर निवडणुकांकरीता उमेदवार व राजकीय पक्षांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे, नियमांतील तरतुदी वा अन्य सूचना देवून अद्यावत ठेवणे त्यासाठी आवश्यक तेवढा संपर्क ठेवणे.
- निवडणुका व्यवस्थित पार पाडणेकरीता कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यांचा आढावा घेणे व आचरसंहिता पालन / अंमलबजावणी याकरीता आवश्यक उपाययोजना करणे.
- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरासाठी मतदानाच्या किमान एक आठवडा (मतपत्रिका तयार झालेबरोबर लगेच ) अगोदर तयार (Set & Seal) करणे.
- **मतदान व मतमोजणी प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्रांच्या कार्यपध्दतीची नीट माहिती करुन देणे व त्यांना आत्मविश्वास जोपर्यंत येत नाही तोपर्यंत त्याचे प्रशिक्षण देणे.**

- मतदान पथके, EVM, मतदानाचे इतर साहित्य इ. च्या वाहतूक आराखडा तयार करणे, व त्याप्रमाणे व्यवस्था करणे.
- मतदान पथके, मतपत्रिका, EVM व इतर साहित्य रवाना करणे.
- मतदानानंतर EVM सुरक्षितपणे ठेवण्याची व्यवस्था करणे.
- मतमोजणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
- निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतमोजणी ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेस करणे.
- निकाल जाहिर करणे.
- **मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर / EVM व सर्व मतदान साहित्य सांविधानीक व असांविधानिक लिफाफे इत्यादींसह जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या ताब्यात देणे.**
- **परिणामकारक नियंत्रण.**
- **सर्वसाधारण पर्यवेक्षण.**

**४) जिल्हा निवडणूक अधिकारी / जिल्हाधिकारी यांनी करावयाची काही महत्वपूर्ण व्यवस्था.**

- जिल्हा सनियंत्रण समिती स्थापणे, त्यासाठी आवश्यक सर्व विभागांचे सहाय्य घेणे
- आवश्यकतेनुसार विभागीय आयुक्तांकडून, निर्वाचन अधिकारी, सहायक निर्वाचन अधिकारी उपलब्ध करून घेणे व प्रत्येक मतदान केंद्राकरीता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी तसेच इतर कर्मचारी उपलब्ध करून देणे.
- मतदान कर्मचाऱ्यांना (राखीव कर्मचाऱ्यांसह) सखोल व पूर्ण प्रशिक्षण देणे.
- सांविधानिक तरतुदी, कायद्यातील- नियमातील तरतुदी, आयोगाच्या विशेष सूचना, आदेश व परिपत्रके निर्वाचन अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.
- महत्वाच्या बाबींची तपासणी सूची तयार करणे व ती देणे
- मतपत्रिका / मतदान यंत्रे व कार्यपध्दती याबाबत सर्वसाधारण जनता, राजकीय पक्ष, उमेदवार व जनसंपर्क माध्यमे यांना अवगत करणे.
- आवश्यक साहित्य जसे मतपत्रिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, न पुसणारी शाई, निवडणूक साहित्य, विभेदक चिन्ह, पितळी सील इ. उपलब्ध करुन देणे.
- मतपत्रिकांची तसेच निवडणूक कर्मचारी व पोलीस मतदारांसाठी टपाली मतपत्रिका छपाईची व्यवस्था करणे.
- निवडणुका पूर्ण झाल्यानंतर EVM व निवडणूक कागदपत्रे व साहित्य सुरक्षित ठेवणेसाठी गोदामांची व्यवस्था करणे
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची खर्चाचे हिशेब तपासणे.

या सर्व प्रकारच्या कार्यवाहीकरीता व निवडणूका सुव्यस्थितपणे पार पाडण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाशी नियमित संपर्कात रहाणे आवश्यक आहे.

# प्रकरण १
# मतदार यादी तयार करणे
## सर्वसाधारण सूचना

१.१ राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी जिल्हा परिषदेसाठी निवडणूक विभाग आणि पंचायत समितीसाठी निर्वाचक गणानुसार विभागून ती निवडणुकीसाठी छापून घेणे व अधिकाऱ्यांनी प्रमाणित करणे आवश्यक आहे. असे करताना संबंधित क्षेत्राची विधानसभेची मतदार यादी जशी असेली तशी संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचक गणामध्ये विभागावयाची आहे. त्यामध्ये कोणतीही नावे वाढविणे, कमी करणे किंवा त्यामध्ये सुधारणा करणे इ.ची अनुमती देण्यात आलेली नाही. मतदार यादी विभागण्याचे काम हे “कट ॲण्ड पेस्ट ऑपरेशन” असून विधानसभा मतदार यादीच्या कोणत्याही भागात बदल करता येणार नाही.

१.२ मतदार यादी विभागताना निवडणूक विभाग / निर्वाचक गणाच्या हद्दीवर राहणाऱ्या मतदारांच्या संदर्भात विशेष दक्षता घेणे आवश्यक असून त्यासाठी गरज वाटल्यास स्थळ पाहणी करुन यादी विभागावयाची आहे. असे करताना एका निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील हद्दीतील मतदारांची नावे शेजारच्या मतदार यादीत समाविष्ट होणार नाही हे पाहणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या यादीला पुरवणी यादी असल्यास (विशेषत: नावे वगळणे, दुरूस्ती, पत्ता दुरूस्ती) त्यांचा काळजीपूर्वक विचार करुन त्यानुसार मतदार यादीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

१.३ राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार, निवडणूक विभाग / निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यापूर्वी, संबंधित निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील मतदारांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात याव्यात व त्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या तारखेपर्यंत संबंधितांकडून हरकती व सूचना मागविण्यात याव्यात.

१.४ प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीमधून जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या निवडणुकांकरिता मतदार याद्या तयार करताना -

(अ) काही छपाईच्या चुका असल्यास त्या सुधारण्यात याव्यात.

(ब) दुसऱ्या निवडणूक विभाग / निर्वाचक गणामधील मतदार चुकून अंर्तभूत झाले असतील तर त्यांची नावे त्या निवडणूक विभागातून / निर्वाचक गणातून वगळण्यात यावीत व संबंधित निवडणूक विभाग / निर्वाचग गणात समाविष्ट करण्यात यावीत.

(क) जिल्हा परिषदेच्या निवडणूक विभाग / पंचायत समिती निर्वाचक गण क्षेत्रातील विधानसभेच्या यादीत मतदारांची नावे असूनही जिल्हा परिषद / पंचायत समितीच्या निवडणुकीच्यावेळी मतदार यादीमध्ये त्यांची नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात यावीत.

१.५ त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदार याद्या अधिप्रमाणित करण्यात याव्यात व त्याबद्दलची सूचनाही प्रसिध्द करण्यात यावी.

अधिप्रमाणित करित असताना मतदार यादीच्या मुखपृष्ठावर स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव, प्रभागाचे नाव, मतदार यादी प्रसिद्ध केल्याचा दिनांक, त्या यादीमध्ये समाविष्ट यादी भागातील विभागाचा (section) तपशिल, मतदार यादीचा गोषवारा (मतदार क्रमांक, स्त्री-पुरूष व एकूण मतदार) छापावा. यादीच्या प्रत्येक पानावर पान क्रमांक, जिल्हाधिकारी कार्यालय यांचा गोल शिक्का व ती तयार करावयास प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याची सही असावी. शेवटच्या पानावरील प्रमाणपत्रावर अधिप्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्याची सही व शिक्का असावा.

i) मतदार यादीच्या वरच्या बाजूस आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकाचा (Cut Off Date) म्हणजेच विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याच्या दिनांकाचा स्पष्ट उल्लेख असावा.

ii) मतदार यादीच्या प्रत्येक पानावर यथास्थिती प्रारूप /अंतिम मतदार यादी असे स्पष्ट नमूद करण्यात यावे अथवा शिक्का मारावा.

१.६ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी-१०९६/सीआर-३४/९६/पीआर, दिनांक १९ नोव्हेंबर, १९९६ अन्वये मतदार यादीसंदर्भातील आयोगाचे अधिकार संबधित जिल्हाधिकाऱ्यांना प्रदानित करण्यात आले आहेत. तरी दिलेल्या अधिकारांचा योग्य तो वापर करून प्रभाग निहाय मतदार यादी विभाजन व त्याचे जतन करण्याची संपुर्ण जबाबदारी हि जिल्हाधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांची असेल.

१.७ राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकास मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिध्द करण्यात याव्यात. त्यासाठीची पुर्व तयारी करण्यात यावी.

१.८ लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० च्या कलम ३१ मध्ये ज्या व्यक्तीने नावाची नोंदणी मतदार यादीत एकापेक्षा जास्तवेळा केली असेल त्यांच्याविरुध्द दावा चालविण्याची व न्यायालयात अपराध सिध्द झाल्यास १ वर्षापर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. परंतु सदरचे अधिकार मतदार नोंदणी अधिकाऱ्यास असल्याने मतदार यादीमध्ये प्राप्त तक्रारीवर कारवाई करणेकामी संबंधितांना तसेच जिल्हाधिकारी यांना लेखी कळवावे व उपरोक्त तरतुदीस प्रसिध्दी देवून, जिल्हा परिषद / पंचायत समिती क्षेत्रातील मतदारांच्या निदर्शनास मोठया प्रमाणात आणण्यात यावी.

१.९ मतदार यादीतील दुबार नावाबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक- रानिआ/मनपा/२००७/प्र.क्र.६/का.५, दिनांक २४ एप्रिल, २००७ नुसार कार्यवाही करावी.

१.१० स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीतील मयत अथवा स्थानांतरीत मतदारांबाबत करावयाची कार्यवाहीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा/२०१०/प्र.क्र.४/का.५, दि.११/१०/२०१० कृपया पहावेत.

१.११ निवडणूक विभाग /निर्वाचक गणाच्या याद्या राजकीय पक्षांना विनामूल्य देण्याची तरतूद अधिनियम / नियम यामध्ये नसल्याने त्या छपाईकरिता झालेल्या खर्चाचा विचार करुन त्यानुसार ठरविण्यात आलेल्या दराने मूल्य घेवून देण्यात याव्यात. यासंबंधीचे राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/जिपपंस/२००६/ प्र.क्र.२५/का.७, दि. १४/०१/२००७ कृपया पहावे.

१.१२ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये तोतयेगिरीबाबत मतदान केंद्राध्यक्षांनी करावयाची कार्यवाहीबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा२०११/प्र.क्र.१६/का.०५, दि.२२/१०/२०१० संबधितांच्या प्रशिक्षणावेळी सांगावेत.

१.१३ राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांनुसार मतदार विभाजनाविषयक कार्यपद्धती अवलंबावी. जसे Computerised Voterlist Bifurcation चे सॉफ्टवेअर वापरून मतदार यादीचे विभाजन करणे वै.

## प्रकरण २

# नामनिर्देशन पत्राबाबतच्या तरतुदी
# सर्वसाधारण सूचना

### २.१. निवडणूक सूचना :

२.१.१ महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६१ मधील नियम ११ व महाराष्ट्र पंचायत समित्या ( निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम १९६२, नियम १३ अन्वये राज्य निवडणूक आयोग सार्वत्रिक वा पोट निवडणूक कार्यक्रम जाहीर करेल.

२.१.२ महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निवडणूक विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६१ मधील नियम १२ व महाराष्ट्र पंचायत समित्या ( निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम १९६२, नियम १४ नमूद तरतुदीनुसार जिल्हाधिकारी राज्य निवडणक आयोगाने दिलेला कार्यक्रम व नामनिर्देशन पत्र स्विकारण्याचे ठिकाण व इतर तपशील विहित नमुन्यात प्रसिद्ध करतील (परिशिष्ट-१)

### २.२. नामनिर्देशन पत्र :

**२.२.१** राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नामनिर्देशन पत्राच्या नमुन्यात उमेदवार आपले नामनिर्देशन पत्र दाखल करेल. (परिशिष्ट-२-अ)

२.२.२ राज्य निवडणूक आयोगाने नामनिर्देशनपत्र उमेदवारांना सहज रितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केले आहे. सर्व संभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र भरणे आवश्यक आहे. या संगणक प्रणालीद्वारे सर्व उमेदवारांनी त्यांचे नामनिर्देशनपत्र भरावे. त्याचे प्रिंट आऊट घेऊन त्यावर स्वाक्षरी करावी. असे स्वाक्षरी केलेले प्रिंट आऊट नामनिर्देशनपत्र म्हणून निर्वाचन अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने सादर करावयाचे आहे. असा भरलेला नामनिर्देशनपत्राचा नमुना नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राहय धरण्यात येईल. ( यासाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रमातील सूचना पहाव्यात)

२.२.३ नामनिर्देशपत्रासोबत उमेदवाराचे गुन्हेगारी पार्श्वभुमीबाबत व स्थावर /जंगम मालमत्तेचा तपशील देणारे सुधारीत नमुन्यातील शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे. (आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/का-०५,दि.१५/३ /२००४ व क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१५/ प्र.क्र.५१/का-७, दि.२१/०४/२०१६)

(परिशिष्ट-२-ब)

नामनिर्देशपत्रासोबत देण्यात येणारी **शपथपत्रे संगणक प्रणालीवर भरता येतील व त्याचेही प्रिंट आउट्स साक्षंकित करून** नामनिर्देशनपत्राच्या स्वाक्षरी केलेल्या संगणकीय प्रिंट आऊटसोबत निर्वाचन अधिकारी यांच्याकडे दाखल करावे.

नामनिर्देशपत्र दाखल करुन घेतेवेळी अर्जासोबत जोडावयाची शपथपत्रे व जोडपत्रे त्याच दिवशी संगणक प्रणालीवर अपलोड करण्याची जबाबदारी निर्वाचन अधिकारी यांची असेल. ज्यावेळी अशी सुविधा सॉफ्टवेअर मध्ये उपलब्ध असेल त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**२.३. सूचक :**

**२.३.१** नियम १४(१) नुसार नामनिर्देशन पत्रावर उमेदवारासह एका सूचकाची सही राहील. जी व्यक्ती मतदार म्हणून अपात्र नसेल व ज्या विभागात उमेदवारास नामनिर्देशीत करावयाचे आहे अशा संबधित विभागाच्या मतदार यादीत ज्याचे नाव समाविष्ट केले आहे अशी कोणतीही व्यक्ती सूचक म्हणून पात्र राहील

२.३.२ राज्य निवडणूक आयोगाकडील मान्यता प्राप्त राजकीय पक्ष तसेच नोंदणीकृत राजकीय पक्ष, अपक्ष सर्व उमेदवारांच्याबाबतीत सूचकांची संख्या ही एकच राहील.

२.४. **नामनिर्देशनपत्र दाखल करणे/वेळ/ठिकाण :**

२.४.१ नियम ११ अन्वये प्रसिद्ध नोटिशीत नमूद दिवशी, वेळेत व ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्र स्विकारतील.

२. ४.२ सदरचे नामनिर्देशनपत्र उमेदवार स्वत: वा सुचकामार्फत निवडणुक निर्णय अधिकाऱ्यास सादर करतील. त्यावेळी त्यांचे सोबत जास्तीत जास्त २ व्यक्तिंना प्रवेश मिळेल.

२.४.३ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या दालनात उमेदवारांची गर्दी होण्याची शक्यता असते व त्यामुळे विहित वेळेमध्ये, सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दाखल होणाऱ्या सर्व उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे दाखल करून घेण्यास अडचण होऊ शकते. सबब आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार शेवटच्या दिवशी ठिक ३.००वा ( कार्यक्रमात नमूद वेळेस) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचे दरवाजे बंद करावेत. तत्पूर्वी १० मिनिटे पुकारा करून तसे करत असल्याची ताकीद दयावी. व नंतर सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण नामनिर्देशन पत्र घेऊन दालनात उपस्थित उमेदवारांची नामनिर्देशन पत्रे विहित पद्धतीने स्विकारावीत. अशी सर्व नामनिर्देशन पत्रे विहित वेळेत प्राप्त झाल्याचे मानले जाईल. परंतु कोणत्याही उमेदवारास विहित वेळेनंतर बाहेरुन कागदपत्र आणून सादर करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२.४.४ आयोगाचे निरीक्षक कार्यालयात उपस्थित असल्यास त्यांनी या सर्व कार्यपद्धतीचे निरीक्षण करावे व आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.

२.४.५ नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याच्या व छाननी तसेच चिन्ह वाटपाच्या सर्व प्रकियेचे डिजीटल कॅमेऱ्याने (तारीख,वेळ दर्शविणाऱ्या) छायाचित्रण करावे.

**२.५. नामनिर्देशन पत्र सादर करतेवेळी उपस्थित राहू शकणाऱ्या व्यक्ती व गाडयांची संख्या :**

२.५.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात जास्तीत जास्त २ वाहनांना परवानगी देण्यात येईल. उमेदवार मिरवणुकीने येत असल्यास १०० मीटर अगोदर मिरवणूक थांबवावी, त्यासाठी योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवावा.

२.५.२ उमेदवार वा त्याचा सूचक नामनिर्देशन पत्रे दाखल करणेसाठी जात असताना त्यांचे सोबत जास्तीत जास्त २ व्यक्ती (एकूण ४) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात उपस्थित राहू शकतात.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी अनावश्यक गर्दी रोखणेकामी पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने, योग्य तो पोलीस बंदोबस्त राखावा

२.६. **नामनिर्देशन पत्रांची संख्या :**

२.६.१ उमेदवार एकापेक्षा जास्त निवडणूक विभाग / निर्वाचक गणात नामनिर्देशनपत्रे भरु शकतात.

२.६.२ एक निवडणूक विभाग / निर्वाचक गणातून जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात.

२.६.३ एकाच निवडणूक विभाग /निर्वाचक गणातून एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे भरली तरी अनामत रक्कम एकदाच स्विकारण्यात यावी. परंतु वेगवेगळया निवडणूक विभाग /निर्वाचक गणासाठी स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल.

२.७. **प्राप्त नामनिर्देशनपत्रांना अनुक्रमांक देणे :**

२.७.१ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रांना अनुक्रमांक देणे आवश्यक आहे, उदा. अनु.क्र/जि.प/सा.नि.२०१७ तसेच न चुकता प्राप्तीची वेळ, तारीख टाकून सही करावी. सोयी करिता एक स्वतंत्र रजिस्टर ठेवावे, जेणेकरून दररोज प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशन पत्रांना सलग क्रमांक देताना गोंधळ होणार नाही.

२.७.२ एका उमेदवारास जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात, व ती तो एकाचवेळी वा वेगवेगळी आणून देऊ शकतो. जर उमेदवार एकाच वेळी ती आणून देत असेल तर त्या सर्वांना एकामागे एक क्रमांक दयावेत.

२.८ **नामनिर्देशनपत्राची प्राथमिक तपासणी** :

२.८.१ नामनिर्देशनपत्राची प्राथमिक तपासणी म्हणजे छाननी नव्हे, या तपासणीचा उद्देश केवळ टाळल्या जाऊ शकल्या जाणाऱ्या छोटयाशा तांत्रिक वा लिपीक चुकांमुळे नामनिर्देशनपत्र फेटाळले जाऊ नये.

- जी जागा ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, त्याच प्रवर्गातील उमेदवारांना सदर जागेची निवडणूक लढविता येईल. सबब सादर करण्यात आलेले नामनिर्देशनपत्र हे त्याच प्रवर्गासाठी आहे याची खात्री करावी.
- शासनाने विशेष मागासप्रवर्गात ज्या प्रवर्गाचा समावेश केला आहे त्यांना नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यामधून निवडणूक लढविता येईल. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.एसईसी/एमएमसी-११९६/प्र.क्र.१९६/का-३,दि.७/१०/१९९६ व शासनाचे पत्र क्र.सीबीसी-१०९६/सी-१२५८/ प्र.क्र.२३८/ मावक-५, दि.५/१०/१९९६ पत्र पहावे.
- नामनिर्देशनपत्रावर सूचक व उमेदवार यांची सही आहे.
- नामनिर्देशनपत्रात नमूद उमेदवारांचा/सूचकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक व नाव हे मतदार यादीतील अनुक्रमांक व नावाशी जुळते आहे वा कसे हे तपासावे. कधी कधी मतदार यादीतील अनु.क्र. लिहीताना चुका होऊ शकतात. तरी त्या तात्काळ दुरूस्त करून घेता येतात. (आयोगाचे पत्र क्र.रानिआ/ मनपा२००८/प्र.क्र.१२/का.५, दि.२३ जन, २००८ अन्वये सूचना) मूळ मतदार यादीतच नाव वा फोटोबाबत खात्रीलायक टंकलेखनीय चूक दिसून येत असेल तर निर्वाचन अधिकाऱ्याने त्याबाबत स्वत:ची खात्री करावी व योग्य तो निर्णय घ्यावा.

- उमेदवार हा दुसऱ्या मतदार विभागातील असेल त्या बाबतीत, त्या मतदार विभागाची यादी किंवा तिचा संबंधीत भाग किंवा त्या मतदार यादीतील संबधीत नोंदीची एक प्रमाणित प्रत ही नामनिर्देशनपत्रासोबत घ्यावी.
- राखीव जागेसाठी (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती / नागरिकांचा मागासवर्ग) निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक आहे. (आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२००९/ प्र.क्र.१०/का.७, दि.६/०८/२००९ )
- तसेच नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणेबाबत व तसे न केल्यास नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येईल याची कल्पना उमेदवारांस दयावी.(**जात वैधता प्रमाणपत्राबाबत निवडणुकीच्यावेळी अस्तित्वात असलेल्या अधिनियमातील तरतुदी पहाव्यात**.)
- तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोच पावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत अधिनियमात तरतूद आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (**सन २०१६ महाराष्ट्र अधिनियम क्र.२१, दि. ०७ मे, २०१६** )
- महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १६ अन्वये आवश्यक, सक्षम प्राधिकाऱ्याकडील शौचालय वापराबाबतचे, ग्रामसभेच्या ठरावासोबत संबंधित पंचायतीचे प्रमाणपत्र ( याबाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८/पंरा-२, दि.२६ फेब्रुवारी, २०१६ व दि.०७ ऑक्टोबर, २०१६ पहावे.)
- कलम १६ मध्ये नमूद इतर अनर्हतेबाबत निर्वाचन अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप आल्यास वा असा आक्षेप दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने घेतला असेल तर, त्याबाबतीत अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवार आवश्यक ते पुरावे सादर करील.
- जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे. यासंदर्भातील ग्रामविकास विभाग अधिसूचना क्रमांक-ग्रापनि.१००१/प्र.क्र.२४७/०६, दि.१५/०१/२००२ कृपया पहावी. (नियम १७ व १६-अ)

| उमेदवाराचा प्रवर्ग | जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|---|
| सर्वसाधारण* | रु.१०००/- | रु.७००/- |
| अनुसूचित जाती | रु.५००/- | रु.३५०/- |
| अनुसूचित जमाती | रु.५००/- | रु.३५०/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु.५००/- | रु.३५०/- |

*सर्वसाधारण जागेवर जरी अनुसूचित जाती/जमाती वा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांनी अर्ज केला तर त्यास अर्धीच अनामत रक्कम देय राहील. परंतु अशी सूट देण्यास तो पात्र आहे याबाबत निर्वाचन अधिकारी उमेदवाराचे जात प्रमाणपत्र तपासून स्वत:ची खात्री करील. अनामत रक्कम स्विकारणे त्याबाबत पोहच पावती देणे यासंदर्भात योग्य व्यवस्था करावी.

- राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना (नमुना २अ व नमुना २ब) नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. ( शासन राजपत्र असाधारण क्र.१०/२०१७, दिनांक ६ जानेवारी, २०१७)

- नमुना २ब वर राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिची सही (शाई मधील) असणे आवश्यक राहील. फॅक्स/झेरॉक्स वा मेल चालणार नाही.

- उमेदवाराने सादर केलेले, गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर /जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र राज्य निवडणूक आयोगाच्या दिनांक ०८/०१/२०१५ च्या आदेशानुसार स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही. परंतु संबधीत शपथपत्रातील कोणताही रकाना/ माहिती कोरी ठेवू नये. माहिती निरंक/संबंधीत नसल्यास/वा माहित नसल्यास ( Nil /Not applicable or Not Known) तसे शेरे असणे आवश्यक आहे. **रकाने कोरे ठेवल्यास नामनिर्देशनपत्र नाकारले जाऊ शकते.** (आयोगाच्या क्रमांक-रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.५/का.६, दिनांक २७/०३/२०१५ च्या पत्रासोबतच्या भारत निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक-५७६/३/२०१३-एसडीआर, दि.३०/०९/२०१३ मध्ये दिलेल्या सूचनां तपासाव्यात.)

    - प्राथमीक तपासणीत निर्वाचन अधिकाऱ्यास अशी बाब आढळल्यास संबधीत उमेदवाराच्या ती पडताळणी सूची(Check list) द्वारे लक्षात आणून दयावी. सदरची चेक लिस्ट २ प्रतीत ठेवावी व त्यावर सही करून उमेदवारास दयावी. स्थळ प्रतीवर उमेदवाराची सही घेऊन नामनिर्देशनपत्रास लावून ठेवावी.
    - परंतु शपथपत्रातील गुन्हेगारी पार्श्वभूमी व मालमत्तेचा तपशील याबाबतच्या माहितीची छाननी अथवा सत्यता पडताळून पाहणार नाही अथवा चुकीची आढळल्यास त्याच्याआधारे नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

**पडताळणी सूची (Check List)**

जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पचायत समीती निर्वाचक गणाचे क्रमांक व नाव (आरक्षण असल्यास तपशील) :....................................
उमेदवाराचे नाव : ..........................
नामनिर्देशनपत्र सादर करण्याची तारीख व वेळ :
नामनिर्देशनपत्राचा क्रमांक :

| अ. क्र. | आवश्यक कागदपत्र | जोडली आहेत वा कसे (होय/नाही) (काही कमी असल्यास संक्षीप्त तपशील) |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्रावर उमेदवार व सुचकाने सही केली आहे. | |
| २ | गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर /जंगम मालमत्ता व अपत्याबाबतचे शपथपत्र<br>अ) सर्व रकाने भरले आहेत<br>ब) नसल्यास तपशील<br>क) शपथपत्र सक्षम प्राधिकाऱ्यासमोर साक्षांकीत करण्यात आले आहे | |
| ३ | उमेदवार हा दुसऱ्या मतदार विभागातील असेल तर संबधीत मतदार यादीतील संबधीत नोंदीची प्रमाणीत प्रत दिली वा कसे ? | |
| ४ | राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची नमुना२-अ, नमुना २- ब जोडली वा कसे ? | |
| ५ | सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र (राखीव जागांकरिता) नामनिर्देशनपत्रासोबत जोडला आहे वा कसे ? | |
| ५अ | जात वैधता प्रमाणपत्र जोडले नसल्यास ते छाननी समितीकडे सादर केल्याबद्दलची पावती* तसेच ते ६ महिन्यात सादर करण्याबाबतचे हमीपत्र* (*सूट लागू असल्यास) | |
| ६ | अनामत रक्कम भरल्याची पावती | |
| ७ | विहित मुदतीत खर्च सादर करणे बाबत<br>-हमीपत्र<br>-बँक अकाउंट तपशील | |
| ८ | म.जि.प./पं.स अधि.१९६१, कलम १६ अन्वये आवश्यक, सक्षम प्राधिकाऱ्याकडिल सर्व प्रमाणपत्र<br>- शौचालय वापर<br>- *<br>-** | |

***वेळोवेळी प्रचलीत तरतुदीनुसार आवश्यक इ.कागदपत्रे**

**** कलम १६ मध्ये नमूद इतर अनर्हतेबाबत निर्वाचन अधिकाऱ्याने कोणताही आक्षेप आल्यास वा असा आक्षेप दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीने घेतला असेल तर, त्याबाबतीत अशा आक्षेपाचे खंडन करण्यासाठी संबंधित उमेदवार आवश्यक ते पुरावे सादर करील.**

उपरोक्त यादीत नमूद कागदपत्रे, पुढील प्रमाणे नमूद मुदतीत सादर करावेत,

अ) रकाना ...मध्ये नमूद...........कागदपत्र दि..........ठिक ........वा.पर्यंत दाखल करावे.

ब) वर नमूद केले प्रमाणे शपथपत्रातील रिकामे ठेवण्यात आलेले सर्व रकाने भरुन, नव्याने परिपूर्ण शपथपत्र छाननी पूर्वी सादर करणे आवश्यक राहील तसे न झाल्यास नामनिर्देशनपत्र अवैध ठरु शकते

क) रकाना ...मध्ये नमूद...........कागदपत्र दि..........ठिक ........वा.पर्यंत दाखल करावे.

मिळाले

.............

(उमेदवाराची/सूचकाची सही) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही

तारीख व वेळ :

ठिकाण :

टिप:

१. शपथपत्र, नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या तारखेस ३.०० वा.पर्यंत (निवडणूक कार्यक्रमानुसार अंतीम वेळेस) सादर करणे
२. सर्व रकाने भरुन, नवीन परीपूर्ण शपथपत्र (संपूर्ण) छाननीला सुरूवात होणेपूर्वी सादर करणे (रकाने रिकामे ठेवल्यास नामनिर्देशन पत्र अवैध ठरु शकते)
३. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी दु.३.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करणे
४. उमेदवार हा दुसऱ्या मतदार विभागातील असेल तर संबधीत मतदार यादीतील संबधीत नोंदीची प्रमाणित प्रत छाननी वेळी सादर करणे
५. विहित मुदतीत, परिपूर्णरित्या नव्याने सादर केलेले शपथपत्र वेबसाईट वर टाकले जाईल.

- निर्वाचन अधिकाऱ्याने उमेदवारांनी नामनिर्देशनपत्राची प्राथमिक चाचणी करून चेकलिस्ट दिले नंतर नामनिर्देशन पत्राच्या "भाग चार" मध्ये असणारी पोहोच, छाननीचे ठिकाण व वेळ नमूद करून स्वत:च्या सहीने दयावी.
- निर्वाचन अधिकाऱ्याने, उमेदवारांनी सादर केलेली प्राप्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्राच्या प्रती, सूचना फलकावर चिकटवून व वेबसाईट वर टाकून त्याचा प्रसार करावयाचा आहे. प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा उमेदवार तसेच प्रसिध्दी माध्यमे यांना योग्य ते शुल्क आकारुन त्याच्या

प्रती देता येतील. कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वत: शपथपत्राद्वारे परस्परविरोधी माहिती सादर केली असली तरी त्या माहितीचा देखील वरीलप्रमाणेच प्रसार करावयाचा आहे.

- दररोज, प्राप्त नामनिर्देशनपत्राची माहिती, निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय तयार करुन सुचना फलकावर लावावयाची आहे.

प्राप्त नामनिर्देशनपत्राची सूचना

(नियम १८ व )

जिल्हा परिषद /पंचायत समिती सार्वत्रिक /पोट निवडणूक - २०१६

निवडणूक विभाग/ निर्वाचक गण....................................................

आज दिनांक .....................रोजी ३.०० वा पर्यंत प्राप्त नामनिर्देशनपत्राची सूचना

| नामनिर्देशन पत्राचा अनु.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराच्या आई/वडील/पतीचे नाव | उमेदवाराचे वय | निवासी पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |
| राजकीय पक्ष*/ अपक्ष | अनु.जाती/ जमाती /ना.मा.प्र/सर्वसाधारण (**तपशील) | उमेदवाराच्या मतदार यादीचा तपशील | सूचकाचे नाव | सूचकाच्या मतदार यादीचा तपशील |
| ६ | ७ | ८ | ९ | १० |

ठिकाण :

तारीख : निर्वाचन अधिकारी

*एखादा उमेदवार, स्वत:स एखाद्या राजकीय पक्षाचा अधिकृत उमेदवार घोषित करीत असेल तर त्यास पक्षाचे विहित नमुना २-ब प्राप्त आहे वा कसे? असल्यास ते पक्षाने विहित नमुना २-अ अन्वये प्राधिकृत केलल्या व्यक्तीनेच सही केलेले आहे वा कसे ? ह्या सर्व बाबी तपासून नसल्यास ते स्पष्ट नमूद करावे.

** पोट जातीचा तपशील तसेच स्त्री साठी आरक्षित असेल तर कंसामध्ये तसे नमूद करावे.

***या प्रपत्रातील माहिती ही नामनिर्देशनपत्रात नमूद केले प्रमाणेच असेल.

## २.९ खर्चाची मर्यादा व विहीत मुदतीत खर्च सादर करणे :

२.९.१ आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा/२००६/ प्र.क्र.१७/ का-५ दि. ३०/०७/२०११ अन्वये जिल्हा परिषद निवडणूक विभाग (रुपये ३ लाख), पंचायत समिती निर्वाचक गण (रुपये २ लाख) यासाठी खर्चाची मर्यादा ठरविण्यात आली आहे. उमेदवाराने सदर मर्यादेतच खर्च करावयाचा आहे.

२.९.२ उपरोक्त आदेशात नमूद केलेप्रमाणे उमेदवाराने तो लढवित असलेल्या प्रत्येक निवडणूकीकरीता १ स्वतंत्र बँक खाते उघडून त्या खात्याद्वारेच सदर निवडणूक खर्च करावयाचा आहे. तसेच त्याच

खात्यात त्यास निवडणूकीसाठी प्राप्त होणाऱ्या सर्व रकमा जमा करावयाच्या आहेत. असे न केल्यास त्यांनी विहित पद्ध्तीने खर्चाचा तपशील ठेवला आहे असे मानण्यात येणार नाही.

सदर खाते नामनिर्देशनपत्र सादर करणेपूर्वी किमान १ दिवस आधी उघडावे व त्याचा तपशील नामनिर्देशनपत्र सादर करतेवेळी त्यांचेकडून घ्यावा. तसे न झाल्यास तशी रितसर नोटीस संबधिताना दयावी.

उमेदवार हे खाते स्वत:च्या वा निवडणूक प्रतिनिधीच्या वा दोघांच्या नावे (सामाईक) उघडू शकतात, तसेच ते शेडयूल बँकेत उघडू शकतात. परंतु पुर्वीचेच खाते वापरण्यास मनाई असेल तसेच उमेदवाराच्या नातेवाईकासह (जर तो निवडणूक प्रतिनिधी नसेल तर ) सामाईक खाते उघडता येणार नाही.

उमेदवारांनी संबधित खात्यातूनच निवडणुकीसाठीचे सर्व आर्थिक व्यवहार करणे बंधनकारक आहे. (आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष, दि. १५ ऑक्टोबर, २०१६ व दि.२५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उमेदवारांनी खर्चाची हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केलेली आहे. (उमेदवारांनी निवडणुकीदरम्यान केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्रे आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ-२०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष, दि. २५ ऑक्टोबर, २०१६ पहावेत.)

२.९.३ उमेदवाराने विहित नमुन्यात निवडणूक खर्चाचा तपशील निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर न केल्यास तो अनर्ह ठरू शकतो याबाबतची कल्पना उमेदवारास दयावी व त्यांचेकडून तसे हमीपत्र नामनिर्देशनपत्रासोबत घ्यावे. (आयोगाचे आदेश क्र. रानिआ/नपा-२०१५/प्र.क्र.१०/का-६ दि. १०/०८/२०१५)

२.९.४ नामनिर्देशन पत्र दाखल केले दिनांकापासून निकाल जाहीर करण्याच्या दिनांकापर्यंतचा (दोन्ही तारखा धरून), उमेदवाराने वा त्याच्यावतीने निवडणूक प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. सदर खर्चात नामनिर्देशन पत्रासोबतची अनामत रक्कम देखील समाविष्ट असणार आहे.

२.९.५ निवडणूकीसाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खाते पुस्तकातील नोंदीची छायांकित प्रत उमेदवाराने स्वत: प्रमाणित करुन द्यावयाची आहे.

**२.१०.** नामनिर्देशन पत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे चेक लिस्टसह, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील. छाननीवेळी एका उमेदवाराची सर्व नामनिर्देशन पत्रे एकत्र तपासावयाची असल्याने नामनिर्देशन पत्रे व त्यासोबतची कागदपत्रे सोयीकरिता, उमेदवारनिहाय एका प्लॅस्टीक फोल्डरमध्ये ठेवावीत.

## २.११. सर्व नामनिर्देशित उमेदवारांची यादी :

२.११.१ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी, शक्य तितक्या लवकर नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांची यादी, निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय तयार करुन सूचना फलकावर लावावयाची आहे.

नामनिर्देशित उमेदवारांची यादी

जिल्हा परिषद /पंचायत समिती सार्वत्रिक /पोट निवडणूक - २०

निवडणूक विभाग/ निर्वाचक गण.................................................

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | निवासी पत्ता | पसंती क्रमानुसार मागणी केलेली निवडणूक चिन्हे * |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

| राजकिय पक्ष**/ अपक्ष | नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या शेवटच्या दिवशी (दु.३.०० वाजेपर्यंत) नमुना २अ व २ब प्राप्त आहे वा कसे ? | असल्यास नमुना २ब नुसार उमेदवार हा मुख्य उमेदवार वा बदली उमेदवार आहे याचा तपशील |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |

ठिकाण :

तारीख : निर्वाचन अधिकारी

i) *एका उमेदवाराने,एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे दाखल केली असल्यास, त्या उमेदवाराने प्रथम दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रातील पसंती क्रमानुसार मागणी केलेली निवडणूक चिन्हे रकाना ४ मध्ये लिहावीत.

ii)**परंतु सदर उमेदवार जर मान्यताप्राप्त राष्ट्रीय वा राज्यस्तरीय पक्षाचा अधिकृत उमेदवार असेल व त्यास नमुना २ब प्राप्त असेल व त्याने तसे त्याच्या नामनिर्देशन पत्रात घोषीत केले असेल तर त्याचे नावासमोर त्या पक्षाचे राखीव चिन्ह लिहावे व त्या पक्षाचे नाव रकाना ५ मध्ये लिहावे.

iii) एका उमेदवाराने,जरी एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे दाखल केली असली तरी त्याचे नाव उपरोक्त नमुन्यात एकदाच नमूद करावे.

iv) उमेदवाराचा नामनिर्देशनपत्रात नमूद, निवासी पत्ता संपूर्ण व व्यवस्थीत टाईप करावा, त्रोटक लिहू नये. जेणेकरुन भविष्यात संपर्क साधताना अडचण येणार नाही.

## २.१२. निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक:

महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम २४ व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम २४ अन्वये एखाद्या उमेदवारास निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक करावयाची असेल तर अशी नेमणूक नामनिर्देशनपत्र स्वाधीन करण्याच्यावेळी किंवा निवडणूकीपूर्वी कोणत्याही वेळी “नमुना ५” मध्ये करता येईल. म्हणजेच निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक हि ऐच्छिक आहे. **(परिशिष्ट-१७)**

२.१२.१ उमेदवार कोणत्याही वेळी स्वत:च्या सहीने व निर्वाचन अधिकाऱ्यास सादर केलेल्या **विहित नमुन्यातील** घोषणापत्राद्वारे (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/ प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६) सदरची नेमणूक रद्द करू शकतो. निर्वाचन अधिकाऱ्यास ज्या दिवशी असा अर्ज प्राप्त होईल त्या दिवसापासून सदर नेमणूक रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तरी सदर घोषणापत्राची रितसर पोहच द्यावी.

२.१२.२ महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम २४(३) व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम २४ (३) अन्वये

निवडणूक प्रतिनिधीच्या नेमणूक करताना ज्या व्यक्तीस कलम २८ नुसार मतदान करण्यास किंवा निवडून येण्यास अपात्र ठरविले आहे असेल अशी व्यक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही अशी तरतूद आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१६/ प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६ अन्वये राज्य विधानमंडळ सदस्य (विधान सभा / विधान परिषद), संसद सदस्य (लोकसभा / राज्य सभा), केंद्रीय वा राज्य शासनाचा मंत्री तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा आजी सदस्य तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यास निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

२.१२.३ भारत निवडणूक आयोगाच्या धर्तीवर राज्य निवडणूक आयोगाने देखील निवडणूक प्रतिनिधींना छायाचित्र असलेले ओळखपत्र देण्याचे ठरविले असून त्यासाठी उमेदवाराने २ प्रतीत “नमुना ५” सादर करावे. त्याने सादर केलेल्या “नमुना ५” वरच उजव्या कोपऱ्यात निवडणूक प्रतिनिधीचा फोटो लावावा व सदर फोटो निर्वाचक अधिकाऱ्याने साक्षांकीत करावा. व तेच ओळखपत्र म्हणून वापरावे. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जि.प.पं.स/२०१६/प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६)

## २.१३. आचारसंहिता व इतर निर्बंध

२.१३.१ नामनिर्देशनपत्र दाखल करणाऱ्या प्रत्येक उमेदवारास आयोगाकडून निर्गमित केलेल्या आचारसंहिता व इतर निर्बंध विषयक आदेशांचा संच देण्यात यावा उदा. पोस्टर्स, पॅम्पलेट्स छपाई वरील निर्बंध (SEC १०९५/CR-७५/९५/DESK-३ Dtd. २८/०८/१९९५)

२.१३.२ उपरोक्त सर्व निर्बंधांचे काटेकोर पालन केले जाईल याबाबतची दक्षता निवडणूक अधिकारी घेईल तसेच आपल्या क्षेत्रातील स्थानिक छपाई कारखाने व इतर वृत्तपत्रे यांनादेखील या निर्बंधाची कल्पना देईल.

## प्रकरण -३
## छाननी व अपील
## (नियम १९, २०)

३.१ नामनिर्देशन पत्राची छाननी निर्वाचन अधिकारी स्वत: करील. कोणत्याही परिस्थितीत सहाय्यक निर्वाचन अधिकाऱ्यांकडे सदर काम सोपवू नये. परंतु छाननीचे काम पार पाडण्यास निवडणूक निर्णय अधिकारी हे अपरिहार्य अशा परिस्थितीमुळे असमर्थ असतील तर सहायक निवडणूक निर्णय अधिकारी हे छाननीचे काम करु शकतात. त्यासाठी निर्वाचन अधिकारी यांनी त्यांना लेखी प्राधिकृत करणे आवश्यक आहे.

**३.२ छाननी- अर्ध-न्यायीक जबाबदारी( Quasi-Judicial Duty)**

३.२.१ छाननी करतेवेळी आपण अर्ध-न्यायीक जबाबदारी पार पाडत आहात याची जाणीव असावी. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता आपण ठामपणे आपला निर्णय देणे अपेक्षित आहे. आपली भूमिका निपक्ष, पारदर्शक व सर्व उमेदवारांसाठी समान राहील याची काळजी घ्यावी. बऱ्याचवेळा उमेदवार वा त्यांचे प्रतिनिधी आरोप/प्रत्यारोप करू शकतात, तरी आपण आपला तोल ढळू न देता आपला निर्णय ठामपणे व योग्य त्या कारणमिमांसेसह नोंदवावा.

३.२.२ आपला निर्णय देताना आपण आपले वरिष्ठ, आयोग, आयोगाच्या प्रतिनिधी/ निरीक्षक यांचेकडूनही कोणते तोंडी वा लेखी आदेश घेणे अपेक्षित नाही. सबब अधिनियम/ नियमातील तरतुदी , आयोगाचे व शासनाचे तत्कालीन आदेश यांचे आधारे आपला निर्णय दयावा.

**३.३ छाननी साठी उपस्थीत राहण्यास कोण पात्र आहे?**

३.३.१ छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी, प्रत्येक उमेदवाराचा एक सूचक, आणि प्रत्येक उमेदवाराने योग्यरीत्या लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थीत राहाता येणार नाही.

३.३.२ छाननीच्यावेळी कोणताही अनुचीत प्रकार टाळणेकामी व अनावश्यक गर्दी रोखणे कामी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा.

३.३.३ एखाद्या उमेदवाराने वा सूचक/ निवडणूक प्रतिनिधी/ प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने अन्य उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र /शपथपत्र वा दाखल केलेली कागदपत्रे तपासणीस मागीतल्यास ती दाखवण्याची व्यवस्था करावी.

३.४. **सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी करणे :**

३.४.१ प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे आवश्यक आहे.

३.४.२ एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास ती सर्व एका मागोमाग एक अशा रितीने छाननी केली जातील. उमेदवाराचे एक नामनिर्देशनपत्र स्विकृत झाले म्हणून अन्य नामनिर्देशनपत्र छाननी न करता ठेवले जाणार नाही.

३.४.३ भविष्यात होवू शकणारी न्याय प्रविष्ठ प्रकरणे लक्षात घेवून, सर्व छाननी प्रक्रीयेचे **छायाचित्रण** करावे .

**३.५. आक्षेप व संक्षिप्त चौकशी (नियम १९) :**

३.५.१ प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्राच्या वैधतेबाबत निर्वाचन अधिकारी स्वत: खात्री करेल. केवळ आक्षेप आले नाहीत म्हणून खातरजमा न करता कोणतेही नामनिर्देशनपत्र स्विकारले वा नाकारले जाणार नाही.

३.५.२ कोणत्याही नामनिर्देशनपत्रासंबधी घेण्यात आलेल्या आक्षेपाबाबत निर्णय देईल. आक्षेप नसेल तरीही एखादे नामनिर्देशनपत्र नाकारण्यास पात्र असेल तर त्याबाबतही योग्य तो खुलासा करून नाकारेल.

३.५.३ आक्षेपावरून वा स्वत:हून एखाद्या गोष्टीची खातरजमा करणेकामी निर्वाचन अधिकारी संक्षिप्त चौकशी करू शकतो. चौकशीअंती देण्यात येणाऱ्या निर्णयाची नोंद योग्य त्या खुलाशासह तो नामनिर्देशन पत्रावर ठेवेल. आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस तसेच मागेल त्यास निर्णयाची प्रत दयावी.

३.५.४ एखादे नामनिर्देशनपत्र स्विकारले वा नाकारले याची विधीग्राहयता याबाबतचा निर्णय निर्वाचन अधिकाऱ्यांनी नामनिर्देशनपत्रावर स्वत:च्या स्वाक्षरीने नोंदविल्याशिवाय पूर्ण होत नाही तरी प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर सदर नोंद घेतली जाईल याची खात्री करावी.

**३.६ अहर्ता/ अनर्हता ग्राहय धरण्याचा दिवस**

उमेदवार निवडणूक लढविण्यास पात्र आहे वा कसे हे ठरविण्यासाठी कोणता दिवस ग्राह्य धरण्यात यावा याबाबत वाद होऊ शकतो , तरी याबाबत अधिनियम/नियमामध्ये स्पष्ट तरतूद असल्यास उदा. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १५ नुसार वयाच्या बाबतची अर्हता (२१ वर्षे पूर्ण असणे) यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याकरिता निश्चित करण्यात आलेला अंतिम दिनांक ग्राह्य धरावा. तसेच कलम १६(के) नुसार अनर्हता आहे वा कसे हे ठरविण्यासाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्याचा दिवस ग्राह्य धरावा. इतर अनर्हतेबाबत छाननीचा दिवस ग्राह्य धरावा.

३.७ नामनिर्देशनपत्र नामंजूर करण्याचे सबळ कारण असल्याशिवाय कोणतेही नामनिर्देशनपत्र नाकारु नये,

सबळ कारणे उदा. :

i) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १५, १५-ब व १६ किंवा नियमातील तरतुदीनुसार निवडून येण्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात आले आहे;

ii) उमेदवारास किंवा नाव सुचविणाऱ्या व्यक्तीस नामनिर्देशनपत्रावर सही करण्यास अपात्र ठरविले आहे:

iii) नियमान्वये किंवा अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात उमेदवाराने कसूर केली आहे;

iv) उमेदवाराची वा नाव सुचविणाऱ्या व्यक्तिची सही ही त्याची खरीखुरी सही नाही.

३.७.१ एखाद्या उमेदवारास त्यानी सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रांपैकी एका नामनिर्देशन पत्राद्वारे योग्यरित्या नामनिर्दिष्ट केले असेल तर इतर नामनिर्देशनपत्रातील उपरोक्त iii , iv मधील कारणास्तव त्याची उमेदवारी नामंजूर करण्यात आली असे धरले जाणार नाही.

३.८. निर्वाचन अधिकारी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निवडणुक कार्यक्रमामध्ये विहित केलेल्या दिवशी व वेळेसच छानन्नी करण्याचे काम करील. परंतु दंगल, वा नैसर्गीक आपत्ती या सारख्या आवाक्या बाहेरील परिस्थितीमुळे त्यात बदल करावयाचे झाल्यास राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या विशेष वा सर्वसामान्य सुचनांच्या अधिन राहून निर्णय घेईल व त्या बाबतीत आयोगास अहवाल देईल.

३.८.१ छानन्नी करतेवेळी एखादया उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रावर आक्षेप प्राप्त झाला असेल वा निर्वाचन अधिकारी यांनी स्वत: आक्षेप घेतला असेल तर सदर आक्षेपांचे खंडन करण्यासाठी संबधीत उमेदवारास लगतच्या पुढील दिवसाहून उशीरा होणार नाही इतकावेळ देता येईल आणि ज्या तारखेपर्यंत असे कामकाज पुढे ढकलण्यात आले असेल त्या तारखेस निर्वाचन अधिकारी आपल्या निर्णयाची नोंद करील.

३.८.२ निर्वाचन अधिकारी प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्विकारल्याबद्दल वा नाकारल्याबद्दल निर्णय लिहुन ठेवील, नामंजूर करण्यात येणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर नामंजूर केल्याबद्दलचे संक्षिप्त निवेदन लेखी नोंदवील.

३.८.३ इतर कारणांसाठी अपात्र नसेल त्यावेळी संबधीत निर्वाचक गणातील मतदारांच्या यादीमध्ये केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत सादर करणे हा, त्या नोंदीमध्ये नाव असलेल्या कोणत्याही मतदाराच्या, निवडणुकीसाठी उभे राहण्याच्या अधिकाराबाबत निर्णायक पुरावा असेल.

३.८.४ वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी, तारीख व वेळ नमूद करून निर्वाचन अधिकारी (नियम २०च्या उपबंधास अधीन राहून) आपल्या सूचना फलकावर लावील.

नमुना

वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी

(नियम २० *च्या उपबंधास अधीन राहून)

जिल्हा परिषद /पंचायत समिती सार्वत्रिक /पोट निवडणूक - २०

निवडणूक विभाग/ निर्वाचक गण....................................................

| अ. क्र. | उमेदवारांचे नाव* * | उमेदवाराच्या वडील/आई /पतीचे नाव | उमेदवारांचा पत्ता*** | राजकीय पक्षाचे नाव /अपक्ष |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

ठिकाण :

दिनांक व वेळ : निर्वाचन अधिकाऱ्याची सही

* पंचायत समिती साठी नियम १९-अ च्या उपबंधास अधीन राहून

** वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमे लावण्यात येतील. (ज्या उमेदवारांना आडनावे असतील अशा उमेदवारांच्या आडनावांनुसार व इतर उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या खुद्द नावानुसार)

***** नामनिर्देशनपत्रात नमूद पत्ते**

**३.९. अपील :** महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम २० व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील नियम १९-अ नुसार नामनिर्देशन पत्र स्विकारणे वा नाकारणे या निर्वाचन अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही उमेदवारास, वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी ज्या तारखेस सुचनाफलकावर लावण्यात आली असेल त्या तारखेपासून ३ दिवसांच्या मुदतीच्या आत जिल्हा न्यायालयाकडे अपील दाखल करण्याची तरतूद आहे. असा उमेदवार त्याच दिवशी अशा अपील अर्जाच्या प्रती (प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या संख्येइतक्या +१) निर्वाचन अधिकाऱ्यास सादर करेल.

३.९.१ अशा अपिलाच्या प्रती मिळाल्यानंतर निर्वाचन अधिकारी नमुना-३ **(परिशिष्ट-३ )** मधील १ नोटीस आपल्या सूचना फलकावर लावून प्रसिद्ध करील.

३.९.२ अशी नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर ३ऱ्या दिवशी किंवा त्या दिवशी सरकारी सुट्टी असेल तर सरकारी सुट्टी नसेल अशा लगतच्या पुढील दिवशी अपिलाची जिल्हा न्यायालयासमोर सुनावणीस प्रारंभ होईल

३.९.३ निर्वाचन अधिकारी त्याच्याकडे सादर करण्यात आलेल्या उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रापैकी प्रत्येक नामनिर्देशनपत्राची १ प्रत आणि त्यावर त्याने लिहून ठेवलेल्या निर्णयाची १ प्रत आणि निर्वाचन अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशी इतर संबंधित कागदपत्रे जिल्हा न्यायालयाकडे पाठविल. तसेच उमेदवाराकडून वा त्याच्या वतीने अर्ज प्राप्त झाल्यास नामनिर्देशनपत्रावरील निर्णयाची प्रत अर्जदारास पुरवील.

३.९.४ निर्वाचन अधिकाऱ्याच्या सूचना फलकावर लावलेली नोटीस या नियमान्वये अपील सादर केलेबाबत व सुनावणीच्या तारखेबाबत पुरेशी नोटीस असल्याचे मानण्यात येईल.

३.९.५ अपिलावरील जिल्हा न्यायालयाचा निर्णय व केवळ अशा निर्णयास अधीन राहून, निर्वाचन अधिकाऱ्याचा, उमेदवाराचे नामनिर्देशन स्विकारणारे किंवा फेटाळणारे निर्णय हे अंतिम व निर्णायक असतील व त्यावर कोणत्याही न्यायालयामध्ये किंवा कलम २७, पोट-कलम (२) मध्ये निर्देशिलेल्या न्यायाधीक्षासमोर आक्षेप घेता येणार नाही.

## प्रकरण ४
## उमेदवारी मागे घेणे

### ४.१ उमेदवारी मागे घेणेसंबधीची नोटिस

४.१.१ कोणत्याही उमेदवारास

अ) महाराष्टजिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील नियम २० व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९-अ अन्वये कोणतेही अपील दाखल नसेल अशा बाबतीत, अपील दाखल करणेकामी निर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर, दुसऱ्या दिवशी (Second Day) किंवा तो दिवस सरकारी सुट्टीचा असेल तर लगतनंतरच्या, सरकारी सुट्टीचा दिवस नसलेल्या दिवशी;

ब) असे अपील दाखल असेल तेथे जिल्हा न्यायालयाचा निर्णय दिल्याच्या दिवसानंतरच्या दुसऱ्या दिवशी (Second Day) किंवा तो दिवस सरकारी सुट्टीचा असेल तर लगतनंतरच्या, सरकारी सुट्टीचा दिवस नसलेल्या दिवशी;

त्याने सही केलेल्या व निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या लेखी नोटिशी (परिशिष्ट-४) द्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

४.१.२ उपरोक्त तरतुदीनुसार येणारा दिवस राज्य निवडणूक आयोग, निवडणूक कार्यक्रमात ठरवून देईल. अशा निश्चित केलेल्या **दिवशी दुपारी ३ वाजण्यापूर्वी** नोटीस निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल. तदनंतर प्राप्त नोटिशीना कायदेशीर अर्थ नसून अशा नोटिसा स्विकारण्यात येवू नयेत.

४.१.३ अशी नोटीस उमेदवार स्वत: वा आपल्या सुचकामार्फत वा आपल्या लेखी प्राधिकृत केलेल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत देईल.

४.१.४ उमेदवारी मागे घेण्याच्या नोटिशीच्या खरेपणाबाबत तसेच ती सादर करणाऱ्या व्यक्तिच्या खरेपणाबाबत निर्वाचन अधिकारी स्वत: खात्री करेल व अशा प्राप्त नोटिशी बाबत रितसर पोहच देईल.

४.१.५ अशी खात्री केलेली नोटीस प्राप्त झालेनंतर ती मागे घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

४.२ विहीत मुदतीत, विहित पद्धतीने खात्री करण्यात आलेल्या सर्व उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची यादी निर्वाचन अधिकारी (परिशिष्ट -४अ) तयार करेल व सूचनाफलकावर लावण्याची व्यवस्था करेल.

# प्रकरण ५
# चिन्ह वाटप
# सर्वसाधारण सूचना

राज्य निवडणूक आयोगाने राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, दिनांक २० नोव्हेंबर, २००४ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता पक्षांची नोंदणी आवश्यक केली. दि.३१ मार्च २००९ च्या आदेशानुसार याबाबत नव्याने एकत्रित आदेश दिले आहेत. त्यानुसार जे पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करतील, केवळ त्याच पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविताना चिन्ह राखून ठेवता येते किंवा प्राधान्याने चिन्ह वाटप करता येते.

ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांची यादी राज्य निवडणूक आयोग वेळोवळी प्रसिध्द करते. त्या यादीनुसारच चिन्ह वाटप करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत केवळ भारत निवडणूक आयोगाच्या पक्षांच्या यादीतील नावांच्या आधारे चिन्ह वाटप करण्यात येऊ नये.

दिनांक १८/१०/२०१६ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने पक्षांची यादी व चिन्हे अधिसूचित केली आहेत. या यादीमध्ये वेळोवळी सुधारणा करण्यात येते. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी अद्ययावत यादी तसेच मुक्त चिन्हांचा तक्ता, राज्य निवडणूक आयोगाकडून प्राप्त करुन घ्यावी.

राज्य निवडणूक आयोगाने क्र. एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/डी-११, दि.३१ मार्च, २००९ च्या आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप कशाप्रकारे करावे याबाबत अधिसूचित केले आहेत. चिन्ह वाटप या अधिसूचनेच्या आधारे करण्यात यावे. **(परिशिष्ट-५)**

५.१ **उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.**

५.१.१ उमेदवाराने नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख केला नसेल व त्यास एखादया पक्षाचा नमुना-२ ब प्राप्त झाला तरी त्यास त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार मानता येणार नाही.

**५.१.२** तसेच उमेदवारने नामनिर्देशनपत्रामध्ये तो एखाद्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख केला असेल पण त्यास त्या पक्षाने नमुना- २ब दिला नाही व इतर उमेदवारास तो दिला असेल तर सदरचा उमेदवार हा पक्षाचा अधिकृत उमेदवार गणला जाणार नाही.

५.२ संबंधित राजकीय पक्षाने विहित कालावधीमध्ये उमेदवाराचे अधिकारपत्र व ते अधिकारपत्र सही करण्यास सक्षम असलेला अधिकारी कोण याबाबतचे प्रपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही प्रपत्रे महाराष्ट्र जिल्हा परिषद (निवडणूक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम १५(अ) आणि

महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ चा नियम १५(अ) नुसार नमुना २अ व नमुना २ब अशी विहीत करण्यात आली आहेत. **( परिशिष्ट ६ )**

५.३ राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले मान्यताप्राप्त राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष तसेच *महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ दिनांक ३१/०३/२००९ मधील परिच्छेद-७ व महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) (सुधारणा) आदेश, २०१५ दिनांक ०६/०५/२०१५* मधील तरतुदीनुसार चिन्ह वाटपासंबंधीच्या सवलतीस पात्र असलेले मान्यता प्राप्त पक्ष यांनी, त्यांच्या पक्षासाठी राखीव असलेल्या चिन्हांची नोंद आपल्या नामनिर्देशनपत्रात करणे आवश्यक आहे. त्यानुसार त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह वाटप करता येईल.

५.४ राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या इतर पक्षांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक चिन्ह प्राधान्याने देता येईल. (ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न केलेले पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यावर प्राधान्याने चिन्ह वाटप करण्यात येते.) याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरावी :-

(अ) जेथे एखादया मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केली असेल तेथे ते चिन्ह त्या उमेदवारास देण्यात येईल.

(ब) जेथे एखादया चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निर्वाचन अधिकारी चिठ्ठया टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

५.५ राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न झालेले राजकीय पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार असल्याचे मानण्यात येईल. अपक्ष उमेदवारांना खालील पध्दत अवलंबीत करुन चिन्ह वाटप करण्यात येईल.

(अ) जेथे एखादया मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच उमेदवाराने केली असेल त्या उमेदवारास ते चिन्ह देण्यात येईल.

(ब) जेथे एखादया चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निर्वाचन अधिकारी चिठ्ठया टाकून कोणत्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

५.६ काही प्रसंगी पक्षाकडून, पक्षाचा अधिकृत उमेदवार निश्चित करण्याबाबतचे नमुने एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात येतात अशावेळी -

(१) जर नमुना २ब मध्ये एका उमेदवारास मूळ उमेदवार व दुसऱ्या उमेदवारास बदली उमेदवार असल्याचा उल्लेख असेल व तशा आशयाचे पत्र पक्षाचा नमुना-२ ब सही करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीने दिले असेल अशावेळी त्या मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र वैध ठरल्यास त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार गृहीत धरावे. अशा परिस्थितीत डमी उमेदवार अपक्ष उमेदवार समजण्यात

येईल. मूळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास डमी उमेदवार हा पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची अधिसूचना -शासन राजपत्र असाधारण क्र.१०, दि.०६ जानेवारी, २०१७ अन्वये राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३-०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकारी यांचेकडे दिले पाहिजे. (जर पक्षाने नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३ वाजेपर्यंत नेमक्या कोणत्या उमेदवाराला उमेदवारी द्यावयाची असे पत्र संबंधित निर्वाचन अधिकाऱ्याला दिले असेल तर त्या उमेदवारास त्या पक्षाची उमेदवारी देण्यात यावी.)

(३) जर नमुना २ब मध्ये एका उमेदवारास मूळ उमेदवार व दुसऱ्या उमेदवारास बदली उमेदवार असल्याचा उल्लेख नसेल परंतु दोन्ही उमेदवारांस नमुना २ब, पक्षाचा नमुना-२ ब सही करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीने दिले असेल अशावेळी ज्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र प्रथम प्राप्त झाले असेल त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून गृहीत धरण्यात यावे.

५.७ एकाच उमेदवारास विविध पक्षाकडून उमेदवारी दिली गेल्यास : (आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी/ २००९/ सीआर-४९/का-११ दि.५/०२/२०१२)

५.७.१ एखादया उमेदवारास एकापेक्षा जास्त पक्षांचा नमुना-२ब सादर केला असेल आणि नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखरेच्या तारखेस दु.३-०० वाजेपर्यंत विहित वेळेत एक राजकीय पक्ष वगळता अन्य राजकीय पक्षाने लेखी सूचना देऊन नमुना-२ ब मागे घेतले असल्यास त्या उमेदवारास ज्या पक्षाने नमुना २-ब मागे घेतलेले नाही, त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे.

५.७.२ जर नामनिर्देशन मागे घेण्याच्या विहित कालावधीनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त राजकीय पक्षाने दिलेले नमुना-२ब शिल्लक राहिले असल्यास त्या उमेदवाराने तो कोणत्या पक्षातर्फे निवडणूक लढवू इच्छितो याबाबत लेखी दिल्यास त्याला त्या पक्षाचा अधिकृत उमेदवार असल्याचे मानण्यात यावे.

५.७.३ वरील प्रमाणे लेखी न दिल्यास उमेदवाराने प्रथम ज्या पक्षाच्यावतीने नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल त्या नामनिर्देशन पत्रासोबतचा नमुना-२ब ग्राहय धरुन त्यास त्या पक्षाचा उमेदवार आहे असे समजणेत येईल.

५.८ अपक्ष उमेदवारांना त्यांनी त्यांच्या नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या ३ मुक्त चिन्हांपैकी १ मुक्त चिन्ह दिले जाईल, परंतु एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास

त्याने प्रथम दाखल केलेल्या वैध नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या चिन्हांचा पसंतीक्रम विचारात घेण्यात यावा. (आयोगाचे आदेश क्रं. एसईसी/२००९/सीआर-४९/का-११ दि.५/०२/२०१२)

५.९ कोणत्याही परिस्थितीत एका निवडणूक विभागात किंवा एका निर्वाचक गणात एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकच चिन्ह वाटले जाणार नाही.

५.१० चिन्ह वाटप अत्यंत काळजीपूर्वक करावे, चुकीचे चिन्ह देणे वा एकच चिन्ह दोन उमेदवारास (एकाच निवडणूक विभाग वा निर्वाचक गणात) देणे यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया फोल ठरू शकते. तरी चिन्ह वाटप करताना सर्व सुचनांचा अभ्यास करावा.

अशी चूक झाल्यास व ती संबधित निवडणूक अधिकाऱ्याच्या मतदानापूर्वी लक्षात आल्यास, तो योग्य त्या खूलाशासह आयोगास अहवाल सादर करेल, आयोगाकडून परवानगी प्राप्त झाल्यावर आयोग देईल त्या कार्यक्रमाप्रमाणे चिन्ह वाटप प्रक्रियेपासूनची कार्यवाही पुन्हा करेल.

५.११ चिन्ह वाटपाच्या प्रक्रियेचे छायाचित्रण करावे तसेच सविस्तर इतिवृत्त लिहिण्यात यावे

५.१२ निर्वाचन अधिकारी उमेदवारास वाटून देण्यात आलेल्या निशाणीबद्दल त्या प्रत्येक उमेदवारास किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस माहिती देईल तसेच **निशाणीचा एक नमुना त्यास पुरविल.**

५.१३ मतदार यादी पुरविणे :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाची मतदार यादी वापरत असून ती निवडणूक विभाग तसेच निर्वाचक गण निहाय विभाजित करण्यात येते. तरी अशी मतदार यादी विनामुल्य पुरविण्याची कायद्यात तरतूद नाही. सबब आयोगाचे आदेश क्रं. १०९७/८१६/९७/परा दि. २४/०१/१९९७ नुसार छपाईचा खर्च लक्षात घेऊन मूल्य निर्धारीत करावे व ते आकारुन मागणी करणाऱ्यास पुरवावी.

**५.१४ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ओळखपत्र देणे :**

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी तयार झालेबरोबर खालील नमुन्यात, उमेदवाराचे छायाचित्र असणारे ओळखपत्र देण्यात यावे.

**उमेदवाराचे ओळखपत्र**

उमेदवाराचा फोटो

**श्री./श्रीम...............................हे / ह्या ............जिल्हा परिषद/पंचायत समिती मधील .................निवडणूक विभाग /निर्वाचक गण सार्वत्रिक/ पोट निवडणूक २०... साठी उमेदवार आहेत. त्यांना .........................या राजकीय पक्षाकडून उमेदवारी देण्यात आली आहे.**

**उमेदवाराची सही**

**साक्षंकित केले**
**निवडणूक अधिकाऱ्याची सही व गोल शिक्का**
**ठिकाण ..........**
**तारिख ............**
**(आयोगाकडे मान्यतापात्र वा नोंदणीकृत राजकीय पक्षाचा उमेदवार असल्यास पक्षाचे नाव नमूद करावे अन्यथा सदर मजकूर खोडावा)**

५.१४.१ याकरिता उमेदवाराकडून २ छायाचित्र/ फोटो घेण्यात यावीत. वरील प्रमाणे ओळखपत्र तयार करून, १ फोटो ओळखपत्रावर लावण्यात यावा व सदर ओळखपत्र उमेदवारास देण्यात यावे. तसेच कार्यालयीन अभिलेखासाठी निवडणूक विभाग/ निर्वाचक गण निहाय १ रजिस्टर (वा एका रजिस्टरमध्ये विभाग करून) तयार करून त्यात उमेदवाराचे नाव, पक्षाचे नाव, हा तपशील नोंदवून त्याच रजिस्टरवर फोटो लावावा व उमेदवाराची ओळखपत्र मिळालेकामी पोहच घ्यावी.

# प्रकरण ६
# बिनविरोध /अविरोध निवडणूक

६.१ महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील ३० व महाराष्ट्र जिल्हा परिषदा (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील २९ मधील तरतुदीनुसार उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी संपले नंतर एखाद्या मतदार विभागात ज्याचे नामनिर्देशन स्विकारण्यात आले आहे असा एकच उमेदवार असेल तर निर्वाचन अधिकारी ती जागा भरण्यासाठी तो योग्य रित्या निवडून आला असल्याचे जाहीर करेल; आणि नमुना ६-अ मधील प्रतिज्ञापत्र पूर्ण करून प्रमाणित करेल. सही केलेल्या प्रमाणित प्रती, तात्काळ जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवेल.

**नमुना ६-अ**

**(नियम ३० व २९ पहा)**

लढविण्यात न आलेल्या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याचा नमुना

........................जिल्हा परिषदेच्या/ पंचायत समितीच्या...................... निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील निवडणूक , २०.....

महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम ३०/ महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम २९ मधील उपबंधास अनुसरून, मी घोषित करतो की, श्री........................, पत्ता ........................... हा, निवडणूक लढविणारा एकमेव उमेदवार असल्यामुळे वरील विभागातील / गणातील जागा भरण्यासाठी तो यथोचितरीत्या निवडून आलेला आहे.

दिनांक........

निर्वाचक अधिकारी ,

ठिकाण.................... मतदार विभाग.................

६.२ मात्र उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम मुदतीनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिल्यास अशावेळी संबंधित उमेदवाराने इतर उमेदवारांवर दबाब आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडले वा कसे याची खात्री निर्वाचक अधिकाऱ्यांनी करावी व असा प्रसंग घडला असल्यास राज्य निवडणूक आयोगाला सविस्तर अहवाल पाठवावा. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/का-५, दिनांक २३ डिसेंबर, २००४ पहावेत.)

# प्रकरण ७
## निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व मतपत्रिका

७.१ उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपलेनंतर, वैधरित्या नामनिर्देशीत झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही अशा उमेदवारांस चिन्ह वाटप करण्यात येईल व तदनंतर तात्काळ निर्वाचन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी विहित नमुन्यात मध्ये तयार करेल.

७.२ या यादीत, उमेदवारांची नावे हि देवनागरी वर्णानुक्रमे लावण्यात येतील. यासाठी उमेदवारांची नामनिर्देशनपत्रात नमूद नावे व पत्ते लक्षात घेण्यात येतील.

७.३ ज्या उमेदवारांना आडनावे असतील अशा उमेदवारांच्या **आडनावांनुसार** व इतर उमेदवारांच्या बाबतीत त्याच्या खुद्द नावानुसार वर्णानुक्रमे लावण्यात येतील. ( नियम २२ व नियम २१)

नमुना ४*
( नियम २२ व २१ पहा )*
निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी

.........जिल्हा परिषदेच्या/ पंचायत समितीच्या ............. निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील निवडणूक , २०.....

| अनु. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराचा पत्ता | उमेदवारास नेमून दिलेली निशाणी |
|---|---|---|---|
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>इत्यादी | | | |

ठिकाण .................... निर्वाचन अधिकाऱ्याची सही
दिनांक

** पंचायत समितीसाठी नमुना ३ व नियम २१ असेल.

**७.४ मतपत्रिका :**

७.४.१ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी अंतिम केलेनंतर तात्काळ मतपत्रिका छपाईसाठी खास व्यवस्था करण्यात यावी. यासाठी आयोगाचे आदेश क्रमांक: रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२०/का.५ दि. १७ /११/२०१४ पहावेत.

७.४.२ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत ज्या क्रमाने उमेदवारांची नावे असतील त्याच क्रमाने ती मतपत्रिकेवर लिहिली जातील.

७.४.३ जर दोन किंवा अधिक उमेदवार एकच नाव धारण करीत असतील तर, त्यांचा व्यवसाय किंवा राहण्याचे ठिकाण लिहून किंवा इतर रीतीने त्यांच्यातील फरक दर्शविण्यात येईल.

७.४.४ **टपाली मतपत्रिकांची छपाई :-** उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यानंतर टपाली मतपत्रिकांची छपाई हे अत्यंत महत्वाचे काम आहे. राज्य निवडणूक आयोगाकडील टपाली मतपत्रिका आदेश, दि. १६ जानेवारी,२००१ व दि. १७ जानेवारी,२००१ मध्ये दिल्यानुसार टपाली मतपत्रिकांची छपाई करावयाची आहे. राज्य निवडणूक आयोगाने टपाली मतपत्रिका आदेश हे निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांपुरतेच मर्यादित ठेवलेले असून, आवश्यक तितक्याच टपाली मतपत्रिका छापण्यात याव्यात. टपाली मतपत्रिकेच्या नमुन्याचा तपशील खाली नमूद केला आहे :-

(१) प्रत्येक टपाली मतपत्रिकेस स्थळप्रत (काऊन्टर फाईल) जोडलेली असावी. ती स्थळप्रत मतपत्रिकेच्या अगदी वरच्या बाजूस असावी.

(२) स्थळप्रतीवर तसेच मतपत्रिकेच्या भागावर ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांची सार्वत्रिक निवडणूक/पोट निवडणूक आहे तिचे नाव, प्रभाग तसेच जागा क्रमांक त्याबाबतचा तपशील छापण्यात यावा.

(३) टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव व नावाच्या खाली कंसामध्ये उमेदवाराचा पक्ष/आघाडी/फ्रंट अथवा अपक्ष असल्यास तसे नमूद करण्यात यावे. तथापि, टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह छापण्यात येणार नाही.

(४) मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर संबंधित प्रभागाच्या मतदार यादीतील "मतदाराचा अनुक्रमांक" हा तपशील छापण्यात यावा. त्यासमोर टपाली मतपत्रिका निर्गमित केल्यानंतर, निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या मतदाराचा अनुक्रमांक नोंदविण्यात यावा. तसेच मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीवर सदर अनुक्रमांकासमोर "PB" अशी नोंद घेण्यात यावी. टपाली मतपत्रिकेचा नमुना (परिशिष्ट ७) येथे दिला आहे.

**७.४.५ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतपत्रिका -**

राज्य निवडणूक आयोगाकडून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका EVM द्वारे घेण्यात येत असून प्रत्येक मतदान यंत्रास कंट्रोल युनिट व बॅलट युनिट असे दोन भाग असतील व ही मतदान यंत्रे इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेली असतील. हे दोन भाग एकमेकास जोडल्यानंतर सदर मतदान यंत्र कार्यरत होऊ शकते. भारत निवडणूक आयोगाच्या एका बॅलट युनिटवर १६ उमेदवारांसाठी ( राज्य निवडणूक आयोगाच्या एका बॅलेट वर १५ उमेदवारांसाठी) मतदान करण्याची तरतूद आहे. मतपत्रिकेतील शेवटचे बटण नोटासाठी (NOTA) राखीव असेल. एकास एक असे ४ बॅलट युनिट जोडून ५९-६३ उमेदवारांच्या निवडणुकीचे मतदान घेता येते.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या बॅलट युनिटसाठी आवश्यक असणाऱ्या मतपत्रिका -**

(१) प्रत्येक बॅलट युनिटसाठी एक मतपत्रिका त्यासाठी राखून ठेवलेल्या जागेमध्ये घट्ट चिकटवली जाईल.

(२) सदर मतपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे असेल :-

(अ) मतपत्रिकेची एकूण लांबी ४६० मि.मी. तर रुंदी १४० मि.मी. इतकी राहील.

(ब) मतपत्रिकेच्या अगदी वरच्या बाजूस निवडणुकीचा तपशील लिहिण्यासाठी जागा ठरविण्यात येईल व या जागेची लांबी १२.७ मि.मी. व रुंदी १४० मि.मी. इतकी राहील.

(क) सदर ठरविलेल्या जागेत अगदी वरच्या बाजूस डाव्या कोपऱ्यात मतपत्रिकेचा अनुक्रमांक छापला जाईल. ज्या ठिकाणी उमेदवारांची संख्या ही १६ पेक्षा जास्त असेल तेथे एकापेक्षा जास्त बॅलट युनिट असणार आहेत. (जिथे राज्य निवडणूक आयोगाचे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरले जाईल तेथे एका मतपत्रिकेवर जास्तीत जास्त १५ उमेदवार राहतील) तरी तेथे प्रत्येक मतपत्रिकेच्या पानावर उजव्या कोपऱ्यात मतपत्रिकेचा पृष्ठ क्र. १,२,३,४ असा लिहावा.

सर्व उमेदवारांची नांवे लिहिल्यानंतर शेवटचा क्रमांक नोटा (NOTA) असेल. (आयोगाचे या संदर्भातील आदेश क्र.रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२, दि.१२.११.२०१३ व दि. २६.११.२०१३ चे आदेश पहावेत.)

(ड) सदर ठरविलेल्या जागेत अगदी वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव, प्रभाग/जागा क्रमांक व सार्वत्रिक/पोट निवडणुकीचे वर्ष याबाबतचा तपशील छापला जाईल.

(इ) सदर मजकूर छापल्यानंतर त्याच्या खाली २.१ मि.मी. जाडीची एक काळी रेषा आखण्यात येईल.

(फ) उपरोक्त नमूद रेषेखाली निवडणूक लढविणाऱ्या उमदवाराचे नाव आणि त्याला देण्यात आलेले चिन्ह चौकोनात छापण्यात येईल. प्रत्येक उमेदवारासाठी वेगळा चौकोन राहील.

(ग) प्रत्येक उमेदवारासाठी असलेला प्रत्येक उपरोक्त नमूद चौकोन २५.४ मि.मी. लांबीचा व १४० मि.मी. रुंदीचा राहील. याप्रमाणे एका मतपत्रिकेवर जास्तीत जास्त १६ उमेदवार राहतील. (जिथे राज्य निवडणूक आयोगाचे मतदान यंत्र वापरले जाईल तेथे एका मतपत्रिकेवर जास्तीत जास्त १५ उमेदवार राहतील व मतदान यंत्रावरिल शेवटच्या बटनासमोरील (“END” बटण ) मास्क करावे या चौकटीनंतर ५.२ मि.मी. जागा रिकामी राहील)

(ह) प्रत्येक उमेदवाराच्या तपशीलाचा चौकोन वेगळा करणारी जाड काळी रेषा २.१ मि.मी. इतक्या जाडीची राहील.

(य) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नावे छापण्यात येतात त्याच क्रमाने मतपत्रिकेवर उमेदवाराची नावे छापण्यात येतील.

(ज) प्रत्येक उमेदवारासंबंधीच्या चौकोनात मतपत्रिकांवर उमेदवाराचा अनुक्रमांक व नाव डाव्या बाजूला तर त्याचे चिन्ह उजव्या बाजूला छापण्यात यावे.

(ल) मतपत्रिकांचे रंग राज्य निवडणूक आयोगाने विहित केल्यानुसार राहतील.

जिल्हा परिषद सदस्य - पांढरा रंग
पंचायत समिती सदस्य - गुलाबी रंग

(३) नमुना मतपत्रिका **परिशिष्ट ८** मध्ये दिल्याप्रमाणे असेल.( राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रं.- रानिआ/२०१३/प्र.क्र. ११/का-१२, दि. १२/११/२०१३ अन्वये देण्यात आलेल्या NOTA संबधीत तरतुदी लक्षात घ्याव्यात)

**मतपत्रिका छापतांना घ्यावयाची दक्षता**

(१) मतपत्रिका छापताना ती अशारितीने छापणे आवश्यक आहे की जेणेकरुन मतपत्रिका बॅलेट युनिटमध्ये घट्ट चिकटविल्यानंतर उमेदवाराचे नांव नमूद केलेला चौकोन हा बॅलेट युनिटवरील रेषेशी बरोबर जुळला पाहिजे. त्यासाठी मतपत्रिका छापताना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. मतपत्रिका योग्यरित्या छापल्या जातील यासाठी आवश्यक वाटल्यास मुद्रणालयाच्या तंत्रज्ञान बॅलेट युनिट दाखविण्यात यावे व त्यांना त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेण्यास सांगावे जेणेकरुन निवडणुकीचा तपशिल छापावयाची जागा व उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेले चौकोन यांच्या मधल्या रेषा व त्यांची जाडी याबाबत बॅलेट युनिटवर त्यासाठी ठेवलेल्या जागेशी बरोबर जुळतील. बॅलेट युनिटवर वापरण्यासाठी घ्यावयाच्या मतपत्रिकांना स्थळप्रतीची आवश्यकता नसून त्यांचे बंडल देखील शिवून घेण्याची आवश्यकता नाही. मतपत्रिका सुट्टयाच ठेवण्यात याव्यात.

**७.४.६ प्रदत्त मतपत्रिका**

(१) एखादी व्यक्ती आपण स्वत: मतदार असल्याचा दावा करुन संबंधित मतदान केंद्रात उपस्थित झाल्यास व त्या व्यक्तीच्या नावावर त्या आधीच मतदान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तीस आपल्या ओळखीचा पुरावा सादर करण्याची संधी देऊन तीच व्यक्ती खरा मतदार आहे याची ओळख पटल्यास मतदान केंद्राध्यक्षांनी अशा व्यक्तीस प्रदत्त मतपत्रिका देण्याची तरतूद आहे.

(२) बॅलेट युनिटवर लावलेली मतपत्रिका व प्रदत्त मतपत्रिका या एकच असतील, म्हणजेच प्रदत्त मतपत्रिका देखील वरील परिच्छेद ३ येथे विहित केल्याप्रमाणे राहील. मात्र प्रत्येक प्रदत्त मतपत्रिकेच्या पाठीमागे “प्रदत्त मतपत्रिका” असा शिक्का मारलेला असेल.

### ७.४.७ मतपत्रिका किती छापाव्यात याचा अंदाज घेणे

मतपत्रिका किती छापाव्यात ही बाब किती मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत यावर तसेच किती मतदान यंत्रे वापरण्यात येणार आहेत (त्यामध्ये राखीव मतदान यंत्रांचा देखील समावेश असेल) यावर अवलंबून राहील. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर किती प्रदत्त मतपत्रिका पुरवायच्या आहे यावर देखील अवलंबून राहील. त्यासाठी खालील बाबी विचारात घेण्याची आवश्यकता आहे :-

(१) प्रत्येक बॅलेट युनिटवर एक मतपत्रिका आवश्यक राहील. यास्तव जितकी मतदान यंत्रे वापरावयाची आहेत (राखीव मतदान यंत्रासह) तितक्या मतपत्रिका आवश्यक राहतील.

(२) प्रत्येक मतदान केंद्रावर सुमारे २० प्रदत्त मतपत्रिका पुरविण्यात येतील अशारीतीने जितकी मतदान केंद्रे असतील गुणिले २० याप्रमाणे प्रदत्त मतपत्रिकांची संख्या काढण्यात यावी.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे मतपत्रिकांची संख्या काढल्यानंतर त्या संख्यांच्या १०% अतिरिक्त मतपत्रिका ज्या आणीबाणीची वेळ पडल्यास वापरता येतील अथवा एखादया मतदान केंद्रावर अतिरिक्त प्रदत्त मतपत्रिका लागल्यास वापरता येतील अशारितीने एकूण छापावयाच्या मतपत्रिकांची संख्या काढण्यात यावी.

### ७.४.८ मतपत्रिका छापावयाची व्यवस्था

(१) मतपत्रिकांची छपाई शक्यतोवर शासकीय मुद्रणालयात करण्यात यावी. कारण लोकसभा/विधानसभा निवडणुकीसाठी मतदान यंत्रे वापरण्यात आली असल्यामुळे सदर मतदान यंत्रासाठी आवश्यक असणारी मतपत्रिका छपाई करण्याचा त्यांना अनुभव आहे. यास्तव, शक्यतोवर शासकीय मुद्रणालयात मतपत्रिका छापून घेण्याची व्यवस्था निर्वाचन अधिकारी यांनी करावयाची आहे. मतपत्रिका छापून घेतल्यानंतर त्या सुरक्षितपणे ठेवण्याची जबाबदारी निर्वाचन अधिकाऱ्याची आहे.

तथापि, शासकीय मुद्रणालयाकडून मतपत्रिका छपाईसाठी काही तांत्रिक अडचण असल्यास अथवा छपाई करावयाची मतपत्रिकांची संख्या कमी असल्यास, मतपत्रिकांची सुरक्षितता व गोपनियता राहील याची दक्षता घेऊन मतपत्रिकांची छपाई स्थानिक मुद्रणालयामध्ये करता येऊ शकेल. (आयोगाचे परिपत्रक क्रमांक-रानिआ/मनपा-२०१४/प्र.क्र.२०/का.५, दि.१७/११/२०१४)

(२) मतपत्रिका छापून प्राप्त झाल्यानंतर त्यांची काळजीपूर्वक तपासणी करण्यात यावी जेणेकरुन कोणत्याही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नाव व चिन्ह वगळले गेले असल्यास अथवा चुकीचे छापले गेले असल्यास ते लक्षात येईल.

(३) मतपत्रिका छापून मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्यानंतर जितक्या मतपत्रिका छापण्याचे आदेश मुद्रणालयास दिले आहेत तितक्या छापल्या आहे किंवा कसे हे तपासणे आवश्यक आहे. तसेच काही मतपत्रिका खराब असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा मतपत्रिकांच्या अनुक्रमांकाची द्विरुक्ती झाली असल्यास ते लक्षात येईल.

### ७.४.९ न वापरलेल्या मतपत्रिकांची उपलब्धता

मतदान यंत्रावर मतपत्रिका लावून झाल्यानंतर तसेच प्रदत्त मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर पुरविण्यात आल्यानंतर काही मतपत्रिका निर्वाचन अधिकाऱ्याकडे शिल्लक राहण्याची शक्यता आहे. अशा मतपत्रिका एखाद्या मुख्य ठिकाणी मतदानाचे दिवशी उपलब्ध होतील अशा ठिकाणी ठेवाव्यात. तथापि, अशा शिल्लक मतपत्रिकांचा ताबा निर्वाचन अधिकारी अथवा सहायक निर्वाचन अधिकारी यांचेकडेच राहील याची दक्षता घेण्यात यावी व त्या अनधिकृत व्यक्तीच्या हातात पडणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी. निवडणूक पूर्ण झाल्यानंतर अशा अतिरिक्त मतपत्रिका एखाद्या लोखंडी पेटीत ठेवून जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार कोषागारात अथवा अन्य ठिकाणी सुरक्षितरित्या ठेवण्यात याव्यात व नंतर आयोगाच्या आदेशानुसार त्या योग्यवेळी नष्ट करण्यात याव्यात.

७.५ निवडणूक विभागनिहाय तसेच निर्वाचक गणनिहाय नामनिर्देशनपत्र, छाननी, उमेदवारी मागे घेणे तसेच चिन्ह वाटप या सर्व प्रक्रियेशी निगडीत सर्व कागदपत्रे हि व्यवस्थीत सिल करून सुरक्षित ठेवावीत.

### ७.६ निवडणूक लढविणारे उमेदवार व त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षऱ्यांचा नमुना मतदान केंद्रावर पाठविणे

७.६.१ मतदान प्रतिनिधींची नेमणूक हि उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षरीने होत असल्याने कोणतीही बोगस व्यक्ती मतदान प्रतिनिधीं असल्याचे भासवून मतदान केंद्रात प्रवेश करु नये याकरिता उमेदवार व त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षऱ्यांचा नमुना प्रत्येक मतदान केंद्रावर पाठवावा, जेणेकरून मतदान केंद्राध्यक्षासमोर सादर केल्या जाणाऱ्या कागदपत्रावरील उमेदवार किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या स्वाक्षरी ते तपासू शकतील. सबब खालील प्रमाणे तक्ता तयार करून मतदान केंद्रावर पाठवावा.

| **........जिल्हा परिषदेच्या/ पंचायत समितीच्या<br>............. निवडणूक विभागातील / निर्वाचक गणातील निवडणूक , २०.....** | | |
|---|---|---|
| अ.क्र | उमेदवाराचे नाव व सही | निवडणूक प्रतिनिधी नाव व सही |
| १ | ..........नाव | ..........नाव |
| | सही | सही |
| २ | ..........नाव | ..........नाव |
| | सही | सही |

### ७.७ मतदानापूर्वी उमेदवार मरण पावल्यास करावयाची कार्यवाही :

निवडणूकीपूर्वी, निवडणूक लढविणारा उमेदवार जर मरण पावला आणि त्याच्या मृत्यूचे प्रतिवृत्त निर्वाचन अधिकाऱ्यास मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मिळाले तर, निर्वाचन अधिकारी, उमेदवाराच्या मृत्यूबाबत त्याची खात्री झाल्यानंतर, मतदानासंबधी प्रत्यादेश देईल व तसा अहवाल राज्य निवडणूक आयोगास तसेच जिल्हाधिकाऱ्यास देईल.

७.७.१ त्या निवडणूकीच्या संबंधात कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणुकीसाठी असल्याप्रमाणे नवीन सुरू करण्यात येईल : परंतु,

अ) मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्याच्या वेळी जी व्यक्ती निवडणूक लढवणारा उमेदवार होती अशा व्यक्तीच्या बाबतीत आणखी नामनिर्देशनाची आवश्यकता असणार नाही;

ब) मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्यापूर्वी जिने नियम २१, पोट-नियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याबाबतची नोटिस दिली असेल अशी कोणतीही व्यक्ती, मतदानासंबंधी अशा प्रत्यादेश दिल्यानंतर निवडणुकीकरिता उमेदवार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास अपात्र असणार नाही.

# प्रकरण ८
# आचारसंहिता
# सर्वसाधारण सूचना

८.१ आचारसंहिता हि मार्गदर्शक तत्वे असून ती जास्तीत जास्त आदर्श होणेकामी राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहिते संदर्भात वेळोवळी आदेश / निदेश / सूचना जारी केल्या आहेत. त्याचा काळजीपूर्वक अभ्यास करुन आचारसंहितेचा भंग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेसंदर्भात, आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१६/ प्र.क्र.३१/का-६ दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ अन्वये सर्वसाधारण सूचना जारी केल्या आहेत. त्याचप्रमाणे यासंदर्भातील इतर महत्वाचे आदेश (**परिशिष्ट- ९)** प्रमाणे आहेत कृपया त्या तपासाव्यात.

८.२ आचार संहितेची व्याप्ती : जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी आचारसंहिता संपूर्ण जिल्हयासाठी लागू राहील. पोटनिवडणूकीची आचारसंहिता संबंधित निवडणूक विभाग वा निर्वाचक गण यांच्यापुरतीच लागू असेल. मात्र निवडणूक क्षेत्राबाहेरील जिल्हयातील निवडणूक नसलेल्या नगर पंचायत/ नगर परिषद वा महानगरपालिका क्षेत्रात नेहमीप्रमाणे सर्व कामे व अनुषंगिक बाबी करण्यावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. परंतु जिल्हा परिषदेतील मतदारांवर विपरीत प्रभाव टाकणारी कोणतीही कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था वा मंत्री, खासदार, आमदार वा कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही.

८.३ **आचारसंहितेची कालावधी :** राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या वेळेपासून ते निकाल जाहीर होईपर्यंत आचारसंहिता लागू राहील.

८.४ **जाहीर प्रचाराचा कालावधी :**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (कलम २८ब) नुसार जाहीर प्रचाराचा कालावधी मतदानास सुरूवात होण्याच्या **तारखेपूर्वी** २४ तास अगोदर (उदा. १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेस रात्री १२.०० वा.)संपेल. म्हणजेच या कालावधी मध्ये कोणतीही प्रचार सभा घेता येणार नाही. मात्र कोणत्याही दिवशी रात्री १०.०० नंतर ध्वनीपेक्षकाचा वापर, मोर्चे, सभा घेता येणार नाही.

८.४.१ जाहीर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर उमेदवार मतदान केंद्राच्या १०० मीटर बाहेर मतदारांना भेटून तसेच घरोघरी जाऊन प्रचार करु शकतील. मात्र माईकचा वापर करता येणार नाही आणि समूहाने फिरता येणार नाही. क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५, दिनांक १४/०२/२०१२ अन्वये आदेश देण्यात आले आहेत.

८.४.२ **नकली (डमी) मतपत्रिका:-** उमेदवारांनी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाठी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वत:चे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, इतकीच माहिती त्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह, नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. दुस-या उमेदवाराचे नाव छापलेली मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. तसेच ज्या रंगाची

मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्याऐवजी दुस-या रंगाची नकली मतपत्रिका छापण्याची परवानगी द्यावी. तसेच सदर मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळया आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरित लक्षात येईल.

८.४.३ **नकली (डमी) बॅलेट युनिटः-** उमेदवार तसेच राजकीय पक्षांनी नकली (डमी) बॅलेट युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याद्वारे मतदारांना त्याची माहिती देणे सुलभ होईल. मात्र, अशी नकली बॅलेट युनिट लाकडी, प्लास्टिक अथवा प्लायवूडची असावीत व ती अधिकृत बॅलेट युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलेट युनिटला असलेला रंग वगळून अन्य रंगामध्ये ती तयार करण्याची अनुमती द्यावी.

८.४.४ **अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी** :-राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर मतदाराचे नाव, निवडणूक विभाग/निर्वाचक गण क्रमांक, मतदान केंद्राचा क्रमांक, मतदाराचा अनुक्रमांक इत्यादी माहिती छापण्यास हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी, मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्याचे निवडणूक चिन्ह तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता कामा नये.

उमेदवाराचे/ पक्षाचे निवडणूक चिन्ह यांची छपाई केलेली अशी ओळखचिठ्ठी मतदान केंद्रापासन २०० मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

८.५ **प्रचारासाठी आवश्यक परवानग्या:** प्रचारासाठी सर्वसाधारणपणे खालील परवानग्या मागितल्या जातात व त्यासाठी संबधित विभाग रकाना क्र.४ प्रमाणे असतील. उदा.

**निवडणुकीदरम्यान लागणारे विविध परवाने**

| अ.क्र. | परवानगीचा तपशील | परवानगी देणारे अधिकारी | परवानगीसाठी करावयाची पुर्तता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | चौक सभा व सर्व प्रकारच्या जाहीर सभा | पोलिस विभाग | १. अर्ज<br>२. जागामालकाचे संमतीपत्र<br>३. स्था.स्व.सं.चा नाहरकत दाखला |
| २ | पोस्टर्स/झेंडे सभेच्या ठिकाणी लावणे | पंचायत समिती / जिल्हा परिषद | १. अर्ज<br>२. खाजगी जागा असल्यास मालकाचे संमतीपत्र<br>३. स्था.स्व.सं.चा नाहरकत दाखला |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | खाजगी जागेवर जाहिरात फलक (कटआऊट वगळून) | पंचायत समिती / जिल्हा परिषद | १. अर्ज<br>२. खाजगी जागेच्या मालकाचे संमतीपत्र<br>३. फलक लावल्याची माहिती निर्वाचन अधिकारी यांना देणे आवश्यक आहे. |
| ४ | फक्त उमेदवाराच्या मतदारारसंघाच्या कार्यक्षेत्रापर्यंत | निर्वाचन अधिकारी | १. अर्ज<br>२. वाहन मालकाचे संमतीपत्र<br>३. वाहन नोंदणीपत्र<br>४. वाहनचालक परवाना |
| ५ | उमेदवाराचे तात्पुरते प्रचार कार्यालय | पोलिस विभाग व निर्वाचन अधिकारी | १. अर्ज<br>२. जागा मालकाचे संतीपत्र<br>३. स्था.स्व.सं. चा ना हरकत परवाना |
| ६ | हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरविणे | संचालक नागरी विमान सेवा | १. अर्ज<br>२. जिल्हाधिकारी/पोलिस अधिक्षक यांची ना हरकत<br>३. स्था.स्व.सं. ने आकारलेले शुल्क भरलेची पावती तसेच त्याचा ना हरकत दाखला<br>४. P.W.D., Fire, Ambulance ची ना हरकत |
| ७ | ध्वनिक्षेपकाची परवानगी | पोलिस विभाग | १. अर्ज |
| ८ | मिरवणूक /रोड शो | पोलिस विभाग | १. अर्ज |
| ९ | केबल जाहिरात परवानगी | निर्वाचन अधिकारी | १. नमुना अ मध्ये अर्ज<br>२. जाहिरात मजकूर-लेखी व दृकश्राव्य स्वरुपात (सी.डी.सह) तयार करणे व प्रसारित करण्यासाठी करण्यात आलेल्या खर्चाच्या धनादेशाची प्रत<br>३. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात गठीत करण्यात आलेल्या समितीचे प्रमाणपत्र |

### ८.५.१ विवीध परवानग्या देणेकामी एक खिडकी योजना

विविध परवानग्या देणेकामी निर्वाचक अधिकारी यांच्या कार्यालयात "**एक खिडकी योजना**" राबवावी. (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र. ३०/दि.२३/११/२०१६ पहा) यासाठी आवश्यक ती पुर्वतयारी करणेकामी संबंधीत जिल्हाधिकारी व निर्वाचक अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी यासाठी भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/INST/२०१४-EPS, दि. २० मार्च, २०१४ पहावेत. उदा. :

- परवानग्या देणेसंदर्भात पोलिस विभाग तसेच आवश्यक त्या सर्व संबधीत विभागांशी संपर्क साधून त्यांच्या प्रतिनिधींची नियुक्ती तात्काळ करून घ्यावी. सदर अधिकारी हा परवानगी कक्षामध्ये त्या विभागाचा प्रतिनिधी असेल व तो सदर विभागाच्यावतीने ना-हरकत दाखला देण्यास जबाबदार असेल सबब अशा दर्जाचा सक्षम अधिकारी नेमण्याची विनंती संबधीत विभागास करावी.
- आवश्यकते नुसार वर्ग-३ व ४ चे कर्मचारी देखील नेमावेत.
- एक खिडकी कार्यालयात आवश्यक मुलभूत साधनसामुग्री असावी.
- प्रत्येक उमेदवार / राजकीय पक्ष आवश्यक परवानगीसाठी परवानगी कक्षाकडे किमान ४८ तास आधी अर्ज करतील.
- उमेदवार / राजकीय पक्ष जास्तीत जास्त ७ दिवस आधी (अर्जाचा दिवस वगळून) पुढे आयोजीत करावयाच्या मिरवणुका, सभा , इतर कार्यक्रमासाठी अर्ज करू शकतील.
- एकाच दिवशी होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल.
- दोन किंवा अधिक मतदार विभागांमध्ये विभागल्या गेलेल्या वा समाविष्ट होणाऱ्या जागांवर एखादा कार्यक्रम आयोजित करावयाचा झाल्यास संबंधीत परवानगी कक्षाकडे स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.
- परवानगी कक्षाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची नोंद ठेवणेकामी एक रजिस्टर ठेवावे, ज्यामध्ये प्राप्त अर्ज सर्व विभागांच्या प्रतिनिधींकडे पाठविण्यापासून, अंतिम निर्णय घेवून परवानगी देणे वा नाकारण्यापर्यंतचे सर्व नोंदी (दिनांक व वेळ) घेण्यात येतील.
- वाहतुक नियंत्रण कक्षाशी संबंधित सर्व परवानग्या हया परवानगी कक्ष प्रमुख संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेईल. अर्जदाराला त्यासाठी वाहतूक विभागाकडे जाण्याची आवश्यकता भासणार नाही.
- या व्यतिरिक्त आवश्यक असणाऱ्या अग्निशमक दल व इतर स्थानिक प्राधिकरणाकडील परवानग्या प्राप्त करुन घेवून कोणत्याही परिस्थितीत अर्ज प्राप्त झाल्यापासून ३६ तासात परवानगी दिली जाईल वा नाकारली जाईल.
- ३६ तासापेक्षा अधिक कालावधीसाठी प्रलंबित असणारे अर्जाबाबत योग्य ती कारणमिमांसा करुन तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविला जाईल.

३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी एक खिडकी योजनेमध्ये प्रलंबित असणारे अर्ज

| अ.क्र. | निर्वाचक गण / निवडणूक विभागाचे नाव | परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे नाव व पद | परवानगी कक्षाच्या प्रमुखाचे भ्रमणध्वनी | ३६ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित अर्जांची संख्या | प्रकरणनिहाय प्रलंबित राहण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

- एक खिडकीमध्ये प्राप्त होणाऱ्या अर्जावर प्राप्त होण्याच्या क्रमानुसार (First Come First Served) कारवाई करण्यात येईल.

- एक खिडकीमधून दिल्या जाणाऱ्या प्रत्येक परवानगीची प्रत ही निर्वाचक अधिकाऱ्यांना एक तासाच्या आत दिली जाईल. निर्वाचक अधिकारी सदरची प्रत त्यांच्या आचारसंहिता पथकाला व्हिडीओ शुटिंग वा इतर कार्यवाहीसाठी पाठवतील. या सर्वांची रजिस्टरमध्ये नोंद ठेवली जाईल.
- राजकीय पक्ष वा उमेदवार यांचेकडून शासकीय हेलिपॅड, विमानतळ इ. च्या वापराची परवानगी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचेकडे किमान २४ तास अगोदर घेणे आवश्यक राहील. सदर परवानगी घेतेवेळी संपूर्ण प्रवासाचा आराखडा, वेळ, प्रवासी यांच्या नावासह तपशिल देणे आवश्यक राहील.
- सदर एक खिडकी योजनेमध्ये विविध विभागाच्या ना हरकत परवानग्या देण्याकामी खालीलप्रमाणे अधिकारी सहभागी होतील.
    - I) पोलीस विभागाचा अधिकारी
    - II) स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी,
    - III) अग्निशमक दलाचा अधिकारी
    - IV) विद्युत महामंडळाचा अधिकारी
    - V) वाहतूक नियंत्रण कक्षाचा अधिकारी
- उपरोक्त अधिकारी हे निर्वाचक अधिकाऱ्याच्या एक खिडकी कार्यालयात उपस्थित राहतील. प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छायांकीत प्रत घेवून त्यावर ना हरकत देणे / निर्णय घेणे यासारखी आवश्यक ती कार्यवाही त्याच दिवशी तातडीने करतील. यावेळी देखिल First Come First Served तत्वावर कार्यवाही करण्यात येईल.
- एक खिडकी योजने संदर्भात सर्व उमेदवार / राजकीय पक्ष यांना माहिती दयावी.

## ८.६ आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करिता निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करणे व इतर उपाययोजना

### ८.६.१ निवडणूक संनियंत्रण समिती:

(i) जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक निवडणूक संनियंत्रण समिती स्थापन करण्यात यावी. यामध्ये खालीलप्रमाणे सदस्य असतील :-

| | **अनिवार्य सदस्य** | **आवश्यकतेप्रमाणे सदस्य** |
|---|---|---|
| १ | जिल्हा पोलिस अधिक्षक | महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | महाराष्ट्र राज्य प्रादेशिक परिवहन परिषद, कार्यालय |
| ३ | आयकर विभागाचे अधिकारी | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| ४ | विक्रीकर विभागाचे अधिकारी | विद्यापिठे |
| ५ | अबकारी विभाग | जिल्हा माहिती अधिकारी (DIO), इत्यादी |
| ६ | बँकेचे वरिष्ठ अधिकारी | |

(ii) या समितीवर आवश्यकतेप्रमाणे इतर अधिकारी घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

(iii) जिल्हाधिकारी यांनी योग्य त्या अधिकाऱ्याची समिती सचिव म्हणून नियुक्ती करावी.

(iv) जिल्हा परिषदेची निवडणूक असलेल्या जिल्हयांमध्ये महानगरपालिकेचीही निवडणूक असल्यास जिल्हाधिकारी यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांच्याशी समन्वय साधावा

(v) संनियंत्रण समितीने आवश्यक त्या सर्व विषयावर शास्त्रोक्त आराखडा तयार करुन योग्य ती कार्यवाही करावी उदा.:-

(i) कायदा व सुव्यवस्था राखणे -
प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तूंच्या जसे- मद्य (Liquor), पैसा इत्यादीच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) प्रत्येक उमेदवार व राजकीय पक्ष यांनी खर्चाबाबतची व्यवस्थित माहिती वेळेवर सादर करणे.

(v) रोख रकमांच्या ने-आण संदर्भात लक्ष ठेवणे. त्यासाठी सर्व महत्वाच्या ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(vi) अशा सर्व व्यवहार व हालचालीवर जसे - तारण, वित्तीय हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) लक्ष ठेवणे.

(vii) बँकांमार्फत होणाऱ्या मोठया व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(viii) आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का.५, दि. १६/०१/२०१२ प्रमाणे पेड न्यूज, सोशल कमेंट, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

**८.६.२ आचारसंहिता तक्रार निवारण कक्ष :**

प्रत्येक निर्वाचन अधिकाऱ्याच्या स्तरावर तसेच जिल्हास्तरावर एक तक्रार निवारण कक्ष (Control Room) तयार करण्यात यावे.

- सदरचे निवारण कक्ष आचारसंहिता कालावधीत २४*७ तास कार्यरत असेल. त्यासाठी आवश्यक अधिकारी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी.
- आचारसंहिता कक्षासाठी स्वतंत्र दूरध्वनी (Toll Free Number) देण्यात यावा व त्यास वेबसाईट / केबल /वृत्तपत्रात प्रसिद्धी देण्यात यावी.
- तक्रार निवारण कक्षासाठी संगणक, नेट, फॅक्स, झेरॉक्स इ.ची सोय असावी.
- तक्रार निवारण कक्षाकडे प्राप्त सर्व तक्रारींची व त्यावर केलेल्या कार्यवाहीची नोंद एका रजिस्टर मध्ये ठेवावी, नोंद घेताना तक्रारीचा दिनांक व वेळ नमूद करावी

तक्रार निवारण केंद्र

आचारसंहिता दैनिक कारवाई अहवाल

मतदार संघाचे नाव :

दिनांक :

| अ.क्र | तक्रारीचे स्वरूप | तक्रार प्राप्त झाल्याची वेळ व तक्रार करण्याचे माध्यम (दुरध्वनी/फॅक्स/SMS/लेखी तक्रार/ विशेष प्रतिनिधीद्वारे) | तक्रारीवर केलेली कारवाई | विशेष पथका (FS SST/Expenditure Observer)कडे पाठविल्याची वेळ |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(सही व अधिकाऱ्याचे नाव व पदनाम)

- प्राप्त तक्रार तात्काळ आवश्यक कारवाईसाठी पाठवावी
- निर्वाचक अधिकाऱ्यांनी सर्व तक्रारींवर योग्य ती कारवाई होईल याकरीता स्वत: नियंत्रण ठेवावे.

**८.६.३ आचारसंहिता निरिक्षण/ नियंत्रण पथके :**

आचारसंहितेची योग्य अंमलबजावणी करणेकामी (भारत निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. No.७६/ Instructions/२०१३/EPPS/Vol. IV दि. २१/०३/२०१३ मधील सर्वसाधारण सूचना पहाव्यात) खालील पथकांची निर्मिती करावी. सदरची पथके २४ तास कार्यरत ठेवावयाची असल्याने, आवश्यक तितकी पथक निर्मिती करावी व २४*७ मध्ये त्यांना वेळा विभागून द्याव्यात जेणेकरून कोणत्याही परिस्थितीत सलग ८ तासांहून जास्त काळ एकाच टिमला काम करावे लागणार नाही.

(i) **व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक (Video Surveillance Team):** आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचारफेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेच्या दृष्टीने महत्वाच्या घटनांचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. या पथकात किमान एक अधिकारी व व्हिडीयोग्राफर असावा.

अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निर्वाचन अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करुन द्यावी.

एखादया प्रकरणी व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक (Video Surveillance Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे चित्रिकरण करुन निर्वाचन अधिकारी यांना संबंधित क्लीपसह अहवाल सादर करावा. या क्लिप तपासणी कामी व्हिडीओ व्ह्युवींग टिम (Video Viewing Team) ठेवावी.

(ii) **भरारी पथक (Flying Squad)**

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, वा मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्याशी संबंधित क्षेत्राकरिता किमान ३ पथके असावीत. यामध्ये किमान १ वरिष्ठ कार्यकारी दंडाधिकारी, जो पथक प्रमुख असेल. १ प्रत्येक पोलिस स्टेशन च्या हद्दीतील वरिष्ठ पोलिस अधिकारी, ३-४ शस्त्रधारी पोलिस, १ व्हिडीयोग्राफर असावा. या

पथकासाठी १ वाहन, मोबाईल, व्हिडीओ कॅमेरा व वस्तू /पैसे जप्त करताना, पंचनामा करण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे पुरवावीत. या पथकाने योग्य ती तपासणी करुन आक्षेपार्ह वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) **चेक पोस्टसाठी पथक** (Static Surveillance Team)

प्रत्येक निवडणूक अधिकाऱ्याशी संबंधित क्षेत्राकरिता किमान ३ पथके असावीत. यामध्ये किमान १ वरिष्ठ कार्यकारी दंडाधिकारी, ३-४ शस्त्रधारी पोलिस, असावेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्याची , शस्त्रांची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची/ पैशाची वाहतूक होऊ शकते अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करुन वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

**८.६.४ राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी करावयाच्या जाहिरातीवरील निर्बंध :**

(i) राजकीय पक्ष अथवा उमेदवारांनी सादर केलेल्या रेडिओ वा टेलिव्हिजन यासारख्या माधमातून करावयाच्या जाहिरातीची ध्वनीफित/ चित्रफीत/सीडी इत्यादी साहित्याची तपासणी करण्यासाठी तसेच त्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणूकांच्याबाबतीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करणेबाबत आयोगाचे दि.२२ डिसेंबर, २०११ प्रमाणे कार्यवाही करावी.

(ii) तसेच छापील प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येणाऱ्या बातम्यांमध्ये राजकीय पक्ष किंवा उमेदवारांकडून छुपी जाहिरात म्हणजे "**पेड न्यूज**" बाबत आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का.५, दि. १६/०१/२०१२ प्रमाणे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**८.६.५ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून** (Discretionary Grant) **खर्च करण्यावर निर्बंध:**

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क, दि.५ ऑक्टोबर, २०१६ व पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६, दिनांक २०/१२/२०१६ अन्वये स्थानिक स्वराज्य संस्थांची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने आधीपासून किंवा निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्यापासून यापैकी जे अगोदर घडेल त्या दिनांकापासून त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रातील कामांवर लोकप्रतिनिधीनी ( जसे- खासदार, मंत्री, आमदार, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी, सदस्य इ.) स्वेच्छानिधीतून खर्च करता येणार नाही. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी काढतील. तरी वरील निर्बंध न पाळल्यास, ते काम मतदारांवर प्रभाव टाकण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचे गृहित धरुन अशा कामांना स्थगिती

देण्यात यावी व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी असे निदेश देण्यात आले आहेत.

**८.७ निवडणूक प्रचार खर्च :**

८.७.१ उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा : राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का-०५, दिनांक ३० जुलै, २०११ अन्वये उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे विहीत केली आहे :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | उमेदवाराने करावयाच्या खर्चाची मर्यादा |
|---|---|---|
| १ | जिल्हा परिषदा | रुपये ३,००,०००/- |
| २ | पंचायत समिती | रुपये २,००,०००/- |

८.७.२ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप२०१५/प्र.क्र.१०/का.०६, दिनांक १०/०८/२०१५ नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने (बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवाराने सुध्दा) दैनंदिन खर्चाचा हिशोब तसेच निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत एकत्रित खर्चाचा तपशिल संबंधित जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करतील अशा उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याकडे सादर करावयाचा आहे. खर्चाचा हिशोब सादर न केलेल्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

८.७.३ राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र १३/संगणकीकरण कक्ष, दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ अन्वये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करण्याची कालमर्यादा व रित विहित केली आहे.

निवडणुकांकरिता पक्षाने केलेला खर्च संबंधित पक्षांच्या उमेदवारांमध्ये विभाजित करणेकामी आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का-५, दिनांक २८ डिसेंबर, २००६ पहावेत.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ०८/११/२०११ अन्वये निवडणुकांदरम्यान महत्वाचे राजकीय पुढारी (Star Campaigners) यांनी केलेल्या प्रचार दौऱ्यावरील प्रवास खर्चास उमेदवारांच्या निवडणूक खर्चामधून वगळण्याबाबत आदेश देण्यात आले आहे.

उमेदवाराने निवडणुकीदरम्यान केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाच्या विवरणपत्रे व शपथपत्रासंदर्भातील आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ-२०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ व राजकीय पक्षांनी निवडणुकीदरम्यान उमेदवारांवर केलेल्या खर्चाबाबत सादर करावयाच्या विवरणपत्रे व शपथपत्रासंदर्भातील आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/रापनों-२०१६/प्र.क्र.०४/का.११, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ पहावेत.

**८.७.४ निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केल्यास येणारी अनहर्ता :**

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (कलम १५ब, ६२क) नुसार संबधित निवडणुकांमध्ये उमेदवाराने निवडणूक खर्चाचा हिशोब राज्य निवडणूक आयोगाने निर्धारीत केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रितीने देण्यास कसूर केली तर तो पाच वर्षाच्या कालावधीकरिता निवडणूक लढविण्यास अनर्ह ठरतो.

जिल्हापरिषद व पंचायत समीतींच्या निवडणुकांमधील खर्च सादर न करणाऱ्या उमेदवारांना अनर्ह ठरविण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. अशी अनर्हता त्यांनी आदेशीत केल्यास, कलम १५ब (२), ६२क (२) नुसार, अशी कोणतीही निरर्हता दूर करण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकार आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस २०१०/प्र.क्र.९/का.-०७, दि. १९ नोव्हेंबर, २०१० अन्वये विभागीय आयुक्तांना प्रदान करण्यात आले आहेत.

सबब अनर्हतेबाबतच्या उपरोक्त तरतुदींची पूर्व कल्पना निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांस निर्वाचक अधिकारी यांनी दयावी व निवडणूक खर्च सादर करणेबाबतचे हमीपत्र त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावे, त्याचा नमुना राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.१०/का.६, दिनांक १० ऑगस्ट, २०१५ देण्यात आला आहे. खर्चाचा हिशोब प्राप्त करून घेणेकामी निर्वाचक अधिकाऱ्यांनी एक स्वतंत्र टिम नेमावी; जेणेकरुन उमेदवारांना आवश्यक बाबी समजावून सांगणे, प्रत्येक दिवसाचा खर्च सादर करण्यास खंड पडल्यास संबंधीत उमेदवारास आठवण करुन देणेकामी नोटीस काढणे, काही त्रुटी असल्यास तात्काळ पुर्तता करुन घेणे, इ. बाबी वेळोवेळी झाल्याने अनावश्यक विलंब व अडचणी टाळता येतील.

८.८ राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/जिपपस-२०१६/प्र.क्र.३१/का.७, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ अन्वये प्रचार फेरी व मिरवणुकीमध्ये किती वाहने वापरावीत इत्यादी बाबत आदेश अद्यावत करण्यात आले आहेत. त्याअनुसार जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी जास्तीत जास्त १० वाहनांची परवानगी देण्यात आली आहे, यामध्ये जास्तीत जास्त ३ वाहने चारचाकी वा तीनचाकी असतील, व इतर वाहने दुचाकी असू शकतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच परवानगी शिवाय प्रचारासाठी वाहन वापरावर देखील निर्बंध घालण्यात आहे आहेत, तरी सदर बाब तपासावी.

अ) आदर्श आचारसंहिता जरी केवळ मार्गदर्शक तत्वे असली तरी ज्या वर्तणुकीमुळे निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात निवडणुका पार पडण्यास बाधा निर्माण होईल अशा गोष्टी निवडणूक प्रक्रियेत निषिद्ध राहतील व त्यासाठी निर्वाचक अधिकारी भारतीय दंड संहिता मधील खालील कलमांच्या आधारे कारवाई करेल.

| | | |
|---|---|---|
| १ | कलम १५३ ए | समाजातील वेगवेगळया घटकांमध्ये धर्म, जात, जन्म, रहिवासाचे ठिकाण, भाषा यावरुन वैर पसरविणे, तसेच अशा कृत्यांसाठी धार्मिक स्थळांचा वापर करणे यासाठी ३/५ वर्षापर्यंत शिक्षा व दंड होऊ शकतो. |

| | | |
|---|---|---|
| २ | कलम १५३ बी | राष्ट्रीय एकात्मकतेला बाधा आणणारे वक्तव्य करणे, लिखाण करणे अथवा कृती करणे यासाठी ५ वर्षासाठी शिक्षा व दंड होऊ शकतो. |
| ३ | कलम १७१ बी | मते मागण्यासाठी लाच देणे या अपराधासाठी एक वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते. |
| ४ | कलम १७१ क | निवडणुकांमध्ये गैरवाजवी प्रभाव पाडणे. |
| ५ | कलम १७१ ड | निवडणुकांमध्ये तोतयेगिरी करणे |
| ६ | कलम १७१ जी | प्रतिस्पर्धी उमेदवाराच्या संबंधात खोटे कथन करणे |
| ७ | कलम १७१ एच | निवडणुकीच्या संबंधात अवैधपणे पैसे खर्च करणे |
| ८ | कलम १७१ आय | निवडणुकीचे हिशेब ठेवण्यास चुकणे |
| ९ | कलम १८८ आय | सक्षम अधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास |

८.९ आचारसंहिता कालावधीत करण्यात आलेल्या कारवाई संदर्भात दैनिक व साप्ताहिक अहवाल सादर करणे : आचारसंहिता कालावधीत पोलिस व त्यांच्या सहाय्याने निर्वाचक अधिकारी विवीध प्रतिबंधात्मक तसेच आवश्यक कारवाया करित असतात तरी त्याबाबतची माहिती संकलीत करणे भविष्यातील निवडणूकांच्या दृष्टीने महत्वाचे ठरते. सबब राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात ( परिशिष्ट-१०-अ, १०-अ(१), १०-ब ) दैनिक अहवाल व साप्ताहिक अहवाल निर्वाचक अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तसेच आयोगास पाठवावेत. तसेच भरारी पथक व चेक पोस्ट साठीचे पथक यांनी विहित नमुन्यात (परिशिष्ट-१०-क, १०-क(१), १०-ड) निवडणूक निर्णय अधिकारी यांना अहवाल सादर करावा व त्याचा संकलित अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत आयोगाकडे पाठवावा.

# प्रकरण-९
# मतदान केंद्र

निवडणुकांच्यावेळी "मतदान केंद्र" हा महत्वाचा विषय असून भारत निवडणूक आयोगाच्या निवडणुकीच्यावेळी घेण्यात येणारी सर्व दक्षता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही घेणे आवश्यक आहे.

सबब राज्य निवडणूक आयोगाकडून निर्गमित, मतदान केंद्र निश्चितीबाबतचे **आदेश क्रमांक - रानिआ-२०१५/प्र.क्र.९/प्रकल्प कक्ष दि.२७/०५/२०१५ व रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.०४/का.५, दिनांक ९/३/२०१६** अवलोकन व्हावे.

(i) जिल्हा परिषद व पंचायत समितीचा मतदार संघ हा निवडणूक विभाग व निर्वाचन गणामध्ये म्हणजेच प्रभागामध्ये विभागलेला असतो व प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्टया सलग प्रदेश असतो. सबब, प्रत्येक प्रभागाकरिता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.

(ii) जिल्हा परिषद/पंचायत समितीसाठी प्रत्येक मतदान केंद्रास जोडलेल्या मतदारांची संख्या १००० ते १२०० असण्यास हरकत नाही. परंतु, सदर मतदान केंद्रावर १२०० हून अधिक मतदार असू नयेत. तसेच मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार अशा केंद्रांवर अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

(iii) भौगोलिकदृष्टया मतदान केंद्र हे त्यास जोडलेल्या भागाच्या मध्यावर असावे. जेणेकरून, मतदान केंद्रास जोडलेल्या कोणत्याही मतदारास २ किमीपेक्षा अधिक प्रवास करावा लागू नये. सबब, विरळ लोकसंख्या/भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या / विभागलेल्या वस्त्यांमध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र तयार केल्यास हरकत नसावी.

(iv) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने शक्यतोवर एका इमारतीत शहरी भागात जास्तीत जास्त ४ व ग्रामीण भागात जास्तीत जास्त २ केंद्रे ठेवावीत.

(v) मतदान केंद्राची जागा किमान २० चौ. मीटर असेल.

(vi) मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे दोरीच्या सहाय्याने तात्पुरती व्यवस्था करावी.

(vii) मतदान केंद्र हे पक्क्या इमारतीत असावे. तसेच शासकीय /निमशासकीय शाळा, कार्यालये किंवा अनुदानित शाळा/कार्यालयांच्या इमारतीतच असावे. जेणेकरून, टेबल-खुर्च्या व इतर सोयी निर्माण करणे सोपे जाते. सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर बाब योग्य होते. अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करावयाचे झाल्यास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी योग्य ती कारणमिमांसा जाणून घेऊन मगच अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी.

खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापतेवेळी त्याच्या मालकाची लेखी संमती असणे आवश्यक राहील. परंतु अशी लेखी संमत्ती देण्यास नकार दिल्यास आयोगाकडील आदेश

क्रमांक- एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२ मार्च, १९९५ प्रमाणे अधिग्रहीत करण्याची कार्यवाही करावी.

खाजगी इमारतीतील मतदान केंद्राच्या बाबत अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय/उमेदवार/हितचिंतक/पाठीराखा रहात नसल्याची/मालकी नसल्याची खात्री करावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी नेण्याची पर्यायी व्यवस्था करावी.

मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या २४ तास अगोदर असे मतदान केंद्र निर्वाचन अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे. (राज्य निवडणूक आयोगाकडील SEC/३०६/Desk-३ दि. ०२/०३/१९९५ चे आदेश)

(viii) मतदान केंद्राचा २०० मीटर परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या २०० मिटर परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाही.

(ix) कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही स्थितीत पोलीस स्टेशन, हॉस्पिटल, देऊळ, धार्मिक इमारतीत नसेल.

(x) मतदान केंद्रात खालील मुलभूत सुविधा पुरवण्यात याव्यात:-

(a) मतदान केंद्र शक्यतोवर तळमजल्यावर ठेवावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असेल तर तेथे लिफ्टची सोय असावी वा मानवी डोलीची व्यवस्था करावी.

(b) मतदान केंद्रावर वृध्द/अपंग व्यक्तींना सोयीचे व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी.

(c) मतदान केंद्र सुरक्षित पक्क्या इमारतीतच असावे. खिडक्या, दरवाजे, पंखे आणि विद्युत पुरवठा यांची तपासणी करून घ्यावी.

(d) मतदान केंद्रावर भरपूर उजेड व हवा असेल याची तपासणी करावी. मतदान केंद्र निश्चितीपूर्वी तपासणीच्यावेळी या सर्व बाबींची नोंद घ्यावी. बल्ब, लाईट्स, फॅन्स, स्वीचेस, वायरिंग तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही याची खात्री संबंधित यंत्रणेला (MSEB/RELIANCE/TATA) आवश्यक आदेश देऊन करावी. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

(e) मतदान केंद्रावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे याची खात्री करावी. उन्हाळयात प्रत्येक केंद्रावर मातीच्या मडक्यात (२ ग्लास सोबत ठेवावेत) स्वच्छ पिण्याचे पाणी ठेवावे. ते मडके सातत्याने भरलेले राहील याकडे लक्ष द्यावे.

(f) मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर (टेबल, खुर्च्या, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहतेवेळी सावलीसाठी शेडस्) ची उपाययोजना करावी. Entry-Exit साठी आवश्यक तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

(g) स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्यावेळी त्याच्या स्वच्छतेबाबतचीही काळजी घ्यावी.

(h) मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदारांची वर्णानुक्रमे नावे असलेली एक यादी, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक ................ ते ................. मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

(i) मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची (मतदान केंद्र सहाय्य शौचालय, पाणी) माहिती दर्शविणारे फलक

(j) उन्हाळयात होणाऱ्या निवडणूका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून आवश्यक ती प्रथमोपचार, औषधे (जसे De-hydration Medicine) मतदान अधिकाऱ्यांसोबत द्यावीत. सर्व मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत साखर-मीठाच्या पुडया मतदान साहित्यात द्याव्यात

(k) भौगोलिक परिस्थिती व वातावरण यांचा अंदाज घेऊन उष्माघातात आवश्यकतेनुसार लोकांनी घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांसह प्रसिध्दी द्यावी. "आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या औषधांसोबत फिरतीवर ठेवणे. जेणेकरून, गरजेनुसार ते उपचार करू शकतील.

(l) पावसाळयात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातून पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी.

(xi) मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह/आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.

(xii) परदानशीन स्त्रियांसाठी किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत

असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल. आवश्यकतेनुसार कमी खर्चाचे पार्टिशन (बेडशीट/चारपाईचा उपयोग) तयार करून घ्यावे.

(xiii) शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान करू द्यावे.

(xiv) ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरीक/अपंग/गरोदर स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदाराकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना माफक प्रसिध्दी द्यावी. तसेच या सर्व सूचनांबाबत मतदान कर्मचारीवृंदानाही प्रशिक्षणादरम्यान सूचित करावे.

(xv) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या २०० मीटर परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. २०० मीटर परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल. परंतु, सदर केंद्रास स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी घ्यावी लागेल.

सदर केंद्रावर ३ x ४ $^{१/२}$ फुटापेक्षा जास्त लांबी रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात येईल.

मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव/चिन्ह नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही.

येथे अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निर्वाचन अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी.

(xvi) मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद/पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल/कॉडलेस फोन/वायरलेस वापरणार नाही.

(xvii) मागील निवडणुकीतील मतदान प्रक्रियेशी निगडित गुन्हे, मतदानाची सरासरी, मतदार यादीतील फोटो, ओळखपत्र प्राप्त मतदारांची सरासरी, कुटुंबविरहित न सापडणाऱ्या मतदारांची संख्या लक्षात घेऊन, भारत निवडणूक आयोगाच्या परिपत्रक क्रमांक-४६४/INST/२००८-EPS, दिनांक २४/१०/२००८ नुसार संवेदनशील /अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी तयार करावी.

अशी यादी पोलीस यंत्रणेशी समन्वय साधून क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या मदतीने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी तयार करावी व तद्नंतर अशा संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रात अतिरिक्त पोलीसवृंद, आवश्यकतेनुसार

डिजिटल / व्हिडिओ कॅमेरे लावणे, मतदारांची ओळख पटविताना विशेष काळजी घेणे यासारख्या उपाययोजना कराव्यात.

(xviii) भारत निवडणूक आयोगाकडील परिपत्रक क्र. ४६४/INST/२००७-PLN-१, दिनांक १२/१०/२००७ नुसार मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित/कमजोर मतदारांचा समूह/विभाग (Vulnerable Mapping)असल्यास तो शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत काही महत्वाच्या सूचना पारित करण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतही करण्यात यावे.

(अ) तहसिलदार/गट विकास अधिकारी/पोलीस यंत्रणा यांनी असे कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत पोलीस यंत्रणेला तात्काळ कळवावे.

(ब) अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निर्वाचन अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी वारंवार भेटी देतील. तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोंडींचा आढावा घेतील.

(क) मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे. अशा ठिकाणी मतदान कमी होत असल्याचे निदर्शनास आल्यास विशेष पथकाने तात्काळ भेट देऊन मतदारांना मतदान करण्याकामी प्रवृत्त करावे. याबाबत संबधित मतदान केंद्राध्यक्षांना विशेष सुचना द्याव्यात.

(ड) असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नसावी. (जरी असे मतदान केंद्र ५०० मतदारांपेक्षाही कमी असले तरी चालेल) अशा कमकुवत मतदारांना, जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(xix) (अ) मतदान केंद्रांची निश्चीती नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अगोदर अंतिम होणे आवश्यक राहील. मतदान केंद्राची यादी अंतिम करण्यापूर्वी संबंधित तहसिलदार यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

सदर मतदान केंद्रांची, मतदान केंद्र व ज्या क्षेत्रासाठी सदरचे मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात येईल ती क्षेत्र (मतदान क्षेत्र) दर्शवणारी एक प्रारुप यादी तयार करावी.

| मतदान केंद्र क्र. | यादी भाग क्र. | गावाचे नाव | मतदान केंद्र असणाऱ्या इमारतीचा तपशील | मतदान केंद्रास जोडलेले मतदान क्षेत्र | मतदान केंद्रास जोडलेले मतदार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्त्री | पुरूष | एकूण |
| | | | | | | | |

(ब) प्रारूप मतदान केंद्रांच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ प्रसिध्दी द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील माजी पदाधिकारी/राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक तेथे) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी. सदर यादीच निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमात निश्चीत केलेल्या दिवशी (मतदानाच्या अगोदर किमान ७ दिवस) प्रसिद्ध करण्यात यावी.

मतदान केंद्र अंतीम यादीत प्रसिद्ध केल्यानंतर काही आकस्मिक उद्भवलेल्या कारणास्तव मतदान केंद्रात बदल करणे भाग असल्यास जिल्हाधिकारी यांची पुर्वपरवानगी असणे आवश्यक राहिल.

(क) अंतिम मतदान केंद्रांची यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा (Route Map), वाहतूकविषयक आराखडा (Transport plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांच्या संपर्क दूरध्वनीसह एक Communication Plan तयार करावा. तसेच वॉटस्‌ ॲप, एसएमएस, ई-मेल यांचा वापर जास्तीत जास्त करावा व त्यासाठी सर्व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक व ई-मेल ॲड्रेस कम्युनिकेशन प्लॅनमध्ये समाविष्ट असावेत.

(ड) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना संवेदनशील/अतिसंवेदनशील मतदान केंद्रांच्या यादीसह उपरोक्त आराखडे टिप्पणीसह पुरवावेत.

## प्रकरण-१०
## मतदान कर्मचारी वृंद

१०.१ **कायद्यातील तरतुदी :** महाराष्ट्र जिल्हा परिषद निवडणूक नियम, १९६२ मधील नियम ८ व महाराष्ट्र पंचायत समिती निवडणूक नियम १९६२, नियम १० नुसार मतदान केंद्रावर नेमण्यात येणारा कर्मचारीवृंद हा निर्वाचक अधिकारी नेमेल. परंतु असा कर्मचारीवृंद पुरविण्याची संपुर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहिल. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक SEC/३०६/DESK- ३ दि.०२-०३-१९९५ नुसार सदरचा कर्मचारीवृंद जिल्हाधिकारी अधिग्रहित करतील.

१०.२ **नियंत्रण :** निवडणूक कामासाठी नेमण्यात येणारे सर्व अधिकारी-कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या अधिक्षण, नियंत्रण व संचलनाखाली काम करतील ( नियम-१० व १२) निवडणुकीमध्ये काम करताना निष्काळजीपणा वा कसूर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यास राज्य निवडणूक आयोग सक्षम आहे याची संपूर्ण कल्पना निर्वाचन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणामध्ये संबंधीतांना दयावी. (आयोगाच्या आदेश क्रमांक रानिआ२००६/प्र.क्र.१४/का.५ दि.०२-०८-२००६)

१०.३ **सर्वसाधारण सूचना : भारत निवडणूक आयोगाच्या सर्वसाधरण सूचना व राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष सूचना लक्षात घ्याव्यात जसे-**

- राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रं.१०९५/३०६/डेस्क-३ दि.२/०३/१९९५ नुसार राज्य शासनाचे विभाग/कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था वा राज्य शासनाच्या अखत्यारितील महामंडळे/उपक्रम (शासनाचे किमान २५ % भांडवलात वाटा असणारे) इ. यामधील अधिकारी /कर्मचारी निवडणुक कामासाठी अधिग्रहित करता येतील.
- कोणत्याही निवडणूकीसाठी कर्मचारी-अधिकारीवृंद अधिग्रहित करताना आवश्यक कर्मचाऱ्यांची संख्या व कर्मचारी अधिग्रहित करता येतील अशा उपलब्ध संस्था व त्यामधील उपलब्ध कर्मचारीवृंदांची संख्या लक्षात घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत एकाच संस्थेचे कर्मचारी नेमू नये. तसेच एखाद्या संस्थेचे सर्वच्या सर्व कर्मचारी / अधिकारी काढून घेऊ नयेत.
- अधिकारी /कर्मचारी नेमताना व त्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविताना त्यांचे संबंधीत संस्थेतील पद, जेष्ठता लक्षात घ्यावी. केवळ वेतन श्रेणी लक्षात घेऊ नये कारण विविध संस्थांमध्ये वेतनबँड वेगवेगळा असू शकतो. कोणत्याही जेष्ठ अधिकाऱ्यास त्याच्यापेक्षा कनिष्ठ अधिकारी /कर्मचाऱ्याच्या हाताखाली काम करावे लागणर नाही याची दक्षता घ्यावी.

- राज्य शासनाच्या विविध महसूल वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नेमताना त्यांच्या वरिष्ठांची पूर्व परवानगी असावी जेणेकरून संबंधीत विभागाचे अनावश्यक नुकसान होणार नाही.
- आयुर्विमा व बँका यांसारख्या यंत्रणेचा कर्मचारी वृंद हा अपवादात्मक परिस्थीतीत नेमला जावा.
- स्थानीक स्वराज्य संस्थेंच्या निवडणूकांमध्ये संबंधीत संस्थेंच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शक्यतोवर नेमू नये. अपवादात्मक परिस्थितीत नेमावयाचे झाल्यास मतदान केंद्रांवर मतदान केंद्राध्यक्ष वा पहिला मतदान अधिकारी म्हणून नेमण्यात येवू नये.
- उमेदवार किंवा उमेदवाराच्यावतीने काम पाहणाऱ्या व्यक्तींची नेमणूक मतदान केंद्रांवर होणार नाही याची दक्षता घ्यावी.
- मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह/आश्रम असल्यास व त्यांच्यासाठी स्वतंत्र स्वतंत्र मतदान केंद्र असल्यास त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.

**१०.४ कर्मचारीवृंद नेमताना भारत निवडणूक आयोगाच्या निर्वाचक अधिकाऱ्यांसाठी असणाऱ्या मार्गदर्शक पुस्तिकांमधील सुचनांचा देखील विचार करावा जसे-**

अ) अत्यावश्यक सेवांमधील पुढील विभागांना निवडणूक कामांतून सूट देण्यात यावी

- भारतीय वन सेवा
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील डॉक्टर /कंपाउंडर
- पशुवैद्यकिय दवाखान्यातील वर्ग-ब चे अधिकारी जसे (Cattle Extention Officer)
- वैद्यकिय क्षेत्रातील डॉक्टर , नर्स, वै
- प्रादेशिक वन विभागातील कर्मचारीवृंद
- दुरदर्शन, आकाशवाणी यांचे कर्मचारी
- अन्न महामंडळाचे अधिकारी
- आयुष विभागाचे आयुर्वेदिक, युनानी, होमीओपथी विभागाचे मेडिकल ऑफीसर

ब) BSNL, MTNL चा तांत्रिक विभाग, UPSC, MPSC व शैक्षणिक संस्था यांचे कर्मचारी यांना अपवादात्मक परिस्थीतीत नेमण्यात यावे.

क) ग्रामीण भागांत जेथे एकच बँक असते तेथे अशा बँकेचा कर्मचारी नेमु नये.

ड) ज्या अधिकारी -कर्मचाऱ्याच्या निवृत्तीस ६ महिने वा त्यापेक्षा कमी कालावधी राहिला असेल वा एखादा अधिकारी- कर्मचारी निवृत्त झाला आहे परंतु सेवावाढ मिळाली असेल वा पुन्हा सेवेत घेण्यात आले असेल तर अशा कर्मचाऱ्यास नेमू नये .

**१०.५ महिला अधिकारी -कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी :-**

- परदानशीन स्त्रियांसाठी किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळते सबब प्रत्येक

मतदान अधिकाऱ्यांच्या पथकामध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल.

- गर्भवती स्त्रिया वा स्तनदा माता (प्रसुती रजेवर नसेल तरी ) तसेच ज्यांना आरोग्याच्या दृष्टिने अशा कामापासून दूर ठेवण्याचा सल्ला देण्यात आला असेल अशा स्त्रियांना निवडणुकीचे काम देऊ नये.
- महिला अधिकारी -कर्मचारी यांची राहण्याची व्यवस्था योग्यरित्या करण्यात येईल तसेच त्यांची सुरक्षितता याची काळजी घ्यावी.
- महिला कर्मचाऱ्यांना मतदान केंद्र वाटप करताना संगणकाद्वारे सरमिसळ (Computerised randomisation) करू नये.

**१०.६ न्यायीक अधिकारी नेमतानाच्या अटी :**

- मा. उच्च न्यायालयाच्या परवानगी शिवाय न्यायालयातील कोणत्याही अधिकाऱ्याची नेमणूक करू नये
- दिवाणी न्यायालय, जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश व अधिकारी यांची नेमणूक करू नये
- कार्यकारी दंडाधिकारी यांना कायदा व सुव्यवस्थेसंबंधी कामे देण्यास हरकत नाही. परंतु त्यांची नेमणूक करताना देखील कार्यकारी दंडाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडणेकामी आवश्यक तेवढा पुरेसा अधिकारीवृंद वगळून नेमणूक करावी.

**१०.७ अपंग कर्मचारी नेमताना घ्यावयाची काळजी :-**

- कोणत्याही अपंग व्यक्तीची मतदान केंद्रावर नेमणूक करणेपुर्वी सदर व्यक्ती मतदान केंद्रावर काम करण्यास सक्षम आहे वा कसे याची खात्री निर्वाचक अधिकारी स्वत: करतील व अशा कर्मचाऱ्यास नेमावयाचे झाल्यास जाण्या-येण्याच्या दृष्टिने सोयीस्कर अशा केंद्रावरच त्यांची नेमणूक करतील.
- "Persons with Disabilities (Equal Opportunities Protection of Rights & Full Participation) Act १९९५" (अपंग समानसंधी, हक्क, संरक्षण व पूर्ण सहयोग) अधिनियम १९९५) अंतर्गत नमूद अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींची नेमणूक निवडणूककामी करू नये.

**१०.८ पुर्वतयारी : प्रत्यक्ष मतदान केंद्रावर नेमणूक करताना-**

कर्मचारीवृंद अधिग्रहित करताना त्यांचा ऑफिस, घरचा पत्ता, मोबाईल नंबर, वेतनश्रेणी, निवृत्तीचा दिनांक या सर्वाची माहिती घ्यावी जेणेकरून मतदान केंद्रासाठी पथक निर्मीती करताना अडचण येणार नाही.

- एका मतदान केंद्रास १ मतदान केंद्राध्यक्ष, किमान ३ मतदान अधिकारी व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी याप्रमाणे मतदान केंद्रांच्या संख्येनुसार (+१०% राखीव) अधिग्रहित

करावयाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांची संख्या निश्चित करावी. डाटाबेस तयार करताना सर्व संस्थांचा डाटा घ्यावा.

- एकाच संस्थेतील कर्मचारी-अधिकारी एकाच मतदान केंद्रावर शक्यतोवर नेमु नयेत.
- स्थानिक स्वराज्य संस्थातील रहिवाशी असणाऱ्या कर्मचाऱ्यास त्याच्या निवडणूक विभाग/ निर्वाचक गणातील मतदान केंद्रावर नेमण्यात येऊ नये.
- **पोलिस व्यवस्था :** प्रत्येक मतदान पथकासोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त मतपेटी / मतदान यंत्र, मतपत्रिका व इतर साहित्य याच्या सुरक्षिततेकरीता सतत असणे आवश्यक आहे. असे पोलीस कर्मचारी मतदान पथक रवाना होण्याच्या वेळेपासून मतपेटी / मतदान यंत्र सुरक्षा कक्षात सुपूर्द करण्यात येईपर्यंत मतदान केंद्राध्यक्षाच्या नियंत्रणाखाली व आदेशांनुसार काम करतील. सबब आवश्यक पोलिस बंदोबस्ताबाबत संबंधीत यंत्रणेला कळवावे
- प्रशिक्षणांच्यावेळी तसेच EVM तयार करतेवेळी तसेच EVMs जिथे सुरक्षीत ठेवण्यात येतील तिथे आवश्यक असणारा पुलिस बंदोबस्ताबाबत संबंधीत यंत्रणेला कळवावे.

१०.९ **नेमणूक :** सर्व मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांची नेमणूक हि विहित नमुन्यात करावयाची आहे. (परिशिष्ट -११) नेमणूकीचे आदेश २ प्रतीत करावेत, (ज्यावर निर्वाचन अधिकाऱ्याचा सही व शिक्का असेल) जेणेकरून टपाली मतपत्रिकेच्या अर्जासोबत १ प्रत जोडता येईल.

१०.१० नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांना नेमणूक नाकारता येणार नाही.

१०.११ **नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी** - कर्मचाऱ्यांना छायाचित्र असणारे खालील प्रमाणे ओळखपत्र देण्यात यावे. परंतु संबंधीत कर्मचाऱ्यांना कोणत्या मतदान केंद्रावर नेमण्यात येणार आहे हे मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान पथक निर्गमीत करण्याच्या दिवशीच कळेल याची काळजी घ्यावी.

--------जिल्हापरिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक -२०...

ओळखपत्र

मतदान केंद्राध्यक्षाचे नाव :

वय:

मुळ कार्यालयाचे नाव :

मुळ कार्यालयातील हुद्दा :

निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने साक्षंकित केलेला फोटो

--------जिल्हापरिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक -२०...

ओळखपत्र

| | |
|---|---|
| मतदान अधिकाऱ्याचे नाव :<br>वय:<br>मुळ कार्यालयाचे नाव :<br>मुळ कार्यालयातील हुद्दा : | निवडणुक निर्णय अधिकाऱ्याने साक्षंकित केलेला फोटो |

### १०.१२.१ टपाली मतदान सुविधा :

१०.१२.१ मतदान केंद्रावर नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी - कर्मचारी हा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा रहिवासी असेल तर त्यास टपाली मतपत्रिकेचा अर्ज (PB-१) पहिल्या प्रशिक्षणाच्या वेळी देण्यात यावा व त्याची नोंद विशेष रजिष्टरमध्ये ठेवावी. दुसऱ्या प्रशिक्षणाच्या वेळी संबधित कर्मचाऱ्यांकडून सदरचे अर्ज गोळा करावेत, सदरचा अर्ज योग्यरित्या भरण्यात आला आहे याची खात्री करून घेण्यात येईल. तसेच संबंधीतांचे नाव, मतदार यादी क्रमांक, ओळखीचा छायाचित्र असणारा पुरावा तसेच EPIC तपासून घ्यावा व त्यानुसार त्यांना टपाली मतपत्रिकेचे वाटप करावे. वाटप करण्यात आलेल्या टपाली मतपत्रिकेची नोंद मतदार यादीत घेणे आवश्यक आहे.

१०.१२.२ टपाली मतपत्रिका तात्काळ भरू इच्छिणाऱ्या कर्मचारी/ अधिकाऱ्यांसाठी ट्रेनिंग सेंटरवर-टपाली मतपत्रिका सुविधा केंद्र (PB Facilitation Centre) ठेवावे. परंतु कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घ्यावी. सदर मत नोंदविण्यासाठी आवश्यक ती सुरक्षा व गोपनियता राखली जाईल याची देखील दक्षता घ्यावी. तसेच टपाली मतपत्रिकेचे घोषणापत्र (PB-४) प्रमाणित करणेसाठी सक्षम शासकीय अधिकाऱ्याचीही नेमणूक करावी.

### १०.१३ प्रशिक्षण :

१०.१३.१ राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.९/का ५, दिनांक ११/११/२००८ नुसार ज्यावेळी शाळा-कॉलेज मधील शिक्षकांना ज्यावेळी मतदान केंद्रावरील कर्मचारी म्हणून नेमण्यात येते त्यावेळी जर मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस नसल्यास त्या दिवशी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात सुट्टी दयावी, तसेच मतदानाच्या आदल्या दिवशी ज्या दिवशी मतदान साहित्य व मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या दिवशी सुद्धा शाळांना सुट्टी द्यावी. शिक्षकांचे शाळेचे नुकसान होऊ नये म्हणून मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण शक्यतो सुट्टीच्या दिवशी आयोजीत करावे. प्रशिक्षणावेळी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी:-

- प्रशिक्षणाच्या तारखा, वेळ, व जागा निवडणूक कार्यक्रमाच्या सुरवातीलाच निश्चित कराव्यात

- किमान ३ प्रशिक्षण दयावेत त्यापैकी दुसरे प्रशिक्षण टपाली मतपत्रिका छापल्यावर असावे
- प्रशिक्षणासाठी आवश्यक मतदान साहित्याचीही व्यवस्था करावी
- प्रशिक्षणाच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, प्राथमिक उपचार साहित्य वै. ची सोय असावी
- प्रशिक्षण हे मेळाव्यांसारखे आयोजित न करता छोट्या छोट्या गटात विभागावे व नियम, अधिकार, कर्तव्य याचसोबत EVMs साठी Hands On Training वर भर द्यावा प्रशिक्षणसाठी पुरेशा EVMs उपलब्ध करून घेऊन प्रशिक्षण देण्यासाठी खास कर्मचारीवृंद तयार ठेवावा. प्रशिक्षणार्थीच्या सर्व शंकांचे समाधन होवून त्यांच्यात आत्मविश्वास येईल यासाठी प्रयत्न करावा
- सांविधानीक- असांविधानीक लिफाफे/ अहवाल याबाबत योग्य ते प्रशिक्षण द्यावे
- **मॉक पोल** चे महत्व व बंधन विशद करावे, मॉक पोल केल्याचे प्रमाणपत्र बंधनकारक करावे
- ज्याठिकाणी जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक एकाचवेळी होणार असेल त्याठिकाणी मतदान अधिकाऱ्यांना, "मतदाराची ओळख पटल्यानंतर चिन्हांकित मतदार यादीत मतदाराच्या नावासमोर खूण करण्याआधी मतदाराला जिल्हा परिषदेसाठी एक व पंचायत समितीसाठी एक अशी एकूण दोन मते द्यावयाची आहेत", याबाबत मतदाराला कल्पना देण्याचे सांगण्यात यावे.
- मतदान केंद्राबाबत ज्या सूचना (दि. २७/०५/२०१५ चे आदेश) तपासून त्यातील गर्भवती महिला, जेष्ठ नागरिक, वा अंध-अपंग मतदार यांची काळजी कशी घ्यावी याबाबत सुचना दयाव्यात. मतदान केंद्रात बसण्याची व्यवस्था, Voting Compartments कुठे असावे याचे व्यवस्थीत प्रशिक्षण दयावे.
- मतदान प्रक्रिया, मतदार यांचे बाबतचे महत्वाचे आदेश संबंधीतांच्या निदर्शनास आणून द्यावेत.
- प्रशिक्षणाच्या हजेरीवर लक्ष ठेवावे, हजेरीपट ठेवावा, गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दुय्यम लेखून प्रशिक्षणाला कमी महत्व दिले जाते वा ते टाळण्याकडे कल राहतो व त्यामुळे चुका घडतात तरी राज्य निवडणूक आयोगाच्या दि.२/०८/२००६ च्या आदेशाची जाणीव संबंधीतांना करून दयावी.

**१०.१४ मतदान केंद्रांवर पथक पाठविण्याच्या दिवशी प्रशिक्षणाची सोय ठेवणे :**

ज्या दिवशी पथके मतदान केंद्रांवर रवाना करण्यात येतील त्या दिवशी देखील Hands On Training ची मध्यवर्ती निवडणूक कार्यालय (Dispatch Centre) वर सोय करावी

**१०.१५ मानधन :**

निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ/मनपा-२००८/प्र.क्र.३/का ५, दिनांक ३१/१/२०१२ व दिनांक ११/२/२०१२ नुसार मतदान /मतमोजणी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे निवडणूक व आहार भत्याचे दर हे लोकसभा/विधानसभा निवडणूकीसाठी सामान्य प्रशासन विभागाने ठरविलेल्या दरांप्रमाणे असतील व त्याबाबतचे आदेश ग्रामविकास विभाग काढेल. तसेच पोलिस अधिकारी /कर्मचाऱ्यांसाठीचे दर हे गृहविभाग ठरवेल.

याबाबत कोणतीही थकबाकी राहणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावयाची आहे व तसे प्रमाणित करावयाचे आहे. (आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७, दि.९/११/२०१६ चे आदेश) तरी मतदान कर्मचाऱ्यांना शक्यतोवर मतदान केंद्रावरच मानधन देण्याची तयारी करावी.

**१०.१६ मतदान केंद्र पथक :**

प्रत्येक मतदान केंद्र पथकात १ मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer), २ ते ३ मतदान अधिकारी (Polling Officer) व १ चतुर्थ श्रेणी कर्मचारी व पोलिस असेल.

- प्रत्येक मतदान पथकातील सदस्य स्वत:चा मोबाईल नंबर इतर सदस्यांबरोबर तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्याबरोबर शेअर करेल.
- सर्व पथक पूर्ण झाले शिवाय मतदान केंद्रावर रवाना करू नये.

**१०.१६.१ मतदान केंद्राध्यक्ष (Presiding Officer) :**

- मतदान केंद्रात सुव्यवस्था राखणे आणि मतदानाचे काम सुरळीतपणे चालू ठेवणे हे सर्वसाधारण कर्तव्य राहिल
- मतदान केंद्र ताब्यात घेण्यापासून मतदान प्रकिया पार पाडले नंतर मतदान पेटी निर्वाचन अधिकाऱ्याच्या ताब्यात देईस्तोवर सर्व जबाबदारी व्यक्तीश: पार पाडेल.
- त्यासाठी तो आपल्या हाता खालील मतदान अधिकाऱ्यांकडे योग्यरित्या कामाचे वाटप करेल
- अनिवार्य कारणास्तव मतदान केंद्राध्यक्ष अनुपस्थित राहिल्यास पहिला मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्षाची कर्तव्ये पार पाडेल. सबब पहिला मतदान अधिकारी हा देखील तेवढाच सक्षम नेमावा. याकरीता मतदान पथक निश्चित करतांनाच एका मतदान अधिकाऱ्याचे नाव निश्चित करण्यात यावे. शक्यतो प्रथम मतदान अधिकारी / सहायक मतदान केंद्राध्यक्ष (First Poling Officer/ Assistant Presiding Officer) या कर्तव्याकरिता नामनिर्देशित करण्यात यावा.
  - एखादा मतदान अधिकारी निवडणुकीच्या दिवशी गैरहजर राहिल्यास कोणत्याही सामान्य व्यक्तीची ( उमेदवार वा उमेदवाराच्या वतीने काम न करणाऱ्या) नेमणूक मतदान अधिकारी म्हणून करण्यास मतदान केंद्राध्यक्ष सक्षम राहील (नियम ८(१))

### १०.१६.२ मतदान अधिकारी (Polling Officer)

- **प्रथम** मतदान अधिकाऱ्याकडे चिन्हांकित मतदार यादी असेल, मतदाराची ओळख पटविण्यासाठी हा जबाबदार राहील
- **दुसरा** मतदान अधिकारी मतदाराने यापुर्वी मतदान केले नाही याची खात्री करून त्याच्याकडे असणाऱ्या मतदार नोंदवहीत ( VM-१) तो मतदाराच्या ओळखीच्या पुराव्याची नोंद घेईल तसेच सही / अंगठा घेईल व मतदारास व्होटर स्लिप / मतदान चिठ्ठी देईल
- **तिसऱ्या** मतदान अधिकाऱ्याकडे मतदान यंत्राचे नियंत्रण युनीट असेल व्होटर स्लिप पाहून तो मतदानासाठी नियंत्रण युनीटचे बटण दाबेल
- ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची उपलब्धता नसल्याने दोनच मतदान अधिकारी असतील तिथे मतदान अधिकारी २ व ३ चे काम एकच व्यक्ती पाहील

### १०.१६.३ राखीव कर्मचारी :

मतदान केंद्र पथकातील प्रत्येक श्रेणीतील म्हणजेच मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्यातील १०% राखीव कर्मचारीवृंद ठेवावा. त्यांनादेखील संपूर्ण प्रशिक्षित करावे. आवश्यकतेनुसार मतदान केंद्रांवर त्यांना वापरता येईल.

### १०.१६.४ क्षेत्रीय अधिकारी (Zonal Officer) :

मतदान केंद्र निश्चितीनंतर मतदान केंद्रांच्या वाहतूक आरखडयानुसार एकाच मार्गावर असणाऱ्या केंद्रासाठी एक झोन याप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. संबंधीत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जास्तीत जास्त १० ते १२ केंद्र ठेवावीत जेणेकरून त्यांना सदर केंद्र तपासणे, मतदान केंद्र पथकांवर नियंत्रण ठेवणे, मतदानाच्या दिवशी अहवाल सादर करणे इत्यादी गोष्टी व्यवस्थीत करता येतील

- क्षेत्रीय अधिकाऱ्याची नेमणूक करताना ज्यास स्थानिक माहिती आहे असा निर्णय क्षमता असणारा अधिकारी असावा

### १०.१७ प्रत्येक मतदान पथकांची वाहन व्यवस्था :-

मतदान पथक हे मतदान केंद्रावर मतदानाच्या आदल्यादिवशी सायंकाळी पोहचतील अशाप्रकारे निर्गमित करण्यात यावे.

मतदान पथकासोबत मतपत्रिका व मतपेटी /मतदान यंत्र, मतदार यादी इत्यादी साहित्य मतदान केंद्रावर पाठवावयाचे असल्याने योग्य ते वाहन व संरक्षणार्थ पोलीस कर्मचारी पुरविण्यात यावे.

मतदान पथकाचा मध्यवर्ती निवडणूक कार्यालयातून (Dispatch Centre) मतदान केंद्रापर्यंत व मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रातून मध्यवर्ती निवडणूक कार्यालयापर्यंतचा (Receiving Centre)/ मतपेटी जमा करण्याच्या सुरक्षा कक्षापर्यंतचा मार्ग सुनिश्चित असावा व त्याच मार्गाने मतदान पथकाची वाहतूक करण्यात यावी व त्याचा मार्गदर्शक नकाशा निर्वाचन अधिकाऱ्याकडे / तहसिल कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

## प्रकरण ११
## मतदान साहित्य

जिल्हापरिषद-पंचायत समिती निवडणुकांमध्ये मतदान पूर्वापार पध्दतीनुसार मतपेटीद्वारे घेण्यात येत होते. मात्र दि. ४ मे, २००५ च्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेद्वारे जिल्हा परिषद-पंचायत समित्या अधिनियमात सुधारणा करण्यात येऊन, "जिल्हापरिषद-पंचायत समिती निवडणुकीच्यावेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल.." (कलम १०अ, ५८ अ) अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रं रानिआ-२००५ /प्र.क्र.२४/का-७ दि.३/५/२००५ अन्वये, मतदान यंत्राद्वारे (Electronic Voting Machines) मतदान करण्याबाबतची कार्यपध्दती विशद करण्यात आली आहे.

११.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यात येणार असल्याने आयोगाने नव्याने तयार केलेले VM १ to ५ व इतर नमुने वापरण्यात यावेत. मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन अहवालचे नमुने व आवश्यक लिफाफे छापून घेण्यात यावेत. तसेच मतदान केंद्रावर द्यावयाचे इतर साहित्य देखील उपलब्ध करून घ्यावे **( परिशिष्ट १२ (१ ते ५))**

### ११.२ निवडणूक प्रक्रियेसाठी लागणारे साहित्य :

११.२.१ EVM (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे) :- या यंत्रात दोन भाग आहेत. हे दोन्ही भाग केबलद्वारे जोडले जातात.

**१)** कंट्रोल युनिट (नियंत्रण विभाग)

**२)** बॅलटींग युनिट (मतदान विभाग)

**१) बॅलटींग युनिट (Balloting Unit)**

बॅलटींग युनिटवर उमेदवारांची नावे व चिन्हे असलेली मतपत्रिका लावली जाते व त्यासमोरील बटनाद्वारे योग्य त्या उमेदवारास मतदार आपले मत देऊ शकतो. मतदाराचा संबंध फक्त बॅलट युनिटशीच येतो.

बॅलटींग युनिटमधील भाग (Parts of Balloting Unit)

i) कंट्रोल युनिटला जोडणारी केबल

ii) मतदान यंत्र मतदानासाठी तयार असल्याचे दर्शविणारा दिवा (Ready Lamp)

iii) स्लाईड स्वीच पॅनेल

iv) मतपत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग

v) १६ उमेदवारांची (Including NOTA ) बटने व त्यासमोर १६ लाल दिवे (राज्य निवडणूक आयोगाच्या EVMs मध्ये १६ वे बटण END बटण असल्याने १५ च बटणे वापरता येतील.)

**२) कंट्रोल युनिट (Control Unit) :**

कंट्रोल युनिटद्वारे मतदानाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जाते. कंट्रोल युनिटमध्ये ४ भाग असतात.

i) दर्शक भाग (Display Section)

ii) कॅन्डीडेट सेट सेक्शन (Candidate Set Section)

iii) रिझल्ट सेक्शन (Result Section)

iv) बॅलॅट सेक्शन (Ballot Section)

**११.२.२ सिलींग मटेरियल :**

i) पट्टी सील (Strip Seals)

ii) पेपर सील (Paper Seals)

iii) कंट्रोल युनिटसाठी खुण चिठ्ठी (Address Tag for CU)

iv) बॅलेट युनिटसाठी खुण चिठ्ठी (Address Tag for BU)

v) स्पेशल टॅग

**११.२.३ मतपत्रिका (परिच्छेद ७.४ मध्ये नमूद केलेप्रमाणे )**

**११.२.४ नामनिर्देशन व मतदानाशी संबंधित नमुने (निवडणूक नियमांतर्गत) :**

i) निवडणूकीची नोटीस (परिशिष्ट-१) , नियम १२

ii) नामनिर्देशन पत्र (परिशिष्ट-२)

iii) मतपत्रिकेचा नमूना

iv) मतदार नोंदवही (Voter Register) (नमुना “EVM-१”) (परिशिष्ट-१२(१))

v) देऊ केलेल्या / प्रदत्त मतांची यादी (List of Tender Votes) (नमुना “EVM-२”) (परिशिष्ट-१२(२))

vi) नोंदविलेल्या मतांचा हिशोब ( Accounts of Votes Registered) (नमुना “VM-३”) (परिशिष्ट-१२(३))

vii) मतमोजणीचा निकाल (नमुना “VM-४”) (परिशिष्ट-१२(४))

viii) अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना “VM-५”) (परिशिष्ट-१२(५))

ix) मतदान केंद्राध्यक्षांचे मतदान प्रारंभ होण्यापूर्वी करावयाचे घोषणपत्र (Declaration of Pro) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - ६)

x) मतदान केंद्राध्यक्षांचे दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करतानाचे घोषणपत्र (Declaration of Pro) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - ६-अ)

xi) मतदान केंद्राध्यक्षांचे मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापत्र (Declaration of PRO) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - ७)

xii) मतदानयंत्र मोहोरबंद केल्यानंतरचे प्रतिज्ञापत्र (Declaration of Pro) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - ८)

xiii) अंध व अपंग मतदारांच्या सहकाऱ्यांचे घोषणपत्र (Declaration by the companion of blind and infirm voter) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र ९)

xiv) मतदान केंद्राध्यक्षांची दैनंदिनी (**PRO's Diary**) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - ११)

xv) मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या पुराव्याची यादी (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - १२, १२-अ)

xvi) हरकत घेतलेल्या मतांची यादी (List of Challanged Votes) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - १३)

xvii) आक्षेप फी पुस्तक (Recipt Book for Deposit of Challanged Votes fee) ) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - १४)

xviii) पोलीस ठाणे अधिकाऱ्यास तक्रारपत्र (Letter to S.H.O ) (मतदान केंद्राध्यक्षाच्या माहिती पुस्तिकेतील जोडपत्र - १५)

### ११.२.५ निवडणूक आयोगाने आदेशित केलेली प्रपत्रे / नमुने-

i) गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत व मालमत्तेबाबत घोषणापत्र (आयोगाचे आदेश क्र.एसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/ का.१० दि. १५/३/२००४ व क्रमांक- रानिआ/जिपपंस/२०१५/ प्र.क्र.५१/का.७, दि.२१/०४/२०१६)

ii) अपत्यांबाबतचे घोषणापत्र (पहा आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस/२०१५/ प्र.क्र.५१/का.७, दि.२१/०४/२०१६ मधील (११) (ii))

iii) जाती पडताळणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र नसल्यास करावयाचे हमीपत्र ( आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२०१५/प्र.क्र.५१/का.७, दि. २१ एप्रिल, २०१६ मधील (११) (iii))

iv) खर्चाचे विवरणपत्र व शपथपत्र (पहा आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ- २०१६/प्र.क्र.१३/का.सं.कक्ष, दि. २५/१०/२०१६)

### ११.२.६ **अधिक आवश्यक नमुने**

i) मतदार यादी,

ii) मतदान साहित्य तपासणी सूची

iii) मतदान केंद्रांची यादी

iv) मतदान पथक आदेशाचा नमुना

v) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी- नमुना

vi) उमेदवारांच्या स्वाक्षऱ्या व निवडणूक प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या

vii) टपाली मतपत्रिकांची नोंदवही

viii) टपाली मतपत्रिकेचा नमुना

ix) मतदान केंद्राची आखणी /नकाशा

x) ओळखपत्रे नमुने- निर्वाचन अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान कर्मचारी, क्षेत्रीय अधिकारी, तहसिलदार / जिल्हा निवडणूक अधिकारी- निरीक्षक,

मतमोजणी पर्यवेक्षक,मतमोजणी कर्मचारी, उमेदवार निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी

xi) निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी यांच्या नेमणूकीकरीता अर्जाचा नमुना- आदेशाचे प्रारुप

xii) मतदार चिठ्ठी (Voter Slips)

xiii) आचारसंहिताविषयक

xiv) निवडणूक खर्चाचा हिशोब

xv) निर्वाचन अधिकाऱ्याचा अंतिम अहवाल

xvi) व इतर आवश्यक नमुने

**११.२.७ लिफाफे :**

**अ) सांविधानीक लिफाफे :**

१) क्रमांक १ च्या मोठ्या पाकिटात जमा करावयाचे लिफाफे :

i) Marked Copy of Electoral Roll /मतदार यादीची चिन्हांकित प्रत (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

ii) Voter Register/ मतदार नोंदवही (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

iii) Voter Slips/ मतदार चिठ्ठी (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

iv) Used Tendered Ballot Papers/ वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

v) Unused Tendered Ballot Papers/न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

vi) इतर कोणते महत्वाचे कागद/अहवाल निर्वाचक अधिकाऱ्याकडून मागविण्यात आला असल्यास (सीलबंद केलेले छोटे पाकिट)

२) स्वतंत्र सांविधानीक लिफाफे : स्वतंत्रपणे सीलबंद करून EVM सोबत जमा करावयाचे लिफाफे-

i) Accounts of Votes Registered / नोंदवलेल्या मतांचा हिशोब

ii) Declaration Of PRO /मतदान प्रारंभ होण्यापूर्वी, दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करताना, मतदान समाप्तीचे, मतदान यंत्र मोहरबंद केल्यानंतरचे प्रतिज्ञापत्र

iii) PRO's Diary / मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी

**ब) असांविधानीक लिफाफे :**

१) क्रमांक २ च्या मोठ्या पाकिटात जमा करावयाचे लिफाफे:

i) Cover containing the copies of electoral roll (other than marked copy)मतदार यादीची चिन्हांकित प्रत सोडून इतर मतदार यादीचे पाकीट (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

ii) Cover containing Appointement letter s of polling agent मतदान प्रतीनिधीचे नेमणूक पत्र (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

iii) Cover containing Election Duty Certificate / निवडणूक कार्य प्रमाणपत्र (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

iv) Cover containing List of Challanged Votes / हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

v) Cover containing List of Blind & Infirm Voters and Declaration by the companion of Blind & Infirm Voters /अंध व अपंग मतदारांची यादी) व त्यांच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

vi) Cover containing Cash & Receipt Book for deposit of challenged votes fee /आक्षेप फी व पुस्तक (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

vii) Cover containing unused & damaged paper seals/ न वापरलेल्या व खराब झालेल्या कागदी मोहरा (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

viii) Cover containing unused voter's slips/न वापरलेल्या मतदार चिठ्ठी (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

ix) Cover containing unused & damaged special tag/ न वापरलेल्या व खराब झालेल्या स्पेशल टॅग (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

x) Cover containing unused & damaged strip seals / न वापरलेल्या व खराब झालेल्या पट्टी सील (सीलबंद न केलेले छोटे पाकिट)

**क) क्रमांक ३ च्या मोठ्या पाकिटात जमा करावयाचे साहित्य:**

i) Handbook of PRO /मतदान केंद्राध्यक्षाची माहिती पुस्तिका

ii) Manual of EVMs / मतदान यंत्राची माहिती पुस्तिका

iii) Marker Pen/ Indelible Ink set

iv) Ink Pad

v) Metal Seal of PRO

vi) Arrow Cross Mark rubber Stamp

vii) Cup for setting the indelible ink if Marker pens not used

**ड) क्रमांक ४ च्या मोठ्या पाकिटात जमा करावयाचे लिफाफे / साहित्य**

i) All other items / इतर उरलेले साहित्य

११.३ मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेवुन, जिल्हाधिकारी यांनी राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ जिपपंस/प्र.क्र २०/का-७ दि. २४/१०/२०१६ मध्ये विहित केलेल्या **Statement -२** च्या नमुन्यात आवश्यक तेवढया EVMs व त्याच्या सिलींग बाबतचे आवश्यक साहित्य यांची मागणी मुदतीपुर्वी आयोगोकडे करावी. मागणी करताना उपलब्ध साहित्याचा प्रथम आढावा घ्यावा, अनावश्यक खर्च टाळावा.

११ .४ राज्य निवडणूक आयोगाचे **पितळी मुद्रा (सील)** वापरणेबाबत तसेच इतर साहित्य खरेदीबाबत आदेश क्रं एसईसी/पीएम-१४९६/सीआर-११/ का-३ दि. १५.०३.१९९६ तसेच **विभेदक चिन्हांच्या** नमुन्याबाबत आदेश क्रं. SEC/GEN-१०९७/ CR.२४१/D-३ दि. २३.०७.१९९७ तपासावेत व त्याप्रमाणे कार्यवाही करावी

११.५ मतदान यंत्रासह अन्य कोणकोणते साहित्य मतदान केंद्रावर वापरण्यासाठी द्यावे त्याची यादी **परिशिष्ट- १३** मध्ये दिली आहे.

**११.५.१ मतदार नोंदवही (परिशिष्ट- १०(१)):-**

i) प्रत्येक मतदान केंद्रावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशा मधील नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही ठेवावयाची आहे. मतदान केंद्राध्यक्षांनी या नोंदवहीमध्ये मतदारांचा, मतदार यादीतील अनुक्रमांक (चिन्हांकित मतदार यादीत नमूद केल्यानुसार) लिहून घ्यावयाचे आहेत आणि संबंधित मतदारांची स्वाक्षरी अथवा त्यांच्या अंगठयाचा ठसा सदर नोंदवहीत घ्यावयाचा आहे. ही मतदार नोंदवही दुसरे काही नसून पारंपारिक पध्दतीमध्ये मतपत्रिकेस जी स्थळप्रत असते त्यासाठी पर्याय म्हणून वापरली जाणार आहे.

ii) मतदार नोंदवही एखाद्या पुस्तकाच्या स्वरुपात असेल व ती चांगल्या प्रकारच्या कागदावर छापलेली असेल. हा कागद ए-४ या आकाराचा असावा. प्रत्येक नोंदवहीस एक वेगळे मुखपृष्ठ असावे व त्यामध्ये खालील तपशील छापण्यात यावा.

नमुना-व्हीएम-१
(पहा परिच्छेद-१४)
मतदार नोंदवही

...........जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक/पोटनिवडणूक.........,
तालुका.........................., जिल्हा-.................
निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक .............................
मतदान केंद्राचे नाव व क्रमांक ............................
मतदानाची तारीख ........................

iii) सदर नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठावर मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक व त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी व अभिप्रायासाठी जागा असावी. एका पृष्ठावर साधारणपणे १० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्ष-या राहतील अशारितीने नोंदवहीची रचना करावी. (म्हणजे एका पानावर

पाठपोठ २० मतदारांचे अनुक्रमांक राहतील) राज्य निवडणूक आयोगाकडून साक्षर-निरक्षर माहिती मागविण्यात आली असल्यास या नोंदवही वरील माहिती मिळेल.

iv) नोंदवहीच्या प्रत्येक कागदाच्या दोन्ही बाजूला तपशील लिहिता येईल अशारीतीने छपाई करावी.

v) सदर नोंदवही बांधणी (बाईंडिंग) केलेली असावी व सदर नोंदवहीत २५ पृष्ठ अथवा ५० पृष्ठ राहतील अशारीतीने नोंदवहीची बांधणी करण्यात यावी. २५ पाने असलेल्या नोंदवहीत सुमारे ५०० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्षऱ्या घेता येतील; तर ५० पृष्ठ असलेल्या नोंदवहीत सुमारे १००० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्षऱ्या घेता येतील. नोंदवहीचा प्रत्येक पृष्ठ क्रमांक छपाई यंत्राद्वारे छापलेला असेल. प्रत्येक मतदान यंत्रावर एक किंवा त्यापेक्षा जास्त नोंदवहया (मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या विचारात घेऊन) पुरविण्यात याव्यात.

vi) आवश्यक तितक्या संख्येने मतदार नोंदवहया वेळीच छपाई करुन घ्याव्यात.

**११.६ मतदार चिठ्ठी (स्लीप):-**

(१) मतदान केंद्रावर मत नोंदविण्यासाठी येणा-या प्रत्येक मतदाराची नोंद वर नमूद केल्यानुसार मतदार नोंदवहीत घेण्यात येईल. त्या मतदान केंद्रावर जसे मतदार येतील त्याप्रमाणे त्यांची ओळख पटल्यानंतर त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक नमूद करुन त्यांची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा नोंदवहीत घेतल्यानंतर त्यांना मतदान करण्याची संधी द्यावी. हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, मतदार नोंदवहीमध्ये ज्या क्रमाने मतदारांची नावे व त्यांच्या स्वाक्ष-या अथवा अंगठयाचे ठसे घेतले असतील त्याचक्रमाने प्रत्येक मतदाराने, मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक मतदारास त्याचा अनुक्रमांक मतदार नोंदवहीत लिहून घेतल्यानंतर व त्याची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर एक चिठ्ठी (स्लीप) संबंधित अधिका-याने ज्यांच्याकडे मतदार नोंदवहीमध्ये वरील तपशील लिहून घेण्याचे काम नेमून देण्यात आले आहे त्याने द्यावी. सदर स्लीपमध्ये खालील तपशील राहील :-

(१) मतदार नोंदवहीतील रकाना-१ मध्ये लिहिल्याप्रमाणे मतदाराचा अनुक्रमांक

(२) मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक

(३) मतदान अधिका-याची सही

(२) वरीलप्रमाणे देण्यात आलेली मतदार चिठ्ठी घेऊन मतदार, मतदान केंद्राध्यक्ष अथवा कंट्रोल युनिटचा ज्यांच्याकडे ताबा आहे त्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल व ती चिठ्ठी त्यास दाखवील. ती चिठ्ठी बघून मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी त्या क्रमाने (मतदार नोंदवहीत नमूद केलेल्या अनुक्रमांकानुसार) मतदान करण्याची अनुमती मतदारास देईल.

(३) मतदार चिठ्ठया वेळीच आवश्यक तितक्या प्रमाणात छापून घेण्यात याव्यात. सदर चिठ्ठया ५० अथवा १०० च्या बंडलमध्ये शिवून घेतलेल्या असाव्यात; जेणेकरुन त्या प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदार संख्येच्या प्रमाणात पुरविणे सोईचे होईल.

**११.७ खूण चिठ्ठी:-**

(१) खूणचिठ्ठी दोन प्रकारची असून, त्यापैकी एक कंट्रोल युनिटसाठी वापरावयाची आहे तर दुसरी बॅलेट युनिटसाठी वापरावयाची आहे. सदरच्या खूणचिठ्ठीचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने दिला असून त्यानुसार आपण आवश्यक तितक्या प्रमाणात वेळीच छापून घ्याव्यात व त्या मतदान यंत्रे तयार करताना अथवा मतदान केंद्रावर वापरण्यासाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

(२) खूणचिठ्ठीस डाव्या बाजूस एक छिद्र असावे. हे छिद्र एका धातूच्या कडीमध्ये झाकलेले असावे जेणेकरुन त्यामधील दोरा काढल्यानंतर खूणचिठ्ठी सहजासहजी फाटणार नाही.

प्रकरण-१२

## मतदानाची तयारी- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे कार्यान्वित करणे

राज्य निवडणूक आयोगाची मतदान यंत्र वापरण्यात येणार आहेत तेथे-

१२.१. प्राथमिक:- निर्वाचन अधिकारी म्हणून आपण मतदान केंद्राच्या संख्येनुसार अंदाजीत EVM ची संख्या जिल्हाधिकारी यांना कळविणे आवश्यक आहे. उमेदवारांची अंतिम यादी निश्चीत झाले नंतर उमेदवारांच्या संख्येनुसार BU च्या संख्येत वाढ होऊ शकते.

राज्य निवडणूक आयोगाचे EVM हे बहुसदस्यीय निवडणुकीसाठी वापरता येऊ शकते. जरी जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती निवडणूक विभाग/ निर्वाचक गण हे एकसदस्यीय असले तरी जिल्हापरिषद व पंचायत समिती निवडणूका जिथे एकाच वेळी होतात त्या ठिकाणी एकाच कंट्रोल युनिटद्वारे दोन्ही निवडणूका घेतल्या जाऊ शकतात. सबब ज्या ठिकाणी सदर मतदान यंत्रे वापरावयाची आहेत, त्याठिकाणी निर्वाचन अधिकारी यांनी त्या मतदार संघात एका मतदान यंत्रावर १५ उमेदवारांसाठी मतदान घेता येते (१६वे बटण END बटण असल्याने) हे लक्षात घेऊन त्यानुसार १५ च्या पटीत जेवढे उमेदवार असतील तितकी बॅलेट युनिट म्हणजेच जास्तीत-जास्त ५९ ( +१ NOTA) उमेदवारांसाठी ४ बॅलेट युनिट अशाप्रकारे बॅलेट युनिटची संख्या निश्चित करावी लागेल. त्यापेक्षा जास्त उमेदवार रिंगणात असल्यास पारंपारिक पध्दतीने मतदान घ्यावे लागेल.

१२.२. अतिरिक्त मतदान यंत्रांची संख्या - वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार बॅलेट युनिटची संख्या तसेच कंट्रोल युनिटची संख्या लक्षात घेऊन राखीव १० टक्के अधिक मतदान यंत्रे आवश्यक राहतील.

१२.३. **मतदान यंत्रे कार्यान्वित करणेसाठी पुर्वतयारी :-**

स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांकरिता एका निर्वाचन अधिका-याच्या अधिपत्याखाली वेगवेगळे निवडणूक विभाग / निर्वाचक गण येत असल्यामुळे त्यांनी त्या-त्या प्रभागातील उमेदवारांच्या संख्येनुसार मतदान यंत्रे सेट करणे आवश्यक आहे.

१२.३.१याकरिता एकावेळी एक प्रभाग असलेल्या मतदान केंद्रांवर आवश्यक असलेली मतदान यंत्रे सेट करण्याकरिता घ्यावी. एका प्रभागातील आवश्यक असलेली मतदान यंत्रे सेट/ सील करुन झाल्यानंतर दुसऱ्या प्रभागातील मतदान यंत्रे सेट करण्याकरिता घ्यावीत. एकाच वेळी दोन प्रभागातील मतदान यंत्रे एकाच टेबलवर सेट / सील करण्याकरिता आल्यास त्यात गोंधळ होण्याची शक्यता आहे. तरी या सूचनेचे काटेकोरपणे पालन करावे. त्यासाठी पुरेसा वेळ आवश्यक असल्याने अतिशय काटेकोरपणे वेळापत्रक आखावे. मतपत्रिका छपाई झाल्याबरोबर लगेच मतदान यंत्रे सेट करण्याचे काम करावे.

१२.३.२ मतदान यंत्रे सेट करणेपूर्वी मतपत्रिकेवरील प्रभागाचे नाव, उमेदवारांची संख्या, नावे सर्व बाबींची निर्वाचक अधिकाऱ्यांनी स्वत: खात्री करावी. मतपत्रिकेच्या मागे निर्वाचक अधिकाऱ्यांनी सही करावी वा त्याकरिता सहीचा शिक्का वापरावा. परंतु मतपत्रिका खराब होणार नाही याची काळजी घ्यावी.

१२.३.३ मतदान यंत्र सेट करण्यासाठी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना प्रथम प्रशिक्षण दयावे. जेणेकरून अनावश्यक चुका टाळल्या जातील.

१२.३.४ मतदान यंत्र सेट करण्यासाठी लागणारे साहित्य याची जुळवाजुळव आधीच करून ठेवावी; जसे सीलींग साठी आवश्यक लाख, ती वितळवण्यासाठी स्टोव्ह, भांडे, सपाट चमचा, ॲड्रेस टॅग साठीचे छोटे दोरे, मतपत्रिका BU मध्ये लावल्यानंतर करावयाच्या सिलींगसाठी लागणारे मोठे दोरे कापून ठेवणे. ॲड्रेस टॅग व्यवस्थीत लिहून त्यावर केंद्र निहाय विभाजन चिन्ह मारून ठेवणे इ. यामुळे प्रत्यक्ष सिलिंगवेळी वेळ कमी लागेल.

मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रावर वापरण्यासाठी कोणतेही मतदान यंत्र देण्यापूर्वी निर्वाचन अधिकारी यांच्या स्तरावर काही तयारी करणे आवश्यक असते.

१२.४. मतदान यंत्रे मतदानासाठी केव्हा (तारीख व वेळ) तयार करण्यात येणार आहेत, याबाबत उमेदवारांना सूचना देणे :-

१२.४.१ मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्या तारखेपूर्वी उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना मतदान यंत्रे मतदानासाठी किती तारखेस कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी तयार करण्यात येणार आहेत, याबाबतची लेखी सूचना देणे आवश्यक आहे.

उमेदवारांना अथवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना याविषयी सूचना देताना प्रत्येक उमेदवारास किती प्रतिनिधी अनुज्ञेय राहतील, हे नमूद करणे आवश्यक आहे. उदा.५ टेबलावर एकाच निवडणूक विभाग/निर्वाचक गणातील मतदान यंत्र सेट/सील करणार असल्यास त्यांना यानुसार ५ प्रतिनिधी नेमण्याची मुभा राहील.

अनावश्यक गर्दी टाळणेकामी व सुरक्षितेच्या दृष्टिने प्रभागनिहाय मतदान यंत्रे तयार करण्याचे वेळापत्रक आखावे व त्यानुसार उमेदवारास कळवावे.

त्यावेळी उपस्थीत प्रतिनिधींच्या सह्या खालील प्रमाणे **रजिस्टर** ठेवून घ्याव्यात

..............जिल्हा परिषद ..........पंचायत समिती<br>
सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ............<br>
(तालुका ................ जिल्हा...................)<br>
निवडणूक विभाग क्रमांक- ....... निर्वाचक गण क्रमांक-.......<br>
ठि काण : दिनांक

| अ .क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवाराच्या प्रतिनिधीचे नाव तसेच राजकीय पक्षाचे नाव | छायाचीत्र ओळखपत्र क्र तपशील | सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

१२.४.२ कोणत्याही कारणामुळे कोणताही उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्यावेळी अनुपस्थित राहिल्यास तुम्ही कोणत्याही परिस्थितीत मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याचे काम पुढे ढकलता कामा नये. उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर असल्यास अथवा कोणीही हजर नसल्यास तुमचे काम तुम्ही सुरु ठेवणे आवश्यक आहे.

१२.४.३ उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास मतदान यंत्रे मतदानासाठी कशाप्रकारे तयार करण्यात येतात हे त्यांना समजावून सांगावे.तसेच त्यांना कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट तयार करतेवेळी त्याचे निरीक्षण करण्याची संधी द्यावी. तसेच त्याच्या सह्या रजिस्टर मध्ये घ्याव्यात.

१२. ५. **बॅलेट युनिट मतदानासाठी तयार करणे**

निर्वाचन अधिकारी यांच्या स्तरावर प्रत्येक बॅलेट युनिट खाली नमूद केल्यानुसार मतदानासाठी तयार करणे आवश्यक आहे.

**१२.५.१ बॅलेट युनिटमध्ये मतपत्रिका घट्ट चिकटविणे :**

i) यासाठी ठेवण्यात आलेल्या जागेवर म्हणजेच एक पारदर्शक ऍ्क्रेलिकची काच (बॅलेट पेपर स्क्रीन) असून, त्यावर मतपत्रिका घट्ट चिकटविण्यात यावी. मतपत्रिका घट्ट बसविण्यापूर्वी मतपत्रिकेच्या पाठीमागे निर्वाचन अधिकारी यांनी स्वाक्षरी / सहीचा रबरी शिक्का असल्याची खात्री करावी

ii) बॅलेट पेपर स्क्रीन जो अगदी डाव्या बाजूच्या वरच्या कोप-यात फिक्स केलेला असतो तो उघडण्यासाठी स्क्रीनचे लॅचेस जे अगदी वरच्या बाजूला असलेल्या झाकणाच्या आत असतील. हे लॅचेस एकाच वेळी सुरुवातीला थोडेसे उजव्या बाजूस व नंतर खालच्या बाजूस दाबल्यानंतर बॅलेट पेपर स्क्रीन मोकळा होईल व तो अगदी वरच्या बाजूस एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडेल. तो उघडताना ही काळजी घेणे आवश्यक आहे की, त्यास कोणताही धक्का लागून हानी होणार नाही बॅलेट पेपर स्क्रीन उघडल्यानंतर मतपत्रिका ती ठेवण्यासाठी पुरविलेल्या जागेवर बॅलेट युनिटच्या वरच्या झाकणाच्या बाजूला ठेवावी. मतपत्रिका अशारीतीने ठेवण्यात यावी जेणेकरुन प्रत्येक उमेदवाराचे नाव व त्याचे चिन्ह त्याच्या समोरील बटण आणि दिवा यांच्या समोर येईल व दोन्ही उमेदवारांच्या चौकोनावरील जाड रेषा बॅलेट युनिटमधील रेषांशी जुळतील. हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, बॅलेट पेपरची संरेखन (Alignment) जुळणे हा अत्यंत महत्वाचा टप्पा आहे. सदर संरेखन (Alignment) न जुळल्यास उमेदवारांची नावे व त्यंच्यासमोरील बटण तसेच दिवा हे समोरासमोर न आल्यास मतदाराच्या मनात मत देण्यासंदर्भात गोंधळ होईल व त्यातून अत्यंत गंभीर तक्रार होवु शकते. सदरची मतपत्रिका घट्ट चिकटवून संरेखन (Alignment) व्यवस्थित जुळल्यानंतर बॅलेट पेपर स्क्रीन बंद करावा. (*ज्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक एकाच वेळी असेल तेव्हा जिल्हा परिषद सदस्य पदाच्या निवडणुकीतील उमेदवारानंतरचे बटण NOTA चे असेल व त्या NOTA च्या बटणानंतर बॅलेट युनिटवरील एक बटण बंद (Masked) ठेवावे व त्यापुढे पंचायत समितीचा निर्वाचक गण क्रमांक इ.तपशील दर्शवावा व त्यापुढील बटनापासून पंचायत समिती सदस्य पदासाठीचे पदाचे उमेदवार व त्यांची चिन्हे दर्शवावीत. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदाचे उमेदवार मिळून १२ पेक्षा जास्त उमेदवार होत असतील तेथे दोन्ही पदांचे उमेदवार स्वतंत्र बॅलेट युनीटवर दर्शविण्यात यावेत. मात्र कंट्रोल युनिट एकच राहील.*)

ii) मतपत्रिका बॅलेट पेपर स्क्रीनच्या खाली घट्ट चिकटविल्यानंतर वरच्या बाजूच्या झाकणास सील करण्यासाठी पुरविलेली जागा त्यामध्ये असलेल्या दोन छिद्रातून दोरा ओवून ते सीलबंद करण्यात यावी. सदरच्या दोऱ्याची गाठ बांधून त्याच्या दोऱ्याच्या टोकाच्या बाजूस पुढील तपशील असलेल्या पत्त्याची खूणचिठ्ठी (एड्रेस टॅग) बांधण्यात यावा.

पत्त्याची खूणचिठ्ठी (Address Tag).

....जिल्हा परिषद ...पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक सन .२०.........
तालुका ................ जिल्हा-...................
निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक- ..................
मतदान केंद्र क्रमांक-............ बॅलेट युनिट अनुक्रमांक- ..........................
मतदानाचा दिनांक -..........................................

**१२.५.२ बॅलेट युनिटवरील निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ पेक्षा कमी असल्यास (NOTA धरून) जी बटणे उपयोगात आणली जाणार नाहीत ती झाकणे. (मास्क करणे):-**

बॅलेट युनिटवरील जी बटणे उपयोगात आणली जाणार आहेत, तीच फक्त दृश्य (Unmasked) असली पाहिजे. याचाच अर्थ असा की, निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या दृश्य असलेल्या बटणांच्या संख्येशी जुळली पाहिजे. उदा. ज्यावेळी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक एकाचवेळी असेल तेव्हा जिल्हा परिषद उमेदवारांची संख्या ४ असेल तर उमेदवारानंतरचे एक बटण NOTA चे असेल म्हणजेच पहिली ५ बटणे दृश्य असली पाहिजेत. त्यानंतरचे बटण बंद (Masked) ठवावे व त्यापुढे पंचायत समितीचा मजकूर येईल. त्याखालील बटनांवर पंचायत समितीचे ३ उमेदवार असतील तर त्यांच्या समोरील बटने दृश्य (Unmasked) राहतील व त्यानंतरचे एक बटण NOTA चे असेल म्हणजेच पंचायत समितीकरिता एकूण ४ बटणे दृश्य असली पाहिजेत. उर्वरित बटने झाकलेली (Masked) रहातील. ही प्रक्रिया करण्याकरिता बॅलेट युनिटमधील पांढरे मास्किंग टॅब, उमेदवारांच्या बटणावर ठेवून ती झाकली जातात व त्यासाठी बॅलेट युनिट उघडणे आवश्यक आहे.

**बॅलेट युनिटवरील शेवटचे बटण (१६ वे) -End बटण असल्याने त्या बटनासमोरील चौकटीमध्ये कोणत्याही उमेदवाराचे नाव येणार नाही. हे बटण मास्क ठेवावे. कारण NOTA करिता तरतूद उपलब्ध करुन दिलेली आहे. (फक्त कॅन्ड सेट करताना " End" बटण चालू ठेवावे.)**

**१२.५.३ स्लाईड स्वीच सेट करणे :-**

i) बॅलेट युनिटच्या आतल्या बाजूस उजव्या कोप-यात वरील बाजूला एक स्लाईड स्वीच असून, तो चार जागी ठेवता येतो. उदा. १,२,३,४. ही कार्यवाही एखाद्या मतदान केंद्रावर किती बॅलेट युनिट वापरावयाची आहेत, यावर अवलंबून असून, नंतर ती एका कंट्रोल युनिटशी जोडावी लागतील. १५ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास स्लाईड स्वीच योग्य त्या ठिकाणी म्हणजेच जितकी बॅलेटींग

युनिट वापरावयाची आहेत त्यानुसार ठेवणे. उदा. ४ बॅलेट युनिट जोडली असल्यास कंट्रोल युनिटला पहिले जोडलेल्या बॅलेट युनिटचा स्लाईड स्वीच १ वर राहील व त्यापुढे जोडलेल्या बॅलेट युनिटचे स्लाईड स्वीच अनुक्रमे २, ३ व ४ वर राहतील.

ii) जेव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ पर्यंत असेल तेव्हा एकच बॅलेट युनिट वापरावे लागेल व त्यावेळी आतल्या बाजूचा स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल. जेव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १६ आणि ३० यामध्ये असेल तेव्हा २ बॅलेट युनिट वापरावे लागतील, तेव्हा पहिल्या बॅलेट युनिटमध्ये १ ते १५ उमेदवार असल्यामुळे त्या युनिटमधील स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल. तर दुस-या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच उमेदवार १६ ते ३० पर्यंत असल्यामुळे २ वर ठेवावा लागेल. अशा त-हेने जर तीन बॅलेट युनिट वापरावयाची असतील व उमेदवारांची संख्या ३१ ते ४५ च्या मध्ये असेल तर पहिल्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच १ वर,दुस-या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच २ वर तर तिस-या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच ३ वर ठेवावा लागेल. अशाच रितीने उमेदवारांची संख्या ४६ ते ६० च्या दरम्यान असल्यास व ४ बॅलेट युनिट वापरावयाची असल्यास चौथ्या व शेवटच्या बॅलेट युनिटवरील स्लाईड स्वीच ४ वर ठेवावा लागेल.

**टीप:- वरील परिच्छेदात नमूद केलेली स्लाईड स्वीच सेट करण्याची बाब योग्य रीतीने न केल्यास कॅन्ड सेट करताना अडचणी निर्माण होतील. विशेषत: एकापेक्षा अधिक बॅलेट युनिट्स वापरतेवेळी बॅलेट युनिट्स परस्परांना जोडताना त्यांचा क्रम योग्य न ठेवल्यास देखिल कॅन्ड सेट योग्य रितीने करता येणार नाही.**

**एकापेक्षा अधिक बॅलेट युनिट वापरत असताना कॅन्ड सेट करतेवेळी वॉर्ड क्र. आणि बुथ क्र. ची नोंद कंट्रोल युनिट मध्ये करण्यासाठी कंट्रोल युनिटला जोडलेल्या पहिल्याच बॅलेट युनिट वरील अ.क्र. १ ते १० या उमेदवारांच्या समोरील बटणांचा वापर करावा. तसेच करण्यात आलेली नोंद कायम करण्यासाठी पहिल्याच बॅलेट युनिट वरील END या बटणाचा वापर करावा. यास्तव बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच सेट करणे व बॅलेट युनिट योग्य क्रमाने परस्परांना जोडणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे, हे लक्षात घ्यावे.**

### १२.५.४ बॅलेट युनिट सील करणे:-

i) बॅलेट युनिटमध्ये बॅलेट पेपर घट्ट चिकटविल्यानंतर आणि बॅलेट पेपर स्क्रीन खाली ठेवून नंतर सील केल्यानंतर उमेदवारांची बटणे जी उपयोगात आणली जाणार नाहीत, ती झाकण्यात येतील आणि वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे स्लाईड स्वीच योग्य त्या जागी सेट करावे लागतील व त्यानंतर बॅलेट युनिट वरील बाजूचे झाकण त्याच्या मूळ जागी घट्ट बसवावे लागेल. कंट्रोल युनिट सेट केल्यानंतर बॅलेट युनिट सील करावे लागेल. त्यासाठी वरील बाजूच्या छिद्रांमधून दोऱ्याचे एक टोक ओवून आणि खालच्या बाजूच्या छिद्रातून दोऱ्याचे दुसरे टोक ओवून त्याची घट्ट गाठ मारावी व त्यानंतर एक स्पेस गाठ मारावी. त्यानंतर दोऱ्याच्या एका टोकातून ॲड्रेस टॅग टाकावा (उपस्थितांनी त्यावर स्वाक्षरी व शिक्के मारावेत.) नंतर एक गाठ मारावी व

त्यानंतर चौथी गाठ, ऍ़ड्रेस टॅगवर निर्वाचन अधिकारी यांचा पितळी शिक्का उमटवून लाखेने सील करावी. (सर्व ऍ़ड्रेस टॅग याप्रकारे सील करावयाचे आहेत.) बॅलेट युनिटच्या दोन्ही टोकाला पत्त्याची खूणचिठ्ठी या परिच्छेदामध्ये नमूद केल्यानुसार डकवावी. ही कार्यवाही करताना उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असल्यास त्यांनाही त्यावर स्वाक्षरी करण्याची संधी द्यावी. अशारीतीने बॅलेट युनिट तयार करुन सील केल्यानंतर ते पुन्हा त्यासाठी पुरविण्यात आलेल्या बॅगमध्ये ठेवावे व बॅगच्या हॅण्डलला पत्त्याची खूणचिठ्ठी पुन्हा लावावी.

## १२.६ बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट एकमेकास जोडणे

१२.६.१ जेव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ पेक्षा कमी असेल व एकच बॅलेट युनिट उपयोगात आले असेल तेव्हा बॅलेट युनिट कंट्रोल युनिटशी जोडण्यात यावे.

१२.६.२ बॅलेट युनिट जेव्हा एकापेक्षा जास्त असतील तेव्हा मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या सर्व बॅलेट युनिट पैकी पहिल्या क्रमांकाचे बॅलेट युनिट हेच फक्त कंट्रोल युनिटशी जोडण्यात यावे व त्या बॅलेट युनिटचे स्लाईड स्वीच १ वर असल्याची खात्री करावी व तदनंतर १ नंबरच्या बॅलेट युनिटशी, स्लाईड स्वीच २ क्रमांकावर ठेवलेले बॅलेट युनिट जोडणे आवश्यक आहे. जेव्हा ३ बॅलेट युनिट वापरावयाचे असतील तेव्हा अनुक्रमे स्लाईड स्वीच ३ वर ठेवलेले बॅलेट युनिट हे स्लाईड स्वीच २ वर ठेवलेल्या बॅलेट युनिटशी जोडले पाहिजे व अशारितीने ४ चे बॅलेट युनिट क्रमांक ३ च्या बॅलेट युनिटशी जोडले पाहिजे.

१२.६.३ एक बॅलेट युनिट दुस-या बॅलेट युनिटशी जोडताना बॅलेट युनिटच्या खालच्या बाजूस एक कप्पा असून, त्यामध्ये एक सॉकेटची तरतूद आहे. या सॉकेटला दुसऱ्या युनिटमधून निघालेली केबल पहिल्या बॅलेट युनिटमधील सॉकेटशी जोडली पाहिजे. अशारीतीने तिसऱ्या बॅलेट युनिटची केबल दुसऱ्या युनिटच्या सॉकेटशी जोडली पाहिजे व चौथ्या युनिटची केबल तिसऱ्या युनिटच्या सॉकेटशी जोडली पाहिजे.

१२.६.४ वर नमूद केल्यानुसार फक्त पहिले बॅलेट युनिट हेच कंट्रोल युनिटशी जोडले पाहिजे. बॅलेट युनिटमधून निघालेली केबल ही कंट्रोल युनिटच्या पाठीमागे असलेल्या कप्प्यातील सॉकेटशी जोडली पाहिजे.

१२.६.५ कंट्रोल युनिटच्या पाठीमागच्या कप्प्यामध्ये “Power” हे बटण पुरविलेले असते. ते बटण “On” या पोझिशनला ठेवल्यास मतदान यंत्राची बॅटरी कार्यान्वित होते व कंट्रोल युनिट तसेच सर्व बॅलेट युनिटला ती ऊर्जा पुरविते.

टीप:-

i) एकापेक्षा जास्त बॅलेट युनिट वापरावयाचे असतील तेव्हा ती एकमेकांशी त्याच्या अनुक्रमानुसार जोडली पाहिजेत. यामध्ये चूक झाल्यास मतदान यंत्र निरुपयोगी होईल आणि कंट्रोल युनिटवरील कोणतेही बटण दाबल्यास “LE” (Link Error) असे कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर दिसू लागेल. याचाच अर्थ बॅलेट युनिट एकमेकांशी अनुक्रमानुसार

जोडण्यामध्ये काही तरी चूक झालेली असून ही चूक दुरुस्त केल्यानंतर “LE” हा मेसेज बंद होईल.

ii) बॅलेट युनिटच्या केबलच्या दुस-या टोकाच्या कनेक्टरमध्ये अनेक पिन असतात. हा कनेक्टर दुसऱ्या बॅलेट युनिटच्या अथवा कंट्रोल युनिटच्या सॉकेटमध्ये योग्यरीतीने बसतो. हा कनेक्टर बसविताना योग्य पोझिशनमध्ये बसविणे आवश्यक आहे. ही पोझिशन ओळखणे फार सोपे असून, याकरिता कनेक्टरमधील पिनची संख्या व कनेक्टरचा आकार पहावा. या कनेक्टरच्या पिन अत्यंत नाजूक असून, या कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना जास्त ताकद वापरल्यास सदर पिनला हानी होऊ शकेल किंवा त्या वाकू शकतील. यास्तव कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना ते योग्यरीतीने बसविणे आवश्यक आहे. त्याची खालची व वरची बाजू नीट पाहून जुळणारी योग्य बाजू सॉकेटमध्ये बसविली पाहिजे. कनेक्टर योग्यरीतीने बसविल्यास मतदान यंत्र योग्यरीतीने काम करील हे ध्यानात घ्यावे. हा कनेक्टर, कंट्रोल युनिटपासून वेगळा करताना त्याच्या दोन्ही बाजूला असलेल्या क्लीप दाबून मागे खेचावा.

iii) बॅलेट युनिट एकमेकांशी जोडणे अथवा ते कंट्रोल युनिटशी जोडणे अथवा वेगळे करणे यासाठी थोडा सराव करणे आवश्यक असून, तसे न केल्यास मतदान यंत्रास हानी होऊ शकते. ही बाब जे जे अधिकारी यंत्र हाताळतील अशा सर्व निवडणूक अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या मनावर ठसविणे आवश्यक आहे.

**१२.७ कंट्रोल युनिट तयार करणे :-**

निर्वाचन अधिकारी यांच्या स्तरावर प्रत्येक कंट्रोल युनिट खाली नमूद केल्यानुसार मतदानासाठी तयार करणे आवश्यक आहे.

१२.७.१ कंट्रोल युनिटमध्ये बॅटरी बसविणे -

कंट्रोल युनिट हे विशिष्ट प्रकारच्या बॅटरीवर (Power Pack) चालते. प्रत्येक नवीन निवडणुकीसाठी नवीन पॉवर पॅक बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे आवश्यक सिल्ड (पारदर्शक चिकटपट्टी) पॉवर पॅकची सोय करून ठेवावी. कोणत्याही परिस्थितीत एकदा वापरलेल्या पॉवर पॅक निवडणूकीसाठी वापरू नयेत.

१२.७.२ कंट्रोल युनिटच्या वरच्या बाजूस जे “ कॅन्डिडेट सेट सेक्शन ” आहे. त्यामध्ये पॉवर पॅक बसविण्यासाठी जागा आहे. “कॅन्डिडेट सेट सेक्शन ” मध्ये बॅटरीसाठी पुरविलेल्या कप्प्याचे झाकण सुरुवातीस थोडेसे आत दाबून त्यासाठी डाव्या बाजूला पुरविलेल्या लॅचद्वारे उघडता येते. सदर पॉवर पॅकसाठी एक सॉकेट असून, “ कॅन्डिडेट सेट सेक्शन” मधील पॉवर पॅक च्या कप्प्यात असलेल्या प्लगमध्ये ते बसते. नवीन पॉवर पॅकच्या सॉकेटवर एक चिकटपट्टी सारखे फॅक्टरी सील बसविण्यात आलेले असते. (सदर फॅक्टरी सील हे पॉवर पॅक नवीन असल्याची निशाणी असते.) सदरचे फॅक्टरी सील न काढता पॉवर पॅक योग्य जागी घट्ट बसविण्यात यावी.

१२.७.३ राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्रामध्ये " Detachable Memory Module (DMM)"ची खास सोय करण्यात आलेली आहे. त्यामुळे कॅंडसेट करणेपूर्वी DMM जागेवर (पॉवर पॅकच्या बाजुला) असल्याची खात्री करावी.

**१२.७.४ यंत्रामधील जुनी माहिती काढून टाकणे :**

कंट्रोल युनिटमध्ये वर नमूद केल्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे सेट करण्याकरिता प्रथम मतदान यंत्रात पूर्वी रेकॉर्ड केलेली सर्व माहिती काढून टाकणे आवश्यक आहे. यासाठी कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनमधील "Clear" असे नाव दिलेले बटण दाबावे. हे बटण दाबताच मतदान यंत्रातील सर्व माहिती शून्यावर सेट होईल आणि कंट्रोल युनिटमधील डिस्प्ले पॅनेलवर प्रत्येक उमेदवारासमोर नोंदविण्यात आलेली मते शून्य इतकी दर्शविली जातील. जर क्लीयर बटण दाबल्यावर "Invalid Operation" हा मेसेज डिस्प्ले होत असेल तर C-R-C म्हणजेच Close-Result-Clear हि प्रक्रिया योग्यरित्या झाली नाही असे समजावे व "Close" बटण दाबावे.

१२.७.५ **निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या सेट करणे :** मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट हे जास्तीत जास्त ५९+ NOTA उमेदवारांच्या निवडणुकीसाठी उपयोगात आणता येते. यास्तव प्रत्येक वेळी जेव्हा मतदान यंत्र वापरले जाईल तेव्हा कंट्रोल युनिटमध्ये त्या निवडणुकीत जितके उमेदवार आहेत त्यांची संख्या सेट करणे आवश्यक आहे.

उमेदवारांची संख्या सेट करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

i) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ही कंट्रोल युनिट आणि निवडणुकीमध्ये जितके बॅलेट युनिट वापरावयाचे आहेत ते सर्व ( व तितकेच) एकमेकांशी जोडल्यानंतरच सेट करता येईल. बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट एकमेकांशी कसे जोडावेत, हे वरील परिच्छेदात यापूर्वीच स्पष्ट करण्यात आलेले आहे.

ii) कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट एकमेकांशी जोडल्यानंतर, कंट्रोल युनिटवरील POWER हे बटण सुरु (On) करावे, जेणेकरुन कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट कार्यान्वित होतील.

iii) निर्वाचन अधिकाऱ्यांनी प्रथम परिच्छेद १२.५ प्रमाणे बॅलेट युनिटवर मतपत्रिका लावावी.

iv) जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी एका निवडणूक विभागातील व एका निर्वाचक गणाकरिता Candset करण्याची पध्दत

उदा. एका बॅलेट युनिटवर दोन जागांसाठी (१ जिल्हापरिषद+ १ पंचायत समिती जागा) मतदान असेल आणि सर्व जागांसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या १२ पेक्षा जास्त नसेल ( १२.५.१(ii) प्रमाणे) तर अशावेळी एकाच बॅलेट युनिटच्या सहाय्याने मतदान प्रक्रिया करणे शक्य आहे.

तर दोन जागांसाठी Candset करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

जिल्हा परिषद जागेकरिता चार उमेदवार,

पंचायत समिती जागेकरिता तीन उमेदवार असतील

निवडणूक विभाग : १२७ , निर्वाचक गण : ५८

मतदान केंद्र क्रमांक : १८९

एकूण मतपत्रिका : २, (एक जिल्हापरिषद, दुसरी पंचायत समितीसाठी)

जिल्हापरिषद मतपत्रिका क्र-१ (एकूण २ मतपत्रिकेपैकी पहिली)

पंचायत समिती मतपत्रिका क्र-२ (एकूण २ मतपत्रिकेपैकी दुसरी)

Ballot Unit

१) बॅलेट युनिटवरील पहिला उमेदवार पहिल्या बटणापासून सुरूवात करा व जिल्हा परिषद जागेसाठी एकूण चार उमेदवार निवडणूक लढवीत असल्याने प्रथमत: बॅलेट युनिटवर काचेच्या कप्प्यात मतपत्रिका व्यवस्थितपणे ठेवल्यानंतर चारही उमेदवारांच्या निवडणूक चिन्हासमोरील मतदानाची बटणे व NOTA चे बटण Unmasked करा.

२) पंचायत समिति जागेसाठी तीन उमेदवार निवडणूक लढवीत असल्याने पहिल्या जागेची मतपत्रिका बसविल्यानंतर त्याखाली दुसऱ्या जागेसाठीच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मतपत्रिका अशारितीने ठेवा की, दुसऱ्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी मतपत्रिकेवरील पहिला उमेदवार बॅलेट युनिटवरील वरून अ.क्र.७ व्या बटणासमोर असेल. (६ वे बटण Masked असेल )






Masked End Button Unmasked End Button

विशेष टीप १ : मतदानात End या बटणाचा वापर करावयाचा नसल्याने ते Masked ठेवावे लागते. परंतु कँडसेट करताना END बटण Unmasked ठेवावे लागेल.

| सेटिंग चा विषय | डिस्प्ले | Ballot Unit | वापरावयाचे बटण | क्रियेचा अर्थ |
|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र. सेट करणे १२७ | ENTER WARD NO... | १ | १,२,७ नंतर १६ वे बटण (END) दाबून प्रक्रिया पुर्ण झाल्याचे निश्चीत करावे | निवडणूक विभाग क्र. १२७ भरणेकामी BU वरील १,२,७ क्रमांकाची बटणे दाबली व १६ वे बटण (END) दाबून प्रक्रिया पूर्ण केली |
| मतदान केंद्र क्रमांक सेट करणे- १८९ | ENTER BOOTH NO... | १ | १,८,९ नंतर १६ वे बटण (END) दाबून प्रक्रिया पुर्ण झाल्याचे निश्चीत करावे | मतदान केंद्र क्रमांक १८९ भरणेकामी BU वरील १,८,९ क्रमांकाची बटणे दाबली व १६ वे बटण (END) दाबून प्रक्रिया पूर्ण केली |
| एकूण मतपत्रिका - २ | NUMBER OF BALLOTS | १ | २ | एकूण २ मतपत्रिका असल्याने BU वरील २ क्रमांकाचे बटण दाबले |
| पहिल्या मतपत्रिकेवरील पहिला उमेदवार | BALLOT १<br>१ ST CAND... | १ | १ | पहिल्या मतपत्रिकेवरील पहिल्या उमेदवाराचे नाव BU वरील पहिल्या बटणाच्या समोर असल्याने १ क्रमांकाचे बटण दाबले |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहिल्या मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार | BALLOT १<br>LAST CAND... | १ | ५ | पहिल्या मतपत्रिकेवरील शेवटच्या उमेदवाराचे (NOTA) नाव BU वरील पाचव्या बटणाच्या समोर असल्याने ५ क्रमांकाचे बटण दाबले |
| एकुण उमेदवारां पैकी किती उमेदवार निवडायचे त्यासाठी | B१ CANDS<br>५ SEATS.... | १ | १ | जिल्हा परिषद एका निवडणूक विभागातून एकच उमेदवार निवडायचा असल्याने BU वरील १ क्रमांकाचे बटण दाबले |
| दुसऱ्या मतपत्रिकेवरील १ उमेदवार | BALLOT १<br>१ ST CAND... | १ | ७ | दुसऱ्या मतपत्रिकेवरील पहिल्या उमेदवाराचे नाव BU वरील सातव्या ( ६वे बटण Masked राहील) बटणाच्या समोर असल्याने ७ क्रमांकाचे बटण दाबले |
| दुसऱ्या मतपत्रिकेवरील शेवटचा उमेदवार | BALLOT १<br>LAST CAND... | १ | १० | दुसऱ्या मतपत्रिकेवरील शेवटच्या उमेदवाराचे (NOTA) नाव BU वरील दहाव्या बटणाच्या समोर असल्याने १० क्रमांकाचे बटण दाबले |
| एकूण उमेदवारां पैकी किती उमेदवार निवडायचे त्यासाठी | B२ CANDS<br>SEATS.... | १ | ७ | पंचायत समिती निर्वाचक गणातून एकच उमेदवार निवडायचा असल्याने BU वरील ७ क्रमांकाचे (दुसऱ्या मतपत्रिकेतील पहिले) बटण दाबले |

टिप :- प्रभाग/मतदान केंद्र क्रमांक कंट्रोल युनिटमध्ये समाविष्ट (ENTER) करण्यासाठी १ ते ९ आकड्याकरिता १ ते ९ बटण वापरावे, ० (शुन्य) या अंकाकरिता अ.क्र.१० बटण वापरावे (प्र.क्र.१०० साठी अ.क्र.१, अ.क्र.१० व पुन्हा अ.क्र.१० अशाक्रमाने वापरावी लागतील) व पुन्हा आकडे (Reset) भरावयाचे झाल्यास,१५ क्रमांकाचे बटण दाबावे. उदा. जिल्हा परिषदेकरिता अ.क्र.१ व १० अनुक्रमांकाची बटणे दाबणे आवश्यक आहे. तर पंचायत समितीकरिता २, १० व ७ अनुक्रमाची बटणे दाबणे आवश्यक आहे.

१) वरील उदाहरणात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करताना खालील प्रमाणे डिस्प्ले दिसेल :-

सर्व जागांच्या मतपत्रिका बॅलेट युनिटमध्ये सेट केल्यानंतर बॅलेट युनिट, कनेक्टरच्या सहाय्याने Top ही अक्षरे कंट्रोल युनिटच्या आतील बाजूस रहातील अशा रितीने जोडा.




२) DMM काढता येणारी मेमरी Candset सेक्शनमध्ये Candset बटनाच्या वर असलेल्या DMM सॉकेटमध्ये घट्ट बसवा.



३)	बॅटरीसाठी विहित असलेल्या कप्प्यात नवीन बॅटरी बसवा.




४)	कंट्रोल युनिटचा स्वीच ऑन केल्यावर दर्शक पट्टीवर पुढीलप्रमाणे तपशिल दिसेल :-

१)	MEMORY CHANGE

२)	BATTERY STATUS

डिस्प्ले थांबल्यानंतर Result स्केशनमधील Clear बटण दाबावे. जर एखादया यंत्राच्या दर्शकपट्टीवर INVALID OPRATION आल्यास क्लीअर बटण दाबलेल्या अवस्थेतच Cand Set बटण दाबावे. त्यानंतर पुढीलप्रमाणे तपशिल दिसेल :-




दर्शकपट्टीवर वरील निर्देश येण्याचे बंद झाल्यानंतर कंट्रोल युनिटचा स्वीच ऑफ करा.

५)	कंट्रोल युनिट मागील बाजूने स्विच On करा. त्यानंतर दर्शकपट्टीवर खालीलप्रमाणे तपशील क्रमाक्रमाने दिसेल.




वरीलप्रमाणे प्राप्त होणारी सूचना क्रमाक्रमाने येणे पूर्णत: बंद झाल्यानंतर पुढील कृती करावी.

६) आता Candset हे बटण दाबा. म्हणजे दर्शकपट्टीवर खालीलप्रमाणे तपशील दिसेल.

ENTER WARD
NO. . . . . . .

वर नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दती अनुसरून प्रभाग क्रमांक कंट्रोल युनिटमध्ये नोंदविल्यानंतर बॅलेट युनिटवरील End हे बटण Beep आवाज बंद होईपर्यंत दाबून ठेवा. त्यानंतर खालील सूचना प्राप्त होईल.

ENTER

BOOTH NO. . . . . .

आता मतदान केंद्राचा अनुक्रमांक देखील कंट्रोल युनिटमध्ये ENTER करावयाचा असून त्यासाठी देखील प्रभाग क्रमांक ENTER करावयाच्या कार्यपध्दतीचा पुन्हा अवलंब करा आणि योग्य तो मतदान केंद्राचा अनुक्रमांक कंट्रोल युनिटमध्ये नोंदविल्यानंतर पुन्हा END हे बटण BEEP आवाज बंद होईपर्यंत दाबून ठेवावे. तद्नंतर पुढीलप्रमाणे सूचना प्राप्त होईल.

NUMBER OF

BALLOTS

याचा अर्थ किती जागांसाठी मतदान होणार आहे त्याची नोंद कंट्रोल युनिटमध्ये करावी. यासाठी अर्थातच या उदाहरणात आपण जिल्हा परिषद व पंचायत समितीकरिता दोन मतजपत्रिका (जागांसाठी) Candset करत असल्याने असा निर्देश प्राप्त झाल्यानंतर बॅलेट युनिटवरील बॅलेटची संख्या ( मतपत्रिका ) निश्चित करावी. उमेदवारांच्या बटणामधील वरून दुस-या क्रमांकाचे बटण दाबावे. त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना प्राप्त होईल.

BALLOT **1**
**1**st CAND

याचा अर्थ पहिल्या जागेसाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी पहिला उमेदवार बॅलेट युनिटवर ज्या स्थानावर आहे ते बटण दाबावे. अर्थात, पहिल्या जागेकरिता बॅलेट युनिटवर बसविलेल्या मतपत्रिकेनुसार पहिला उमेदवार हा पहिल्या बटणासमोर आहे म्हणून अ.क्र.१ चे बटण दाबा. म्हणजे पुढील सूचना दर्शकपट्टीवर येईल.

BALLOT **1**
LAST CAND

यानुसार पहिल्या जागेसाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी शेवटचा उमेदवार कितव्या स्थानावर आहे ती देखील नोंद करावी. अर्थातच, चार उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. मात्र शेवटच्या म्हणजेच NOTA समोरील बटण दाबाबे. त्यानंतर खालीलप्रमाणे सूचना दर्शकपट्टीवर येईल.

B **1** CAND **5**
SEATS. . . . . .

याचा अर्थ पहिल्या जागेसाठी चार उमेदवार आहेत आणि त्यामधून किती उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत ती संख्या निश्चित करणे. त्यासाठी या चार उमेदवारांमधून एकाची निवड अभिप्रेत असल्याने SEAT साठी पुन्हा अ.क्र.१ चे बटण दाबावे. त्यानंतर खालील सूचना प्राप्त होईल.

BALLOT **2**
**1**ST CAND. . . . .

दुस-या जागेकरिता निवडणूक लढविणा-या उमेदवारांपैकी पहिला उमेदवार ज्या स्थानावर असेल त्या समोरील बटण दाबावे.

BALLOT **2**
LAST CAND. . . . .

अर्थातच दुस-या जागेकरिता निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या मतपत्रिकेतील शेवटच्या उमेदवारासमोरील (NOTA) बटण दाबावे. नंतर पुढील सूचना मिळेल.

**B 2 CAND 4**
**SEATS** . . . . .

म्हणजेच दुसऱ्या जागेकरिता तीन उमेदवार असून त्यातील एक निवडून द्यावयाचा असल्याने पुन्हा एक ही संख्या ENTER करण्यासाठी दुसऱ्या जागेकरिता बॅलेट युनिटवर सेट केलेल्या मतपत्रिकेतील पहिले बटण दाबा. याठिकाणी (१ हा अंक ENTER करण्यासाठी पहिल्या बॅलेट युनिटवरील अनुक्रमांक १ चे बटण निष्क्रिय असेल. कारण दुसऱ्या जागेसाठी देखील तेच बॅलेट युनिट वापरले जात असेल तरीही दुसऱ्या जागेसाठी दुसऱ्या मतपत्रिकेतील पहिल्या उमेदवारासमोरील बटण दाबणे जरुरीचे आहे. जरी ते बॅलेट युनिटवरील प्रत्यक्षात सातवे बटण असेल तरीही ते पहिले बटण म्हणूनच वापरावे लागेल.)

Candset प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कंट्रोल युनिटच्या Display सेक्शनवर आपण केलेल्या Candset विषयी खालीलप्रमाणे सविस्तर तपशील क्रमाक्रमाने दिसेल.

| Sr.No. | Display | Meaning |
|---|---|---|
| 1 | WARD NO - 127<br>BOOTH NO - 189 | district Number is 127<br>Booth Number is 189 |
| 2 | NUMBER OF BALLOTS 2 | Number of Ballot Papers are 2 i.e. one for ZP Seat and another for PS Seat |
| 3 | BALLOT 1 | Ballot Paper 1 |

| | | |
|---|---|---|
| 4 | CANDS 5<br>SEATS 1 | Total No. of Candidates<br>Number of Candidates to be elected<br>(5 th button for NOTA) |
| 5 | BALLOT 2 | Ballot Paper 2 |
| 6 | CANDS 4<br>SEATS 1 | Total No. of Candidates<br>Number of Candidates to be elected<br>(4 th button for NOTA) |

चार बॅलेट युनिट परस्परांना जोडून जास्तीत जास्त ६० उमेदवारांसाठी Candset करण्याची व्यवस्था करता येईल.

टीप:-

(१) जर चुकून बॅलेट युनिटवरील चुकीची बटणे दाबली गेली उदा. ५ उमेदवार असतील व ६ व्या क्रमांकाचे बटण दाबले गेले तर अशी चूक दुरुस्त करण्यासाठी बॅलेट युनिट वरील १५ क्रमांकाचे बटण **(BACK KEY)** दाबावे आणि उपरोक्त टप्यांनुसार योग्य ती बटने दाबल्यानंतर मतदान यंत्र योग्यप्रकारे सेट होईल.

(२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या सेट करताना एकच बॅलेट युनिट अथवा जितके बॅलेट युनिट निवडणुकीत वापरावयाचे आहेत (हे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून आहे) त्याच्या आधारे कंट्रोल युनिटमध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या सेट करता येते. चुकीची बटणे दाबली जाऊ नयेत यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवारानंतरची सर्व पांढऱ्या आवरणाच्या झाकणाने बटणे झाकण्यात (Masked) यावीत.

(३) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या कंट्रोल युनिटमध्ये सेट केल्यानंतर कंट्रोल युनिटच्या बॅटरीचे बटण बंद करणे आवश्यक आहे. तसेच बॅलेट युनिट कंट्रोल युनिटपासून वेगळे करणे आवश्यक आहे. त्यासाठी बॅलेट युनिटपासून निघालेली केबल व कनेक्टर जो कंट्रोल युनिटच्या सॉकेटमध्ये बसविला असेल तो वेगळा करण्यात यावा.

### १२.७.६ "कॅन्डिडेट सेट सेक्शन" सील करणे

(१) "कॅन्डिडेट सेट सेक्शन" मध्ये बॅटरी बसविल्यानंतर आणि कंट्रोल युनिटमध्ये निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या सेट केल्यानंतर कॅन्ड सेट सेक्शनमध्ये खोचून बसविण्यात आलेल्या काढता येणाऱ्या मेमरीचा अनुक्रमांक मतदार यंत्राच्या नोंदी घेण्याकरिता ठेवलेल्या मुख्य नोंदवहीत (Master Register) मध्ये नोंदविण्यात यावा. त्यानंतर कॅण्डसेट बटणाचा छोटा कप्पा बंद करा. त्यावरील कव्हर घट्ट बसवून बंद करावा दोऱ्याच्या सहाय्याने अड्रेस टॅगसह सिल करा (मतदानकेंद्राचा अनुक्रमांक/प्रभाग क्र. दर्शविणाऱ्या खुणचिठ्ठीसह)

(२) बॅटरी सेक्शनचा बाहेरचा मुख्य कप्पा बंद करून त्यावर देखील प्रभाग क्र./मतदान केंद्र क्र.दर्शविणारी खुणचिठ्ठी लावून दोऱ्याच्या सहाय्याने सिलबंद करा. जेणेकरुन "कॅन्डिडेट सेट सेक्शन"मधील बॅटरी आणि कॅन्ड सेट बटण या दोघांना कोणीही धक्का लावू शकणार नाही. तो सीलबंद करण्यासाठी डाव्या बाजूला पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा

ओवून त्याची गाठ बांधावी व दोऱ्याच्या दोन्ही टोकांना पत्त्याची खूणचिठ्ठी डकवावी. त्यामध्ये खालील तपशील नमूद करावा.

...............जिल्हा परिषद ..........पंचायत समिती
सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ...........
(तालुका ................. जिल्हा....................)
निवडणूक विभाग क्रमांक- ....... निर्वाचक गण क्रमांक-....... मतदान केंद्र क्रमांक-..
कंट्रोल युनिट अनुक्रमांक- ................................
मतदानाचा दिनांक -...........................................

यानंतर मशीनच्या मागील ऑन/ऑफ बटण " ऑफ" (Off) म्हणजे बंद करण्यात यावे. मात्र बॅटरी तशीच राहू द्यावी.

(३) उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्यास व त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास त्यांना पत्त्याच्या खूणचिट्ठीवर आपली सही करण्याची अनुमती द्यावी. तसेच निर्वाचन अधिकारी यांनीही त्यावर सही करणे आवश्यक आहे. त्यानंतर कंट्रोल युनिट त्याच्या बॅगमध्ये ठेवावे, जेणेकरुन ते संबंधित मतदान केंद्राकडे रवाना करता येईल. कंट्रोल युनिटच्या हॅण्डलला देखील पत्त्याची खूणचिठ्ठी डकवावी जेणेकरुन ते कोठे वापरावयाचे आहे, हे त्वरित कळेल. याकरिता कागदी स्टीकरचा वापर करता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मार्कर पेन इ.चा वापर करु नये व मतदान यंत्र / मतदान यंत्राची बॅटरी खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

## १२.८ मतदानासाठी तयार करण्यात आलेली यंत्रे सुरक्षित ठेवणे:-

(१) मतदानासाठी तयार करण्यात आलेली सर्व मतदान यंत्रे राखीव मतदान यंत्रांसह स्ट्राँग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात यावीत. स्ट्राँग रुमला जे कुलूप लावण्यात येईल त्यास सील लावून त्यावर निर्वाचन अधिकारी यांनी स्वाक्षरी करावी. उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांची इच्छा असल्यास त्यांनाही कुलूपाच्या सीलवर स्वाक्षरी करण्याची अनुमती द्यावी.

(२) मतदान यंत्रे सुरक्षित ठेवलेली खोली (स्ट्राँग रुम) मतदान केंद्रावर यंत्रे देण्याच्या दिवशीच उघडण्यात यावी. ही खोली उघडण्याबाबतच्या लेखी सूचना, तारीख व वेळेसह निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना पाठविण्यात यावी. स्ट्राँग रुम उघडण्यासंबंधीच्या हालचालींची नोंदवही (Movement Register) ठेवण्यात यावी व त्यामध्ये खोली केव्हा उघडली व बंद केली याचा तपशील नोंदविण्यात यावा.

(३) काही आकस्मिक व न टाळता येणाऱ्या कारणांमुळे स्ट्राँग रुम नियोजित वेळेच्या व तारखेच्या आधी उघडणे भाग पडल्यास तुम्ही, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीतच सदर खोली उघडावी व ती बंद करताना पुन्हा कुलूप

बंद करुन कुलूपावर वर नमूद केल्यानुसार सील लावून निर्वाचन अधिकारी, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना सही करण्याची अनुमती द्यावी व हालचाल नोंदवहीमध्ये खोली कोणत्या कारणामुळे उघडली व बंद केली त्याबाबतची तारीख, वेळ इत्यादी नमूद करण्यात यावी.

(४) मतदान यंत्रे ठेवलेली खोली वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या निरिक्षणाखाली सतत सुरक्षेत ठेवण्यात यावी. आवश्यक वाटल्यास केंद्रीय राखीव दल किंवा राज्य राखीव दलाचे जवान तैनात करण्यात यावेत.

**मतदान यंत्रे सुरक्षा कक्षात ठेवलेनंतर स्ट्राँग रुम उघडण्यासंबंधीच्या हालचालींची नोंदवही (Movement Register) :**

..............जिल्हा परिषद .........पंचायत समिती
सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ...........

(तालुका ................ जिल्हा...................)
निवडणूक विभाग क्रमांक- ....... निर्वाचक गण क्रमांक-.......
मतदान केंद्रांवर देणेसाठी सिल करून ठेवण्यात आलेले BU................CU.................... (संख्या)
राखीव BU................CU....................(संख्या)

| सुरक्षा कक्ष उघडण्याचा दिनांक | आत शिरण्याची वेळ | सुरक्षा कक्ष उघडणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा | सुरक्षा कक्ष उघडण्याचा उद्देश |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

| सुरक्षा कक्ष उघडणाऱ्या अधिकाऱ्या सोबतच्या अधिकाऱ्यांचा तपशील | ज्या अधिकाऱ्याने सुरक्षा कक्ष उघडला त्याची सही | सुरक्षा कक्षाच्या सुरक्षतेसाठी उपस्थित पोलिस अधिकाऱ्याची सही | बाहेर निघण्याची वेळ |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |

| सुरक्षा कक्षाच्या बाहेर येणाऱ्या अधिकाऱ्यांचा तपशील | सुरक्षा कक्षात घालवलेला एकूण कालावधी | बाहेर येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सह्या | सुरक्षा कक्षाच्या सुरक्षतेसाठी उपस्थित पोलिस अधिकाऱ्याची सही | शेरा |
|---|---|---|---|---|
| ९ | १० | ११ | १२ | १३ |

## १२.९ मतदान यंत्राच्या नोंदी ठेवणे:-

(१) निवडणुकीमध्ये आपण वापरणार असलेल्या कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिटच्या संपूर्ण नोंदी तुम्ही ठेवल्या पाहिजेत. सदर नोंदीनुसार

- किती कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट प्रत्येक मतदान केंद्रावर वापरली जाणार आहेत.

- तसेच कोणत्या क्रमांकाच्या मतदान केंद्रावर कोणत्या क्रमांकाचे कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट वापरले जाणार आहे, याची नोंद राहील.
- तसेच या नोंदीमध्ये किती कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट त्यांच्या अनुक्रमांकासह राखीव म्हणून वापरण्यासाठी तयार केली आहेत, याचाही तपशील ठेवण्यात यावा. असे राखीव कंट्रोल युनिट अथवा बॅलेट युनिट वापरण्याची वेळ आल्यास कोणते युनिट, कोणत्या मतदान केंद्रावर, कोणत्या कारणामुळे वापरले गेले याचा तपशील ठेवणे शक्य होईल.

(२) वर नमूद केलेल्या मतदान यंत्राच्या संपूर्ण नोंदी ठेवण्याच्यादृष्टीने मुख्य नोंदवही (Master Register) ठेवण्यात यावी. त्यामध्ये खालील नोंदी राहतील.

i) निर्वाचन अधिका-यांच्या नियंत्रणामध्ये एकूण किती कंट्रोल युनिट देण्यात आली होती.

ii) एकूण उपलब्ध करुन देण्यात आलेली बॅलेट युनिट

iii) निवडणूक विभाग /निर्वाचक गणातील एकूण मतदान केंद्रांची संख्या

iv) मतदान केंद्रावर वापरावयाच्या एकूण कंट्रोल युनिटची संख्या (प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक याप्रमाणे)

v) मतदान केंद्रावर वापरावयाच्या एकूण बॅलेट युनिटची संख्या (प्रत्येक मतदान केंद्रावर किती बॅलेट युनिट आवश्यक आहेत त्यानुसार)

vi) राखीव कंट्रोल युनिटची संख्या

vii) राखीव बॅलेट युनिटची संख्या

viii) प्रत्येक निवडणूक विभाग / निर्वाचक गणातील मतदान केंद्राचे नाव व त्याचा क्रमांक

ix) प्रत्येक मतदान केंद्राचे नाव व क्रमांकासमोर तेथे वापरावयाच्या कंट्रोल युनिटचा अनुक्रमांक

x) कंट्रोल युनिटमध्ये खोचून बसविलेल्या काढता येणा-या मेमरीचा अनुक्रमांक

xi) मतदान केंद्रावर वापरावयाच्या बॅलेट युनिटचा अनुक्रमांक

xii) बॅलेट युनिटवर घट्ट चिकटविलेला मतपत्रिकेचा अनुक्रमांक

xiii) राखीव ठेवलेले कंट्रोल युनिट, त्यामध्ये बसविण्यात आलेली काढता येणारी मेमरी व बॅलेट युनिटचे अनुक्रमांक

xiv) वर नमूद केलेल्या मुख्य नोंदवहीत शेरा या रकान्यामध्ये एखाद्या मतदान केंद्रावर राखीव मतदान यंत्र वापरले असल्यास त्याचा क्रमांक व नाव लिहून त्यासमोर जर राखीव कंट्रोल युनिट अथवा बॅलेट युनिट वापरावे लागले तर ते नमूद करावे व त्यासाठीची कारणे नमूद करण्यात यावीत. (उदाहरणादाखल परिशिष्ट नऊ व दहा येथे नोंदवहीचा नमुना दिला आहे.)

## १२.१० मतदान यंत्रे, मतदान अधिकारी / कर्मचारी (Polling Party) यांना पुरविणे.

(१) मतदान केंद्राध्यक्ष यांना मतदान यंत्रे पुरविताना त्याबाबतची योग्य ती पोहच घेण्यात यावी. त्यासाठी आपण एक वेगळी नोंदवही ठेवून मतदान केंद्राध्यक्षांचे नाव, मतदान केंद्राचा क्रमांक व त्याचे नाव देण्यात आलेल्या कंट्रोल युनिटचा तसेच बॅलेट युनिटचा अनुक्रमांक व मतदान केंद्राध्यक्षांची सही त्या नोंदवहीत घेण्यात यावी.

(२) सदर नोंदवहीमध्ये मतदान केंद्राध्यक्षांकडून मतदान यंत्रे परत ताब्यात घेताना त्याबाबतच्या नोंदी ठेवण्याची तरतूददेखील करण्यात यावी. जो अधिकारी अशी मतदान यंत्रे मतदान केंद्राध्यक्षांकडून ताब्यात घेईल, त्यांनी प्राप्त झालेल्या कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटचा क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा व त्यावर मतदान यंत्रे ताब्यात मिळाल्याबद्दल पूर्ण सही करावी.

(३) एखादे मतदान यंत्र ताब्यात घेताना ते मोडतोड झालेल्या अवस्थेत असेल तर त्याची संपूर्ण नोंद व मतदान यंत्राचा अनुक्रमांक इत्यादी ठेवण्यात यावा.

(४) मतदानाच्या दिवशी मुख्य ठिकाणी राखीव मतदान यंत्रे ठेवण्यात यावीत जेणेकरुन कमीत कमी कालावधीत ती संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यासाठी आणीबाणीच्या वेळी उपलब्ध राहतील. ही राखीव मतदान यंत्रे शक्य असल्यास क्षेत्रिय अधिकाऱ्याकडे ठेवावीत, तेवढी राखीव यंत्रे नसल्यास मध्यवर्ती ठिकाणी एखाद्या सहाय्यक निर्वाचन अधिका-याच्या ताब्यात अथवा अन्य वरिष्ठ अधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवण्यात यावी.

# प्रकरण 13

## जिथे भारत निवडणूक आयोगाची मशीन वापरायची आहेत तिथे

१३.१ भारत निवडणूक आयोगाच्या मशीन ह्या एकाच उमेदवारास मत देण्यासाठी वापरता येतात सबब जिथे भारत निवडणूक आयोगाची मशीन वापरायची आहेत तिथे आपल्याला जिल्हा परिषद व पंचायत समिती साठी प्रत्येकी स्वतंत्र बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट लागणार आहे सबब EVMs ची मागणी करताना हे लक्षात घ्यावे.

१३.२ भारत निवडणूक आयोगाच्या मशीन व राज्य निवडणूक आयोगाच्या मशीन निवडणुकीसाठी तयार करताना केवळ कँडिडेट सेटिंग मध्ये फरक असुन इतर सर्व कारवाई प्रकरण १२ मध्ये दिल्या प्रमाणेच करावयाची आहे.

१३.३ भारत निवडणूक आयोगाचे एका बॅलेट युनीट वर १६ बटणे आहेत , अशी ४ बॅलेट एकमेकांस जोडता येतात म्हणजेच ६३ उमेदवार व १ NOTA साठी वापरता येतील. तरी निर्वाचक अधिकाऱ्याच्या स्तरावर बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटतयार करताना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१३.३.१ बॅलेट युनिट मतदानासाठी तयार करणे

निर्वाचक अधिकाऱ्यांच्या स्तरावर प्रत्येक बॅलेट युनिट खाली नमूद केल्यानुसार मतदानासाठी तयार करणे आवश्यक आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या लक्षात घेवून एक किंवा त्यापेक्षा अधिक बॅलेट युनिट लागणार आहेत याबाबत निर्णय घ्यावा.

(१) बॅलेट युनिटमध्ये मतपत्रिका घट्ट चिटकविण्यासाठी ठेवण्यात आलेल्या जागेवर ती घट्ट चिकटविण्यात यावी.

(२) मतपत्रिका अशारीतीने ठेवण्यात यावी जेणेकरुन प्रत्येक उमेदवाराचे नाव व त्याचे चिन्ह त्याच्या समोरील बटण आणि दिवा यांच्यासमोर येईल व दोन्ही उमेदवारांच्या चौकोनावरील जाड रेषा बॅलेट युनिटमधील रेषेशी जुळतील. बॅलट पेपरची संरेखन (Alignment) जुळणे हा अत्यंत महत्वाचा टप्पा आहे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सदर संरेखन (Alignment) न जुळल्यास उमेदवारांची नावे व त्याच्यासमोरील बटण तसेच दिवा हे समोरासमोर न आल्यास मतदाराच्या मत देण्यासंदर्भात गोंधळ होईल व त्यातून अत्यंत गंभीर समस्या निर्माण होतील.

(३) संबंधित गट /गण यांच्या मतपत्रिकेच्या मागील बाजूवर निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करावी व स्वाक्षरीचा रबरी शिक्का उमटवावा.

(४) त्यानंतर मतपत्रिका ठेवण्याकरीता असलेली जागा पारदर्शक पट्टीने बंद करावी.

(५) निवडणूक लढविणारे उमेदवार १६ पेक्षा कमी असल्यास जितके उमेदवार + NOTA या व्यतिरिक्त उर्वरित उपयोगात आणली न जाणारी बॅलेट युनिटवरील बटणे झाकावीत.(Masked)

(६) १६ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास स्लाईड स्वीच योग्य त्या ठिकाणी म्हणजेच जितकी बॅलेट युनिट वापरावयाची आहेत त्यानुसार ठेवणे. मतपत्रिका बॅलट पेपर स्क्रीनच्या खाली घट्ट चिकटविल्यानंतर वरच्या बाजुला सील करण्यासाठी पुरविलेल्या जागेमध्ये असलेल्या दोन छिद्रातून दोरा ओवून ते सीलबंद करावे. सदरच्या दोऱ्याची गाठ बांधून त्याच्या दोऱ्याच्या टोकाच्या बाजूस खूण चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) बांधण्यात यावा. त्यावर निर्वाचन अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी करावी व रबरी शिक्का उमटवावा. ही कार्यवाही करताना उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असलयास त्यांनाही आपली स्वाक्षरी करण्याची संधी द्यावी.

१३.३.२ खूण चिठ्ठीस डाव्या बाजूस एक छिद्र असावे. हे छिद्र एका धातूच्या खूण झाकलेले असावे जेणेकरुन त्यामधील दोरा काढल्यानंतर खूण चिठ्ठी सहजासहजी फाटणार नाही.

टीप:- जिल्हा परिषद निवडणूकाकरीता खूण चिठ्ठी "पांढऱ्या रंगाची तर पंचायत समितीकरीता खूण चिठ्ठी गुलाबी" रंगाची असेल तसेच त्यांचा आकार वेगवेगळा आहे. त्याचा नमुना (परिशिष्ट-१३) मध्ये दिलेला आहे. या खूण चिठ्ठीच्या नमुन्यानुसार आपण आवश्यक तितक्या प्रमाणात खूण चिठ्ठया वेळीच छापून घ्याव्यात व मतदान केंद्रावर वापरण्यासाठी उपलब्ध कराव्यात.

१३.३.३ जेव्हा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १५ पर्यंत असेल तेव्हा एकच बॅलेट युनिट वापरावे लागेल व त्यावेळी आतल्या बाजूचा स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल. जेव्हा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या १५ आणि ३१ यामध्ये असेल तेव्हा दोन बॅलेट युनिट वापरावी लागतील. तेव्हा पहिल्या बॅलेट युनिटमध्ये १ ते १६ उमेदवार असल्यामुळे त्या युनिटमधील स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल तर दुसऱ्या बॅलेट युनिटमधील स्लाईड स्वीच २ वर ठेवावा लागेल. जर उमेदवारांची संख्या ३२ ते ४७ यामध्ये असेल तर ३ बॅलेट युनटिची आवश्यकता भासेल व तिसऱ्या बॅलेट युनिटचा स्लाईड स्वीच ३ वर ठेवावा लागेल. उमेदवारांची संख्या ४८ ते ६३ च्या दरम्यान असल्यास ४ बॅलेट युनिटचा स्लाईड स्वीच ४ वर ठेवावा लागेल.

टीप :- वरील परिच्छेदात नमूद केलेली स्लाईड स्वीच सेट करण्याची बाब योग्यरितीने न केल्यास संपूर्ण मतदान यंत्र निरुपयोगी ठरेल यास्तव बॅलेट युनिटमधील स्वीच सेट करणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे हे लक्षात घ्यावे.

### १३.४ कंट्रोल युनिट तयार करणे.

१३.४.१ बॅलेट युनिट तयार केल्यानंतर बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट एकमेकांना केबलच्या सहाय्याने जोडावे त्यानंतर कंट्रोल युनिटला जेथे बॅटरी बसविण्याची जागा आहे तेथे बॅटरी बसविण्यात यावी.

१३.४.२ बॅटरी बसविल्यानंतर मतदान यंत्रात आवश्यक असलेला वीजेचा पुरवठा होईल व त्यानंतर कंट्रोल युनिटच्या मागील बाजूस असलेले पॉवर ऑन / ऑफचा स्वीच सुरु करावा.

१३.४.३ मतदानाकरीता इलेक्ट्रानिक मतदान यंत्र तयार करताना या यंत्रामध्ये हे यंत्र ज्या ठिकाणी पूर्वी वापर करण्यात आलेले होते त्या निवडणूकीची माहिती त्यामध्ये असण्याची शक्यता आहे म्हणून सर्वप्रथम ही माहिती पुसून टाकावी.

इलेक्ट्रानिक मतदान यंत्रातील माहिती पुसून टाकण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनमधील “Close-Result-Clear (CRC)” असे नाव दिलेली बटणे त्याच क्रमाने दाबणे आवश्यक असते. प्रत्येक बटण दाबल्यानंतर कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर आवश्यक ती माहिती दिसेल त्यानंतर सर्वात शेवटी End अशी अक्षरे दिसतील. सर्वप्रथम Close हे बटण दाबावे. हे बटण दाबल्यानंतर कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर माहिती दिसेल व सर्वात शेवटी End ही अक्षरे दिसतील. त्यानंतर “Result-I ” हे बटण दाबावे व End अशी अक्षरे दिसल्यानंतर “Clear” हे तीसरे बटण दाबावे. हे बटण दाबल्यानंतर ज्यावेळी डिस्प्ले पॅनलवर End अशी अक्षरे दिसतील व डिस्प्ले बंद झाल्यावर मतदान यंत्रातील सर्व माहिती शुन्यावर सेट होईल.

१३.५. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या सेट करणे

मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट हे जास्तीत जास्त ६३+ NOTA उमेदवारांच्या निवडणुकीसाठी उपयोगात आणता येते. NOTA साठी शेवटचे बटण राखीव ठेवायचे आहे. यास्तव प्रत्येक वेळी जेव्हा मतदान यंत्रे वापरले जाईल तेव्हा कंट्रोल युनिटमध्ये त्या निवडणुकीतील जितके उमेदवार आहेत त्यांची संख्या सेट करतेवेळी लक्षात घेणे आवश्यक आहे.

उमेदवारांची संख्या सेट करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१३.५.१ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ही कंट्रोल युनिट आणि निवडणुकीमध्ये जितके बॅलेट युनिट वापरावयाचे आहेत ते सर्व एकमेकांशी जोडल्या नंतरच सेट करता येईल.

१३.५.२ कंट्रोल व बॅलेट युनिट एकमेकांशी जोडल्यानंतर कंट्रोल युनिटवरील पॉवर हे बटण सुरु (On) करावे. जेणेकरुन कंट्रोल व बॅलेट युनिटला आवश्यक ती ऊर्जा मिळणे सुरु होवून ती कार्यान्वित होतील.

१३.५.३ कंट्रोल युनिट ON केल्यावर त्याचा “Cand. Set” विभाग उघडावा व त्यातील “Cand. Set” हे बटण दाबावे. त्यानंतर कंट्रोल युनिटवर असलेल्या डिस्प्ले वर खालीलप्रमाणे मजकूर दिसू लागेल.

| | |
|---|---|
| Cd | -- |

Cd म्हणजे निवडणुकीत उभ्या असलेल्या एकूण उमेदवारांची संख्या
त्यानंतर बॅलेट युनिटवरील सर्वात शेवटच्या उमेदवाराच्या नावासमोरील बटण दाबावे. (NOTA समोरील बटण दाबावे लागेल) उदा. जिल्हा परिषदेतील निवडणूक विभागाकरीता ९ उमेदवार उभे असल्यास ९+१ NOTA म्हणजे १० वे बटण दाबावे लागेल.

त्यानंतर कंट्रोल  युनिटवरील डिस्प्लेवर खालील मजकूर दिसू लागेल.

| | |
|---|---|
| np | 1 |
| cd | 10 |

अशाप्रकारे ईव्हीएम ९ + १ NOTA साठी सेट झाले आहे. त्यानंतर मशीनच्या मागील On/Off  बटण बंद करावे.

१३.६  कँडीडेट सेट सेक्शन सिल करणे.

कंट्रोल  युनिटमधील निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या सेट झाल्यानंतर कँडीडेट सेट सेक्शन बंद करुन तो सिलबंद करावा.

यापुढील सर्व कारवाई हि प्रकरण १२ प्रमाणे करावी.

# प्रकरण- १४
## मतदान

**प्राथमिक:-**मतदान हा अत्यंत महत्वाचा टप्पा असून त्यामध्ये होणारी छोटीशी चूक संपूर्ण निवडणूक प्रक्रिया फोल ठरवू शकते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १०-अ व ५८अ मधील दुरूस्ती अनुसार मतदान हे मतदान यंत्राद्वारे घेण्यात येते तरी त्याबाबतची सर्व तयारी मागील प्रकरणांत विषद केल्याप्रमाणे करावी.

**१४.१ मतदान केंद्र** : महाराष्ट्र जिल्हा परिषद (मतदार विभाग व निवडणूक घेणे), १९६२ मधील नियम ७ व महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे), १९६२ मधील नियम ९ नुसार मतदान केंद्रांची यादी वेळीच प्रसिध्द करुन त्यानुसार मतदानाची सर्व व्यवस्था वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांची यादी आपण सर्व संबंधित उमेदवारांना वितरित करावी व त्यामध्ये आयत्यावेळी कोणताही बदल करण्यात येऊ नये.

**१४.२ मतदान कर्मचारी (Polling Party) :-** ब-याचशा मतदान कर्मचा-यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्याचा अनुभव नसण्याची शक्यता आहे व त्यामुळे त्यांना सखोल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विशेषत: मतदान केंद्राध्यक्ष आणि वरिष्ठ मतदान अधिकारी ज्याला सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमलेले असते त्या दोघांना सखोल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**१४. ३. मतदान साहित्य वाटप :-**सर्व मतदान कर्मचा-यांना मतदान साहित्य, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासह वेळीच प्राप्त होईल याची दक्षता तुम्ही घेणे आवश्यक आहे. मतदान साहित्याची सर्वसाधारण यादी परिशिष्ट- १३ मध्ये दिली आहे.

१४.३.१ मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्राची सर्वतोपरी काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या सुरक्षेची देखील योग्य ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. मतदान यंत्रांना मतदान केंद्राध्यक्षांच्या निष्काळजी- पणामुळे काही हानी पोहोचल्यास ते त्यास वैयक्तिक जबाबदार राहतील, याची त्यांना जाणीव करुन देण्यात यावी.

१४.३.२ मतदान साहित्य ताब्यात घेतलेबरोबर ते आपल्याच मतदान केंद्रासाठी असल्याची खात्री मतदान केंद्राध्यक्षाने करणे आवश्यक आहे. मतदान यंत्र देखील कार्यान्वित करून पहावी.

१४.३.३ मतदान साहित्य वाटप सोपे होणे करिता महत्वाचे मतदान साहित्य (मतदान यंत्राव्यतिरिक्त) जसे मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रती, मतदार नोंदवही, स्ट्रीपसिल, पेपरसिल, स्पेशल टॅग, अॅड्रेस टॅग, मार्कर पेन ,विभेदकचिन्ह, मतदार चिठ्ठी असे महत्वाचे (मतदान केंद्रासाठी खास) वाटप करावयाचे साहित्य एका प्लॅस्टीकच्या पारदर्शक बॅगेत ठेवून त्यावर मतदान केंद्राचे नाव व क्रमांक असणारे लेबल लावल्यास मतदान यंत्रासोबत वाटप करणे सोपे जाईल.

तसेच सांविधानीक-असांविधानीक लिफाफे व इतर साहीत्य जे सर्व मतदान केंद्रांवर सारखेच वाटावयाचे असते ते वेगळया बॅगेत ठेवावे. व वेगळया काउंटर वरून वाटावे

मतदान साहित्य वाटप कोणत्या दिवशी, कोणत्यावेळी व कोठून करणार आहेत याची पुर्व कल्पना मतदान कर्मचाऱ्यांस दिलेली असावी. मतदान साहित्य वाटप करण्यासाठी, मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन टेबल लावावेत. शक्य असल्यास

झोननुसार (२ ते३ झोनला १) टेबल लावावेत जेणे करून अनावश्यक गर्दी टळेल व वाटप सोपे होईल. कोणत्या टेबलावरुन कोणत्या मतदान केंद्रासाठी वाटप होणार आहे याचा बोर्ड टेबलावर लावावा तसेच टेबलांना क्रमांक दयावेत. संबंधीत कर्मचाऱ्यास मिळालेले मतदान केंद्र, टेबल क्रमांक - त्यावरून वाटप होणाऱ्या मतदान केंद्राचा तपशील असणारा तक्ता घेवून २-३ कर्मचाऱ्यांना मुख्य दरवाजावर हजेरी साठी बसवावे. म्हणजेच येणाऱ्या कर्मचाऱ्याच्या हजेरीसोबत त्यास कोणते मतदान केंद्र मिळाले आहे हे कळेल व कुठच्या टेबलाजवळ जायचे हे कळल्याने तो इकडेतिकडे भटकणार नाही.

मतदान साहित्य वाटप केंद्रावर माईकची (पब्लीक अनाउंसमेंट सिस्टीम) सोय असावी, तसेच पुरेसा उजेड, पिण्याच्या पाण्याची, स्वच्छता गृहाची व प्राथमिक उपचाराची सोय असावी.

मतदान कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर सोडण्यासाठी केलेल्या वाहनांवरही मोठ्या बोर्ड वर झोन क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील लिहावा.

**१४.४ निवडणूका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचे नियोजन:-**

आपण संबंधित पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा करुन संवेदनशील तसेच अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी तयार करावी व त्याठिकाणी योग्य तो पोलिस बंदोबस्त अथवा राज्य राखीव पोलिस दल यांच्या अतिरिक्त तुकडया तैनात कराव्यात. विशेषत: मतदान साहित्य व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे यांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच मतदान पार पडल्यानंतर मतदान कर्मचारी मतदान साहित्य व मतदान यंत्रे यासह मतमोजणीच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत त्यांना पोलिस सुरक्षा मिळेल याची काळजी घेण्यात यावी. मतदान केंद्रांच्या आसपास कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, यादृष्टीने मतदानाच्या दिवशी वापरावयाची वाहने,दारुच्या विक्रीवर बंदी, परवानाधारक शस्त्रे बाळगणाऱ्या व्यक्तींनी आपली शस्त्रे योग्य त्या पोलिस अधिकाऱ्यांकडे जमा करण्याबाबत आदेश काढणे, विना परवाना शस्त्रे कोणाकडे असल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची पोलिसांना सूचना देणे इत्यादी सर्व बाबींची दक्षता घेण्यात यावी.

**१४.५ मतदान केंद्रावर मतदान कर्मचाऱ्यांचे (Polling Party) आगमन:-**

१४.५.१ मतदानाच्या आदल्या दिवशी नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर मतदान कर्मचारी यांनी पोहोचणे आवश्यक आहे. तेथे पोहोचल्यानंतर मतदान कक्ष (व्होटिंग कम्पार्टमेंट) योग्य त्यारितीने एका कोपऱ्यात उभे करावे, जेणेकरुन मतदार मत नोंदविताना, आवश्यक ती गोपनीयता राखली जाईल. तसेच तेथे पुरेसा प्रकाश देखील असेल. ज्या ठिकाणी २ किंवा जास्त बॅलेट युनीट असतील तेथे मतदान कक्षाची व्याप्ती लक्षात घ्यावी.

१४.५.२ मतदान कक्षामध्ये बॅलेट युनिट ठेवलेले असेल व जेथे कंट्रोल युनिट ठेवलेले असेल त्यामधील अंतर ३ मीटरपेक्षा जास्त असता कामा नये. कारण कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट

यांना जोडणारी केबल ही जास्तीत जास्त ५ मीटर इतकी लांब असते. केबलमध्ये अडखळून मतदार पडणार नाही तसेच मतदान प्रक्रीया खंडीत होणार नाही याची काळजी घ्यावी

१४.५.३ मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान कर्मचाऱ्याने मतदान सुरु होण्यापूर्वी किमान एक तास आपल्या जागेवर उपस्थित असणे आवश्यक आहे.

१४.५.४ मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी बरोबर एक तास आधी मतदान यंत्र तयार करण्यास घ्यावे. त्यावेळेपर्यन्त मतदान प्रतिनिधी उपस्थित नसल्यास त्यांची वाट पहात न रहाता मतदान यंत्र तयार करण्यास सुरुवात करावी.

१४.५.५ मतदान यंत्र उघडयावर टाकून जाऊ नये, मतदान यंत्र ताब्यात घेतल्यापासून ते जमा करेस्तोवर त्याच्या सुरक्षतेची जबाबदारी संबंधीत मतदान केंद्राध्यक्षाची राहील.

**१४.६. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान कर्मचारी यांची कर्तव्ये:-**

**१४.६.१** सर्वसाधारणपणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट हे मतदान केंद्राध्यक्षांकडे असणे योग्य ठरेल. तथापि, मतदान केंद्रामध्ये अन्य बाबींकडे उदा. आव्हानित मते, अंध व अपंग मतदारांना सहाय्य करण्याबाबतची कार्यपध्दती अवलंबिणे, प्रदत्त मतपत्रिका देणे यासारख्या बाबींकडे लक्ष देण्यास वेळ मिळावा यासाठी कंट्रोल युनिट एखाद्या मतदान अधिका-याकडे सोपवावे म्हणजेच मतदान केंद्राध्यक्षांसह तीन मतदान अधिकारी मतदान केंद्रावर राहतील. तसेच एक कर्मचारी (शिपाई) उपलब्ध राहील.

१४.६.२ मतदान केंद्रावर पहिल्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराची ओळख पटवावयाची आहे. तसेच त्याच्या ताब्यात चिन्हांकित मतदार यादी राहील. दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीस शाई लावावयाची आहे आणि नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक व त्याच्यासमोर मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा याची नोंद करावयाची आहे. तसेच तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याच्या ताब्यात कंट्रोल युनिट राहील.

**१४. ७. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची बैठक व्यवस्था:-**

मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षांनी अशा जागी बसावे की जेथून तो मतदान केंद्रात चाललेली सर्व कार्यवाही पाहू शकेल. मतदान अधिकारी यांची जागा अशी असावी जेणेकरुन मतदान केंद्रात एखाद्या मतदाराने प्रवेश करताच तो सरळ पहिल्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. त्याच्याकडे मतदाराची ओळख पटविणे हे काम व चिन्हांकित मतदार यादी असेल. त्यानंतर तो दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे जाईल व नंतर तिसऱ्या अशाक्रमाने सर्वांची बैठक व्यवस्था असावी.

**१४.८ मतदान प्रतिनिधींचे आगमन:-**

**१४.८.१** प्रत्येक मतदान केंद्रात मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान एक तास आधी मतदान प्रतिनिधींनी उपस्थित असले पाहिजे. कारण या एक तासात मतदान केंद्राध्यक्षांस मतदान यंत्र तयार करणे तसेच अभिरुप मत (Mock poll) मतदान प्रतिनिधींच्या समाधानासाठी

करावयाचे असते. तथापि,मतदान प्रतिनिधी वेळेवर मतदान केंद्रात न पोहोचल्यास कोणतीही कार्यवाही करण्यास थांबू नये व ती पूर्ण करण्यात यावी. तसेच एखादा मतदान प्रतिनिधी केवळ उशीरा आल्यास त्याच्यासाठी अभिरुप मतदान (Mock Poll) पुन्हा करु नये अशा सूचना मतदान केंद्राध्यक्षांना प्रशिक्षणा दरम्यान द्याव्यात तसेच उमेदवारांना देखील याची पूर्व कल्पना द्यावी

**१४.८.२** मतदान प्रतिनिधी स्वत:च्या नेमणुकीचे पत्र घेवून येईल त्यावेळी मतदान केंद्राध्यक्षाने त्यावरील उमेदवार वा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीची सही नमुना स्वाक्षरीशी जुळवून पहावी. **(परिशिष्ट-१७)**

**१४.८.३** एका उमेदवारास २ मतदान प्रतिनिधी नेमता येतील एक मूळ व दुसरा त्याला सुटका देणारा पण कोणत्याही क्षणी दोन्ही मतदान प्रतिनिधी एकत्र केंद्रावर थांबणार नाहीत.

**१४.८.४ मतदान प्रतिनिधी कोण असू शकते वा असू नयेत याबाबत नियम २४ तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रं.रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६ लक्षात घ्याव्यात.**

## १४.९ मतदान प्रतिनिधींची बैठक व्यवस्था:-

मतदान प्रतिनिधींना बसण्यासाठी अशी जागा असावी जेथून त्यांना मतदान केंद्रात प्रवेश करणारा मतदार दिसेल व ओळखता येतील. तसेच मतदान केंद्राध्यक्ष व तिसरा मतदान अधिकारी यांच्या टेबलवरील कंट्रोल युनिट व त्याबाबतची सर्व कार्यवाही त्यांना पाहता येईल. परंतु मतदान कक्षाच्या आत दिसणार नाही.

शक्यतो मान्याताप्राप्त राजकीय पक्ष, नोंदणीकृत अमान्याताप्राप्त राजकीय पक्ष नंतर अपक्ष उमेदवाराचा मतदान प्रतिनिधी अशारितीने बसविण्यात यावे

## १४. १० मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्राची तयारी करणे:-

निर्वाचन अधिकारी यांच्या स्तरावर जी काही कार्यवाही व मतदान यंत्राची तयारी करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त आणखी काही तयारी मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षांनी करणे आवश्यक असते. ही कार्यवाही उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करावयाची असते. ही कार्यवाही मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी सुमारे एक तास आधी सुरु करावी. वर नमूद केल्यानुसार एखादा अथवा कोणताही प्रतिनिधी मतदान केंद्रावर वेळेवर उपस्थित राहिला नाही तरीदेखील ठरल्याप्रमाणे सर्व कार्यवाही मतदान केंद्राध्यक्षांनी वेळेवर सुरु करावयाची आहे.

## १४.११ बॅलेट युनिट तयार करणे:-

१४.११.१ निर्वाचन अधिकारी यांच्या स्तरावर बॅलेट युनिट पूर्णपणे मतदानासाठी तयार केलेले असते व त्यामध्ये आणखी कोणतीही कार्यवाही मतदान केंद्रात करण्याची आवश्यकता नाही. फक्त बॅलेट युनिटला असलेली केबल कंट्रोल युनिटला जोडणे आवश्यक असते.

**१४.११.२** तथापि, जेथे एकापेक्षा जास्त बॅलेट युनिट वापरावी लागणार असतील त्या ठिकाणी सर्व बॅलेट युनिट त्यांच्या अचूक क्रमाने एकमेकास जोडणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत फक्त पहिले बॅलेट युनिट कंट्रोल युनिटला जोडले जाईल व पुढील बॅलेट युनिट त्याच्या अलिकडे असलेल्या बॅलेट युनिटला जोडले जाईल.

**१४.११.३ मतदान केंद्राध्यक्षांनी पुढील बाबी नीट पहाव्यात** :-

(१) बॅलेट युनिटच्या बॅलेट पेपर स्क्रीनवर मतपत्रिका डिस्प्ले पॅनलखाली घट्ट बसविण्यात आलेली आहे.

(२) बॅलेट युनिटच्या वरच्या व खालच्या भागास असलेले दोन सील सुस्थितीत आहेत, याची खात्री करावी.

## १४.१२ कंट्रोल युनिट तयार करणे:-

**१४.१२.१** मतदान केंद्राध्यक्षांनी निर्वाचन अधिकाऱ्यांच्या स्तरावर "कॅन्ड सेट सेक्शन" या भागास जे सील केलेले असते ते सुस्थितीत आहे याची खात्री करावी. त्यास उघडण्याची चेष्टा करू नये.

**१४.१२.२** मतदान केंद्राध्यक्षांनी कंट्रोल युनिटच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) ज्या ठिकाणी एकच बॅलेट युनिट वापरण्यात येणार आहे त्याची केबल कंट्रोल युनिटला जोडावी व ज्या ठिकाणी एकापेक्षा जास्त बॅलेट युनिट जोडण्यात येणार आहेत ती एकमेकांशी स्लाईड स्वीचचा क्रमांक पाहून जोडावीत.

(२) कंट्रोल युनिटचे "POWER" हे बटन सुरु (on) करावे.

(३) कंट्रोल युनिटच्या पाठीमागचा कप्पा बंद करावा.

(४) अभिरुप मतदान (Mock poll) पार पाडणे.

(५) कंट्रोल युनिटच्या "RESULT SECTION" च्या आतल्या कप्प्यामध्ये आयोगाने विहित केलेले पेपर सील बसवावे व सीलबंद करावे.

(६) " RESULT SECTION " चे वरील झाकण सीलबंद करावे.

**१४.१२.३** ज्या ठिकाणी एकच बॅलेट युनिट वापरण्यात येणार आहे त्याची केबल कंट्रोल युनिटला त्यासाठी पुरविण्यात आलेल्या सॉकेटमध्ये बसवावी. तसेच कंट्रोल युनिटवरील "POWER" बटण सुरु करावे. सदर बटण सुरु करताच "BEEP" असा आवाज होईल आणि कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले सेक्शनवरील हिरवा दिवा पेटेल. त्यानंतर कंट्रोल युनिटच्या मागील कप्पा बंद करावा. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, कंट्रोल युनिटच्या सदरचा मागील कप्पा सीलबंद करावयाचा नसून, मतदान बंद झाल्यानंतर पॉवर बटन बंद (off) करण्यासाठी व बॅलेट युनिटची केबल वेगळी करण्यासाठी तो पुन्हा उघडावा लागणार आहे.

**१४.१२.४ अभिरुप मतदान (Mock poll) पार पाडणे:-**

(१) मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्र सुस्थितीत आहे याबद्दल स्वत:ची तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधींची खात्री पटावी तसेच मतदान यंत्रात कोणतीही मते पूर्वीच नोंदविलेली नाहीत, याबद्दल मतदान प्रतिनिधींची खात्री पटावी यासाठी अभिरुप मतदान (Mock Poll) करुन दाखविणे आवश्यक आहे.

यासाठी मतदान केंद्राध्यक्ष सुरुवातीस कंट्रोल युनिटच्या " RESULT SECTION " मधील "Clear" हे बटण दाबेल, ज्यायोगे सर्व उमेदवारांच्यासमोर "शून्य " मते डिस्प्ले पॅनेलवर दिसून येतील.

(२) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष अभिरुप मतदान पार पाडण्यासाठी सर्व उमेदवारांच्या समोर किमान १ मत नोंदवील. त्यासाठी मतदान प्रतिनिधींना कोणत्याही उमेदवाराच्या समोरील बटण दाबण्याची संधी द्यावी. मात्र, कोणत्या उमेदवारास किती मते दिली गेली याची नोंद ठेवावी, जेणेकरुन अभिरुप मतदानाचा निकाल पाहताना तो दिलेल्या मतांशी जुळतो किंवा कसे हे त्यातून पाहणे शक्य होईल. अभिरुप मतदानाचा निकाल पाहण्यासाठी कंट्रोल युनिटच्या " RESULT SECTION" वरील "Result-I" हे बटण दाबावे. सदर बटण दाबताच डिस्प्ले पॅनेलवर प्रत्येक उमेदवाराच्यासमोर किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याचे आकडे क्रमाने पहिल्या उमेदवारापासून दिसण्यास सुरुवात होईल. अभिरुप मतदानाचा निकाल जुळतो आहे याची खात्री झाल्यानंतर मतदान यंत्रावर नोंदविलेली मते पुन्हा शून्यावर आणावीत व त्यासाठी "Clear" हे बटण दाबावे.

**१४.१२.५ कंट्रोल युनिट पेपरसीलने सीलबंद करणे:-**

(१) मतदान यंत्र सील करण्याकरिता सुरुवात करण्यापूर्वी ते मागून बंद (off) करणे अत्यावश्यक आहे. मतदान यंत्र मागून बंद केल्यानंतर सिलींग करण्यास सुरुवात करावी व सील पूर्ण झाल्याशिवाय मतदान यंत्र सुरु करण्यात येऊ नये. पारंपारिक मतदान पध्दतीमध्ये जेथे मतपत्रिका व मतपेटया वापरल्या जात होत्या तेव्हा मतपेटया आयोगाने विहित केलेल्या पेपरसीलद्वारे सीलबंद करण्यात येत असत. अशाच प्रकारची कार्यपध्दती मतदान यंत्राबाबत देखील विहित करण्यात आली आहे. त्यासाठी कंट्रोल युनिटमध्ये खाली नमूद केल्यानुसार आयोगाने विहित केलेले पेपर सील वापरुन ते सीलबंद करावयाचे आहे.

(२) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतल्या कप्प्याच्या झाकणाच्या आतल्या बाजूस पेपरसील घालण्यासाठी एक चौकट ठेवलेली आहे. इलेक्ट्रॉनिक कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेल्या मतदान यंत्राच्या बाबतीत एक पेपर सील वापरण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर सील अशाप्रकारे घट्ट बसवावयाचे आहे, जेणेकरुन त्याचा वरील भाग दिसू शकेल. पेपरसीलचा वरचा भाग दुमडल्यानंतर त्यावरील अनुक्रमांक वरील बाजूस येईल.




(रिझल्ट सेक्शनच्या आतील कप्प्यास असलेल्या खाचेमध्ये पेपरसील व आधारासाठी पुठठा दिलेला असल्यास तो वर दर्शविल्याप्रमाणे घालावा जेणेकरुन रिझल्ट सेक्शनचे दोन्ही कप्पे बंद केल्यावर त्यामधून वरील बाजूने बाहेर येणारा पेपरसीलचा भाग पट्टी सीलच्या दिशेने दुमडल्यावर अनुक्रमांक वरच्या बाजूला दिसेल.)

(३) वर नमूद केल्याप्रमाणे पेपर सील आपल्या जागी घट्ट बसून राहावे व ते विहित जागेवरुन हलू नये यासाठी एका पातळ पुठ्ठयाचा आधार पेपर सीलला द्यावा. जेणेकरून पेपर सील आपल्या जागेवरुन हलणार नाही, याची खात्री करण्यासाठी ते एका बाजूने हळूच ओढून ते घट्ट बसल्याची खात्री करताना ते सील खराब होणार नाही, याची दक्षता घ्यावी व पेपर सील खराब झाल्यास त्वरित दुसरे पेपरसील वापरण्यात यावे.

(४) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर कंट्रोल युनिटच्या आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद करावे. सदर झाकण अशारीतीने बंद करावे की पेपर सीलच्या दोन्ही बाजूची टोके आतल्या कप्प्याच्या बाहेर राहतील. त्यानंतर पेपर सीलच्या पांढऱ्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांनी पेपरसीलच्या अनुक्रमांकाखाली आपली पूर्ण स्वाक्षरी करावी. मतदान केंद्रात उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जर पेपरसीलवर स्वाक्षरी करु इच्छित असतील तर त्यांनाही तशी अनुमती द्यावी. मतदान केंद्राध्यक्ष, उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांना पेपरसीलवरील अनुक्रमांक लिहून घेण्याची अनुमती देईल.

### १४.१२.६ पेपरसीलचा हिशेब ठेवणे:-

मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेल्या पेपरसीलचा हिशेब त्याने व्हीएम-३ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी वापरण्यात आलेल्या पेपरसीलचा अनुक्रमांक अचूक नोंदवावा. उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांना पेपरसील वरील अनुक्रमांक लिहून घेण्याची अनुमती देईल.

### १४.१२.७ कंट्रोल युनिट स्पेशल टॅगने सीलबंद करणे

(१) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर व आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी आतल्या झाकणाच्या डाव्या बाजूस ठेवलेल्या दोन छिद्रांमधून एक दोरा ओवून तो स्पेशल टॅग वापरुन सीलबंद करावा. स्पेशल टॅग लावताना “Close”

बटनाला धक्का लागणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. (जर हा स्पेशल टॅग लावताना “Close” बटन दाबले गेले तर मतदान सुरू करताना “Ballot” बटन दाबल्यावर “invalid opreation” असा मेसेज येईल.) यासाठीच कंट्रोल युनिट बंद असावे.

(२) स्पेशल टॅग हा विशिष्ट आकाराचा असून त्याच्या खाचेमध्ये “Close” बटन येईल याची खात्री करून तो लावावा जेणेकरून सायंकाळी ५.३० वाजता मतदान संपल्यावर “Close” बटनावरील कॅप काढून ते दाबणे सहज शक्य होईल. याकरीता स्पेशल टॅग एका विशिष्ट आकाराचा बनविण्यात आला आहे. याला असलेल्या खाचेमुळे मतदान संपल्यावर रिझल्ट सेक्शन बंद असतानादेखील Close बटन दाबणे शक्य होते. हा टॅग लावण्यापुर्वी या टॅगवर मतदान केंद्राध्यक्ष, इच्छुक मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्षऱ्या कराव्यात व विभेदक चिन्ह मारावे.




### १४.१२.८ कंट्रोल युनिटचे रिझल्ट सेक्शन बंद करुन सीलबंद करणे

(१) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतला कप्पा स्पेशल टॅगने बंद करुन तो सीलबंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शनच्या वरील झाकण बंद करावे. असे करताना आतील पेपरसील व्यवस्थीतपणे (न फाटता) दोन्ही बाजूने झाकणाच्या वर राहिल याची काळजी घ्यावी.

(२) वरील झाकण बंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शन पुढीलप्रमाणे सीलबंद करावे.

(अ) वरील झाकणाच्या डाव्या बाजूस पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा ओवावा.

(ब) दोऱ्याची गाठ मारुन त्यास पत्त्याची खूणचिठ्ठी दोऱ्याच्या टोकास बांधावी. ज्याप्रमाणे कॅन्ड सेट सेक्शनमध्ये निर्वाचन अधिकाऱ्यांच्या स्तरावर पत्त्याची खूणचिठ्ठी वर बांधलेली असेल त्याच धर्तीवर ही खूणचिठ्ठी असेल. या पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास त्यांना स्वाक्षरी करण्याची संधी द्यावी. आणि मतदान केंद्राध्यक्षाचे सील लावावे.

१४.१२.९ **ABCD पट्टीसील वापरुन कंट्रोल युनिट सीलबंद करणे:-**

रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, त्याला ABCD अक्षरे असलेली पट्टी सील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे, पट्टी सील हे क्लोज बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन ते डावीकडून कंट्रोल युनिटच्या भोवती गुंडाळून सील करावयाचे आहे.

टप्पा क्र.१:- रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, तो खालीलप्रमाणे दुमडावा.




टप्पा क्र. २ :- त्यानंतर ABCD अक्षरे असलेली पट्टी सील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे. असे करताना –“A” भाग रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो. तेथे खालीलप्रमाणे ठेवावा.




(निकाल विभागाच्या बाहय दरवाजाच्या आतील बाजूने बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेच्या आतील पट्टीच्या तळाजवळ पूर्वीच डिंक लावलेला “A” भाग येईल. अशाप्रकारे पट्टी मोहोर (सील) ठेवा. “A” वरील मेणकागद काढा.)

प्पा क्र. ३ :- त्यावर पेपरसीलचा खालील भाग खालील दर्शविल्याप्रमाणे दुमडून चिटकवावा.




( या डिंक लावलेल्या भागावर गुलाबी कागदी मोहोरेची आतील घडी दाबा आणि चिटकवा)

टप्पा क्र. ४ :- त्यानंतर -B भाग उलट दुमडून पेपरसील वर चिटकवावा.




(पूर्वीच डिंक लावलेल्या “B” भागावरील मेणाचा कागद काढा आणि हा डिंक लावलेला भाग गुलाबी कागदी मोहोरेच्या बाहेरील घडीवर दाबा)

टप्पा क्र. ५ :- त्यानंतर -“C”◦ भागावर पेपरसीलची वरील पट्टी चिटकवावी.







(गुलाबी कागदी मोहोरेवर “बी◦◦ भाग चिटकवल्यावर “C” हा भाग सर्वात वर येईल. “C” भागावरील मेणकागद काढा. बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागापासून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेला दाबा. जेणेकरुन गुलाबी कागदी मोहोर “C” भागावर घटटपणे चिटकवली जाईल.)

टप्पा क्र. ६ :- त्यानंतर पट्टी सील कंट्रोल युनिटभोवती गोल फिरवून -“D” भाग जेथे -A “B” C’ चिटकविलेले आहेत, त्या ठिकाणी आणून चिटकवावा.










(पट्टी मोहोर (सील) क्लोज (बंद) बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन पट्टी सीलचा ऊर्वरित भाग डावीकडून नियंत्रण युनिटच्या भोवताली गुंडाळा. पट्टी सीलचे दुसरे टोक, कंट्रोल युनिटच्या उजव्या बाजूस बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागात जेथे पूर्वीच डिंक लावलेले “A” “B” “C” भाग चिटकवलेले आहेत, तेथे आणा, पूर्वीच डिंक लावलेल्या “D” भागावरील आवरण असलेला मेणकागद काढा आणि दरवाजाच्या सर्वात वरच्या भागातून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेवर तो भाग घट्टपणे दाबा. पूर्वीच डिंक लावलेला “D” भाग क्लोज बंद बटनाच्या खाली पट्टी सीलवर चिकटतो. हा चिकटणारा “D" चा भाग पट्टी सीलवर घट्टपणे दाबा.)

### १४.१२.१० प्रत्यक्ष मतदानासाठी मतदान यंत्र तयार असणे.

(१) आता मतदान यंत्र सर्व प्रकारे प्रत्यक्ष मतदानासाठी तयार झाले आहे.

(२) प्रत्यक्ष मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष बॅलेट युनिट मतदान कक्षात (व्होटिंग कम्पार्टमेंट) नेऊन ठेवील. यापूर्वी नमूद केल्यानुसार बॅलेट युनिट व कंट्रोल युनिट यामधील केबलची लांबी अंदाजे ५ मीटर इतकी असल्यामुळे ज्या मतदान अधिकाऱ्यांच्या ताब्यात कंट्रोल युनिट आहे त्यांचे टेबल व मतदान कक्ष यामधील अंतर ३ मीटरपेक्षा जास्त नसावे. तसेच कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट यांना जोडणारी केबल यामुळे मतदाराच्या हालचालीस बाधा येऊ नये अथवा मतदार या केबलला अडखळणार नाही, याची दक्षता घ्यावी.

(३) कंट्रोल युनिट सुरु (on) करावे.

### १४.१३ चिन्हांकित मतदार यादी व व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही सर्वांना दाखविणे

मतदानास सुरुवात होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष चिन्हांकित मतदार यादी; जी मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्यामध्ये तसेच व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही, यामध्ये कोणत्याही खुणा नाहीत हे उपस्थित उमेदवार अथवा निवडणूक प्रतिनिधी यांना दाखवील.

### १४.१४ मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी करावयाचे घोषणापत्र

मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी (अभिरुप मतदान घेतल्याबाबत) तसेच चिन्हांकित मतदार यादी अथवा मतदार नोंदवही यावर कोणतीही खूण नसल्याबाबत, तसेच पेपर सीलवर संबंधितांची स्वाक्षरी घेतल्याबाबत **परिशिष्ट -१४** मध्ये दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र वाचून दाखवून त्यावर उपस्थित मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

### १४.१५ मतदान गुप्त ठेवण्याबाबत ताकीद

मतदान केंद्राध्यक्षांनी सर्व उपस्थितांना मतदानाबाबतची गोपनीयता पाळण्याबाबत ताकीद द्यावी व गोपनीयतेचा भंग झाल्यास संबंधितांवर कारवाई होईल, याची जाणीव करुन द्यावी.

### १४.१६ मतदानास सुरुवात करणे

मतदान केंद्राध्यक्षांनी मतदानासाठी ठरवून दिलेल्या वेळेवर मतदान सुरु करावे. त्यापूर्वी ज्या काही बाबी पार पाडणे आवश्यक आहे त्या वेळीच पार पाडाव्यात. काही न टाळता येणाऱ्या कारणामुळे मतदान सुरु होण्यास विलंब झाल्यास मतदानाची वेळ वाढवून देण्याचे त्यांना अधिकार नाहीत व मतदान ठरल्यावेळीच बंद झाले पाहिजे. तथापि, मतदान बंद होण्याच्यावेळी जितके मतदार, मतदान केंद्रावर उपस्थित असतील त्या सर्वांना मतदान करु द्यावे.

मतदान सुरू झाल्यावर पहिल्या ५ मतदारांना मते योग्यरित्या नोंदवली जात आहेत याची खात्री करेपर्यंत थांबवावे. टोटल बटण दाबून खात्री करावी

## १४.१७ आव्हानित मते

(१) एखाद्या मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास संबंधित प्रतिनिधीकडून रोख रु.२ इतकी अनामत रक्कम ठेवून घ्यावी. आक्षेप फी **(परिशिष्ट -१६)** आकारणी बाबत पावती देवून मतदाराची चौकशी केल्यानंतर सदर मतदार खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मतदारास मतदान करु द्यावे.

तथापि, मतदार खरा नसल्याचे निष्पन्न झाल्यास व तो बोगस असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास पोलिसांच्या स्वाधीन करावे आणि त्याबाबतची लेखी तक्रार पोलिसात द्यावी. सदर तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन गुन्हेगाराविरुध्द गुन्हा सिध्द होईल, याद्दष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

(२) मतदान केंद्राध्यक्षांनी आव्हानित मतांची यादी जिल्हा परिषद निवडणूक नियमातील नियम क्र.४१ व पंचायत समिती निवडणूक नियमातील नि.क्र.३८ नुसार अनुक्रमे नमुना-८ व नमुना-७ मधील तरतुदीनुसार ठेवावी. (परिशिष्ट -१६अ,ब )

## १४.१८ बोटांना शाई लावणे

प्रत्येक मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीस शाई लावावी. शाई लावण्याची कार्यवाही सदर मतदाराने पुन्हा दुस-या कोणाच्या नावावर मतदान करु नये, यासाठी करण्यात येते. एखादा मतदार त्याच्या डाव्या हाताची तर्जनी त्यावर शाई लावली आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी तपासू देण्यास तयार नसल्यास त्यास मतदान करु देण्यात येणार नाही.

एखाद्या मतदाराच्या डाव्या हातास तर्जनी नसल्यास डाव्या हाताच्या अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी. डाव्या हातास कोणतेही बोट नसल्यास उजव्या हाताच्या तर्जनीस व तर्जनी नसल्यास अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी.

मतदाराच्या दोन्ही हातास बोटे नसल्यास त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताच्या भागाच्या टोकास शाई लावण्यात यावी. या संदर्भातील राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा/२०१०/प्र.क्र.१०/का.५, दि.१९/११/२०११ चे निदेश कृपया पहावेत.

## १४. १९ मतदार नोंदवहीत मतदाराचा अनुक्रमांक लिहिणे

१४.१९.१ कोणत्याही मतदारास मतदान करु देण्यापूर्वी मतदार नोंदवहीत त्याचा चिन्हांकित मतदार यादीतील अनुक्रमांक लिहावा व त्यासमोर त्याची स्वाक्षरी घ्यावी अथवा अंगठयाचा ठसा उमटवावा. कोणताही मतदार आपली स्वाक्षरी करण्यास अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्यास नकार देत असल्यास त्यास मतदान करु देऊ नये व तसा शेरा मतदार नोंदवहीत लिहिण्यात यावा. (आयोगाकडून साक्षर मतदारांबद्दल माहिती मागवली असल्यास त्याबाबतची आकडेवारी मोजण्यासाठी हि गोष्ट महत्वाची आहे )

१४.१९.२ मतदार नोंदवहीत नोंद घेणारा मतदान अधिकारी मतदाराने आणलेल्या पुराव्याची नोंदवही (अभिप्राय मध्ये )घेईल. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र १६/का-५ दि. ८/११/२०११ अन्वये मतदाराची ओळख पटविण्याकरिता वापरावयाच्या

पुराव्यांची यादी देण्यात आली आहे सदरची यादी न चुकता मतदान साहित्यासोबत देण्यात यावी.

## १४. २० मतदार चिठ्ठी देणे

१४.२०.१ मतदार नोंदवहीत मतदाराचा अनुक्रमांक लिहून त्याची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर मतदारास मतदार चिठ्ठी देण्यात यावी.

१४.२०.२ त्यानंतर मतदार कंट्रोल युनिट ज्या मतदान अधिका-याकडे आहे त्यांच्याकडे अथवा मतदान केंद्राध्यक्षांच्या ताब्यात असल्यास त्यांच्याकडे जाईल व त्यास मतदार चिठ्ठी दाखवील. मतदार चिठ्ठी पाहिल्यानंतरच संबंधित अधिकारी त्यास मतदान करण्याची अनुमती देईल.

१४.२०.३ हे अत्यंत महत्वाचे आहे की, त्यांना ज्या क्रमाने मतदार चिठ्ठया देण्यात येतील व त्यांची नावे ज्या क्रमाने मतदार नोंदवहीत नोंदविण्यात येतील त्याच क्रमाने मतदारांनी आपली मते नोंदविणे आवश्यक आहे. यासाठी मतदान केंद्राध्यक्ष अथवा कंट्रोल युनिट ज्यांच्या ताब्यात आहे असा मतदान अधिकारी, मतदारास मतदान कक्षाकडे जाण्याची त्याचक्रमाने परवानगी देईल.(जो क्रमांक मतदार चिठ्ठीवर लिहिलेला आहे.)

१४.२०.४ काही कारणांमुळे ज्या क्रमाने मतदार नोंदवहीत नावे नोंदविण्यात आलेली आहेत त्या क्रमाने एखाद्या मतदाराने आपले मत न नोंदविता वेगळया क्रमांकावर मत नोंदविल्यास सदर मतदाराने कोणत्या क्रमांकावर मतदान केले तो अनुक्रमांक मतदार नोंदवहीत सदर मतदाराच्या स्वाक्षरीसमोरील शेरा या रकान्यात लिहिण्यात यावा.

## १४.२१ मतदाराने मत नोंदविणे

१४.२१.१ वर नमूद केल्यानुसार सर्व कार्यवाही पार पडल्यानंतर कंट्रोल युनिट ज्या अधिकाऱ्याच्या ताब्यात आहे; तो अधिकारी संबंधित मतदारास मतदान कक्षाकडे जाण्याची अनुमती देईल. त्यापूर्वी कंट्रोल युनिटमधील बॅलेट हे बटन दाबल्यानंतर बॅलेट युनिट मत नोंदविण्यासाठी तयार होईल व कंट्रोल युनिटवरील “बीझी” असे लिहिलेला लाल दिवा पेटेल व बॅलेट युनिटवरील “रेडी” असे लिहिलेला हिरवा दिवा पेटेल. मतदार आपले मत आपली इच्छा असलेल्या उमेदवाराच्या समोरील बटन दाबून नोंदविल. त्याने बटन दाबताच बटणाशेजारील लाल दिवा पेटेल व बॅलेट युनिटवरील हिरवा दिवा बंद होईल व त्याचवेळी “बीप” असा आवाज कंट्रोल युनिटमधून निघेल. काही सेकंदानंतर बीप आवाज बंद होईल व बॅलेट युनिटवरील उमेदवारासमोरील लाल दिवा तसेच कंट्रोल युनिटवरील बिझी असे लिहिलेला लाल दिवा हे बंद होतील. सदरचे डोळयांना दिसणारी व कानांनी ऐकू येणारी ही चिन्हे मत नोंदल्याचे निदर्शक आहेत. मतदाराने आपले मत नोंदविताच मतदान कक्षाच्या बाहेर यावे.

१४.२१.२ अशारीतीने प्रत्येक वेळी नवीन मतदार आल्यानंतर हीच कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. मतदान कक्षात एकावेळी एकच मतदार जाईल, याची दक्षता घ्यावी. तसेच कंट्रोल

युनिटवरील बॅलेट बटण दाबण्यापूर्वी मतदान कक्षात आधी गेलेला मतदार बाहेर आला असेल याचीही दक्षता घ्यावी.

### १४.२२ नोंदविण्यात आलेल्या मतांचा वरचेवर ताळमेळ घेणे:-

कोणत्याही वेळी मतदान यंत्रात एकूण किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, हे पाहण्यासाठी कंट्रोल युनिटवरील टोटल हे बटण दाबावे. हे बटण दाबल्यानंतर कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनेलवर त्या क्षणापर्यंत किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याची संख्या दिसू लागेल. मतदार नोंदवहीत नोंदविण्यात आलेली मतांची संख्या व मतदान यंत्रात नोंदविलेल्या मतांची संख्या यांचा मेळ बसतो आहे किंवा कसे, हे पाहण्यासाठी ही प्रक्रिया वरचेवर करावी. मतदान केंद्राध्यक्षांनी साधारणपणे दर दोन तासांनी हा ताळमेळ बसतो आहे हे पहावे व त्याची नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये योग्य त्या रकान्यामध्ये घ्यावी. तसेच झोनल ऑफीसरला आकडेवारी देतानाही टोटल बटण दाबल्यानंतर दिसणारी आकडेवारी द्यावी

### १४. २३ मतदानाबाबत गुप्तता बाळगणे:-

मतदान केंद्रातील प्रत्येक मतदार आपल्या मतदानाबाबत पूर्णपणे गुप्तता पाळील.तसेच मतदान पध्दती जशी विहित करण्यात आली आहे तिचे पालन करील.अशा कार्यपध्दतीचे पालन करण्यास कोणत्याही मतदाराने नकार दिल्यास मतदान केंद्राध्यक्षाने त्यास ताकीद द्यावी व तरीही तो मतदान कार्यपध्दतीचे पालन करीत नसल्यास त्यास मतदान करु देऊ नये.अशा मतदारास मतदार चिठ्ठी देण्यात आली असेल तर ती त्याच्याकडून परत घेऊन रद्द करण्यात यावी.

जेव्हा मतदान पध्दतीचे पालन न केल्याबद्दल एखाद्या मतदारास मतदान करु देण्यास नकार देण्यात आला असेल त्यावेळी व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत “अभिप्राय” या रकान्यात संबंधीत मतदारासमोर तशी नोंद घेण्यात यावी व मतदान केंद्राध्यक्षांनी आपली पूर्ण स्वाक्षरी त्या नोंदीखाली करावी. अशा परिस्थितीत अनुक्रमांकामध्ये मात्र कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

### १४.२४ अंध व अपंग मतदारांनी मतदान करणे:-

यासंदर्भात मतदान केंद्राध्यक्षांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या दि.०३/०५/२००५ च्या आदेशामधील परिच्छेद-१७ तसेच निवडणूक नियमामधील तरतुदींचे पालन करावे व त्या अनुषंगाने काढण्यात आलेली दि.१०/०७/२०१० ची सुधारणा कृपया ध्यानी घ्यावी.

याव्यतिरिक्त राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३४/का.५, दि.२४.१२.२००५ अन्वये स्वतंत्र मतदान केंद्र/रॅम्पची सुविधा देण्याबाबत आदेश दिले आहेत.

**१४.२५ मतदाराने मतदान करण्याचे नाकारणे:-**

याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/२०१३/प्र.क्र.११/का.१२, दि.१२/११/२०१३ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मतपत्रिकेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या नावांच्या शेवटी एक “वरील पैकी एकही नाही” “None of the Above” हा पर्याय उपलब्ध करुन देण्याबाबत आलेले आहे.

तरी एखाद्या मतदाराने मतदार नोंदवहीत त्याचे नाव नोंदविल्यानंतर व त्यापुढे त्याने आपली स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा उमटविल्यानंतर मतदान करावयाचे नाही, असे ठरविल्यास त्यास मतदान करण्याबाबत जबरदस्ती करण्यात येऊ नये. त्यास None of the Above” हया पर्यायाबद्दल सांगावे. तरीही त्याने मतदान करावयाचे नाही, असे ठरविल्यास त्यासंदर्भात मतदार नोंदवहीतील “अभिप्राय” या रकान्यात तशी नोंद करण्यात यावी व मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा शे-यापुढे घ्यावा. तसेच यासंदर्भात मतदार नोंदवहीतील अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/२०१३/प्र.क्र.११/का.१२, दि.२६/११/२०१३ अन्वये दिलेल्या आदेशानुसार मतदान प्रतीनिधींच्या साक्षीने मतदान केंद्राध्यक्षाने None of the Above” दाबावे.

**१४.२६ प्रदत्त मते :-**

१४.२६.१ जेव्हा एखादा मतदार, मतदान केंद्रात आल्यानंतर त्याला असे आढळून आले की, त्याच्या नावावर अन्य एखाद्या व्यक्तीने त्याच्या आधीच मतदान केले आहे, अशावेळी मतदान केंद्राध्यक्षांनी त्याची पूर्णपणे ओळख पटविल्यानंतर त्यास प्रदत्त मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची अनुमती द्यावी. मात्र, मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची अनुमती देऊ नये.

१४.२६.२ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद-१९ मधील तरतुदीनुसार अशा मतदारास प्रदत्त मतपत्रिका देण्यात यावी. प्रदत्त मतपत्रिका दिल्यानंतर मतदार, मतदान कक्षात सदर मतपत्रिका घेऊन जाईल व त्यावर आपल्या इच्छेनुसार संबंधित उमेदवाराच्या चिन्हावर “X” अशी खूण संबंधित रबरी शिक्क्याचा उपयोग करुन करील.

१४.२६.३ मतदान केंद्राध्यक्ष प्रदत्त मतपत्रिकेचा (१) मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या मतपत्रिका, (२) मतदारांना देण्यात आलेल्या मतपत्रिका, (३) न वापरलेल्या मतपत्रिका यांचा हिशेब नमुना व्हीएम-३ मधील अ.क्र- ७, ८ नुसार ठेवील.

**१४.२७ मतदान सुरु असताना मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्षांचा प्रवेश:-**

एखादेवेळी मतदान केंद्राध्यक्षास असा संशय आला की, मतदान कक्षात ठेवलेले बॅलेट युनिट नीट काम करीत नाही अथवा एखादा मतदार, मतदान कक्षात मतदानासाठी प्रवेश केल्यानंतर बॅलेट युनिटला हानी करण्याचा प्रयत्न करीत आहे अथवा आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ मतदान कक्षात थांबला आहे, अशावेळी मतदान केंद्राध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक मतदान

यंत्राद्वारे मतदान करण्याच्या आदेशामधील परिच्छेद-२० मधील तरतुदीनुसार मतदान कक्षात प्रवेश करील व आवश्यक ती पावले उचलील, जेणेकरुन बॅलेट युनिटला कोणताही धक्का पोहोचणार नाही व मतदान सुरळीतपणे चालू राहील. मात्र, मतदान केंद्राध्यक्ष जेव्हा मतदान कक्षात प्रवेश करील अशावेळी त्यांनी मतदान प्रतिनिधींना त्यांनी तशी इच्छा दर्शविल्यास आपल्या सोबत येण्याची अनुमती द्यावी.

१४.२८ **बदली मत ( प्रॉक्सी वोट) :** जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील कलम १०-अ अन्वये "बदली मत" ही संकल्पना जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांत नाही.

**१४. २९ मतदान बंद करणे :**

१४.२९.१ मतदान बंद करण्याच्या विहित केलेल्या वेळी ते बंद करणे आवश्यक आहे. मतदान बंद करण्यासाठी नेमून दिलेल्या वेळी जितके मतदार, मतदान केंद्रावर उपस्थित असतील त्या सर्वांना मतदान करण्याची संधी द्यावी व त्यासाठी मतदान बंद करण्याची वेळ थोडी लांबली तरी हरकत नाही.

१४.२९.२ जेव्हा मतदान केंद्रावरील शेवटच्या मतदाराने मतदान केले असेल तेव्हा मतदान यंत्र बंद करणे आवश्यक असून, त्यामध्ये कोणतेही मत त्यापुढे नोंदविले जाणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलेट युनिट, कंट्रोल युनिटपासून वेगळे करावे व कंट्रोल युनिटवरील "Close" हे बटण दाबावे. जेव्हा हे "Close" बटण दाबले जाईल तेव्हा कंट्रोल युनिट त्यामध्ये एकूण नोंदविलेल्या मतांची संख्या दर्शवील. ती संख्या नमुना व्हीएम-३ मधील अनुक्रमांक-५ (भाग-१) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. एकदा "Close" हे बटण दाबल्यानंतर मतदान यंत्र त्यानंतर कोणतीही मते स्वीकारणार नाही, याची नोंद घ्यावी. यास्तव बंद (close) हे बटण दाबताना मतदान केंद्राध्यक्ष मतदान संपण्याच्यावेळी काळजीपूर्वक पाहूनच क्लोज हे बटण दाबील.

**१४.३० नोंदविलेल्या मतांचा हिशेब**

मतदान बंद झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २२ मधील तरतुदीनुसार नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ मध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब तयार करील व ते एका वेगळया नमुन्यात ठेवण्यात येईल. त्यावर "नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशोब" असे लिहिलेले असेल.

**१४.३१ मतदान प्रतिनिधींना मतांच्या हिशेबाची प्रत पुरविणे :**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक मतदान केंद्राध्यक्षांने मतदान केंद्रावर नोंदविलेल्या मतांचा हिशेब जो व्हीएम-३ (भाग-१) या नमुन्यात तयार केलेला असेल त्याची प्रत मतदान प्रतिनिधींना देणे आवश्यक आहे व हिशेबाची प्रत मिळाल्याची पोच त्यांच्याकडून घेणे आवश्यक आहे. मतदान प्रतिनिधींनी अशा हिशेबाच्या प्रतीची मागणी जरी केली नाही; तरी

प्रत्येक मतदान प्रतिनिधींना त्याची प्रत देण्यात यावी. यासाठी आवश्यक तेवढे नमुने व कार्बन पेपर पुरवावेत.

**१४.३२ मतदान बंद करताना करावयाची घोषणा**

मतदान बंद करताना परिशिष्ट -१४ अ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मतदानाच्या शेवटी मतदान केंद्राध्यक्षाने सर्व मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रावर नोंदविलेल्या मतांच्या हिशेबाची प्रत दिल्यासंदर्भातील घोषणा करणे आवश्यक आहे.

**१४.३३ मतदान संपल्यानंतर मतदान यंत्र सीलबंद करणे**

१४.३३.१ मतदान बंद झाल्यानंतर व नोंदविलेल्या मतांचा हिशेब व्हीएम-३ भाग-१ या नमुन्यात तयार केल्यानंतर व त्याची प्रत मतदान प्रतिनिधींना दिल्यानंतर मतदान यंत्रे मतमोजणीच्या ठिकाणी नेण्यासाठी सीलबंद करणे आवश्यक आहे.

१४.३३.२ मतदान यंत्र बंद करण्यासाठी कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट एकमेकांपासून वेगळे करावे आणि कंट्रोल युनिटमधील पॉवर हे बटण बंद करावे. बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट त्यांच्या संबंधित बॅगांमध्ये ठेवण्यात यावीत व त्यानंतर सदर दोन्ही बॅगच्या हॅण्डलमधून दोरा ओवण्यासाठी ठेवलेल्या छिद्रामधून दोरा ओवून त्याची गाठ मारुन त्यावर मतदान केंद्राध्यक्षांचे सील व पत्त्याची खूणचिठ्ठी लावावी. पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर मतदान केंद्राचे नाव व त्याचा क्रमांक राहील. उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी तशी इच्छा दर्शविल्यास त्यांनाही त्यावर स्वाक्षरी करण्याची अनुमती द्यावी.

१४.३३.३ बॅलेट युनिट अथवा कंट्रोल युनिटच्या बॅगवर वरीलप्रमाणे जे सील व खूणचिठ्ठी लावली असेल व त्यावर जे उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्ष-या केल्या असतील त्यांची नावे मतदान केंद्राध्यक्षांनी परिशिष्ट -१५ मध्ये नमूद करावीत.

**१४.३४ निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २४ मध्ये नमूद केल्यानुसार निवडणुकीसंदर्भातील सर्व कागदपत्रे मतदान केंद्राध्यक्षांनी सीलबंद करावीत.

**१४. ३५ मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे निर्वाचन अधिकारी यांच्या ताब्यात देणे**

१४.३५.१ निवडणूक प्रक्रिया पार पडलेनंतर मतदान यंत्रे व सर्व सील बंद निवडणूक कागदपत्रे व इतर साहित्य कुठे जमा केली जाणार आहेत त्याची पूर्व कल्पना मतदान केंद्राध्यक्षांना दिलेली असावी शक्यतो मतमोजणीच्या ठिकाणीच साहित्य जमा करणे व सुरक्षीत ठेवण्याची व्यवस्था असावी जेणेकरून मतदान यंत्रे फक्त एकदाच हाताळली जातील व त्यांच्या सुरक्षित वाहतुकीची दक्षता घेणे शक्य होईल.

१४.३५.२ मतदान यंत्रे व अन्य निवडणूक कागदपत्रे मतमोजणीच्या ठिकाणापर्यंत अथवा ती ज्या ठिकाणी मतमोजणी पूर्ण होईपर्यंत सुरक्षितपणे ठेवली जाणार आहेत, त्या ठिकाणापर्यंत त्याची सुरक्षित वाहतूक होण्याच्यादृष्टीने सुरक्षारक्षकांसह त्याची वाहतूक व्यवस्था करावी.

१४.३५.३ मतदान यंत्रांची वाहतूक करताना मतदान यंत्रे हलविण्याच्यावेळी व ज्या रस्त्याने त्यांची वाहतूक करण्यात येणार आहे त्याची सूचना उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना द्यावी, जेणेकरुन मतदान यंत्रांसोबत त्यांची इच्छा असल्यास येणे शक्य होईल. तथापि, मतदान प्रतिनिधींनी आपली वाहतुकीची व्यवस्था स्वत:च करावयाची असून, कोणत्याही परिस्थितीत ज्या वाहनात मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे ठेवली असतील त्या वाहनात प्रवास करण्याची अनुमती मतदान प्रतिनिधींना अथवा उमेदवारांना देण्यात येऊ नये.

१४.३५.४ मतदान यंत्र व इतर महत्वाचे लिफाफे घेणेकामी योग्य ती व्यवस्था करावी. साहित्य वाटपावेळी ज्याप्रमाणे काऊंटर उघडण्यात आली असतील तशीच पुरेशी काऊंटर उघडावीत जेणेकरून एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही व मतदान यंत्र व त्यासोबतची महत्वाची कागदपत्रे विशेष करून मतांचा हिशोब (व्हीएम -३) निट तपासता येईल. मतांचा हिशोब (व्हीएम -३) २ प्रतीत घ्यावा, १ प्रत मतदान यंत्रासोबत ठेवावी, तसेच त्याची नोंद तात्काळ संगणकातही घ्यावी. याबाबतचे नियोजन व्यवस्थीत करावे. सर्व कागदपत्र जमा करेस्तोवरच मतदान केंद्राध्यक्ष व झोनल ऑफिसर यांना थांबवावे, अनावश्यकरित्या त्यांना व पोलिस यांना थांबवू नये. संबंधीत कर्मचारीवृंद हा निवडणूक कर्तव्यासाठी दोन दिवसापासून आहे याची जाणीव ठेवून शक्य तितक्या लवकर तो मोकळा होईल अशी उपाययोजना करावी. संबंधीत स्टाफची बैठक व्यवस्थाही करावी.

**१४. ३६ मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे**

१४.३६.१ सर्व मतदान केंद्राध्यक्षांनी त्यांची मतदान केंद्रावरील मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे तसेच अन्य साहित्य वेळेवर जमा करणे आवश्यक असून, त्यासंदर्भात विलंब केल्यास त्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई त्यांच्यावर होऊ शकते.

१४.३६.२ निर्वाचन अधिकारी यांनी ज्या ठिकाणी मतदान यंत्रे सुरक्षित ठेवावयाची आहेत ती जागा आधीच निश्चित केलेली असली पाहिजे व मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे ठेवताना ती शक्यतो मतदान केंद्राच्या अनुक्रमांकानुसार ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

१४.३६.३ एका मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट अथवा युनिट्स एका ठिकाणी एकाच चौकोनात ठेवण्यात यावीत. बॅलेट युनिटवर कंट्रोल युनिट ठेवण्यात यावे व नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब आणि पेपरसीलचा हिशेबही कागदपत्रे कंट्रोल युनिटवर ठेवण्यात यावीत.

१४.३६.४ मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणी दोन रांगांमध्ये पुरेशी जागा ठेवलेली असावी, जेणेकरुन एखादे मतदान यंत्र ठेवल्यानंतर ते हलविण्याची वेळ येऊ नये.

१४.३६.५ मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणाची पाहणी करण्याची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अथवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींची इच्छा असल्यास त्यांना तशी पाहणी करु द्यावी व मतदान यंत्रे ठेवलेल्या खोलीचे दरवाजे बंद केल्यानंतर त्याच्या कुलूपावर सील लावून त्यावर स्वाक्षरी करण्याची त्यांना अनुमती देण्यात यावी. या सीलवर निर्वाचन अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मतदान यंत्रे ठेवली गेल्यानंतर ती खोली तात्काळ बंद करणे आवश्यक आहे व त्यानंतर मतमोजणीच्या वेळेपूर्वी कोणत्याही व्यक्तीस सदर खोलीत जाण्याची अनुमती देण्यात येऊ नये.काही अनपेक्षित न टाळता येण्याजोग्या कारणांमुळे मतदान यंत्रे ठेवलेली खोली उघडावी लागल्यास त्याची सूचना उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधींना देण्यात यावी व त्यांच्या उपस्थितीतच खोली उघडावी व खोली बंद करताना पुन्हा सीलबंद करुन त्यावर निर्वाचन अधिकारी तसेच उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या स्वाक्षऱ्या कराव्यात.

१४.३६.५ यापूर्वीच्या प्रकरणात नमूद केल्यानुसार मतदान यंत्रे ठेवलेली खोली किती वेळा उघडण्यात आली याची हालचाल नोंदवही ठेवण्यात यावी व खोली किती वेळा उघडण्यात आली, कोणत्या व्यक्तीद्वारे उघडण्यात आली, खोली उघडण्यामागची कारणे, खोली उघडण्याच्या वेळी /बंद करण्याच्यावेळी सुरक्षा रक्षकाची स्वाक्षरी इत्यादी सर्व बाबी सदर हालचाल नोंदवहीत नमूद करण्यात याव्यात.

## १४.३७ पितळी सील व रबरी शिक्के इत्यादी सुरक्षित ठेवणे

मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेले पितळी सील तसेच रबरी शिक्के ज्याद्वारे प्रदत्त मतपत्रिकांवर शिक्के मारता येतील इत्यादी साहित्य मतदान केंद्राध्यक्षांनी एका मोठया लिफाफ्यात ठेवावेत व त्यावर “ वैधानिक नसलेले पाकीट” असे नमूद करण्यात यावे.सदर साहित्य निर्वाचन अधिकाऱ्यांनी योग्य वेळी संबंधितांच्या स्वाधीन करावे.

## १४.३८ मतदान स्थगित करणे

१४.३८.१ एखाद्या मतदान केंद्रावर दंगलसदृश्य परिस्थिती अथवा उघड-उघड हिंसाचार अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे मतदान शांततेत पार पाडणे शक्य नाही. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास निर्वाचन अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष संबंधित मतदान केंद्रावरील मतदान स्थगित करतील व त्याची तारीख नंतर ठरविण्यात येईल. जेव्हा असे मतदान, मतदान केंद्राध्यक्षांकडून स्थगित करण्यात येईल तेव्हा त्याबाबतचा अहवाल तात्काळ निर्वाचन अधिकाऱ्यास कळविण्यात येईल.

१४.३८.२ जेव्हा निर्वाचन अधिकारी स्वत: अथवा मतदान केंद्राध्यक्षांकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या आधारे असे मतदान स्थगित करतील त्यावेळी राज्य निवडणूक आयोगास त्यासंदर्भातील अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा व राज्य निवडणूक आयोग पुढील मतदानाची तारीख व वेळ निश्चित करील. निर्वाचन अधिकारी तोपर्यंत झालेल्या मतदानाची मतमोजणी करणार नाही जोपर्यंत स्थगित केलेले मतदान पार पडणार नाही.

**१४.३९ मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती**

१४.३९.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या दि.०३/०५/२००५ च्या आदेशामधील २६ मध्ये मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मतदान स्थगित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगास पाठविलेल्या अहवालानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून मतदानाची नवीन तारीख प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतच्या सूचना निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना अथवा त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात येतील व त्यामध्ये मतदान केंद्राचे स्थळ, मतदानाची तारीख तसेच वेळ हे नमूद करण्यात येईल.

१४.३९.२ स्थगित केलेल्या मतदानाच्या नवीन तारखेबाबत संबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या माहितीसाठी तशी पुरेशी प्रसिध्दी वर्तमानपत्रे अथवा इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्यामार्फत देण्यात येईल.

१४.३९.३ जेव्हा मतदान केंद्रावरील मतदान वर नमूद केल्यानुसार स्थगित करण्यात आलेले असेल अशावेळी स्थगित केलेले मतदान ज्या टप्प्यावर थांबविले होते त्या टप्प्याच्या पुढे सुरु करण्यात येईल. उदा. ज्या मतदारांनी मतदान स्थगित होईपर्यंत मतदान केलेले नव्हते त्यांनाच फक्त मतदान करण्याची अनुमती देण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्षास सील केलेली पाकिटे ज्यामध्ये चिन्हांकित मतदार यादी असेल, तसेच नमुना-व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही आणि एक नवीन मतदान यंत्र पुरविण्यात येईल. मतदान सुरु करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष सील केलेली पाकिटे त्यामध्ये चिन्हांकित मतदार यादी व मतदार नोंदवही ठेवलेली आहे ती उघडील. ती पाकिटे उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्यासमोर उघडण्यात येतील.

१४.३९.४ स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरु केल्यानंतर त्यासंदर्भात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याच्या आदेशामधील परिच्छेद २१ ते २४ मधील तरतुदी शक्य असेल तोवर लागू होतील.

**१४.४० नव्याने फेर मतदान घेणे:**

१४.४०.१ एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान यंत्र बेकायदेशीररित्या मतदान केंद्राध्यक्ष अथवा निर्वाचन अधिकारी यांच्या ताब्यातून पळविण्यात आले असेल अथवा ते अपघाताने नष्ट झाले अथवा हरवले; अथवा त्यास फार मोठया प्रमाणावर हानी पोहोचली की ज्यामुळे त्या मतदान केंद्रावरील मतमोजणी शक्य होणार नाही, अशा परिस्थितीत निर्वाचन अधिकारी त्यासंदर्भातील अहवाल तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठवील.

१४.४०.२ असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधित बाबी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाकडून संबंधित केंद्रावर झालेले मतदान रद्द करण्यात येईल व नवीन फेर मतदानासाठी तारीख व वेळ इत्यादी निश्चित करुन त्यासंबंधी जिल्हाधिकारी यांना

कळविण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी त्याबाबतची सूचना प्रसिध्द करतील आणि त्याबाबतची पुरेशी प्रसिध्दी संबधित क्षेत्रातील मतदारांना देतील.

१४.४०.३ राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली की, एखाद्या मतदान केंद्रावर फेर मतदान घेतल्यामुळे निवडणूक निकालावर काही परिणाम होणार नाही; अथवा झालेली अनियमितता ही फार महत्वाची नसल्यामुळे निकालावर काही परिणाम होणार नाही, अशावेळी राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकारी अथवा निर्वाचन अधिकारी यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील. त्यानुसार पुढील कार्यवाही पार पाडण्यात येईल.

१४.४०.४ फेर मतदान जाहीर केल्यानंतर सबंधित मतदान केंद्रावरील सर्व मतदारांना नव्याने मतदान करण्याची अनुमती देण्यात येईल. अशावेळी आधीच्या मतदानाच्यावेळी मतदारांच्या बोटाला लावलेली शाई दुर्लक्षित करण्यात येईल व मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटाला शाई लावण्यात येईल व याबाबत जिल्हाधिकारी आदेश काढतील ( आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०१२/प्र.क्र.२४/का-०५ दि.९/१०/२०१२)

१४.४०.५ फेर मतदानाच्यावेळी कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट अथवा युनिटस् नवीन वापरण्यात येतील. तसेच चिन्हांकित मतदार यादी तसेच मतदार नोंदवही इत्यादी नवीन वापरण्यात येतील.

१४.४०.६ नवीन मतदान घेताना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील सर्व तरतुदी जोपर्यंत लागू करणे शक्य आहे तोवर लागू होतील.

**१४. ४१ मतदानाबाबतचे वेळोवेळी अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे**

राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात दर दोन तासांची मतदानाची आकडेवारी स्त्री/पुरुष मतदारांसह राज्य निवडणूक आयोगास राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या पदधतीने पाठविणे आवश्यक आहे.यासाठी आकडेवारी गोळा करण्यासंदर्भात संबंधित क्षेत्र अधिकारी (झोनल ऑफिसर) यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात यावी. त्यांनी आकडेवारी गोळा करुन निर्वाचन अधिकारी यांना पुरवावयाची आहे व त्यांनी संबंधित आकडेवारी जिल्हाधिकारी तसेच राज्य निवडणूक आयोगास कळवावयाची आहे. **साक्षर मतदारांची तसेच अंध अपंग मतदारांची माहिती जर आयोगाकडून मागवण्यात आलेली असल्यास सुरवाती पासूनच ती संकलीत करावी जेणेकरून नंतर अडचण येणार नाही.**

बऱ्याच वेळा असे आढळून आले आहे की, काही निर्वाचन अधिकारी जिल्हाधिकारी यांच्याकडे आकडेवारी पाठवितात व राज्य निवडणूक आयोगाशी कोणताही संपर्क ठेवत नाहीत. यास्तव यासंदर्भात हे ध्यानात घेणे आवश्यक आहे की, जिल्हाधिकारी यांच्याकडे आकडेवारी पाठविताना ती राज्य निवडणूक आयोगासदेखील न चुकता पाठविण्याची जबाबदारी निर्वाचन अधिकारी यांच्यावर आहे.

# प्रकरण १५

## मतमोजणी

**सर्वसाधारण सूचना -**

१५.१ पारंपारिक पध्दतीने मतपत्रिकेव्दारे मतदान घेतल्यानंतर त्याची मतमोजणी हा अत्यंत किचकट, श्रमाचा व वेळखाऊ टप्पा आहे. प्रत्येक मतपत्रिकेची वैधता तपासून पाहण्यासाठी त्याची तपासणी बारकाईने करावी लागते. बऱ्याच वेळा मतपत्रिका वैध आहे की अवैध यावरील निर्णय निर्वाचन अधिकारी यांना घ्यावा लागतो व त्या संदर्भात वाद निर्माण होतात.

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये हे सर्व प्रकार नाहीसे झाले आहेत. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रत्येक मतदाराने नोंदविलेल्या मतांची उमेदवारनिहाय अद्ययावत आकडेवारी देऊ शकते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात नोंदविण्यात आलेली मते ही सर्व वैध मते असून, त्यामध्ये अवैध मतांची संख्या शून्य आहे. त्यामुळे मतमोजणी ही अत्यंत सोपी, सुलभ व वेगवान होण्यास मदत होते. तथापि, खाली नमूद केलेल्या परिच्छेदामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे ज्या ठिकाणी मतदान झाले आहे, त्या ठिकाणी मतमोजणी करण्यासंदर्भातील प्रत्येक सूचना बारकाईने वाचून मतमोजणी संदर्भात कोणत्याही उमेद्वार अथवा त्याच्या प्रतिनिधीच्या मनात निवडणुकीच्या निकालाबाबत शंका उरणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. या संदर्भात मतमोजणी पर्यवेक्षक व मतमोजणी सहाय्यक यांना **सखोल प्रशिक्षण** देवून सदर अधिकारी आपली कर्तव्ये नीट पार पाडतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**१५.२.१ कायदेशीर तरतुदी-**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २८ मध्ये मतमोजणी संदर्भातील तरतूद करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियम १९६२ मधील मतमोजणी विषयक तरतुदीनुसार मतदानाची गुप्तता, मतमोजणीच्या जागेत प्रवेश, याबाबतच्या तरतुदी लक्षात घ्याव्यात.

तसेच जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले टपाली मतपत्रिका आदेश २००१ अन्वये निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी टपालाने मत नोंदविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**१५.३ मतमोजणीची तारीख, ठिकाण व वेळ-**

राज्य निवडणूक आयोगाकडून मतमोजणीसाठी तारीख व वार निश्चित करण्यात येतो. तथापि, मतमोजणीचे ठिकाण **जिल्हाधिकारी** यांच्या मान्यतेनुसार निर्वाचन अधिकारी यांनी निश्चित केलेले असेल. मतमोजणीची तारीख, ठिकाण व वेळ कळविणाऱ्या सूचना सर्व संबंधितांना, निवडणूक लढविणाऱ्या उमेद्वारांना अथवा त्यांच्या प्रतिनिधींना लेखी कळविणे आवश्यक आहे.

१५.३.१ काही न टाळता येण्याजोग्या कारणांमुळे निर्वाचन अधिकारी मतमोजणी वेळेवर सुरु करु शकले नाहीत अशावेळी त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या ठिकाणात काही कारणामुळे बदल करावा लागल्यास त्याची अनुमती जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडून मिळविणे आवश्यक आहे.

१५.३.२ मतमोजणी ज्या ठिकाणी करावयाची आहे तो हॉलची जागा अशारितीने निश्चीत करावी, ज्यामध्ये निर्वाचन अधिकारी, मतमोजणीसाठी आवश्यक ते कर्मचारी व अधिकारी, उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी इ. सर्व व्यक्तिच्या हजेरीमुळे गर्दी होणार नाही तसेच मतदान केंद्रांच्या सुरक्षीत हालचालीत अडथळा निर्माण होणार नाही. शक्यतो येण्याजाण्याचे (ENTRY-EXIT) मार्ग स्वतंत्र असावेत.

१५.३.३ मतमोजणीच्या हॉलमध्ये उजेडाची योग्य ती व्यवस्था असावी. लाईट गेल्यास जनरेटर अथवा गॅसबत्ती यांची व्यवस्था असावी.

मतमोजणी हि मतदाना एवढीच महत्वाची असल्याने सुरक्षीततेच्या दृष्टिने मतमोजणीसाठी मंडप उभारण्याचे शक्यतो टाळावे. जेणेकरुन धूळ अथवा पाऊस यामुळे मतमोजणीच्या कामात अडथळा येणार नाही. मंडप उभारण्या शिवाय पर्याय उपलब्ध नसल्यास सुरक्षीततेची सर्व काळजी घेवुन त्याबाबतची **अनुमती जिल्हाधिकारी** यांच्यामार्फत **राज्य निवडणूक आयोगाकडून** घेण्यात यावी.

**१५.४ मतमोजणीसाठी टेबल लावणे-**

मतमोजणीसाठी लावण्यात येणारी टेबले ही रांगेत लावलेली असावीत. तसेच किती टेबले लावावयाची आहेत याबाबतचा निर्णय पुरेसा अगोदर घेण्यात यावा. कारण त्यावर किती मतमोजणी पर्यवेक्षक तसेच सहाय्यक नेमावे लागतील; त्याशिवाय किती मतमोजणी पर्यवेक्षकांना प्रवेश द्यावा हेदेखील अवलंबून राहील.

मतमोजणीसाठी किती टेबले लावावीत याबाबतचा निर्णय मतमोजणीचा हॉल किती मोठा आहे यावर अवलंबून राहील.

मतमोजणीसाठी लावण्यात येणाऱ्या टेबलांच्या २ रांगांमधील अंतर हे मतदान यंत्रांची विनाअडथळा ने-आण करण्याकरीता आवश्यक तेवढे असावे.

लावण्यात येणाऱ्या टेबलांच्या संख्येवर मतमोजणीच्या फेऱ्यांची संख्या अवलंबुन असेल सबब त्यानुसार प्रत्येक मतमोजणीच्या फेरीगणीक येणाऱ्या टेबलनिहाय मतदान केंद्र व मतदान यंत्र यांचा चार्ट तयार ठेवावा, जेणेकरून मतमोजणी प्रकिया विनासायास सुरळीत चालू राहील. चार्ट नुसार, प्रत्येक फेरीत प्रत्येक टेबलावर द्यावयाच्या मतदान यंत्रावर लक्ष ठेवण्यासाठी २-३ कर्मचारी नेमावेत.

मतमोजणीसाठी ठेवण्यात आलेल्या टेबलांच्या व मतमोजणी प्रतिनिधींच्या बसण्याच्या व्यवस्थेमध्ये लाकडी बॅरॅकटिंग व तारेचे जाळे असावे जेणेकरून मतमोजणी चालू असताना मतमोजणी कर्मचारी यांचेकडून मतदान यंत्र हिसकावणे वा त्याला हानी पोहचविणे यांसारखे प्रकार होणार नाहीत.

**१५.५ मतमोजणीसाठी आवश्यक असणारे साहित्य-**

मतमोजणीसाठी खालील साहित्याची आवश्यकता राहील.

(१) निळया शाईचे बॉलपेन
(२) सील तोडण्यासाठी कटर/ब्लेड
(३) नमुना व्हीएम-३ मधील भाग १ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-४ मधील भाग २ या नमुन्यात मतमोजणी करुन मतमोजणी पर्यवेक्षकाने मतमोजणीचा निकाल नमूद करावयाचा आहे)
(४) किमान दोन कोरे कागद
(५) मतमोजणीनंतर काढता येणारी मेमरी ठेवण्याकरिता आवश्यक असलेली प्लास्टीकची डबी (डिटॅचेबल मेमरी राहील, या आकाराची)

**१५.६ मतमोजणी प्रतिनिधींची संख्या-**

मतमोजणीसाठी जितकी टेबले लावण्यात येणार आहेत. तितके प्रत्येक टेबलासाठी १ याप्रमाणे प्रत्येक उमेदवारांचे प्रतिनिधी नेमता येतील. तसेच निर्वाचन अधिकाऱ्यांच्या टेबलासाठी १ प्रतिनिधी नेमता येईल.

**१५.७ मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीची पत्रे देणे-**

१५.७.१ उमेदवारांना त्यांना मतमोजणीसाठी किती प्रतिनिधी नेमता येतील याची संख्या कळवावी. उमेदवार आपल्या सर्व प्रतिनिधींची नेमणूक एकाच पत्राद्वारे करु शकेल.मात्र त्या सर्व मतमोजणी प्रतिनिधींनी सदर पत्रावर स्वाक्षऱ्या केलेल्या असणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांनी मतमोजणी प्रतिनिधी म्हणून आपली नेमणूक स्वीकारली असल्याचे सिध्द होईल. (परिशिष्ट-१७) मतमोजणी प्रतिनिधी कोण असू शकते वा असू नयेत याबाबत नियम २४ -२५ तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६ लक्षात घ्याव्यात.

१५.७.२ कोणत्याही परिस्थितीत मतमोजणीच्या तारखेपूर्वी किमान ३ दिवस अगोदर मतमोजणी प्रतिनिधींची नावे उमेदवारांनी कळविणे आवश्यक आहे. अशा नेमणुकीसोबत

उमेदवारांनी मतमोजणी प्रतिनिधींची छायाचित्रे देखील पुरविणे आवश्यक आहे. जेणेकरुन मतमोजणी प्रतिनिधींना निर्वाचन अधिकारी यांच्या स्वाक्षरीने मतदान कक्षात प्रवेशाकरीता ओळखपत्र किंवा प्रवेशपत्र देणे शक्य होईल.

१५.७.३ प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस १ बॅच देण्यात यावा. त्यावर तो कोणत्या टेबलाचा मतमोजणी प्रतिनिधी आहे, त्या टेबलाचा अनुक्रमांक लिहिलेला असावा. सदर बॅचवर मतमोजणी प्रतिनिधीची पूर्ण स्वाक्षरी असावी व सदर प्रतिनिधी हा ज्या टेबलासाठी नियुक्त करण्यात आलेला आहे त्या टेबलाजवळ बसेल. मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये त्याला इतरत्र फिरता येणार नाही.

१५.७.४ उमेदवार आणि त्याचा निवडणूक प्रतिनिधी मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये फिरुन मतमोजणी प्रक्रियेची पाहणी करु शकेल.

**१५.८ मतमोजणीच्या हॉलमध्ये खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात यावा :-**

(१) मतमोजणी पर्यवेक्षक आणि मतमोजणी सहाय्यक

(२) राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती

(३) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले अधिकारी-कर्मचारी

(४) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी

निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेले अधिकारी-कर्मचारी यामध्ये सर्वसाधारणपणे पोलिस अधिका-यांचा समावेश होत नाही. पोलिस अधिकारी गणवेषात अथवा साध्या वेषात देखील मतमोजणी हॉलमध्ये प्रवेश करणार नाहीत. तथापि, निर्वाचन अधिकारी तशीच वेळ आल्यास कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलिस अधिकाऱ्यांना मतमोजणीच्या हॉलमध्ये प्रवेश देऊ शकेल. मतमोजणीच्या हॉलमध्ये पोलिस अधिकाऱ्यांचा विनाकारण प्रवेश उमेदवारांना तक्रार करण्यास वाव देऊ शकतो. तसेच मतमोजणी प्रतिनिधी त्यांच्यावर दबाव आल्याची तक्रार करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**१५.९ निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले अधिकारी-कर्मचारी - मतमोजणी प्रतिनिधी अथवा निवडणूक प्रतिनिधी बाबत**

यामध्ये केंद्र व राज्य शासनाचे मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री यांचाही समावेश होत नाही. तसेच त्यांना सुरक्षा पुरवावी लागत असल्यामुळे त्यांना मतमोजणी प्रतिनिधी अथवा निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये. (मतमोजणी प्रतिनिधी कोण असू शकते वा असू नयेत याबाबत नियम २४ -२५ तसेच राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२३/का.७ दि.१९/१०/२०१६ लक्षात घ्याव्यात.)

**१५.१० मतमोजणीच्या ठिकाणी शिस्त व सुव्यवस्था ठेवणे-**

निर्वाचन अधिकारी म्हणून काम करताना मतमोजणीच्या ठिकाणी सर्व कामे शिस्तबध्दरीतीने व सुव्यवस्थितपणे होतील याची दक्षता घेण्यात यावी. मतमोजणीच्या ठिकाणी धुम्रपानास तसेच मतमोजणीच्या ठिकाणी भ्रमण दूरध्वनी नेण्याची अनुमती देण्यात येऊ नये. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास भ्रमण दूरध्वनी जप्त करण्याचा अधिकार निर्वाचन अधिकाऱ्यांना राहील.

**१५.११ मतमोजणीच्या ठिकाणी पत्रकार व इलेक्ट्रॉनिक मिडिया यांना प्रवेश-**

मतमोजणीच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या यादीप्रमाणे अधिस्वीकृती धारक वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्या प्रतिनिधींना प्रवेश द्यावा. त्यासाठी त्यांना ओळखपत्रे देण्यात यावीत. मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये त्यांना कुठेही फिरण्याची अनुमती देण्यात येऊ नये. पत्रकार कक्षाची ज्या ठिकाणी व्यवस्था केली असेल त्या ठिकाणी त्यांना माहिती पुरविण्याची व्यवस्था करावी. अधिस्वीकृतीधारक वर्तमानपत्राचे प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया या व्यतिरिक्त अन्य स्थानिक वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींना प्रवेश देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र मतमोजणीच्या ठिकाणी सुव्यवस्था राहावी व गोंधळ होऊ नये याद्दष्टीने दक्षता घ्यावी. दर मतमोजणी फेरीअंती येणारा निकाल त्यांना दिसेल व ऐकू येईल अशी सोय करावी.

**१५.१२ मतमोजणीची माहिती गुप्त ठेवण्याबाबतची ताकीद-**

मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी सुरु असताना मतदानाबाबतची माहिती गोपनीय ठेवणे आवश्यक असून, त्याची गोपनीयता भंग केल्यास संबंधितांवर कारवाई होऊ शकेल याची जाणीव उपस्थितांना करुन द्यावी.

**१५.१३ टपाली मतपत्रिकांची मतमोजणी-**

१५.१३.१ टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील नियम १० मधील तरतुदीनुसार निर्वाचन अधिकारी प्रथमत: टपाली मतपत्रिकांची मतमोजणी करेल व त्यासाठी खाली नमूद केलेली पध्दती अनुसरेल.

मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर प्राप्त झालेला प्रपत्र पीबी-६ मधील कोणताही लखोटा उघडण्यात येणार नाही व त्यामध्ये असलेल्या मतपत्रिकेची मोजणी करण्यात येणार नाही.

१५.१३.२ विहित कालावधीत प्राप्त झालेले टपाली मतपत्रिका असलेले लखोटे एका पाठोपाठ एक उघडण्यात येतील व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर निर्वाचन अधिकारी प्रथमत: प्रपत्र पीबी-४ मधील घोषणापत्राची तपासणी करील.

१५.१३.३ वरील नमूद लखोटा उघडल्यानंतर त्यामध्ये विहित घोषणापत्र न आढळून आल्यास, अथवा त्यावर सही तसेच साक्षांकन नसल्यास, अथवा ते मोठया प्रमाणावर सदोष

असल्यास, अथवा घोषणापत्रात नमूद केलेला टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक व नमुना पीबी-५ मधील लखोटयावर नमूद केलेल्या टपाली मतपत्रिकेच्या अनुक्रमांक यामध्ये फरक असल्यास सदर लखोटा उघडण्यात येणार नाही आणि त्यावर योग्य तो शेरा लिहून निर्वाचन अधिकारी त्यामधील मतपत्रिका रद्द करील.

१५.१३.४ वरीलप्रमाणे शेरा लिहिलेले लखोटे आणि त्यासोबत प्राप्त झालेली घोषणापत्रे प्रपत्र पीबी-६ मधील लखोटयात परत ठेवण्यात येतील व प्रपत्र पीबी-६ मधील अशा तऱ्हेचे सर्व लखोटे एका वेगळया पाकिटात मोहोरबंद करुन ठेवण्यात येतील. सदर लखोटयावर मतदार संघाचे नाव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे, त्याचा थोडक्यात तपशील लिहिण्यात येईल.

**१५.१३.५** प्रपत्र पीबी-५ मधील कोणताही लखोटा, उघडण्यापूर्वी निर्वाचन अधिकारी यांचे मते योग्य असलेली प्रपत्र पीबी-४ मधील सर्व घोषणापत्रे एका वेगळया पाकिटात ठेवण्यात येतील व सदर पाकीट मोहोरबंद करण्यात येईल. तसेच त्यावर मतदार संघाचे नाव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे, त्याचा थोडक्यात तपशील लिहिण्यात येईल.

**१५.१३.६** नमूद केल्यानुसार आतापर्यंत न उघडण्यात आलेले प्रपत्र पीबी-५ मधील लखोटे एका पाठोपाठ एक उघडण्यात येतील आणि निर्वाचन अधिकारी प्रत्येक टपाली मतपत्रिकेची तपासणी करील व त्यावर नोंदविलेल्या मताची वैधता ठरवील.

**१५.१३.७ टपाली मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल, जर -**

i) टपाली मतपत्रिकेवर एखादी अशी खूण करण्यात आली असेल (मत नोंदविण्याच्या खुणेव्यतिरिक्त) ज्यावरुन मतदाराची ओळख पटू शकेल, अथवा

ii) टपाली मतपत्रिकेवर मत नोंदविण्यात आले नसेल, अथवा

iii) एकापेक्षा जास्त उमेदवारांसमोर मत नोंदविण्यात आले असेल, अथवा

iv) टपाली मतपत्रिका नकली/बनावट असेल तर, अथवा

v) टपाली मतपत्रिकेस इतक्या मोठया प्रमाणावर हानी पोहोचली असेल अथवा ती छिन्न-विछिन्न झाली असेल की, ज्यायोगे मतपत्रिका खरी आहे किंवा कसे, हे ओळखता येणार नाही, अथवा

vi) निर्वाचन अधिकारी यांनी टपाली मतपत्रिकेसोबत जो लखोटा पाठविला असेल, त्या लखोटयात ती परत करण्यात आली नसेल.

१५.१३.८ टपाली मतपत्रिकेवर अशारितीने मत नोंदविले असेल की ज्यायोगे ते कोणत्या उमेदवारास दिले आहे हे ओळखता येत नसेल तर अशी मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल.

१५.१३.९ टपाली मतपत्रिकेवर नोंदविलेले मत अस्पष्ट असेल अथवा मत नोंदविण्याची खूण एकापेक्षा जास्त वेळा केली असेल व जर त्यावरुन मतदाराची कोणत्या उमेदवारास मत देण्याची इच्छा

आहे हे पुरेसे स्पष्ट होत असल्यास केवळ त्या कारणासाठी मतपत्रिका रद्द करण्यात येणार नाही.

१५.१३.१० निर्वाचन अधिकारी सर्व वैध टपाली मतपत्रिकांवरील मते कोणत्या उमेदवारांना देण्यात आली आहेत त्याची मोजणी करील व त्यांची बेरीज संबंधित निवडणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या प्रपत्रात नोंदवील व ती जाहीर करील.

१५.१३.११ तद्नंतर, सर्व वैध टपाली मतपत्रिका आणि अवैध ठरलेल्या टपाली मतपत्रिकांचे वेगवेगळे गठ्ठे बांधून एका पाकिटात ठेवण्यात यावेत व ते पाकीट निर्वाचन अधिकारी यांच्या मोहरेने मोहोरबंद करण्यात यावे. उमेदवार अथवा त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींची इच्छा असेल तर त्यांना त्यावर स्वाक्षऱ्या करण्याची अनुमती देऊन सदर पाकिटावर मतदार संघाचे नाव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व पाकिटात काय आहे, त्याचे थोडक्यात विवरण लिहिण्यात येईल.

## १५.१४ मतदान यंत्राद्वारे नोंदविलेल्या मतांची मतमोजणी-

१५.१४.१ टपाली मतपत्रिकाची मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर तुम्ही मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट मतमोजणीसाठी लावलेल्या टेबलवर वितरित करणे आवश्यक आहे. कंट्रोल युनिटचे वाटप मतमोजणीसाठी लावलेल्या टेबलावर करताना ते मतदान केंद्राच्या अनुक्रमांकानुसार करण्यात यावे. म्हणजेच पहिल्या राऊंडसाठी जी कंट्रोल युनिटस घेण्यात येतील ती संबंधित प्रभागाच्या क्रमांक एकच्या मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या कंट्रोल युनिटनुसार करण्यात यावीत. वितरित केलेल्या कंट्रोल युनिटची नोंद तुमच्या माहितीसाठी ठेवण्यात यावी.

१५.१४.२ मतमोजणीच्या वेळी मतदान यंत्रातील फक्त कंट्रोल युनिटचीच आवश्यकता असते, बॅलेट युनिटची आवश्यकता नसते. तरीसुध्दा मतदान केंद्रावर वापरण्यात आलेले बॅलेट युनिट देखील मतमोजणी केंद्रावर नेण्यात यावे. मात्र मतमोजणीच्या टेबलवर फक्त कंट्रोल युनिटच वितरित करण्यात यावे. बॅलटिग युनिट मतमोजणीच्या हॉलमध्ये नेणे यासाठी आवश्यक आहे की, जर एखाद्या उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधींना त्याचे निरीक्षण करावयाचे असल्यास ती उपलब्ध होतील.

१५.१४.३ मतमोजणीच्या टेबलवर कंट्रोल युनिट सोबत संबंधित मतदान केंद्रावरील व्हीम-३ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब, हे प्रपत्र पुरविणे आवश्यक आहे.

## १५.१५ कंट्रोल युनिट ठेवलेल्या बॅगेचे सील उघडणे-

मतदान केंद्रावर वापरलेले कंट्रोल युनिट संबंधित बॅगमध्ये सुरक्षित ठेवलेले असते व त्या बॅगेलादेखील मोहोर लावलेली असते. मतमोजणीच्या टेबलवर सदर बॅग ठेवल्यानंतर

बॅगची मोहोर सुरक्षित आहे किंवा कसे हे पहावे. काहीवेळा बॅगची मोहोर प्रवासामध्ये तुटली असल्यास बॅग उघडून कंट्रोल युनिटमधील मोहोर इ. सुरक्षित आहेत किंवा कसे पहावे.

१५.१५.१ मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये किती मते नोंदविण्यात आली याची मोजणी सुरु करण्यापूर्वी, कंट्रोल युनिट बॅगमधून बाहेर काढल्यानंतर ते मतमोजणी टेबलवर निरीक्षणासाठी ठेवावे. उमेदवार अथवा त्याचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी यांना कंट्रोल युनिट ठेवलेल्या बॅगचे सील तसेच बॅग उघडल्यानंतर व कंट्रोल युनिट बाहेर काढल्यानंतर त्यामध्ये अत्यावश्यक असलेली कागदी मोहोर इ. सुरक्षित आहेत किंवा कसे ? याची पाहणी व निरीक्षण करु द्यावे. प्रत्येक मतदान यंत्राच्या सीलला कोणतीही हानी झालेली नाही याची तपासणी करण्यात यावी.

१५.१५.२ प्रत्येक कंट्रोल युनिट बॅगमधून बाहेर काढल्यानंतर त्याचा अनुक्रमांक तपासून पहावा. जेणेकरुन संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात आलेले कंट्रोल युनिट तेच आहे किंवा कसे याबद्दल तुमची खात्री होईल. त्यानंतर कंट्रोल युनिटच्या “कॅण्ड सेट सेक्शन” सील सुरक्षित आहे का हे तपासण्यात यावे. तसेच कंट्रोल युनिटवरील रिझल्ट सेक्शनचे सीलदेखील सुरक्षित आहे किंवा कसे? ते पहावे. जर या दोनही सीलला हानी झाली असेल तरी रिझल्ट सेक्शनच्या आतल्या झाकणाची कागदी मोहोर (सील) सुरक्षित असल्यास कंट्रोल युनीट सुरक्षित आहे असे समजावे व त्यास कोणतीही हानी पोचविलेली नाही असे समजावे.

**१५.१६ कागदी मोहरेचा अनुक्रमांक तपासून पाहणे-**

१५.१६.१ इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने बनविलेल्या मतदान यंत्राला एक कागदी मोहोर असेल. या कागदी मोहोरवर एका बाजूला अनुक्रमांक छापलेले असतील. सदर कागदी मोहोरेचा अनुक्रमांक तुम्हाला देण्यात आलेल्या व्हीएम-३ या नमुन्यातील भाग-१ नोंदविलेल्या मतांचा हिशेब या प्रपत्रात ज्या कागदी मोहोरांचे (पेपरसील) क्रमांक नोंदविलेले आहेत त्याच्याशी कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या झाकणाच्या कागदी मोहोरेवरील अनुक्रमांक जुळतात किंवा कसे ? ते पहावे. हे क्रमांक जुळतात याबद्दल उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जे मतमोजणी टेबलावर उपस्थित असतील त्यांची खात्री करुन देण्यात यावी.

१५.१६.२ वर नमूद केल्यानुसार व्हीएम-३ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब यामध्ये नमूद केलेल्या वापरलेल्या कागदी मोहोरांचा अनुक्रमांक जर कंट्रोल युनिट रिझल्ट सेक्शनला वापरलेल्या झाकणाच्या कागदी मोहोरेवरील अनुक्रमांक जुळत नसल्यास एक तर मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित प्रपत्रात कागदी मोहोरेचा अनुक्रमांक लिहिण्यात चूक केली असावी असे सकृतदर्शनी संशय घेण्यास वाव आहे. अशा प्रकरणी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांनी न वापरलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक संबंधित प्रपत्रात दिलेले असतील त्याच्याशी कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या झाकणाच्या कागदी

मोहोरेवरील अनुक्रमांक जुळतात किंवा कसे ते पहावे व या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा. या लिहिण्यामध्ये लेखनिक चूक आहे असे आढळून आल्यास ते दुर्लक्षित करावे. तसेच या संदर्भात उमेदवार अथवा त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी यांनी काही तक्रार केल्यास त्या अनुषंगाने या संदर्भात निर्णय घ्यावा.

१५.१६.३ कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शनच्या" बाहेरच्या झाकणाचे मोहर (सील) तोडून झाकण उघडावे. रिझल्ट सेक्शनच्या बाहेरचे झाकण उघडल्यानंतर तुम्हाला आतील झाकणास मतदान केंद्राध्यक्षांनी लावलेल्या मोहरेचा गुलाबी भाग दिसून येईल. ही मोहर सुरक्षित आहे का ते तपासून पहावे.

**१५.१७ कंट्रोल युनिटला हानी पोचविलेली आढळल्यास ते बाजूला ठेवणे-**

मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटला खरोखरच कोणीतरी हानी पोचविली असावी अशी आपली खात्री झाल्यास अथवा मतदान केंद्रावर जे कंट्रोल युनिट वापरण्यात आले ते कंट्रोल युनिट मतमोजणी टेबलवर नाही याबद्दल आपली खात्री झाल्यास असे कंट्रोल युनिट बाजूला ठेवावे व त्यामध्ये नोंदविलेल्या मतांची नोंदणी करण्यात येऊ नये. व त्या संदर्भात मागील प्रकरणात नमूद केल्यानुसार सर्व संबंधित बाबी विचारात घेऊन संबंधित मतदान केंद्रावर पुनर्मतदान घेण्याच्यादृष्टीने निर्वाचन अधिका-यांनी आपला अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करावा व आयोगाकडून पुढील आदेश मिळवून पुनर्मतदान घेण्याच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी.

तथापि, एखादे मतदान यंत्र अशाप्रकारे बाजूला ठेवावे लागल्यामुळे संपूर्ण मतमोजणी थांबविण्याची आवश्यकता नाही. ते यंत्र बाजूला ठेवून उर्वरित मतमोजणी सुरु ठेवावी.

**१५.१८ मतदान यंत्रातील मतमोजणी-**

सर्व कागदी मोहोरा सुरक्षित असल्याची खात्री पटल्यानंतर संबंधित केंद्रावर वापरण्यात आलेले कंट्रोल युनिट तेच असून त्यास कोणतीही हानी पोहोचविण्यात आलेली नाही अशी खात्री झाल्यानंतर त्यामधील मतमोजणी सुरु करावी. त्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१५.१८.१ कंट्रोल युनिटच्या पाठीमागच्या कप्प्याचे झाकण उघडून त्यामधील पॉवर हे बटन सुरु (on) करावे. तसे केल्यानंतर कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले सेक्शनवरील सुरु (On) असे लिहिलेला हिरवा दिवा पेटेल.

१५.१८.२ रिझल्ट सेक्शनचा मोठा कप्पा उघडण्यात यावा. आतल्या झाकणाच्या रिझल्ट-। या बटनावरील खाचेमधून कागदी मोहोर फाडण्यात यावी. सदरचा कप्पा उघडण्याची आवश्यकता नाही.

१५.१८.३ रिझल्ट-। हे बटन दाबावे.

१५.१८.४ आयोगाचे दि.१२/११/२०१३ रोजीच्या आदेशान्वये ज्या मतदारांना कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसेल तर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीमध्ये मतदान यंत्रावर –'**वरील पैकी एकही नाही** / None of the Above' अशा बटणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे निकाल जाहीर करताना आयोगाचे आदेशातील परिच्छेद-७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

१५.१९ जिल्हा परिषद सदस्य- पंचायत समिती सदस्य या दोन पदांची निवडणूक एकाच वेळी होत असेल त्यावेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील Result-I हे बटन दाबून निकाल पुढीलप्रमाणे दिसेल.

समजा खालीलप्रमाणे गृहित धरल्यास प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते व त्यांचा निकाल डिस्प्ले पॅनलवर पुढील पानावर दर्शविल्याप्रमाणे दिसू लागेल:-

१) जिल्हा परिषद सदस्य पदाची निवडणूक लढविणारे उमेदवार - ४ + १ NOTA Button
२) पंचायत समिती सदस्य पदाची निवडणूक पदाची निवडणूक लढविणार उमेदवार - ३ + १ NOTA Button
३) मतदान केद्रावर प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या -७५०

| Sr.No. | Display | Meaning |
|---|---|---|
| १ | SL NO - G11227<br>DMM - G58585 | Serial Number of EVM is G11227<br>Memory Number is G58585 |
| २ | POLL RESULT<br>PDT 04-11-11 | Poll Result starts<br>Poll Date is 4th November 2011 |
| ३ | PST 12-50-53<br>PET 17-33-21 | Poll Start Time<br>Poll End Time |
| ४ | NUMBER OF<br>BALLOTS 2 | Number of Ballot Papers are 2 i.e. one for Seat - A and another for Seat - B |
| ५ | TOTAL VOTERS<br>750 | Total Number of Voters |
| ६ | BALLOT 1<br>VOTES 750 | On First Ballot Paper<br>Total Votes are 750 |
| ७ | CANDS 4<br>SEATS 1 | Total No. of Candidates<br>Number of Candidates to be elected |
| ८ | CANDIDATE – 01<br>VOTES – 150 | First Candidate<br>Obtained 150 votes |
| ९ | CANDIDATE – 02<br>VOTES – 200 | Second Candidate<br>Obtained 200 votes |
| १० | CANDIDATE – 03<br>VOTES – 250 | Third Candidate<br>Obtained 250 vote |
| ११ | CANDIDATE – 04<br>VOTES – 50 | Fourth Candidate<br>Obtained 50 vote |
| १२ | CANDIDATE – 05<br>VOTES – 100 | NOTA BUTTON Obtained 100 votes |
| १३ | BALLOT 2<br>VOTES 750 | On Second Ballot Paper<br>Total Votes are 750 |
| १४ | CANDS 3 | Total No. of Candidates |

| | SEATS 1 | Number of Candidates to be elected |
|---|---|---|
| १५ | CANDIDATE – 01<br>VOTES – 255 | First Candidate<br>Obtained 255 votes |
| १६ | CANDIDATE – 02<br>VOTES – 300 | Second Candidate<br>Obtained 300 votes |
| १७ | CANDIDATE – 03<br>VOTES – 100 | Third Candidate<br>Obtained 100 vote |
| १८ | CANDIDATE – 04<br>VOTES – 95 | NOTA BUTTON Obtained 95 votes |
| १९ | END | End of Result Display |

टिप :- कंट्रोल युनिटवरील "**Result -II**" हे बटण सध्या वापरण्याची आवश्यकता नाही. कारण न्यायालयीन प्रकरणात निर्देश प्राप्त झाल्यासच काढता येणाऱ्या मेमरीवरील निकाल पाहण्याकरिता "Result -II" हे बटण वापरण्याची आवश्यकता असते. त्यामुळे "**Result -II**" बटणाचा वापर करण्यात येऊ नये.

१५.१९.१ नमुना व्हीएम-४, भाग-२ या नमुन्यात प्रत्येक उमेदवाराला कंट्रोल युनिटवर दिसत असलेला निकाल उमेदवारनिहाय लिहून घेण्यात यावा. आवश्यकता वाटल्यास उमेदवार अथवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी याची खात्री होण्यासाठी "Result -I" हे बटण पुन्हा एकदा दाबून लिहून घेतलेली आकडेवारी बरोबर आहे किंवा कसे याची खात्री करण्यात यावी.

१५.१९.२ वरीलप्रकारे निकाल लिहून घेतल्यानंतर रिझल्ट सेक्शनचे झाकण बंद करावे व कंट्रोल युनिटच्या पाठीमागील पॉवर हे बटन बंद (off) करणे.

**१५.२० मतमोजणी निकाल नमुना व्हीएम-४ मध्ये लिहिणे**

१५.२०.१ कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनेलवर प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते दिसतील ती मतमोजणी पर्यवेक्षकाने नमुना व्हीएम-४, भाग-२ मध्ये लिहून घ्यावी. नमुना व्हीएम-४ भाग-२ मध्ये संपूर्ण माहिती भरुन झाल्यानंतर त्यावर मतमोजणी पर्यवेक्षकाने स्वाक्षऱ्या कराव्यात, तसेच त्यावर उपस्थित उमेदवार अथवा संबंधित मतमोजणी टेबलावर उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधी यांच्याही स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

१५.२०.२ वरीलप्रमाणे नमुना व्हीएम-४ भाग-२ भरुन झाल्यानंतर तो निर्वाचन अधिकारी यांचेकडे नेऊन द्यावा. निर्वाचन अधिकारी त्यावर स्वाक्षरी करुन तो साक्षांकित करतील . तसेच त्यामधील सर्व माहिती योग्यरित्या भरली आहे याची खात्री करुन घेतील. यासाठी स्वतंत्र यंत्रणा (Manual Checking) ठेवावी.

निर्वाचन अधिकारी यांनी साक्षांकित केलेला नमुना व्हीएम-४, भाग-२ अंतिम मतमोजणीचा निकाल तयार करण्याऱ्या अधिकाऱ्याकडे (Computerisation) पाठविण्यात यावा. निर्वाचन अधिकारी यांनी अंतिम मतमोजणी स्थिती दर्शविणारे प्रपत्र सोबतच्या परिशिष्ट -१८ मध्ये दिल्यानुसार तयार करावयाचे आहे.

## १५.२१ फेर मतमोजणी

१५.२१.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे झालेल्या मतदानाची मतमोजणी करताना फेर मतमोजणीचा प्रश्न सर्वसाधारणपणे उपस्थित होणार नाही. कारण मतदान यंत्रात मतदाराने दिलेले प्रत्येक मत नोंदविण्यात येते व ते वैध नसण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे वादाचा मुद्दा उपस्थित होत नाही. जास्तीत जास्त, एखादा उमेदवार अथवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी याने मतमोजणी सुरु असताना एखाद्या मतदान केंद्रावरील मते जेव्हा कंट्रोल युनिटमध्ये दर्शविण्यात येतात तेव्ही ती लिहून घेतली नसल्यामुळे फेर मतमोजणी होऊ शकते. अशावेळी रिझल्ट बटन दाबून एखाद्या मतमोजणी केंद्रावरील मतांची संख्या डिस्प्ले पॅनलवर पुन्हा दिसू शकतील व संबंधीत व्यक्ती ते लिहून घेऊ शकेल.

१५.२१.२ वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी अंतिम निकाल संबंधित नमुन्यात भरुन तयार केल्यानंतर त्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी त्याची घोषणा करावी व ½ मिनिटे थांबावे. त्यावेळेत उमेदवार अथवा त्याच्या अनुपस्थितीत त्याचा निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीसाठी मागणी करीत असल्यास त्याला तसा लेखी अर्ज करण्यासाठी किती वेळ लागेल याची विचारणा करावी व त्याने मागितलेला वेळ योग्य असेल तर तेवढा वेळा द्यावा व तसा अर्ज किती वाजून किती मिनिटांपर्यंत स्विकारण्यात येईल यावर निर्णय द्यावा. पुर्नमतमोजणीच्या संदर्भात कोणताही अर्ज येणार नाही याची खात्री असेल तरच अंतिम निकाल पत्रावर निर्वाचन अधिकारी यांनी स्वाक्षरी करावी.

१५.२१.३ फेर मतमोजणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यास फेर मतमोजणी घेण्यासाठी जी कारणे देण्यात आली आहेत ती विचारात घ्यावी. अशाप्रकरणी आपण संपूर्ण अर्ज नाकारु शकता किंवा फेर मतमोजणीची मागणी अंशत: मान्य करुन शकता, फेर मतमोजणीची मागणी विनाकारण करण्यात आली आहे व ती रास्त नाही असे तुम्हाला वाटत असल्यास फेर मतमोजणीचा अर्ज नाकारता येईल. यासंदर्भात निर्वाचन अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल. मात्र कोणताही निर्णय घेतला तरी त्यासंदर्भातील थोडक्यात कारणे नोंदवून तुमचा निर्णय लिहून त्याखाली स्वाक्षरी करावी.

१५.२१.४ काहीही असले तरी तुम्ही फेर मतमेजणीच्या अर्जावर ती अंशत: किंवा पुर्णपणे घेण्याच्या दृष्टीने निर्णय दिल्यास सर्व मतदान यंत्रावरील मतमोजणी विहित पध्दतीनुसार पुन्हा करण्यात यावी. टपाली मतपत्रिका देखील तुम्ही तसे ठरविल्यास पुन्हा मोजण्यात याव्यात. फेर मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर (परिशिष्ट-१८) मधील मतमोजणीची अंतिम स्थिती दर्शविणारे प्रपत्र तयार करण्यात यावे. मूळ निकालपत्र व फेर मतमोजणीनंतरचे निकालपत्र यामध्ये काही फरक असल्यास ते घोषित करावे व त्यानंतर अंतिम निकाल पत्रावर (परिशिष्ट-१९) स्वाक्षरी करावी. तसेच आयोगाकडे अहवाल (Statement 7,8,9) पाठविण्यासाठी आयोगाने दिलेल्या सुचनेनुसार भरतील

१५.२१.५ निर्वाचन अधिकारी म्हणून तुमचे हे कर्तव्य आहे की, मतमोजणी अचूक करण्यात यावी. गरज भासल्यास तुमच्या पर्यवेक्षणाखालील अधिकारी / कर्मचारी यांना फेर मतमोजणीचे आदेश देण्याचे तुम्हाला अधिकार आहेत. मात्र उमेदवारांनी केवळ फेर मतमोजणीची मागणी केली म्हणजे त्यांना फेर मतमोजणी दिलीच पाहिजे असे नाही. फेर मतमोजणीची मागणी करण्यामागे सकृतदर्शनी काही कारण असणे आवश्यक आहे. उदा. मतमोजणी अचूक झाली नाही व न्यायाच्यादृष्टीने फेर मतमोजणी आवश्यक आहे अशी तुमची खात्री पटली पाहिजे.

१५.२१.६ एकदा फेर मतमोजणी झाल्यानंतर आणखी पुन्हा फेर मतमोजणीची मागणी कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही. तसेच अंतिम निकालपत्र स्वाक्षरी करुन त्याबाबतची घोषणा केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत फेर मतमोजणीची मागणी मान्य करण्यात येऊ नये.

१५.२२ **मतमोजणी स्थगित करणे :-**

एकदा मतमोजणीस सुरुवात केल्यानंतर ती पूर्ण होईपर्यंत सातत्याने सुरु राहणे आवश्यक आहे. तथापि, काही अनपेक्षित कारणांमुळे तुम्हाला मतमोजणी स्थगित करावी लागली तर सर्व मतदान यंत्रे व त्यासोबतची निवडणूक कागदपत्रे सीलबंद करण्यात यावीत व उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी तशी इच्छा दर्शविल्यास सीलवर अथवा निवडणूक कागदपत्र ठेवलेल्या पाकिटावर स्वाक्षरी करण्याची अनुमती देण्यात यावी. त्यानंतर सर्व मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे असलेली पाकिटे एका वेगळ्या खोलीत ठेऊन त्या खोलीस लावलेले कुलूप सील करण्यात यावे. त्यावर निर्वाचन अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरी करावी.

**१५.२३ मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी केंद्र ताब्यात घेण्याची घटना** :-

एखाद्या ठिकाणी मतमोजणी केंद्र ताब्यात घेण्यासारखा प्रकार घडल्यास व परिणामी त्या मतमोजणी केंद्रावरील निवडणूक निकाल जाहीर करणे अशक्य होणार असल्यास निर्वाचन अधिकारी त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठवतील. असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून, संबंधित परिस्थिती व जिल्हाधिकारी यांचे मत याचा विचार करुन संबंधित मतदान केंद्रावर पुन्हा निवडणूक करण्याबाबत योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील.

**१५.२४ मतमोजणीनंतर काढता येणारी मेमरी सीलबंद करणे –**

१५.२४.१ यापूर्वी नमूद केल्यानुसार कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेल्या उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी व्हीएम-४, भाग-२ या नमुन्यात लिहून (परिशिष्ट-१८) मधील मतमोजणीची अंतिम स्थिती दर्शविणारे प्रपत्र तसेच अंतिम निकालपत्र (परिशिष्ट-१९) मध्ये दिल्यानुसार तयार करुन निकाल घोषित केल्यानंतर निर्वाचन अधिकाऱ्यांनी काढता येणारी मेमरी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे

मतदान करण्याबाबतच्या दि.०३/०५/२००५ च्या आदेशामधील परिच्छेद २९ नुसार खालीलप्रमाणे सीलबंद करावी व सीलवर स्वत: स्वाक्षरी करुन उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या अथवा त्यांच्या प्रतिनिधींची त्यावर स्वाक्षऱ्या करण्याची इच्छा असल्यास त्यांना तशी अनुमती द्यावी.

(अ) मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेली उमेदवार निहाय मते किती आहेत, याची खात्री करुन ती व्हीएम-४ या विहित नमुन्यात नमूद केल्यानंतर निर्वाचन अधिकारी कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी (Detachable Memory) सीलबंद करील व त्यावर स्वाक्षरी करुन स्वत:चा शिक्का उमटवील. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यावर स्वाक्षरी करावयाची इच्छा असेल अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्याची इच्छा असेल त्यांना तशी परवानगी देईल. परंतु काढता येणाऱ्या मेमरीमधील मते पुसली जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

(ब) निर्वाचन अधिकारी वरीलप्रमाणे सीलबंद केलेल्या काढता येणाऱ्या मेमरीला त्यासाठी विशेषत: मेमरी चिप मावेल या आकाराच्या तयार केलेल्या प्लास्टीकच्या डबीमध्ये ठेवील. तसेच या डबीवर खालील तपशील नमूद करण्यात येईल:-

(i) जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचे नाव व निवडणूक विभाग व निर्वाचक गण क्रमांक

(ii) मतदान केंद्र क्रमांक अथवा नाव जेथे ती काढता येणारी मेमरी उपयोगात आणली गेली आहे;

(iii) काढता येणाऱ्या मेमरीचा अनुकमांक;

(iv) मतदानाची तारीख आणि

(v) मतमोजणीची तारीख.

१५.२४.२ त्यानंतर कंट्रोल युनिट बंद करताना ते खाली नमूद केलेल्या पध्दतीनुसार करावीत :-

अ) कंट्रोल युनिटच्या कॅन्ड सेट सेक्शनचे सील उघडून त्यामधील बॅटरी काढून घ्यावी. बॅटरी काढल्यानंतर कॅंडीडेट सेट सेक्शन पुन्हा बंद करावा. **बॅटरी काढणे अत्यावश्यक आहे;** कारण काही कालावधी गेल्यानंतर बॅटरी खराब होऊ शकते. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, बॅटरी जरी कंट्रोल युनिटमधून बाजूला काढली तरी कंट्रोल युनिटमध्ये नोंदविण्यात आलेली मते त्याच्या मेमरीमध्ये कायम राहतील.

ब) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनचे वरचे झाकण बंद करा.

क) बंद केलेले कंट्रोल युनिट बॅगमध्ये ठेवा.

ड) कंट्रोल युनिट ठेवलेली बॅग बंद करा

**१५.२५ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीशी संबंधित कागदपत्रे यांचा ताबा:-**

१५.२५.१ निवडणुकीमध्ये वापरण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी संबंधित जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या ताब्यात राहील.

१५.२५.२ जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे त्यांच्या ताब्यात खालील बाबी सुरक्षितपणे ठेवतील:-

(अ) चिन्हांकित मतदार यादी असलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ मध्ये ठेवलेली मतदार नोंदवही असलेले पाकीट

(क) नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक मतदारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब ठेवलेले पाकीट

(ड) निवडणूकीसंदर्भातील अन्य कागदपत्र

**१५.२६ इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे सादर करणे अथवा त्यांचे निरीक्षण:-**

१५.२६.१ जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या खालील बाबी:-

(अ) चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यात ठेवलेली मतदार नोंदवही असलेले पाकीट

या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता येणार नाहीत अथवा त्यांचे निरीक्षण अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

१५.२६.२ उपरोक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २९ मधील तरतुदीनुसार सीलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्राच्या काढता येणाऱ्या मेमरी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील व त्या शासकीय कोषागार किंवा उप कोषागारामध्ये ठेवण्यात येतील व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस उघडता अथवा त्याचे निरीक्षण अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

१५.२६.३ राज्य निवडणूक आयोग आदेश देईपर्यन्त जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या ताब्यात असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची काढता येणारी मेमरी जशीच्या तशी ठेवावी व ती अन्य कोणत्याही निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या अनुमतीशिवाय वापरता येणार नाही. जरी सील केलेली मेमरी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागामध्ये कोणतीही निवडणूक याचिका दाखल न झाल्यास ही मेमरी तीन महिन्यांच्या अवधीनंतर राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा ठिकाणी परत केल्यानंतर या मेमरीमधील माहिती नष्ट करण्यात येईल.

१५.२६.४ तसेच कोणतीही निवडणूक याचिका अथवा अन्य कोणत्याही न्यायालयात रिट याचिका प्रलंबित नसल्यास अन्य निवडणूक कागदपत्रे ठेवलेली पाकिटे संबंधित नियमांतील तरतुदीनुसार नष्ट करता येतील.

**१५.२७ मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे :-**

१५.२७.१ मतदान यंत्रे आयुक्त/ जिल्हाधिकारी /राज्य निवडणूक आयोगाने निर्देशित केलेला अधिकारी यांच्या ताब्यात राहतील व राज्य निवडणूक आयोग आदेश देईल अशा कालावधीपर्यत सदर मतदान यंत्रे पुढील कोणत्याही निवडणुकीसाठी वापरण्यात येणार नाहीत.

१५.२७.२ वरील नमूद कागदपत्रे एखाद्या लोखंडी पेटीत ठेवून त्यास कुलुप लावावे व त्या कुलूपास सील लावून त्यावर स्वाक्षरी करावी.

**१५.२८ कार्यवृत्त तयार करणे :-**

१५.२८.१ काढता येणारी मेमरी सीलबंद केल्यानंतर तसेच निवडणुकीसंदर्भातील कागदपत्रे मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर सीलबंद करुन त्यासंदर्भातील कार्यवृत्त तयार करावे. सदर कार्यवृत्तामध्ये खालील बाबींचा समावेश असावा:-

अ) निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी यांची यादी.

ब) निर्वाचन अधिका-यांनी वरील व्यक्तींना काढता येणारी मेमरी तसेच निवडणुकीसंबंधी कागदपत्रे ठेवलेली पाकिटे सीलबंद करताना सीलवर स्वाक्षरी करण्याची संधी दिली होती याबाबतची नोंद

क) वरीलप्रमाणे ज्या व्यक्तींनी काढता येणा-या मेमरीच्या सीलवर तसेच निवडणूक कागदपत्रे ठेवलेल्या पाकिटांवर स्वाक्ष-या केल्या त्यांची यादी, तसेच ज्या व्यक्तींनी स्वाक्ष-या करण्यास नकार दिला त्यांचीही यादी

१५.२८.२ वरीलप्रमाणे कार्यवृत्त तयार केल्यानंतर त्यावर निर्वाचन अधिकाऱ्याने स्वाक्षरी करावी. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी जे स्वाक्षऱ्या करण्यास इच्छुक असतील त्यांच्याही स्वाक्षऱ्या घ्याव्यात. सदर कार्यवृत्त एका पाकिटात घालून ते सीलबंद करावे व अन्य निवडणूक कागदपत्रांच्या सोबत ठेवावे.

**१५.२९ मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे आयुक्त/ जिल्हाधिकारी /राज्य निवडणूक आयोग यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणे :-**

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर शक्यतोवर त्याच दिवशी अथवा उशिरात उशिरा दुसऱ्या दिवशी दुपारपर्यत मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे ठेवलेल्या लोखंडी पेट्या आयुक्त / जिल्हाधिकारी अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणे आवश्यक असून त्यांनी सदर पेट्या जिल्हा कोषागार अथवा उप कोषागारात अथवा राज्य निवडणूक आयोग निदेश देईल त्यानुसार ठेवण्याची व्यवस्था करावी.

## प्रकरण -१६

## अनामत रक्कम जप्त करणे

**१६.१** जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे. यासंदर्भातील ग्रामविकास विभाग अधिसूचना क्रमांक-ग्रापनि.१००१/प्र.क्र.२४७/०६, दि.१५/०१/२००२ कृपया पहावी. (नियम १७)

| उमेदवाराचा प्रवर्ग | जिल्हा परिषद | पंचायत समिती |
|---|---|---|
| सर्वसाधारण* | रु.१०००/- | रु.७००/- |
| अनुसूचित जाती | रु.५००/- | रु.३५०/- |
| अनुसूचित जमाती | रु.५००/- | रु.३५०/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु.५००/- | रु.३५०/- |

**१६.२** **कायदेशीर तरतूद :** महाराष्ट्र जिल्हा परिषद(मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील नियम ६८ व महाराष्ट्र पंचायत समिती(निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२, नियम ६०ब अन्वये अनुक्रमे नियम १७ व नियम १६-अ नुसार नामनिर्देशन पत्रासोबत जमा करण्यात आलेली अनामत रक्कम हि निवडणूकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, उक्त रक्कम ठेवणाऱ्यास किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीस परत करण्यात आली पाहिजे किंवा शासन जमा करण्यात आली पाहिजे.

**१६.३ अनामत रक्कम परत करण्यासंदर्भातील अटी :**

१६.३.१ खालील उमेदवारांची अनामत रक्कम त्यांना परत मिळू शकेल-

अ) जर उमेदवाराचे नाव निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत दाखविण्यात आले नसेल म्हणजेच ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र अवैध ठरले वा ज्या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली असे उमेदवार

ब ) किंवा मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी जो उमेदवार मृत्यू पावला

क )किंवा जेथे मतदान करण्यात आले अशा निवडणुकीत उमेदवार निवडून आला

ड ) किंवा जेथे मतदान करण्यात आले अशा निवडणुकीत उमेदवार निवडून आला नाही परंतु त्यास मिळालेली वैध मतांची संख्या हि सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येच्या १/८ (एक अष्टमांश) पेक्षा अधिक आहे

१६.३.२ सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येमध्ये NOTA ला मिळालेल्या मतांचा समावेश होणार नाही याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.१२/का-७ दि.१९/५/२०१६ विचारात घ्यावेत.

१६.४ एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे :

१६.४.१ महाराष्ट्र जिल्हा परिषद(मतदार विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ मधील नियम ६७ व महाराष्ट्र पंचायत समिती(निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२, नियम ६०अ अन्वये एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडून आली

अ) तर ती निर्वाचन अधिकाऱ्याने निकाल जाहीर केल्याच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत किंवा

ब) निररिळ्या जागांच्या संदर्भात ती व्यक्ती निवडून आल्याच्या तारखा निरनिराळया असतील तर शेवटच्या निवडणूकीच्या संबंधातील निकालपत्र जाहीर झाल्याच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत लेखी अर्ज करून एका खेरीज सर्व जागांचे राजीनामे देईल.

१६.४.२ उपरोक्त कालावधीत तसे राजीनामे न दिल्यास सर्व जागा रिकाम्या होतील. याची पूर्ण कल्पना उमेदवारास दयावी.

## प्रकरण -१७
## निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यावरील सादर करावयाची माहिती

### १७.१ राज्य निवडणूक आयोगास विविध अहवाल पाठविण्याबाबत

१७.१.१ राज्य निवडणूक आयोगाकडील **आदेश क्र. रानिआ/ जिपपंस/प्र.क्र २०/का-७ दि. २४/१०/२०१६** नुसार निश्चित करण्यात आलेल्या विहित टप्प्यांवर, विहित मुदतीत अहवाल पाठवण्यात यावेत. अहवाल जर गुगल ड्राईव्ह/सॉफ्टवेअर द्वारे शेअर करण्यात आले असतील तर ते प्रत्येक टप्प्यांवर बिनचूक भरण्यात यावेत. ( परिशिष्ट २०(१) ते २०(१०))

१७.१.२ निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेनंतर राज्य निवडणूक आयोगाकडील आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस/२०१६/प्र.क्र.२६/का.७, दि.९/११/२०१६ नुसार आवश्यक कारवाई करून प्रमाणपत्रे जिल्हाधिकारी यांनी विहित मुदतीत दयावीत. ( परिशिष्ट - २१(१) to२१ (३))

१७.२ उपरोक्त सर्व अहवालांचे नमुने तसेच विविध टप्प्यांवरील चेक लिस्ट वा अन्य याद्यांचे नमुने व्यवस्थित अभ्यासावेत. सर्व नमुन्यांचे संगणकीकरण करून ठेवण्यात यावे जेणेकरून विहित मुदतीत अहवाल बिनचूक सादर करणे सोपे होईल. जी माहिती निवडणूक पूर्वतयारी मध्ये संकलित करणे शक्य असेल जसे मतदार संघाचे नाव, लोकसंख्या, प्रभागांची संख्या, मतदान केंद्रांची संख्या वै. ती आधीच भरुन ठेवावी.

१७.३ आयोगाकडे माहिती बिनचूक सादर करणे बंधनकारक आहे व त्यासाठी निर्वाचक अधिकारी जबाबदार राहतील. वारंवार माहिती बदलणे वा चुकीची सादर करणे हा कामातील निष्काळजीपणा म्हणून गृहित धरला जाईल याची दक्षता घ्यावी.

परिशिष्टांची यादी


| परिशिष्ट क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना (जिल्हा परिषद) | १३४-१३५ |
| १अ | निवडणूक कार्यक्रमाची अधिसूचना (पंचायत समिती) | १३६-१३७ |
| २ | नामनिर्देशन पत्र | १३८-१४२ |
| २अ | गुन्हेगारी पार्श्वभूमी, मत्ता व दायित्व याबाबतचे शपथपत्र | १४३-१४९ |
| ३ | अपील नोटीस (जिल्हा परिषद) | १५० |
| ३अ | अपील नोटीस ( पंचायत समिती) | १५१ |
| ४ | उमेदवारी मागे घेण्याची नोटीस | १५२ |
| ४अ | उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची यादी | १५३ |
| ५ | चिन्ह वाटप अधिसूचना | १५४-१५६ |
| ६ | नमुना २अ, २ब (जिल्हा परिषद) | १५७-१५९ |
| ६अ | नमुना २अ, २ब ( पंचायत समिती) | १६०-१६१ |
| ७ | टपाली मतपत्रिका | १६२ |
| ८ | मतपत्रिका नमुना (जिल्हा परिषद) | १६३ |
| ८अ | मतपत्रिका नमुना ( पंचायत समिती) | १६४ |
| ९ | आचारसंहिता आदेश संचीका | १६५-१६७ |
| १०,<br>१०अ(१),<br>१० ब<br>१० क<br>१० क(१)<br>१० ड | आचारसंहिता दैनिक व साप्ताहिक अहवाल | १६८<br>१६९<br>१७०<br>१७१<br>१७२<br>१७३ |
| ११ | मतदान केंद्राध्यक्ष नेमणूक | १७४ |
| १२ | व्हिएम १ ते ५ | १७५-१८० |
| १३ | मतदान साहित्य यादी | १८१-१८३ |
| १४ | मतदान केंद्राध्यक्ष घोषणापत्र (सुरू करतेवेळी) | १८४ |
| १४(१) | मतदान केंद्राध्यक्ष घोषणापत्र (मतदान यंत्र बदलल्यास) | १८५ |
| १४अ | मतदान केंद्राध्यक्ष घोषणापत्र (समाप्तीवेळी) | १८६ |
| १५ | मतदान यंत्र मोहोरबंद करणे | १८७ |
| १६ | आक्षेप फी | १८८-१८९ |
| १६अ<br>१६ब | आक्षेपीत मतदारांची यादी | १९० |
| १७ | मतदान प्रतिनिधी/ मतमोजणी प्रतिनिधी नेमणूक | १९१ |
| १८ | मतमोजणी अंतिम स्थिती दर्शविणारा तक्ता | १९२ |
| १९ | मतमोजणी निकालपत्र | १९३ |
| २० | विवरणपत्र १ ते १० ( आदेश दिनांक २४/१०/२०१६) | १९४-२०७ |
| २१ | प्रमाणपत्र १ ते ३ ( आदेश दिनांक ९/११/२०१६ ) | २०८-२१२ |

## परिशिष्ट-१

## नमुना-१

( नियम ११ पहा )

जिल्हाधिकारी, जिल्हा -------------------- यांचे कार्यालय,

क्रमांक-------------------------

महाराष्ट्र, जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम,१९६२ मधील नियम११, पोटनियम (१-अ) याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी,----------------- -------------------जिल्हाधिकारी---------------------, जिल्हा----------याद्वारे यासोबत असलेल्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या मतदार विभागातर्फे (ज्यांचा यात यापुढे “संबंधित मतदार विभाग” असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) करण्यात येणाऱ्या निवडणुकीच्या संबंधात, पुढील तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे:

(अ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबंधित मतदार विभागांच्या संबंधात नामनिर्देशनासाठी असलेल्या अखेरच्या तारखा व वेळा असतील.

(ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया संबंधित विभागाच्या संबंधात नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यासाठी असलेल्या तारखा व वेळा असतील;

(क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या जागा हया नामनिर्देशन करण्याच्या व त्यांची छाननी करण्याच्या जागा असतील.

(ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखा हया ---------, जिल्हा परिषदेच्या निवडणुकी ज्या तारखांस घेण्यात येतील त्या तारखांस असतील;

(इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ६ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट केलेल्या वेळा हया, ज्या वेळांमध्ये मतदान घेण्यात येईल त्या वेळा असतील;

(फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये संबंधित मतदार विभागांसमोर निर्दिष्ट केलेल्या तारखा व वेळा हया, मतमोजणीसाठी असलेल्या तारखा व वेळा असतील;

(ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ८ मध्ये, संबंधित मतदार विभागासमोर निर्दिष्ट कलेल्या जागा हया, मतमोजणीसाठी असलेल्या जागा असतील.

| मतदार विभागाचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र छाननी करण्यासाठी तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्र सादर करण्याची व त्यांची छाननी करण्याचे ठिकाण | आवश्यक असेल तर ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीसाठी तारीख व वेळ | मतमोजणी करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>इत्यादी | | | | | | | |

दिनांक --------

ठिकाण--------

जिल्हाधिकारी

## परिशिष्ट-१ अ

## नमुना-१

( नियम १३ पहा )

-------------------- जिल्हाधिकाऱ्यांचे यांचे कार्यालय,   क्रमांक---------------------

महाराष्ट्र  पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम,१९६२ मधील नियम १३, पोट-नियम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन मी,-------------------------------------जिल्हाधिकारी--------------------- याद्वारे यासोबतच्या अनुसूचीच्या स्तंभ १ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निर्वाचक गणाकडून ( यात यापुढे यांचा निर्देश “संबंधित निर्वाचक गण” असा करण्यात आलेला आहे) केल्या जाणाऱ्या निवडणुकीच्या संबंधात, पुढीलप्रमाणे तारीख, वेळ व जागा निश्चित करीत आहे:

(अ) संबंधित निर्वाचक गणांसमोर उक्त अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, विनिर्दिष्ट करण्यात आलेली तारीख व वेळ ही संबंधित निर्वाचक गणांच्या संबंधातील नामनिर्देशन पत्रे सादर करण्यासाठी अखेरीची तारीख व वेळ असेल;

(ब) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख आणि वेळ संबंधित निर्वाचक गणाच्या बाबतीत नामनिर्देशनपत्राच्या छाननीसाठीची तारीख व वेळ असेल;

(क) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, नामनिर्देशनपत्रे सादर करण्याची  आणि त्याची छाननी करण्याची ठिकाणे असतील.

(ड) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ५ मध्ये, संबंधित निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली तारीख ही ---------, पंचायत समितीसाठी व्यक्तीची निवडणूक ज्या तारखेस घेण्यात येईल ती तारीख  असेल;

(इ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ६ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली वेळ ही, ज्यावेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ असेल;

(फ) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ७ मध्ये निर्वाचक गणापुढे विनिर्दिष्ट केलेली तारीख व वेळ ही, मतमोजणीची तारीख व वेळ असेल;

(ग) उक्त अनुसूचीच्या स्तंभ ८ मध्ये, निर्वाचक गणापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेली ठिकाणे ही, मतमोजणीची ठिकाणे असतील.

| निर्वाचक गणाचे नाव | नामनिर्देशनपत्र सादर करण्यासाठी शेवटची तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रांची छाननी करावयाच्या तारीख व वेळ | नामनिर्देशनपत्रे सादर करणे व व त्यांची छाननी करणे यासाठीची जागा | आवश्यकता असल्यास, ज्या तारखेस मतदान घेण्यात येईल ती तारीख | ज्या वेळी मतदान घेण्यात येईल ती वेळ | मतमोजणीची तारीख व वेळ | मतमोजणीची ठिकाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>इत्यादी | | | | | | | |

दिनांक --------

ठिकाण -------- जिल्हाधिकारी

## परिशिष्ट-२

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस/२०१५/प्र.क्र.५१/का.७, दिनांक २१/०४/२०१६ सोबतचे सहपत्र)

अनुसूची-१ (१/५)

# नामनिर्देशनपत्र (जिल्हा परिषद / पंचायत समिती)

## (सूचनकाने भरावयाचे)
## भाग एक

मी, याद्वारे;

जिल्हा परिषद / पंचायत समिती : --------------------------------

निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक व नाव : ----------------------------------------------मधून निवडणुकीकरिता ---------------------------------------- यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

१) उमेदवाराचे नाव : --------------------------------------------------

२) उमेदवाराच्या वडीलांचे /पतीचे नाव : --------------------------------------------------

३) लिंग : पुरुष / स्त्री / इतर

४) जन्मतारीख व वय : -----/-------/------ , ------ वर्षे------- महिने

५) व्यवसाय / धंदा : --------------------------------------------------

६) संपूर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता( : --------------------------------------------------

--------------------------------------------------

-----------------------------------------------------

७) उमेदवाराचा मतदार यादीतील तपशील

अ) नाव : ------------------------------------

ब) निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक व नाव : ------------------------------------

क) यादी भाग क्रमांक : ------------------------------------

ड) अनुक्रमांक : ------------------------------------

८) उमेदवाराचा प्रवर्ग : (राखीव जागेची निवडणूक असल्यास)

* अनुसूचित जाती ☐ प्रवर्ग -------------- धर्म ---------

अनुसूचित जमाती ☐ प्रवर्ग ---------------

नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग ☐ प्रवर्ग ---------------

* (अनुसूचित जातीच्या उमेदवाराच्या बाबतीत धर्म नमूद करावा)

९) महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय ? : -------------------------------------

१०) मतदार यादीमधील सूचकाचा तपशील -

अ) सूचकाचे नाव : -----------------------------------

ब) निवडणूक विभाग /निर्वाचक गण क्रमांक व नाव : -----------------------------------

क) यादी भाग क्रमांक : -----------------------------------

ड) अनुक्रमांक : -----------------------------------

दिनांक : (सूचकाची सही किंवा अंगठयाचा ठसा)

## उमेदवाराचे प्रतिज्ञापन

मी, याद्वारे सूचित करतो/करते की, निवडून आल्यास जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा)

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र

मी, याद्वारे असे घोषित करतो/करते की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, मी असेही घोषित करतो/करते की,

(अ) माझ्या वयाची -------- वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १६ मधील तरतुदीनुसार मी जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही.

(क) मी जिल्हा परिषद /पंचायत समितीचा ठेकेदार नाही.

(ड) मी जिल्हा परिषद/ पंचायत समिती नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

दिनांक : उमेदवाराची सही किंवा
अंगठयाचा ठसा
नाव ------------------------------

जिल्हा परिषद निवडणूक विभाग/ पंचायत समिती निर्वाचक गणाचा क्र व नाव-----------------

## भाग दोन
## (निवडणूक चिन्हांच्या निवडीबाबतचे घोषणापत्र)
*( उमेदवाराने भरावयाचे)*

मी, याद्वारे आणखी असे घोषित करतो/करते की, --

(अ) मी, या निवडणुकीमध्ये ------------------------ पक्ष ( राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडे नोंदणी झालेल्या पक्षाचे नाव ) यांच्यातर्फे उभा आहे.

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :---

(१) --------------------

(२)--------------------

(३)--------------------

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा

टिपा :- (१) उमेदवारास कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केले नसल्यास व तो अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असल्यास बाब (अ) खोडून टाकावी.

(२) प्रत्येक उमेदवाराने, मग त्याला कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केलेले असो वा नसो, बाब (ब) मधील तीन चिन्हे निर्दिष्ट करावयाची आहेत.

# भाग तीन

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ----------------------

हे नामनिर्देशनपत्र, उमेदवाराने / उमेदवाराच्या सूचकाने ----------------- रोजी (दिनांक( ----------------- वाजता (वेळ( माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

**नामनिर्देशनपत्र स्वीकारणाऱ्या किंवा फेटाळणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा निर्णय**

मी, ----------------------- अधिनियमाच्या कलम ------------------ नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :--

---

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

## भाग चार

(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस यांची पोहोच)
(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक ----------------------

-------------जिल्हा परिषद /पंचायत समितीच्या -------- निवडणूक विभाग / निर्वाचक गणामधील निवडणुकीसाठी असलेले उमेदवार ----------------------------------------------- यांचे नामनिर्देशनपत्र ------------------------- (दिनांक( रोजी ---------(वेळ( वाजता उमेदवाराकडून / उमेदवाराच्या सूचकाकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले आहे.

सर्व नामनिर्देशनपत्रांची --------------------(ठिकाण) येथे -------------(दिनांक) रोजी -------(वेळ) वाजता छाननी करण्यात येईल.

दिनांक : निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही

# जिल्हा परिषद/ पंचायत समिती निवडणूक
# नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने द्यावयाचे शपथपत्र

मी खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो / सांगते की,

**(१) वैयक्तिक माहिती –**

अ) नाव : ------------------------------------------

ब) वडीलांचे / पतीचे नाव : ------------------------------------------

क) लिंग : पुरुष / स्त्री / इतर

ड) जन्मतारीख व वय : -----/-------/------ , ------ वर्षे------- महिने

इ) व्यवसाय / धंदा : -----------------------------------------

फ) संपूर्ण पत्ता (पोस्टाचा पत्ता( : -----------------------------------------

ग) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक: --------------------------------------------

ह) ई-मेल आयडी : --------------------------------------------

**(२) निवडणूक लढवू इच्छितो त्या जागेचा तपशील :**

जिल्हा परिषद / पंचायत समितीचे नाव : -----------------------

निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव : -----------------------

**(३) जातीबाबतचा तपशील –**

अ) जातीचा प्रवर्ग : -------------------
(अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/
नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग)

ब) जात : -------------------

क) जात प्रमाणपत्र : देणारा अधिकारी : ------------------- दिनांक : ------------

ड) जात वैधता प्रमाणपत्र : देणारा अधिकारी : ------------------- दिनांक : ------------

इ) जात वैधता प्रमाणपत्र नसेल तर उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्रासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाच्या पोचपावतीचा तपशील : --------------------------

**(४) मतदार यादीतील माझा तपशील –**

अ) नाव : --------------------------------

ब) निवडणूक विभाग /निर्वाचक गण क्रमांक व नाव : --------------------------------

क) यादी भाग क्रमांक : --------------------------------

ड) अनुक्रमांक : --------------------------------

**(५) माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे –**

| अ.क्र. | शिक्षण | विद्यालय / विश्वविद्यालयाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| कमाल शैक्षणिक अर्हता नमूद करावी. धारण केलेल्या पदवी /पदविका / प्रमाणपत्र यांचे संपूर्ण नाव नमूद करावे. | | | |

**(६) अपत्यांची संख्या –**

अ) आज रोजी असलेल्या अपत्यांची संख्या ----------

ब) त्यापैकी दिनांक १२ सप्टेंबर ,२००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या व त्यांच्या जन्मतारखा ----------

**(७) गुन्हेगारी पार्श्वभूमी –**

अ) मला दोषसिध्दीनंतर दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता कैद होऊ शकेल अशा अपराधांचा माझ्यावर आरोप आहे/नाही व त्याबाबत आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे/नाही. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(जिथे दोन वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरिता शिक्षा होऊ शकेल अशा प्रलंबित प्रकरणांचा तपशील येथे द्यावा.)

| अ. क्र. | ज्या न्यायालयाने दखल घेतली आहे त्या न्यायालयाचे नांव | दावा क्रमांक | न्यायालयाने दखल घेतलेल्या आदेशाचा दिनांक | कायद्याचे कलम व दखल घेण्यात आलेल्या गुन्हयांचा तपशील |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

ब) मला खालील अपराधांसाठी दोषी ठरविण्यात आले आहे. (ज्या अपराधांच्या अपराध सिध्दीमुळे आणि शिक्षेमुळे मला निवडणूक लढविण्याकरिता अपात्र ठरविता येईल अशा अपराधांव्यतिरिक्त) आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीच्या कारावासाची शिक्षा देण्यात आली आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | दावा क्रमांक | न्यायालयीन आदेशाचा दिनांक | कायद्याचे कलम व दोषी ठरविण्यात आलेल्या गुन्हयांचा तपशील | दखल घेतलेल्या उपरोक्त आदेशाच्या विरोधात केलेल्या अपील (ले)/ पुनरिक्षण (णे) इत्यादीबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

**(८) व्यवसाय किंवा कामधंदा याचा तपशील :-**

(अ) स्वत: : -----------------------------------------------------

(ब) पती/पत्नी : -----------------------------------------------------

**(९) वार्षिक उत्पन्नाबाबतचा तपशील :-**

| अ.क्र. | तपशील | पॅन क्रमांक | आयकर रिटर्न भरणा केलेले मागील वर्ष | आयकर रिटर्नमध्ये दर्शविलेले एकूण वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १. | उमेदवाराचे | | | |
| २. | उमेदवाराचे पती/पत्नी | | | |
| ३. | अवलंबित व्यक्ती -१ | | | |
| ४. | अवलंबित व्यक्ती -२ | | | |

## (१०) मत्ता व दायित्व यांचा तपशील –

### (i) जंगम मालमत्तेचा तपशील

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. | वर्णन | स्वत: | पती / पत्नीचे नाव | अवलंबित-१ चे नाव | अवलंबित-२ चे नाव | अवलंबित-३ इ.चे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रक्कम | | | | | |
| २ | बँक वित्तीय संस्था व बँकेव्यतिरिक्त वित्तीय कंपन्यामधील ठेवी | | | | | |
| ३ | कंपन्यांमधील बंधपत्रे, कर्जरोखे व भाग | | | | | |
| ४ | इतर वित्तीय दस्तऐवज,राष्टीय बचत प्रमाणपत्रे पोस्टाच्या बचती, एलआयसी पॉलिसी इ. | | | | | |
| ५ | मोटार वाहने (बनावटीचा तपशील इत्यादी) | | | | | |
| ६ | जडजवाहीर (वजन व मूल्य यांचा तपशील) | | | | | |
| ७ | दाव्यांचे / व्याजांचे मूल्य यासारखी इतर मालमत्ता | | | | | |

## (ii) स्थावर मालमत्तेचा तपशील

(टिप- संयुक्त मालकीच्या संपत्तीमध्ये मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. | वर्णन | स्वत: | पती / पत्नीचे नाव | अवलंबित-१ चे नाव | अवलंबित-२ चे नाव | अवलंबित-३ इ.चे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि जमीन<br>- स्थान (ने)<br>- सर्वे /गट क्रमांक<br>- क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>- सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| २ | अकृषिक जमीन<br>- स्थान (ने)<br>- सर्वे /गट क्रमांक<br>- क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>- सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| ३ | इमारती (व्यापारी व निवासी)<br>- स्थान (ने)<br>- सर्वे /गट क्रमांक<br>- क्षेत्रफळ (एकूण मोजमाप)<br>- सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| ४ | घरे / सदनिका इत्यादी<br>- स्थान (ने)<br>- सर्वे /गट क्रमांक<br>- क्षेत्रफळ (एकूण मोजमाप)<br>- सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| ५ | इतर (संपत्तीमधील हक्क या सारखे) | | | | | |

### (iii) मी देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय /निमशासकीय संस्थांकडील दायित्वे / थकीत रकमा यांचा तपशील

(टिप- संयुक्त मालकीच्या संपत्तीमध्ये मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. | वर्णन | स्वत: | पती / पत्नीचे नाव | अवलंबित-१ चे नाव | अवलंबित-२ चे नाव | अवलंबित-३ इ.चे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | १. बँकाकडून कर्जे | | | | | |
| | २. वित्तीय संस्थांकडून कर्जे | | | | | |
| | ३.शासकीय/ निमशासकीय देणी | | | | | |
| (ब) | १. आयकर (अधिभारासह) | | | | | |
| | २. संपत्ती कर | | | | | |
| | ३. सेवा कर | | | | | |
| | ४. मालमत्ता कर | | | | | |
| | ५. विक्रीकर | | | | | |
| | ६. इतर देणी | | | | | |

**(११) मी शपथेवर सांगतो / सांगते की –**

(i) वरील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातील कोणताही भाग खोटा नसून, त्यामध्ये कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

(ii) दिनांक १२ सप्टेंबर, २००१ नंतर माझ्या एकूण मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

(iii) निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि मी जिल्हा परिषद / पंचायत समितीचा सदस्य राहण्यास अनर्ह / अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

(iv) निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या कालावधीमध्ये निवडणूक खर्चाचा हिशोब विहित पध्दतीने सादर न केल्यास मी जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य राहण्यास अनर्ह / अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

(v) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १६ मधील तरतुदींचे मी वाचन केले असून त्यानुसार मी जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही.

स्थळ :
दिनांक : ( उमेदवाराची सही किंवा अंगठयाचा ठसा )

**पडताळणी**

मी वर नमूद केलेला अधिसाक्षी, तपासणी करुन घोषित करतो/करते की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातला कोणताही भाग खोटा नसून, त्यापासून कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

..................... येथे दिनांक.................... माहे............... २० रोजी तपासले.

स्थळ:

अभिसाक्षी
माझ्यापुढे तपासले
दिनांक : (तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम शिक्का)

## परिशिष्ट -३

## अपिलाची नोटीस

## (नियम २०(२) पहा)

मी, याद्वारे अधिसूचित करतो की, ---------------------- जिल्हा परिषदेच्या ------------------------- निवडणूक विभागातील उमेदवार, श्री / श्रीमती ------------------------------ यांनी, श्री.श्रीमती.----------------------- यांचे नामनिर्देशनपत्र नाकारल्याबद्दलच्या / नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात आल्याबद्दलच्या, माझ्या निर्णयाविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा निवडणूक नियम, १९६२ याच्या नियम २०, पोट-नियम (२) अन्वये जिल्हा न्यायालयाकडे अपील सादर केले आहे.

मी, याद्वारे आणखी असे अधिसूचित करतो की, -------------------- जिल्हा न्यायालयापुढील उक्त अपीलाच्या सुनावणीच्या कामकाजास, ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे---------- रोजी सुरुवात करण्यात येईल.

अपीलाच्या विनंती-अर्जाची प्रत निर्वाचन अधिकाऱ्याकडे मिळू शकेल आणि प्रतिवादी व्यक्तीस (किंवा व्यक्तींना) ती निर्वाचन अधिकाऱ्याकडून घेता येईल.

दिनांक---------

ठिकाण--------

निर्वाचन अधिकारी

ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली आहेत त्या उमेदवारांच्या यादीच्या प्रतींसह या नोटीशीची प्रत---------- जिल्हा न्यायालयाकडे अग्रेषित करण्यात येत आहे.

## परिशिष्ट -३ अ

## अपिलाची नोटीस

## (नियम १९-अ पहा)

मी, याद्वारे अशी नोटीस देतो की,श्री/श्रीमती ----------------यांचे नामनिर्देशनपत्र स्वीकारल्याबद्दलच्या/ नामनिर्देशनपत्र नाकारल्याबद्दलच्या माझ्या निर्णयाविरुध्द, ----- गटातील -------- ----------------- निवडणूक विभागातील--------------- निर्वाचक गणामधून होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवार असलेल्या श्री / श्रीमती ------------------------------ यांनी, महाराष्ट्र पंचायत समित्या निवडणूक नियम, १९६२ च्या नियम १९-अ, पोट-नियम (२) अन्वये -------- च्या जिल्हा न्यायालयाकडे अपील सादर केले आहे.

मी, याद्वारे आणखी असे अधिसूचित करतो की, उक्त अपीलाची सुनावणी ---------- जिल्हा न्यायालयापुढे, या नोटिशीच्या प्रसिध्दीच्या दिनांकानंतर तिसऱ्या दिवशी म्हणजे---------- रोजी सुरु होईल.

अपीलविषयक विनंतीअर्जाची प्रत निर्वाचक अधिकाऱ्याकडे उपलब्ध आहे आणि ती उत्तरवादी (किंवा उत्तरवादींना) निर्वाचन अधिकाऱ्याच्या कार्यालयातून घेता येईल.

दिनांक---------

ठिकाण--------                                        निर्वाचन अधिकारी

ज्यांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात आली त्या उमेदवारांच्या यादीच्या प्रतींसह प्रत---------- जिल्हा न्यायालय, ------------- यांजकडे पाठविण्यात आली.

## परिशिष्ट - ४

(नियम -२० ची तरतूद पहा)

उमेदवारी मागे घेणेबाबतची नोटीस

...........जिल्हा परिषद/पंचायत समिती ................निवडणूक विभाग/निर्वाचक गण सार्वत्रिक / पोट निवडणूक -२०

प्रति,
निर्वाचक अधिकारी,
............निवडणूक विभाग/............निर्वाचक गण

मी, श्री/ श्रीम................................................., हा उपरोक्त निवडणूकीत वैधरित्या नामनिर्देशीत होणारा उमेदवार असुन, मी माझी उमेदवारी स्वमर्जीने मागे घेत असून त्याकामी सदर नोटिस देत आहे. माझ्यावर याबाबत कोणतेही दडपण आणण्यात आलेले नाही.

ठिकाण :............
दिनांक :.............

वैधरित्या नामनिर्देशीत होणाऱ्या
उमेदवाराची सही व नाव

-x-x-x-x-

सदरची नोटिस, मला माझ्या निवडणूक कार्यालयात.......................... ................आज दि................रोजी ठिक...........(वेळ)वा. श्री/श्रीम. ....... ...............*(नाव) यांनी सादर केली आहे.

दिनांक.................

निर्वाचक अधिकारी,
............निवडणूक विभाग/
............निर्वाचक गण

*उमेदवार/उमेदवाराचा सुचक/ उमेदवाराचा निवडणूक प्रतिनीधीचे नाव

.......................................................................................................

उमेदवारी मागे घेणेबाबतची नोटिशीबाबतची पोहच

(नोटिस सादर करणाऱ्या व्यक्तिस देणे)

उमेदवारी मागे घेणेबाबतची श्री/ श्रीम.................................................( उपरोक्त निवडणूकीत वैधरित्या नामनिर्देशीत होणारा उमेदवार), यांची नोटिस श्री/श्रीम. ....... ...............*(नाव) यांनी माझ्या निवडणूक कार्यालयात.......................... ................आज दि................रोजी ठिक...........(वेळ)वा. सादर केली आहे.

ठिकाण :............
दिनांक :............

निर्वाचक अधिकारी,
......निवडणूक विभाग/..........निर्वाचक गण

*उमेदवार/उमेदवाराचा सुचक/ उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधीचे नाव

परिशिष्ट -४ अ

(नियम -२०(५) ची तरतूद पहा)

उमेदवारी मागे घेणाऱ्या उमेदवारांची यादी

...........जिल्हा परिषद/पंचायत समिती ................निवडणूक विभाग/निर्वाचक गण

सार्वत्रिक / पोट निवडणूक -२०

वैधरित्या नामनिर्देशीत होणाऱ्या खालील उमेदवाराने/ उमेदवारांनी उपरोक्त निवडणुकीतून उमेदवारी मागे घेणेबाबतची नोटीस दिली आहे

| अ.क्र | वैधरित्या नामनिर्देशीत होणाऱ्या उमेदवाराचे नाव | वैधरित्या नामनिर्देशीत होणाऱ्या उमेदवाराचे पत्ता | शेरा |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

ठिकाण :............

दिनांक :.............

निर्वाचक अधिकारी

.....निवडणूक विभाग/......निर्वाचक गण

परिशिष्ट-५

चिन्ह वाटप अधिसूचना



## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.

दिनांक ३१ मार्च २००९

### आदेश

**महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९**

भारतीय संविधानाच्या भाग नऊ व नऊ (अ) अनुसार गठित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप, व इतर अनुषंगिक बाबींविषयीचे आदेश.

क्रमांक एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का.११.— ज्याअर्थी, भारताच्या संविधानाने राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील पंचायती व नगरपालिकांच्या निवडणुका घेणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, पारदर्शकतेने आणि प्रभाविपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना चिन्हांचे विनिर्देश, आरक्षण, निवड व वाटप यासंबंधी व इतर अनुषंगिक बाबींची तरतूद करणे आवश्यक झाल्यामुळे ; राज्य निवडणूक आयोगाने, आदेश क्रमांक एसईसी/जीइएन. २०००/सीआर-६०/का.-१०, दिनांक २९ सप्टेंबर २००६ रोजी निर्गमित केलेले, महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण वाटप) आदेश, २००६ अन्वये (त्या आदेशात वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार) राज्यातील पंचायती व नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप याबाबत आणि त्यासंबंधी इतर तरतुदी केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेशामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे ;

त्याअर्थी आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-२४३ के व २४३ झेडए व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम ९अ व महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक गट व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१) व महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१), मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई तीन) च्या कलम १८-ए चे पोट-कलम (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ चे पोट-कलम (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा सी.पी.एन्ड बेरार २) च्या कलम ९ ब चे पोट-कलम (४) व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम १०-ए चे पोट-कलम (४), महाराष्ट्र नगर परिषद व नगरपंचायत निवडणूक नियम, १९६६ च्या नियम १६ चे पोट-नियम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकी संबंधीचे आरक्षण व चिन्हांचे वाटपासंबंधीचे अगोदरचे सर्व आदेश अधिक्रमित करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र याद्वारे खालील आदेश देत आहे.—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ .**—(१) या आदेशास महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ असे म्हटले जाईल.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर राहील व जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकांना तो लागू राहील.

(३) सदर आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून अंमलात येईल.

२. **व्याख्या व निर्वाचन.**—या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "**आयोग**" म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र ;

(२) "**निर्वाचन क्षेत्र**" म्हणजे जिल्हा परिषदेचा मतदार गट, पंचायत समितीचा मतदार गण व महानगरपालिकेचा, नगरपरिषदेचा किंवा यथास्थिती नगरपंचायतीचा प्रभाग ;

(३) "**लढविण्यात येणारी निवडणूक**" म्हणजे ज्या निवडणुकीत जिल्हा परिषद मतदार गट, पंचायत समिती मतदार गण व महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचा प्रभाग जेथे सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकांसाठी मतदान घेण्यात येते अशी निवडणूक ;

(४) "**निवडणूक**" म्हणजे सार्वत्रिक निवडणूक किंवा पोटनिवडणूक ज्यास हे आदेश लागू आहेत ;

(५) "**सार्वत्रिक निवडणूक**" म्हणजे हा आदेश लागू झाल्यानंतर राज्यात जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायती स्थापन करण्याच्या प्रयोजनाकरिता घेतलेली कोणतीही सार्वत्रिक निवडणूक ;

(६) "**स्थानिक स्वराज्य संस्था**" म्हणजे .—

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठीत जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती ;

(ब) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठीत नगरपरिषद किंवा नगरपंचायत ;

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये गठीत मुंबई महानगरपालिका ;

(ड) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये गठीत नागपूर महानगरपालिका

किंवा

(३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये गठीत करण्यात आलेली कोणतीही महानगरपालिका ;

(७) **" मान्यताप्राप्त राजकीय पक्ष "** म्हणजे भारत निवडणूक आयोगाद्वारे काढण्यात आलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८, आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि तसेच, राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेला राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष ;

(८) **" नोंदणीकृत राजकीय पक्ष "** म्हणजे आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला भारतीय नागरिकांचा संघ/समूह.

(९) या आदेशात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्वात असणा-या कोणत्याही अधिनियमात किंवा त्याअन्वये तयार केलेल्या नियमाद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील.

३. **चिन्हांचे वाटप.—** लढविण्यात येणा-या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला या आदेशातील तरतुदीनुसार चिन्हांचे वाटप करण्यात येईल, व एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविणाऱ्या वेगवेगळ्या उमेदवारांना वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

४. **चिन्हांचे वर्गीकरण.—** (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ चिन्हे आरक्षित असतील किंवा मुक्त असतील.

(२) या आदेशात अन्यथा तरतूद असेल त्या व्यतिरिक्त आरक्षित चिन्ह हे मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारासाठी आरक्षित असेल.

(३) आरक्षित चिन्हाव्यतिरिक्त इतर चिन्हे ही मुक्त चिन्हे असतील.

५. **नोंदणीकृत राजकीय पक्षाचे वर्गीकरण:—** या आदेशाच्या प्रयोजनांकरिता व आवश्यकतेनुसार आयोग विनिर्दिष्ट करील अशा इतर प्रयोजनांकरिता राजकीय पक्ष हा मान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष असेल.

ह्या आदेशाच्या प्रयोजनांकरिता " अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष " याचा अर्थ, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरिक्त, आयोगाकडे नोंदविण्यात आलेला कोणताही पक्ष असा आहे.

६. **राष्ट्रीय पक्ष आणि राज्य पक्ष यांच्यातर्फे उभ्या केलेल्या उमेदवारांसाठी चिन्हांची निवड व वाटप.—** (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षाद्वारे उभा करण्यात आलेल्या उमेदवारास भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हाची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राज्य पक्षाद्वारे उभ्या करण्यात आलेल्या उमेदवारास, जरी तो पक्ष राज्यातील पक्ष असो किंवा नसो, भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हांची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल. आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

परंतु असे की, महाराष्ट्र राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या पक्षास त्यांच्याकरिता आरक्षित असलेले चिन्ह देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, जर महाराष्ट्र राज्याबाहेरील एकापेक्षा अधिक राज्यांतील मान्यताप्राप्त राज्य पक्षांकरिता विविध राज्यांत समान चिन्हे आरक्षित करण्यात आली असतील तर राज्य निवडणूक आयोग अशा राज्य पक्षांपैकी ज्या पक्षाचा, महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ च्या परिच्छेद ३ नुसार नोंदणीसाठी अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे प्रथम प्राप्त झाला असेल, फक्त त्याच पक्षाला त्या आरक्षित चिन्हांचे वाटप करील व त्यानंतर नोंदणी अर्ज करणाऱ्या इतर राज्य पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त इतर चिन्हांचे वाटप करील.

(३) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्याही निवडणुकीत, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे निवडणुकीला उभा करण्यात आलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त कोणत्याही इतर उमेदवारास, जरी अशा निवडणुकीत अशा पक्षाद्वारे निवडणुकीला उमेदवार उभा केला नसेल तरी अशा पक्षाकरिता आरक्षित करण्यात आलेल्या चिन्हांची निवड करता येणार नाही किंवा वाटप केले जाणार नाही.

७. **पूर्वी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष असलेल्या व आता अमान्यताप्राप्त असलेल्या पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांना चिन्ह वाटपासंदर्भात द्यावयाची सवलत.—** जर एखादा पक्ष आता अमान्यताप्राप्त पक्ष असेल, तथापि निवडणुकीच्या तारखेच्या घोषणेपूर्वी ६ वर्षे अगोदर असा पक्ष राष्ट्रीय किंवा महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त होता, अशा पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांना जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये, त्या पक्षास, तो पक्ष ज्यावेळी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त पक्ष होता, त्यावेळी जे चिन्ह आरक्षित केलेले होते, त्या पक्षाचे चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या मुक्त चिन्हांच्या यादीमध्ये नसले तरी ते चिन्ह आरक्षित करण्याबाबतची सवलत खालील अटींच्या पूर्ततेनंतर देता येईल :—

(क) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यापासून एका आठवड्याच्या आत अशा पक्षाने त्यांच्यातर्फे उभ्या करण्यात येणाऱ्या उमेदवारांना आरक्षित चिन्ह मिळावे म्हणून आयोगाकडे अर्ज सादर केलेला असावा.

(ख) अशा उमेदवाराने त्यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये तो संबंधित पक्षातर्फे उभा असल्याबाबतची घोषणा केलेली असून, त्याने ह्या आदेशाच्या परिच्छेद ९ मधील तरतुदींची पूर्तता केलेली असावी.

(ग) अशाप्रकारे चिन्ह वाटप करण्याकरिताची विनंती अमान्य करण्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण नाही, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत असेल :

परंतु उपरोक्त परिच्छेदामध्ये काहीही नमूद असले तरी, यापूर्वीच एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्षासाठी चिन्ह राखीव ठेवण्यात आले असेल, तर या परिच्छेदातील तरतुदी लागू होणार नाहीत.

८. **नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभ्या केलेल्या उमेदवारांद्वारे किंवा इतर उमेदवारांद्वारे चिन्हांची निवड व चिन्ह वाटप.**—(१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीस मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त उभ्या राहिलेल्या कोणत्याही उमेदवारास या परिच्छेदात यानंतर नमूद केलेल्या तरतुदीनुसार, आयोगाद्वारे मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी एका चिन्हाची निवड करता येईल व त्यानुसार वाटप करण्यात येईल.

(२) अशा निवडणुकीत एका उमेदवाराद्वारे जर एका मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली, तर निवडणूक निर्णय अधिकारी/निवडणूक अधिकारी यांनी त्या चिन्हाचे उमेदवारास वाटप करावे व इतर चिन्ह देऊ नये.

(३) जर अशा निवडणुकीत अनेक उमेदवारांद्वारे एकाच मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी केवळ एक उमेदवार नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभा केला असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल आणि इतर कोणासही नाही. जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाचे उमेदवार असतील आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरवील आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही ;

९. **एखाद्या उमेदवारास नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे केव्हा समजले जाईल.**—या आदेशाच्या प्रयोजनार्थ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे तेंव्हा समजले जाईल जेंव्हा,—

(१) उमेदवारानी त्याबाबत नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा केलेली असेल तर,

(२) (अ) संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास व संबंधित जिल्हाधिकाऱ्यास किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्ताना तशी लेखी सूचना देण्यात आलेली असेल ;

(एक) उक्त लेखी सूचना ही महाराष्ट्र जिल्हा परिषद निर्वाचक विभागाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी विहीत केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना 'दोन अ' व 'दोन ब' नुसार पाठविण्यात यावी ;

(दोन) उक्त लेखी सूचना ही पंचायत समिती निर्वाचक गणाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना 'दोन अ' व 'दोन ब' नुसार पाठविण्यात यावी ;

(तीन) महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उक्त लेखी सूचना व सूचनापत्र जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्त यांना जोडपत्र एक व जोडपत्र दोन मध्ये विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे पाठविण्यात यावी.

(ब) उक्त सूचनापत्रावर, पक्षाच्या अध्यक्ष, सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने, शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेली असेल. अशा सूचना पत्रावर प्रतिरुप सही असलेली अगर रबर स्टॅम्पची सही असलेली अगर अन्य प्रकारे सही असलेले चालणार नाही. तसेच फॅक्सने अगर अन्य प्रकारेही सूचनापत्र पाठविता येणार नाही. अशा कुठल्याही अन्य प्रकाराने पाठविण्यात आलेली सूचनापत्रे जिल्हाधिकारी अगर निर्वाचन अधिकारी यांनी स्वीकारू नये ;

१०. **चिन्हांची सूची असलेली अधिसूचना.**—आयोग, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या, एक किंवा अधिक अधिसूचनाद्वारे खालील माहिती विनिर्दिष्टित करील.—

(अ) राष्ट्रीय पक्ष

(ब) राज्यस्तरीय पक्ष

(क) इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष आणि त्यांच्यासाठी राखून ठेवलेली चिन्हे

(ड) मुक्त चिन्हांची यादी

११. **सूचना देण्याचे आयोगाचे अधिकार.**—आयोग खालील बाबतीत सूचना व निदेश देऊ शकेल :—

(अ) या आदेशातील कोणत्याही तरतुदी बाबतच्या स्पष्टीकरणाकरिता ;

(ब) अशा कोणत्याही तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी दूर करण्याकरिता ;

(क) निवडणूक चिन्हे आरक्षित ठेवणे व राजकीय पक्षांना त्यांचे वाटप करणे या संबंधात या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेंव्हा ; आणि निवडणुका सुरळीत व सुस्थितीत पार पाडण्यास आयोगास आवश्यक वाटतील अशा योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झाल्यास.

## परिशिष्ट-६

**नमुना २ अ**

(नियम १५-अ पहा )

**राजकीय पक्ष / आघाडी / मोर्चा यांनी उभे केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत व्यक्तींची माहिती कळवणे.**

प्रति,

१. जिल्हाधिकारी

२. निर्वाचन अधिकारी, मतदार विभाग ----------------जिल्हा परिषद----------

विषय : जिल्हा परिषदेची सार्वत्रिक निवडणूक
निवडणूक चिन्हांचे वाटप
उमेदवारांची नावे कळविण्यासाठी व्यक्तींना प्राधिकृत करणे.

महोदय,

मी याव्दारे कळवितो की, वर निर्देश केलेल्या निवडणूकीसाठी पक्षाने उभे करावयाचे प्रस्तावित केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी खालील व्यक्तीस / व्यक्तींना या पक्षाने, जो महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय / राज्यस्तरीय पक्ष आहे. आघाडीने / मोर्चाने प्राधिकृत केले आहे.

| सुचना पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींचे नाव | पक्ष / आघाडी / मोर्चामध्ये धारण केलेले पद | जिल्हा परिषदेच्या ज्या विभागासाठी प्राधिकृत केले आहे त्या मतदार विभागाचे नाव व जिल्हा |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |

२. वरीलप्रमाणे प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या / व्यक्तींच्या स्वाक्षरीचा नमुना पुढीलप्रमाणे आहे.

( १ ) श्री. ------------------------------------ यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -------------------

(दोन) --------------------

(तीन) ------------------

( २ ) श्री.------------------------------------------ यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -------------------

(दोन) --------------------

(तीन) ------------------

( ३ ) श्री.------------------------------------------ यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) -------------------

(दोन) --------------------

(तीन) ------------------

ठिकाण ---------------

तारीख ---------------

आपला विश्वासू

अध्यक्ष/सचिव
पक्षाचे/आघाडीचे/मोर्चाचे नाव
(पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर)

--------------

**नमुना २ ब**

( नियम १५ — अ पहा )

**राजकीय पक्षाने / आघाडीने / मोर्चाने उभे केलेल्या**
**उमेदवारांच्या नावाबाबतची नोटीस**

१. जिल्हाधिकारी -----------------------------------------------

२. निर्वाचन अधिकारी ---------------------------------------------- मतदार विभाग, जिल्हा परिषद-------------------
जिल्हा ----------------------------------

विषय — जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूका
उमेदवार उभे करणे.

महोदय,

मी याव्दारे सूचना देतो की, ------------------------ जिल्हा परिषदेतील -------------------मतदार विभागांच्या येत्या सार्वत्रिक निवडणूकासाठी -------------------------------- पक्षाने / आघाडीने / मोर्चाने खालील व्यक्तींना प्रत्येकी मतदार विभागासमोर दर्शविल्याप्रमाणे उमेदवार म्हणून उभे केले आहे.

| मतदार विभागाचा अनुक्रमांक व नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराचे नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

| जर मान्यताप्राप्त उमेदवारांचे नामनिर्देशन छाननीच्या वेळी अवैध ठरले किंवा त्याने निवडणूकीतून माघार घेतली तर बदली उमेदवाराचे नाव | बदली उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | बदली उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|
| ५ | ६ | ७ |
| | | |

ठिकाण : आपला विश्वासू

तारीख : ( पक्षाच्या / आघाडीच्या / मोर्चाच्या
प्राधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी )

विशेष सूचना * - हे पत्र नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकारी यांचेकडे दिले पाहिजे.

* ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची अधिसूचना- शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०/२०१७, दि.६ जानेवारी, २०१७ अन्वये

(पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर)

## परिशिष्ट-६ अ

### नमुना २-अ

(नियम १५-अ पहा)

**राजकीय पक्ष/ आघाडी / मोर्चा यांनी उभ्या केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत व्यक्तींची माहिती कळविणे.**

प्रति,

(१) जिल्हाधिकारी ..................

(२) निर्वाचन अधिकारी, मतदार विभाग, ......... पंचायत समिती ........ जिल्हा.......

विषय :- पंचायत समिती .......... जिल्हा ........... ची सार्वत्रिक निवडणूक
निवडणूक चिन्हांचे वाटप - उमेदवारांची नावे कळविण्यासाठी व्यक्तींना प्राधिकृत करणे.

महोदय,

मी याद्वारे कळवितो की, वर निर्देश केलेल्या निवडणुकीसाठी पक्षाने उभे करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी खालील व्यक्तीस/व्यक्तींना महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय/राज्यस्तरीय असणाऱ्या पक्षाने / आघाडीने / मोर्चाने प्राधिकृत केले आहे.

| सूचना पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव | पक्ष / आघाडी / मोर्चा मध्ये धारण केलेले पद | पंचायत समितीच्या ज्या गटासाठी व निर्वाचक गणासाठी प्राधिकृत केले आहे तो गट व निर्वाचक गण |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| | | |

२. अशा प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या/व्यक्तींच्या स्वाक्षरीचा नमुना पुढीलप्रमाणे आहे.

(१) श्री.............................. यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक) .............................

(दोन) .........................

(तीन) .............................

(२) श्री.......................... यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक)........................

(दोन)............................

(तीन)........................

(३) श्री.......................... यांच्या स्वाक्षरीचा नमुना

(एक)........................

(दोन)............................

(तीन)........................

आपला विश्वासू

ठिकाण:-

तारीख :-

अध्यक्ष/सचिव

पक्षाचे / आघाडीचे / मोर्चाचे नाव

(पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर)

## नमुना २ ब

(नियम १५-अ पहा)

## राजकीय पक्षाने / आघाडीने / मोर्चाने उभे केलेल्या उमेदवारांच्या नावाबाबतची नोटीस

१. जिल्हाधिकारी.............................

२. निर्वाचन अधिकारी .......... निर्वाचक गण, .............. पंचायत समिती,
जिल्हा .....................

विषय :- पंचायत समिती ......... जिल्हा यांच्या सार्वत्रिक निवडणुका
उमेदवार उभे करणे.

महोदय,

मी याद्वारे सूचना देतो की, .......... पंचायत समिती ......... जिल्हयामधील निर्वाचक गणांच्या आगामी निवडणुकीसाठी ................. पक्षाने/ आघाडीने/मोर्चाने खालील व्यक्तींना प्रत्येक निर्वाचक गणासमोर नमूद करण्यात आल्यानुसार त्यांचा उमेदवार म्हणून उभे केले आहे.

| निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराचे नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | मान्यताप्राप्त उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| | | | |

| (जर मान्यताप्राप्त उमेदवारांचे नामनिर्देशन छाननीच्या वेळी अवैध ठरले किंवा त्याने निवडणुकीतून माघार घेतली तर बदली उमेदवाराचे नाव) | बदली उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | बदली उमेदवाराचा डाक पत्ता |
|---|---|---|
| **५** | **६** | **७** |
| | | |

ठिकाण : आपला विश्वासू

तारीख : (पक्षाच्या /आघाडीच्या / मोर्चाच्या
प्राधिकृत व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी)

विशेष सूचना* — हे पत्र नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत निर्वाचन अधिकारी यांचेकडे दिले पाहिजे.

* ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांची अधिसूचना- शासन राजपत्र असाधारण क्रमांक १०/२०१७, दि.६ जानेवारी, २०१७ अन्वये

(पक्षाची / आघाडीची / मोर्चाची मोहोर)

## परिशिष्ट -७
## टपाली मतपत्रिका

| |
|---|
| ............ जिल्हा परिषद /पंचायत समिती<br>सार्वत्रिक/ पोट निवडणूक, निवडणूक विभाग/ निर्वाचक गण क्र.......<br>टपाली मतपत्रिका<br>मतदार यादीचा भाग क्र.............<br>मतदाराचा अनुक्रमांक .............. |
| |
| |
| |
| ................................................................................................................................ |
| |
| |
| ......................जिल्हा परिषद / ..................पंचायत समिती<br>सार्वत्रिक / पोट निवडणूक, निवडणूक विभाग क्र........ निर्वाचक गण क्र........<br>टपाली मतपत्रिका |
| अबक<br><br>(भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस ) |
| बडइ<br><br>(भारतीय जनता पक्ष ) |
| करम<br><br>(शिवसेना ) |
| वरीलपैकी एकही नाही /None of the Above |

(1) टपाली मतपत्रिकेवर तसेच स्थळप्रतीवर अनुक्रमांक ज्याप्रमाणे सोयीचे असेल त्याप्रमाणे पुढील अथवा

(2) मागील बाजूस डाव्या बाजूला छापण्यात यावा.

परिशिष्ट-८

मतपत्रिकेचा नमुना
(बॅलेटिंग युनिटवरील)

----------- जिल्हा परिषद निवडणूक विभाग क्र.------ ची सार्वत्रिक /पोट निवडणूक सन-------
(पद *) -

| | |
|---|---|
| १. अबक | चिन्ह |
| २. बडइ | चिन्ह |
| ३. करम | चिन्ह |
| वरीलपैकी एकही नाही (None of the Above) | ( NOTA ) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती/अनुसूचित जाती (स्त्री)/अनुसूचित जमाती/अनुसूचित जमाती (स्त्री)/ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री)/सर्वसाधारण/ सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

परिशिष्ट-८अ

मतपत्रिकेचा नमुना

(बॅलेटिंग युनिटवरील)

------------- पंचायत समिती निर्वाचक गण क्र.------ ची सार्वत्रिक /पोट निवडणूक सन------

(पद * ) -

| | |
|---|---|
| १. अबक | चिन्ह |
| २. बडइ | चिन्ह |
| ३. करम | चिन्ह |
| वरीलपैकी एकही नाही (None of the Above) | ( NOTA ) |

* येथे आरक्षण उदा. अनुसूचित जाती/अनुसूचित जाती (स्त्री)/अनुसूचित जमाती/अनुसूचित जमाती (स्त्री)/ नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग /नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (स्त्री)/सर्वसाधारण/ सर्वसाधारण (स्त्री) नमूद करावे.

# परिशिष्ट :९

## आचारसंहितेबाबतचे महत्वपूर्ण आदेश

| आचारसंहिता | | | |
|---|---|---|---|
| आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश | रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.३१/का-६ | १४.१०.२०१६ | सर्व स्था. स्व. सं. |
| **उमेदवाराने निवडणुकीमध्ये करावयाच्या खर्चाबाबत** | | | |
| निवडणुकांकरीता पक्षाने केलेला खर्च संबधित उमेदवारांमध्ये विभागणे व सादर करावयाचे वेळपत्रक | रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का-५ | २८.१२.२००६ | सर्व स्था. स्व. सं. |
| जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी विहित रितीने खर्चाचे हिशोब सादर न केल्यास त्यांना अनर्ह घोषित करण्याबाबतचे अधिकार प्रदान करण्याबाबत | रानिआ/जिपपंस.२०१०/प्र.क्र.९/का.७ | १९.११.२०१० | जि.प./पं.स. |
| स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये उमेदवारांनी करावयाच्या खर्चाची सुधारीत मर्यादा | रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का-५ | ३०.०७.२०११ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांमध्ये उमेदवाराने केलेल्या खर्चाचा हिशोब सादर न केल्यास अनर्ह ठरविण्याबाबत | रानिआ/नप२०१५/प्र.क्र.१०/का.६ | १०.०८.२०१५ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडणूक खर्चाचा हिशोब देण्यासाठी उमेदवाराकरिता “वेळ (Time) आणि रीत (Manner) निश्चित करणेबाबत” | रानिआ/२०१६/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष | १५.१०.२०१६ | सर्व स्था.स्व.सं. |
| उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चाबाबत विवरणपत्रे व शपथपत्रे यांचे नमुने | रानिआ/२०१६/प्र.क्र. १३/का. सं कक्ष | २५.१०.२०१६ | सर्व स्था.स्व.सं. |
| विविध निर्बंध | | | |
| मालमत्ता विद्रुपीकरण यासंदर्भातील आदेश | एसईसी१०९५/सीआर२५/९५/पीआर | २१.०१.१९९५ | सर्व स्था. स्व. सं. |
| मद्यविक्री वरील बंदीबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे निदेश | एसईसी१०९५/सीआर-१/९५/डेस्क-३ | ०७.०३.१९९५ | सर्व स्था. स्व. सं. |
| ध्वनीपेक्षकाच्या वापराबाबत - राज्य निवडणूक आयोगाचे आदेश | एसईसी-१०९५/सीआर-९/ ९५/डेस्क-३ | १८.०३.१९९५ | सर्व स्था. स्व. सं. |
| पोस्टर्स व पॅम्प्लेटची छपाई व प्रसिद्धीवर निर्बंध | एसईसी-१०९५/सीआर-७७/९५/ डेस्क-३ | २८.०८.१९९५ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेच्या कालावधीत येणा-या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत मार्गदर्शक तत्त्वे | स्थास्वसं २०११/ प्र.क्र.२५/का.५ | १६.०३.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| निवडणुक कालावधीत शस्त्र परवानाधारकाकडून शस्त्रे जमा करणेबाबत मार्गदर्शक सुचना | रानिआ/मनपा-२०१५/सं.क्र.२७९/का.५ | ०९.०४.२०१५ | सर्व स्था. स्व. सं. |

| | | | |
|---|---|---|---|
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी लोकप्रतिनिधींना स्वेच्छा निधीतून (Discretionary Grant) खर्च करण्यावर निर्बंध.. | रानिआ-२०१६/लोस्वेनि/प्र.क्र.१२/सं.क. | ०५.१०.२०१६ | सर्व स्था. स्व. सं. |
| **ध्वजारोहणाबाबत** | | | |
| आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत | एसईसी/जीईएन-२००२/ प्र.क्र.१०/का-१० | २५.०१.२००२ | सर्व स्था. स्व. सं. |
| आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत- (महापौर, जिल्हा परिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायतीचे सरपंच) | रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३/का.५ | ११.०१.२०१२ | सर्व स्था. स्व. सं |
| आचारसंहिता कालावधी ध्वजारोहणाबाबत- (जिल्ह्याचे पालक मंत्री) | रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.३/ का.५ | ११.०१.२०१२<br>२४.०१.२०१२ | सर्व स्था. स्व. सं |
| **निवडणुकीसंदर्भातील प्रचार** | | | |
| राजकीय पक्ष,उमेदवार यांच्या इलेक्ट्रॉनिग प्रसार माध्यमाद्वारे (केबल नेटवर्क,स्थानिक वाहिनी)प्रसारीत करण्यात येणा-या मुलाखती इत्यादीबाबत-आदेश | स्थास्वसं-११०३/ प्र.क्र.३२/ का-५ | १७.०३.२००५ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक प्रचारार्थ हद्दीबाहेरुन आलेल्या व्यक्तीनी निवडणुकीचा जाहीर प्रचार कालावधी संपुष्टात आल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक क्षेत्रामध्ये वास्तव्य न करणेबाबत | रानिआ/मनपा-२००९/ प्र.क्र.४/का-५ | ०९.०४.२०१० | सर्व स्था. स्व. सं. |
| महत्त्वाचे राजकीय पुढारी (star Campaigners ) यांच्या प्रचार दौ-याच्या प्रवास खर्चाबाबत | रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/ का-५ | ०८.११.२०११ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणे बाबत | रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.२६/ का-५ | २३.१२.२०११ | सर्व स्था. स्व. सं. |
| निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवारांनी उघडावयाची प्रचार कार्यालये - आदेश | रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.६/का.५ | ०४.०२.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| निवडणुकांमध्ये बॅनर्स, होर्डिंग्ज लावणेबाबत | क्र.रानिआ/मनपा२०११/प्र.क्र. २५/का.५ | ४.०२.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| निवडणूक प्रचाराबाबत | रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.३ /का-५ | १४.०२.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रचारादरम्यान वापरावयाच्या वाहन संख्येबाबत | रानिआ/जिपपंस-२०१६/प्र.क्र.३१/का.७ | १९.१०.२०१६ | सर्व. स्था.स्व.सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांच्या आचारसंहिता कालावधीत उमेदवार / राजकीय पक्ष यांना सभा/प्रचाराकरीता विविध | रानिआ/जिपपंस.२०१६/प्र.क्र.३०/का.७ | २३.११.२०१६ | सर्व स्था. स्व. सं. |

| | | | |
|---|---|---|---|
| परवानग्या देण्याकरीता “एक खिडकी योजना” राबविण्याबाबत. | | | |
| **इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे , पेड न्यूज संदर्भात समिती गठीत करणेबाबत** | | | |
| राजकीय पक्ष,उमेदवार यांच्या इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमाद्वारे (केबल नेटवर्क,स्थानिक वाहिनी)प्रसारीत करण्यात येणा-या मुलाखती इत्यादीबाबत-आदेश | रानिआ/मनपा/२००९/प्र.क्र.१/का.५ | ०६.०१.२००९ | सर्व स्था. स्व. सं. |
| केबल नेटवर्क, स्थानिक वाहिनी प्रसारीत करण्यात येणाऱ्या मुलाखती इत्यादीबाबत-प्रमाणपत्र देण्याकरिता महानरगपालिका / जिल्हाधिकारी कार्यालयात समिती गठीत करण्याबाबत | रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१/का.५ | २२.१२.२०११ | सर्व स्था. स्व. सं. |
| पेड न्यूजबाबत | रानिआ/मनपा/२००९/ प्र.क्र.१/का-५ | १६.०१.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| **आचारसंहिता कालावधीतील विविध बैठकांबाबत** | | | |
| स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता लागू असल्याच्या कालावधीत जिल्हा नियोजन समितीची बैठक घेणेबाबत | रानिआ/ग्रापंनि/२०१२/ प्र.क्र.६/का.८ | २१.०८.२०१२ | सर्व स्था. स्व. सं. |
| स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत लोकशाही दिन साजरा करण्याबाबत | रानिआ/ग्रापंनि/२०१३/प्र.क्र.५/का-८ | ०४.०३.२०१३ | सर्व स्था. स्व. सं. |

**परिशिष्ट-१०**

**नमुना-अ**

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेबाबत साप्ताहिक अहवाल
संपूर्ण जिल्ह्यासाठी (जिल्हा परिषद/पंचायत निवडणूक) एकत्रित अहवाल
अहवाल कालावधी - दिनांक .................. ते दिनांक ....................

**जिल्हा :-**

| अ.क्र. | बाबी | संख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १. | **जप्त केलेली अनधिकृत शस्त्रास्त्रे/स्फोटके** | | |
| | (अ) शस्त्रास्त्रे | | |
| | (ब) स्फोटके, काडतुसे, बॉम्ब | | |
| २. | **धाडी टाकण्यात आलेल्या अवैध शस्त्रास्त्रे निर्मिती केंद्राची संख्या** | | |
| ३. | **परवाना धारक शस्त्रे** | | |
| | (अ) परवाना रद्द केलेली (Cancelled) | | |
| | (ब) जमा केलेली (Deposited) | | |
| | (क) जप्त केलेली (Impounded) | | |
| ४. | **फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०७,११६ खाली स्थानबध्द व्यक्तींची संख्या** | | |
| ५. | **अजामीनपात्र वॉरंट संख्या** | | |
| | (अ) लागू केलेले | | |
| | (ब) प्रलंबित | | |
| ६. | **निवडणूक प्रक्रियेदरम्यान हिंसक घटनांची संख्या** | | |
| | (अ) एकूण मृत | | |
| | (ब) एकूण जखमी | | |
| | (क) मालमत्तेचे नुकसान | | |

दिनांक :

जिल्हाधिकारी / जिल्हा पोलीस अधिक्षक

**टीप:-** मुद्दा क्रमांक-६ बाबत तपशीलवार माहिती नमुना-अ (एक) मध्ये द्यावयाची आहे.

**टीप:-** सदरचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून दररोज घ्यावयाचा असून तो एकत्रित संकलित करुन विभागीय आयुक्त कार्यालयास निवडणूक काळात (साप्ताहिक अहवाल) दर शुक्रवारी दुपारपर्यंत न चुकता पाठवावा.

**परिशिष्ट-१०**
**नमुना-अ-एक**

निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेबाबत साप्ताहिक अहवाल संपूर्ण जिल्ह्याचा
(जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणूक) एकत्रित अहवाल
अहवाल कालावधी - दिनांक .................. ते दिनांक ....................

**जिल्हा :-**

| अ.क्र. | घटनेचा तपशील (प्रत्येक घटनेसाठी स्वतंत्र नमुन्यात माहिती भरावी.) |
|---|---|
| १. | वेळ :- स्थळ:- |
| २. | घटनेचा सारांश |
| ३. | घटनेत समाविष्ट राजकीय पक्ष / उमेदवार अथवा इतर |
| ४. | केलेली कार्यवाही |
| ५. | घटनेतील मृत व जखमींचा तपशील:- मृत:- जखमी:- |
| ६. | मालमत्तेचे नुकसान झाल्यास तपशील |

दिनांक :

जिल्हाधिकारी / पोलीस आयुक्त/जिल्हा पोलीस अधिक्षक

**टीप:-** सदरचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून दररोज घ्यावयाचा असून तो एकत्रित संकलित करुन राज्य निवडणूक आयोग व विभागीय आयुक्त कार्यालयास काळात (साप्ताहिक अहवाल) दर शुक्रवारी दुपारपर्यंत न चुकता पाठवावा.

परिशिष्ट-१०

**नमुना-ब**

निवडणूक काळात आचारसंहिता भंगाबाबत दैनंदिन अहवाल

संपूर्ण जिल्ह्याचा (जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणूक) एकत्रित अहवाल

अहवाल कालावधी - दिनांक ................ (२४ तास आज सकाळी ६.०० ते उद्या सकाळी ६.००)

**जिल्हा :-**

| अ.क्र. | निवडणूक आचारसंहिता भंग विषयक बाबी | प्रकरण संख्या | केलेली कार्यवाही | आचारसंहिता भंग प्रकरणाशी संबंधित राजकीय पक्ष, उमेदवार किंवा इतर याचा प्रकरणनिहाय तपशील |
|---|---|---|---|---|
| १. | **वाहनाचा गैरवापर** | | | |
| | (अ) प्रचार फेरीतील वाहनांबाबत | | | |
| | (ब) मतदानाच्या दिवशी उमेदवारासाठी वाहनाचा वापर | | | |
| | (क) मतदारांना ने-आण करण्यास वाहनाचा गैरवापर | | | |
| | (ड) मतदानाच्या दिवशी बेकायदेशीर शस्त्रास्त्रे व दारूगोळा वाहून नेणे यासाठी वाहनाचा गैरवापर | | | |
| | (इ) दौऱ्यावर असलेल्या मंत्री महोदयांसाठी अथवा निवडणूक संबंधित कामासाठी शासकीय वाहन वापर निर्बंध | | | |
| २. | **उमेदवाराने पोस्टर्स /बॅनर्स लावण्याबाबत** | | | |
| | (अ) निवडणूक प्रचारासंदर्भात उमेदवाराने विना परवाना खाजगी ठिकाणी भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत | | | |
| | (ब) प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर खाजगी मालमत्तेवरील भित्तीपत्रके, बॅनर्स काढून टाकण्याबाबत | | | |
| ३. | **ध्वनीपेक्षकाचा वापर** | | | |
| ४. | विना परवानगी सभा घेणे/सभेमध्ये अडथळा आणेणे/सभेच्या संदर्भात आवश्यक सुविधांची परवानगी न घेणे | | | |
| ५. | मिरवणुकीची वेळ, जागा यासाठी पूर्वपरवानगी न घेणे किंवा स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना आगाऊ माहिती न देता मिरवणुकांचे आयोजन | | | |

दिनांक :

जिल्हाधिकारी

टीप:- सदरचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून दररोज घ्यावयाचा असून तो एकत्रित संकलित करुन राज्य निवडणूक आयोग व विभागीय आयुक्त कार्यालयास न चुकता पाठवावा.

नमुना-क

Daily Activity Report by Flying Squad on seizure of Cash/Other items related Complaints on the date.......................

Name and Designation of the Magistrate ..........................................
Name of the Police Officer..........................................

Reference No.........................................
Name of the Sub-Division.........................
State...........................................................

| Sr. No. | Name of Electoral divisions & Panchayat Samiti/ district | Nature of the complaint/ Information | Name of the person against whom complaint | Cash/ Other Items seized by FS | Cash/Other Items seized by by Other Police authority | FIRs filed | Name of candidate or party with which links found | Name of designation of the authority to whom seized cash/items is handed over | Remark (If any) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| **Description** | | | | **Figure on date of report** | | | | **Progressive figure including the date of report** | |
| 1 | Total amount of cash/other Items seized by Flying Squad | | | | | | | | |
| 2 | Total amount of cash/other Items seized by other Police authority | | | | | | | | |
| 3 | Total of number of complaints of cash/other items, received | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | Total of number of complaints, verified | | | | | | | | |
| 6 | Total of number of complaints, pending | | | | | | | | |
| | Total number of RIRs filed up to the end of the day | | | | | | | | |

**Signature**
**Name & Designation of the Officer in Charge of Flying Squad/Nodal Officer of District Police HQ**

**Note :**

1. The Officer in charge of the Flying Squad will submit the report for each Flying Squad in this format to the Police with copy to RO, General Observer.
2. The Police will send the report to the Nodal Officer in District Headquarter after compiling the data for the electoral division.

परिशिष्ट-१०

नमुना-क (१)

Daily Activity Report by Flying Squad on seizure of Cash/Other items related Complaints on the date.......................

Name and Designation of the Magistrate ............................

Name of the Police Officer.......................................

Reference No........................................

Name of the Sub-Division........................

State...........................................................

| Sr. No. | Name of Electoral divisions & Panchayat Samiti/ district | Nameof the complaint | Party Affiliation, if any | Complaint against (Name) | Party Affiliation, if any | Brief Description of MCC violation issue | Action Taken Report |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |

**Signature**

**Name & Designation of the Officer in Charge of**

**Flying Squad/Nodal Officer of District Police HQ**

**Note :**

1. The Officer in charge of the Flying Squad will submit the report for each Flying Squad in this format to the Police with copy to RO, General Observer.
2. The Police will send the report to the Nodal Officer in District Headquarter after compiling the data for the electoral division.

**Daily Activity Report by Static Surveillance Teamson seizure of Cash/Other items related Complaints on the date......................**

**Name and Designation of the Magistrate .......................................**

**Name of the Designation Police Officer..........................................**

**Place of check post .......................................**

**District........................ State.........................**

| Sr.No. | Name of Electoral divisions & Panchayat Samiti/ district | Name and Address of Persons searched at the check post | Cash/Other Items | FIRs filed | Name of candidate or party having links | Name of designation of the authority to whom cash, goods seized goods are handed over after seizure | Remark s |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| Description | | | | | | figure on date of report | Progressive figure including the date of report |
| A | Total amount of cash seized by SST | | | | | | |
| B | Total amount of other items seized by SST | | | | | | |
| C | No. of FIRs lodged | | | | | | |

**Signature**
**Name & Designation of the Officer in Charge of Static Surveillance Team/Nodal Officer of District Police HQ**

**Note :**

1. The Officer in charge of the Flying Squad will submit the report for each Flying Squad in this format to the Police with copy to RO, General Observer.
2. The Police will send the report to the Nodal Officer in District Headquarter after compiling the data for the electoral division.

## परिशिष्ट -११

### ( प्रकरण १०, परिच्छेद १०.९ )
### मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी नेमणूक आदेश
### (सदरचे आदेश २ प्रतित ठेवावेत)

--------जिल्हापरिषद/पंचायत समीती सार्वत्रिक/पोट निवडणूक -२०...

महाराष्ट्र जिल्हा परिषदा / पंचायत समित्या निवडणूक नियम १९६२ अनुक्रमे नियम ८ व १० मधील तरतुदीनुसार मी, खालील तक्त्यातील रकाना क्र. २ व ३ मध्ये नमूद अधिकाऱ्यांची रकाना क्रमांक , अनुक्रमे मध्ये दर्शविलेल्या मतदान केंद्रासाठी, मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकारी म्हणून नियुक्ती करित आहे.

तसेच मी, नियम ८(३) मध्ये नमूद केलेप्रमाणे आजारपण वा अन्य अनिवार्य कारणामुळे मतदान केंद्राध्यक्षाच्या गैरहजेरीत, रकाना क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या मतदान अधिकाऱ्यास मतदान केंद्राध्यक्षाचे काम पहाण्यास प्राधिकृत करित आहे.

| *मतदान केंद्राचा क्रमांक, नाव व पत्ता | मतदान केंद्राध्यक्षाचे नाव | मतदान अधिकाऱ्याची नावे | मतदान केंद्राध्यक्षाच्या गैरहजेरीत मतदान केंद्राध्यक्षाचे काम पहाण्यास प्राधिकृत मतदान अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |
| | | | |

मतदानाचा दिनांक.......................वेळ सकाळी...........ते..........

मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी ....................येथे पुढील तारखांना प्रशिक्षणवर्गास हजर राहतील.

प्रथम प्रशिक्षण : / /२० रोजी ..........वाजता,
द्वितीय प्रशिक्षण : / /२० रोजी ..........वाजता,
तृतीय प्रशिक्षण : / /२० रोजी ..........वाजता

तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणेकामी दि................रोजी, ..............वाजता, ............................................(ठिकाणाचा पुर्ण पत्ता), तसेच मतदान प्रक्रिया पुर्ण झालेनंतर मतदान यंत्र व इतर साहित्य जमा करणे कामी.............................ठिकाणी हजर राहतील.

*रकाना क्रमांक १ मध्ये नमुद मतदान केंद्र परिच्छेद १०.११ प्रमाणे नमूद केले प्रमाणे मतदान साहित्य वाटपाच्या वेळीच सांगितले जातील.

स्थळ.......................... जिल्हाधिकारी/ निर्वाचक
अधिकारी दिनांक....................... ........निवडणूक विभाग/ निर्वाचक गण यांची सही व शिक्का

**परिशिष्ट : १२ (१)**

**अनुसूची**

**नमुना व्हीएम-१**

**(पहा परिच्छेद १४)**

**मतदार नोंदवही**

..................जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक (जिल्हा........................)

निवडणूक विभाग /निर्वाचक गण क्रमांक.................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव.............................................

| **अ.क्र.**<br>Sr.No. | **मतदारांचा मतदार यादीतील अनुक्रमांक**<br>Sr. No .of elector in elector roll | **मतदाराची स्वाक्षरी/ आंगठयाचा ठसा**<br>Signature /Thumb impression of elector | **अभिप्राय**<br>Remarks |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| इत्यादी | | | |

दिनांक : मतदान केंद्राध्यक्षांची स्वाक्षरी

**परिशिष्ट : १२ (२)**

**अनुसूची**

**नमुना व्हीएम-२**

**(पहा परिच्छेद १८) (नियम-४७)**

**प्रदत्त मतांची यादी**

.................जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक......... (जिल्हा.....................)

निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक........

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव...........................

| अ.क्र. (१) | मतदाराचे नांव (२) | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक (३) | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक (४) | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा (५) |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| १<br>२<br>३<br>४<br>५<br>... | | | | |

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षांची स्वाक्षरी

**परिशिष्ट : १२ (३)**

**नमुना व्हीएम-३**

**(पहा परिच्छेद २१)**

**भाग एक - नोंदविलेल्या मतांचा हिशेब**

.....................जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक (जिल्हा.........)

निवडणूक विभाग/ निर्वाचक गण क्रमांक................. मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.......................

| | | |
|---|---|---|
| | मतदान केंद्राचा क्रमांक व नांव | ...................... |
| | कंट्रोल युनिटचा क्रमांक | ...................... |
| | मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलेट युनिटची संख्या | ...................... |
| १. | मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या | ...................... |
| २. | मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकूण मतदारांची संख्या | ................... |
| ३. | परिच्छेद १८ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या | ................... |
| ४. | परिच्छेद १६) नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या | ................... |
| ५. | मतदान यंत्रामध्ये नोंदविल्या गेलेल्या एकूण मतदारांची संख्या | .................. |
| ६. | वरील अनुक्रमांक-५ मध्ये दाखविलेल्या एकूण मतांची संख्या (अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे, | .................. |
| ७. | परिच्छेद १९ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या | .................. |
| ८. | प्रदत्त मतपत्रिकांची संख्या | .................. |

| | अनुक्रमांक पासून | अनुक्रमांक पर्यंत |
|---|---|---|
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | .......... | ........... |
| (ब) मतदारांना दिलेल्या | .......... | ........... |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | .......... | ........... |

९. कागदी माहोरांचा (पेपर सील) हिशेब-

अनुक्रमांक

पासून पर्यंत

१. पुरविल्या गेलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक पासून ....................पर्यंत......................

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या .........................

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या .........................

४. न वापरलेल्या कागदी मोहोरांचा क्रमांक .........................

जे निर्वाचन अधिकाऱ्यास परत केले. (क्र.२ वजा ३) ........................

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या, असल्यास ........................

ठिकाण : .......................

दिनांक : ........................

मतदान केंद्राध्यक्षाची स्वाक्षरी

मतदान केंद्र क्रमांक......................

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या व नाव

१. ..................२. .................... ३. .................... ४. .................५. ..................

..........................................

मतदान केंद्राध्यक्षांची स्वाक्षरी

## परिशिष्ट : १२ (४)
## नमुना व्हीएम-४
## (पहा परिच्छेद २९)
## भाग दोन-मतमोजणीचा निकाल

..................जिल्हा परिषद / पंचायत समिती निवडणूक/पोट निवडणूक (जिल्हा.....................)

निवडणूक विभाग/निर्वाचक गण क्रमांक ...........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.........................................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव ....................
कंट्रोल युनिटचा क्रमांक..............................
काढण्यात येणाऱ्या मेमरीचा क्रमांक ..........................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलेट युनिटची संख्या ...........................

| अनुक्रमांक (१) | उमेदवाराचे नांव (२) | नोंदविलेल्या मतांची संख्या (३) |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| एकूण | | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे अथवा काही फरक येतो किंवा कसे,

ठिकाण .........................
दिनांक .........................

मतमोजणी पर्यवेक्षकाची सही...........................
उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधीचे.......................
मतमोजणी प्रतिनिधीचे नाव.............................
व पूर्ण सही.................................................

१.
२.
३.
४.
५.

ठिकाण .............
दिनांक .............

निर्वाचन अधिकाऱ्याची सही

**परिशिष्ट : १२ (५)**
**नमुना व्हीएम-५**

**(पहा परिच्छेद १७)**

**(नियम ४५(२) पहा)**

अंध व अपंग मतदारांची यादी

..................जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक(जिल्हा..................)

निवडणूक विभाग / निर्वाचक गण क्रमांक.....................................................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव...........................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक | मतदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक : .................

मतदान केंद्राध्यक्षांची स्वाक्षरी

# परिशिष्ट- १३

## जेथे राज्य निवडणूक आयोगाकडील इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर होईल त्या मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | नियंत्रण युनिट (कंट्रोल युनिटस) | १ |
| २. | मतदान युनिट (बॅलेट युनिट्स) | १ (उमेदवारांच्या संख्येवर अवलंबून) |
| ३. | मतदारांची नोंदवही (नमुना व्हीएम-१) | १ |
| ४. | मतदार स्लीप | मतदारांच्या संख्येवर अवलंबून |
| ५. | मतदार यादीच्या कार्यप्रती | ३ |
| ६. | मतपत्रिका (प्रदत्त मतांसाठी) | २० |
| ७. | पक्की शाई | प्रत्येकी ५ सी.सी.च्या दोन बाटल्या/मार्कर पेन |
| ८. | कंट्रोल युनिटसाठी खूण चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) | ५ |
| ९. | बॅलेट युनिटासाठी खूण चिठ्ठी (ॲड्रेस टॅग) | ४ |
| १०. | स्पेशल टॅग | ३ |
| ११. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासाठी गुलाबी कागदी मोहोर | ४ |
| १२. | पट्टी सील (स्ट्रीप सील) | ३ |
| १३. | बाणफुली चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| १४. | शाई असलेले पॅड (जांभळी) | १ |
| १५. | मतदान केंद्राध्यक्षांसाठी धातूची मोहोर | १ |
| १६. | आगपेटी | १ |
| १७. | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी | १ |
| १८. | विभेदक चिन्ह असलेला रबरी शिक्का | १ |
| **१९.** | **नमुने-** | |
| | १) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी | १ |
| | २) आक्षेपित मतांची यादी | २ |
| | ३) अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना व्हीएम-५) | २ |
| | ४) प्रदत्त मतांची यादी (नमुना व्हीएम-२) | २ |
| | ५) नोंद झालेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-३-भाग-१) | १० (किंवा उमेदवारांची संख्या अधिक ३) |
| | ६) वापरण्यात आलेल्या कागदी मोहोरांचा अभिलेख | २ |
| | ७) आक्षेपित मतांची फी जमा करण्यासाठी पावती | १ पुस्तक |
| | ८) पोलिस ठाणे अंमलदाराला पत्र | ४ |
| | ९) मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणारी घोषणापत्रे<br>मतदान सुरु होण्यापूर्वी, मतदान संपल्यावर,<br>दुसरे मतदान यंत्र वापरताना, यंत्र सील करताना | २ |
| | १०) मतदारांना त्यांच्या वयाविषयी घोषणापत्र करण्यासाठी फॉर्म | २ |

| | | |
|---|---|---|
| | ११) घोषणापत्र दिल्यानंतर मतदान करण्यासाठी दिलेल्या / वयाविषयी घोषणापत्र देण्यास नकार दिलेल्या मतदारांची यादी | २ |
| | १२) अंध व विकलांग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र | ४ |
| | १३) मतदान प्रतिनिधींसाठी पासेस | १० |
| २०. | **लिफाफे-** | |
| | १) लहान लिफाफयांकरीत (सांविधिक लिफाफे) (एस.ई.८) | १ |
| | २) मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीसाठी )(एसई-८) | १ |
| | ३) मतदार यादीच्या इतर प्रतीसाठी (एसई-८) | १ |
| | ४) प्रदत्त मतदानपत्रिका व प्रदत्त मतदाराच्या यादीसाठी | १ |
| | ५) मतदान सुरु होण्यापूर्वी व मतदान संपल्यावर मतदान केंद्राध्यक्षाद्वारे करण्यात येणाऱ्या घोषणापत्र करीता (एसई ७) | १ |
| | ६) नोंद केलेल्या मतांच्या हिशेबासाठी (नमुना व्हीएम-३) (एसई ५) | २ |
| | ७) आक्षेपित मतांच्या यादीसाठी (एसई-५) | १ |
